# संतवीणेचा झंकार

निर्मलकुमार फडकुले



## डॉ. निर्मलकुमार फडकुले यांचे प्रकाशित साहित्य

१) लोकहितवादी : काल आणि कर्तृत्त्व
२) साहित्यवेध
३) संतकवी तुकाराम : अेक चिंतन
४) काही रंग काही रेषा
५) हिरव्या वाटा
६) आनंदाची डहाळी
७) जगायचं कशासाठी?
८) रंग एकेकाचे
९) संत चोखामेळा आणि समकालीन संतांच्या रचना
१०) संतसहवास
११) संताचिया भेटी
१२) अमृतकण कोवळे

**संपादित :**

१) ज्ञानेश्वरी : अध्याय पहिला
२) चिपळूणकरांचे तीन निबंध
३) प्रबोधनातील पाऊल खूणा
४) यात्रिक
५) रत्नकरंड श्रावकाचार

# संतवीणेचा झंकार

निर्मलकुमार फडकुले

सुमेरू प्रकाशन

# संतवीणेचा झंकार

प्रकाशक :

सुमेरू प्रकाशन

डी-६, राजहंस सोसायटी,

टिळकनगर, डोंबिवली (पू) - ४२१ २०१.

दूरध्वनी : (0२५१) ४६५९६८

❐

© : लेखकाधीन

❐

मुद्रक :

श्रीराम प्रिंटींग प्रेस,

ए-२0 वडाळा उद्योग भवन

तळ मजला, वडाळा - ४00 0३१.

❐

मुखपृष्ठ :

एस्व्हीएस् ग्राफिक्स

❐

अक्षर जुळणी :

एस्के एंटरप्रायझेस

डोंबिवली (पू) ४२१ २०१.

❐

प्रथमावृत्ती : जुलै १९९६

❐

किंमत : रु. १00/-

’संतवीणेचा झंकार’ हे प्रा. डॉ. निर्मलकुमार फडकुले लिखित पुस्तक १९९६ साली ‘सुमेरू प्रकाशन’ यांनी २००५ साली प्रकाशित केले. त्या पुस्तकाचे सर्वाधिकार लेखकाचे चिरंजीव व वारस श्री अजित फडकुले  यांच्याकडे आहेत.

त्यांनी ई साहित्य प्रतिष्ठानला याचे ई पुस्तक बनवून विनामूल्य वितरित करण्या्चे कायदेशीर अधिकार दिले आहेत. त्यानुसार आम्ही आमच्या वाचकांना ते पुस्तक विनामूल्य देत असून त्यांनी ते आपल्या ओळखीच्या वाचकांत विनामूल्य वितरित करावे ही विनंती करत आहोत.

या परवानगीसाठी आम्ही

श्री अजित फडकुले :-9422463642

ajitphadkule@hotmail.com

यांचे आभारी आहोत.

ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com
www.esahity.com
www.esahity.in

# संतवीणेचा झंकार

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : श्री. अजित फडकुले यांना फ़ोन किंवा मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाचे चिरंजीव व वारस श्री. अजित फडकुले यांचेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (तुरुंगवास व दंड) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

## ई प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

प्रकाशन : २८ जुलै २०२०

(स्व. श्री. निर्मलकुमार फडकुले स्मृतीदिन)

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी- घेणे आवश्यकआहे.

## पुस्तकं वाचून कोणाला शहाणपण येतं का?

हो! आम्ही म्हणतो हो. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

अनुभवाहून मोठा गुरू नाही. कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. काही प्राण्यांना त्यांचे जन्मदाते थोडं शिक्षण देतात. बाकीचे प्राणी अनुभव घेत घेत शिकतात. फक्त मानवच असा प्राणी आहे ज्याला पुर्वीच्या पिढीतल्या माणसांचे अनुभवही शिकवतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

**अनुभव पुस्तक असतात आणि पुस्तक अनुभवच असते.**

**वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे**.

www.esahity.in आणि www.esahity.com

मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...

...आणि स्वतःही लिहायला हवं.

विश्वधर्माचे अुद्‌गाते, मानवतावादाचे अुपदेशक,

ज्ञान, चारित्र्य आणि तपस्या

यांची संगमभूमी असलेले

परमपूज्य आचार्यश्री विद्यानंदजी महाराज यांना

कृतज्ञतापूर्वक समर्पण

卐

# भूमिका

संतांचं साहित्य हे साऱ्या मानवजातीचं, कधीही नष्ट न होणारं अमूल्य वैभव आहे. कारण या साहित्यात जीवनातल्या शाश्वत सौंदर्याचा आणि सामर्थ्याचा संतांनी नेमका वेध घेतला आहे. जे विचार माणसाला माणुसकीचा चिरंतन सुवास देऊ शकतात, त्या विचारांवर सांप्रदायिकतेचा शिक्का मारणं हे माणसाच्या क्षुद्र बुध्दीचं लक्षण आहे असं मी मानतो. श्रीराम, श्रीकृष्ण, महावीर आणि गौतम बुध्द या महामानवांना एखाद्या विशिष्ट जातीच्या किंवा संप्रदायाच्या चौकटीत बंदिस्त करून ठेवणं हा मला तरी घोर अपराध वाटतो. महापुरुष समजून घेण्यासाठी आपली संकुचित वृत्ती प्रथम सोडावी लागते. त्यांचे असीम विचार आपल्या हृदयांत रुजवण्यासाठी आपल्या मनाची सारी बंद दारं आणि खिडक्या संपूर्णपणे उघडावी लागतात. पण आम्ही आमच्या सीमित दृष्टिकोनातून संत महात्म्यांना पाहू लागतो. आणि मग त्यांच्यावर सुध्दा जाती-पातींचे शिक्के मारून त्यांना कुठल्यातरी कुंपणात बध्द करतो. ज्यांनी सर्व कुंपणं ओलांडली व आपल्या जोमदार पंखांनी भव्य विचारांच्या आकाशात झेप घेतली त्यांना पुन्हा एखाद्या पिंजऱ्यात स्थानबध्द करून ठेवणं ही त्यांची आणि आमचीही दारूण शोकान्तिका आहे.

खरं तर, 'जे जे भेटे भूत ते ते जाणिजे भगवंत', हा सर्वसमावेशक विचार मांडणाऱ्या साधु-संतांच्या दृष्टीत कसलाही भेद नसतो. ते समतेचे आणि ममतेचे पुरस्कर्ते असतात. त्यांच्या हृदयवीणेवर विश्वप्रेमाचे संगीत लहरत असते.

'मित्ति मे सव्व भूदेसु वेरं मज्झम् ण केणवि' हा विचार महावीरांनी जसा मांडला तसाच तो भ. बुध्द आणि संत ज्ञानेश्वर-तुकारामांनीही समाजापुढं ठेवला. प्रवाह अनेक आहेत. पण त्यातलं पाणी एकच आहे. सूर अनेक आहेत. संगीत एकच आहे. रंगरेषा अनेक आहेत. चित्राकृती एकच आहे. दिवे अनेक आहेत. पण ज्योतितत्त्व एकच आहे. रस अनेक असले तरी त्यांचं महाकाव्य एकच आहे. अनंत आकाशाचे जसे तुकडे करता येत नाहीत त्याप्रमाणं महापुरुषांवरही वेगवेगळ्या चिठ्ठया चिकटवता येत नाहीत. त्यांचे कालखंड वेगळे असतील. प्रांत आणि भाषा यांत निराळेपणा असेल पण भाव एकच असतो.

दोन हजार वर्षांपूर्वीचे श्रेष्ठ विचारवंत, तपस्वी, तिरुवल्लुवर आणि आजचे आचार्य विद्यानंदजी यांच्या काळांत व भाषेत अपरिहार्य अंतर असूनही दोघांचं अंतरंग एकच आहे. 'हे विश्वचि माझे घर' असा उदात्त विचार सांगणारे 'संत ज्ञानेश्वर' आणि 'भेदाभेदभ्रम अमंगळ' असा संदेश देणारे संत तुकाराम एकाच तेजाचे भिन्न आविष्कार आहेत. आम्हाला प्रकाशाची उपासना करायची आहे. प्रकाशाचे किरण कोणत्याही खिडकीतून येवोत. खिडकीपेक्षांही त्यातून येणारा उजेड आम्हाला उजळून टाकणारा असतो. म्हणूनच सारे संत – साऱ्या जगातले महापुरुष – ज्यांनी ज्यांनी अहिंसेचा व प्रेमाचा आणि समतेचा संदेश दिला ते सारेच

आम्हाला वंदनीय आहेत. त्यांच्या अंत:करणातील दिव्य संगीताचे आम्ही एकनिष्ठ भक्त आहोत. हे प्रेमसंगीत आमच्या आत्म्यांत एक सुरेल विचारांची लय निर्माण करील.

जाति न पूछो साधुकी । पूछ लीजिये ग्यान ।
मोल करो तरवारका । पडा रहन दो म्यान ॥

संत कबीराचा हा विचार निर्विवाद असूनही क्षुद्र बुध्दीच्या माणसांनी साधुसंतांना देखील जाती आणि संप्रदायांच्या तराजूत तोलण्याचा बेताल प्रयत्न चालवला आहे.

मी माझ्या अल्प अभ्यासाचा आधार घेऊन अनेक साधुसंतांच्या विचारांचा या पुस्तकांत वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांत येशू ख्रिस्त आणि बसवेश्वर आहेत. कबीर, मीरा, तुलसी, नरसी मेहता, नामदेव, चोखा मेळा, जनाबाई, गाडगे महाराज असे वेगवेगळ्या स्तरांतले पण एकाच परमतत्त्वाचा शोध घेत चाललेल्या या संतांच्या हृदयातले 'वीणा झंकार' मी माझ्या परीनं टिपले आहेत. त्यांतील सौंदर्य उलगडून दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. केवळ संतांची वचनं उद्‌धृत करण्यापेक्षा माझ्या मनातल्या विचारांचाही मागोवा घेतला आहे. संतांची भाबडेपणानं स्तुतीस्तोत्रं गात बसणं हे माझं उद्दिष्ट कधीही नव्हतं आणि असणार नाही. संतांनाही तर्कशुध्द चिकित्सेच्या ताजव्यात तोललं पाहिजे. तसे ते तोलले गेले म्हणूनच आज ते वंदनीय आणि अनुकरणीय ठरले.

हे लहान लहान वैचारिक लेख केवळ वाचकांच्या रंजनासाठी लिहिले नाहीत. माझ्या अंतर्मनाची वेदना वाचकांच्याही हृदयाला भिडावी आणि त्यांनीही संत विचारांची साथसंगत करावी हा हेतू ठेवून मी 'सकाळ' या लोकप्रिय दैनिकातून एक वर्षभर लेखन केलं. माझे मित्र व संपादक श्री. विजय कुवळेकर यांनी मला लेखनासाठी प्रेरित केलं. त्यामुळे संत विचारांच्या मुळाशी असलेल्या सौंदर्याचं चिंतन् करू शकलो. चिंतनाच्या वाटेनं जातांना जो आनंद मला मिळाला, त्यातले काही क्षण वाचकांच्या पदरांत टाकण्याचा माझा हा एक प्रयत्न आहे. वाचकांनी 'सकाळ' मधील या लेखनाचं अत्यंत उत्साहानं स्वागत केलं याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. लेखनातून व्यक्त होणारा माझा जीवनवादी दृष्टिकोन वाचकांना मान्य होत आहे याचा मला आनंद वाटला.

प्रस्तुत लेखसंग्रह मी प.पू. आचार्यश्री विद्यानंदजी महाराज या प्रज्ञावंत, विश्वप्रेमी अशा तप:पूत व्यक्तीला अर्पण करीत आहे. कारण त्यांच्या सान्निध्यातले काही क्षण मला नवा प्रकाश देणारे ठरले. कसलाही सांप्रदायिक वा संकीर्ण अभिनिवेश नसलेले हे ज्ञान आणि वात्सल्य यांनी नटलेलं व्यक्तिमत्व आहे. म्हणून त्यांना हे अल्पस्वल्प लेखन नम्रतापूर्वक समर्पित केलं आहे. माझे मित्र श्री. .श्रेणिक अन्नदाते यांनी 'सुमेरू' प्रकाशनाच्या वतीनं स्नेहभावानं, पुस्तक प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारली. 'अमृतकण कोवळे' या पुस्तकानंतर आता 'संतवीणेचा झंकार' हे माझं पुस्तकही तेच प्रकाशित करीत आहेत याचं समाधान वाटतं. ज्ञानेश्वरांच्या रसपूर्ण शब्दांत रसिकांना विनंती करतो –

हे सारस्वताचे गोड । तुम्हीचि लाविलेजी झाड ।
तरी अवधानामृते वाड । सिंपौनि कीजे ॥

**– निर्मलकुमार फडकुले**

# प्रकाशकीय

मानवी जीवनांत आनंद निर्मिती होणे आणि जीवनाला प्रेरणा मिळणे हा सत् साहित्याचा अपरिहार्य परिणाम आहे. संत साहित्याचा तर मूळ गाभा आणि हेतूच सर्व मानवी जीवन, किंबहुना प्राणिजात सुखी व्हावी, परस्पर वात्सल्याने नहावी हाच आहे. महाराष्ट्राची संतांची आणि संत-साहित्याची परंपरा अतिशय समृद्ध आणि दृढमूल आहे. तिचे संस्कारही कमीअधिक प्रमाणात होत असतात.

अलिकडील विज्ञानाच्या प्रगतीने झगमटलेल्या मराठी मनाला 'या संस्काराबाबत' एक नवी जाण आल्याचे जाणवते. विविध-विचित्र परिस्थिती आणि गुंतागुंतीच्या वैचारिक हेलकाव्यातही एक नाजूक पण चिवट विचार-धागा आधुनिक प्रौढ मनाला पकडून ठेवू लागला आहे. हा संत-विचारांचा, सुविचारांचा धागाच अंतर्यामी शांतता, समाधान व प्रेरणा देणारा आहे याची खात्री अधिकांना पटू लागली आहे हे सुचिन्ह.

जबाबदार पत्रकारांना ही जाणीव तीव्रतेने व्हावी हे महाराष्ट्राचे आणि मराठी माणसांचे सौभाग्य समजावे लागेल. त्याच बरोबर संत-विचार दैनंदिन आणि आजच्या सर्व पातळीवर बिघडलेल्या जीवनांगांना स्पर्श करून माणसाला वर उठवू शकतात हे प्रतिपादन नव्याने विचारवंत करू लागलेत हीही स्वागतार्ह घटना आहे.

लोकप्रिय आणि जबाबदार वृत्तपत्रे संतविचारांना यथोचित स्थान देऊन जनमानसाला उचित वळण लावण्याचा स्तुत्य प्रयत्न करीत आहेत. याची इतिहासात नोंद होईल.

डॉ. निर्मलकुमार फडकुले हे संतसाहित्याचे गाढे अभ्यासक, वक्ते आणि प्रवक्तेही. त्यांचा सकाळमधील 'संत-सहवास' अतिशय लोकप्रिय झाला. त्यातील काही शहारून टाकणारे 'वीणा झंकार' आम्हाला शब्दरूपात-ग्रंथस्वरूपात मराठी वाचकांच्या घरात आणि मनात पोहोचवण्याची संधी या 'संतवीणेचा झंकार' पुस्तकाच्या प्रकाशनाने लाभली आहे. सकाळचे लोकहितवादी संपादक श्री. विजय कुवळेकर यांनी आम्हालाही त्यांच्या 'संत' कार्यात सामावून घेतले त्याबद्दल त्यांनाही धन्यवाद.

— श्रेणिक अन्नदाते

# अनुक्रमणिका


आपले जीवन आपल्या हाती ........ १
वाचेवीण बोलावे ........ ३
राजधर्म आणि प्रजाधर्म ........ ५
तंबोऱ्याची तार ........ ७
जीवनाला 'परतत्त्वस्पर्श' व्हावा ........ ९
तुम्हीच आता सज्ञन झालात! ........ ११
काय खावे? किती खावे? ........ १३
आयुष्य मोजावया बैसला मापारी ........ १५
निष्ठांची कवचकुंडले ........ १७
परब्रह्म त्याचे घरी ........ १९
पुण्य विकत मिळते काय? ........ २१
कीर्तनी कैसा वोढवला रंग ........ २३
संयमाचे कुंपण आवश्यक ........ २५
सीमोल्लंघन ........ २७
कोणाही जीवाचा न घडो मत्सर ........ २९
पेरलेले उगवते काय? ........ ३१
मोह : सामान्य आणि असामान्य ........ ३३
श्रीकृष्ण आणि अर्जुन ........ ३५
स्थितप्रज्ञ कोण? ........ ३७
आत्मकल्याण व समाजकल्याण ........ ३९
कष्टेविण फळ नाही ........ ४१
अमृत नासू देऊ नका! ........ ४३
अहिंसा हा जीवनधर्म ........ ४५
जीवनाच्या रंगभूमीवर... ........ ४७
श्रेष्ठ ग्रंथांशी संवाद ........ ४९
सोन्याची बेडी ........ ५१
पेरिल्याविण उगवेना ........ ५३
मन माझे चपळ ........ ५५
ऐसी कळवळ्याची जाती ........ ५७
संतधर्म जीर्ण होत नाही ........ ५९
मी काय मिळवले? ........ ६१
लक्ष्मीपूजन ........ ६३
वैष्णवां संगती सुख ........ ६५
गरज आणि उपभोग ........ ६७
आत्मानंद ........ ६९
संत कवितेची भेट ........ ७१
पेरणारे हात समर्थ व्हावेत ........ ७३
वसंत आहे, तोवर गात राहा ........ ७५

वक्त्याची भावना आणि भाषा ........ ७७
अहंकार हेच अज्ञान ........ ७९
आत्मानुभूती आणि पांडित्य ........ ८१
मनातच आहे तीर्थक्षेत्र ........ ८३
गीता नावाचा कल्पवृक्ष ........ ८५
स्वप्नींचे धन ........ ८७
तरुणांचा धर्म ........ ८९
परमेश्वराची भाषा ........ ९१
शुद्ध करी चित्त ........ ९३
या रणांगणात उभे राहा ........ ९५
प्रार्थना ........ ९७
सद्‌बुद्धि थेकुटी म्हणो नये ........ ९९
आत्मलाभ हेच परमसुख ........ १०१
'मयुराच्या' आर्त 'केका' ........ १०३
दिवस आणि रात्र ........ १०५
समूळ ग्रंथ पाहिल्याविण... ........ १०७
तिघांचे तीन विचार ........ १०९
शरीराची गुलामगिरी ........ १११
कथा गोड विठ्ठलाची ........ ११३
आत्मा बंधू तो आपुला ........ ११५
दु:खातून देवाकडे ........ ११७
ज्ञान की भक्ती? ........ ११९
रामभजनातले सुख ........ १२१
ज्ञानियांचे अज्ञान ........ १२३
संभवामि युगे युगे ........ १२५
साहित्य असे असावे ........ १२७
दुष्टत्वाची कात गळावी ........ १२९
भक्ती की मुक्ती ........ १३१
माझ्याहून कोणी लहान नाही ........ १३३
मुखवट्यांचे जग ........ १३५
खरा तो एकचि धर्म ........ १३७
विकारांचे मुंडण करा ........ १३९
सेंदरी ही दैवतें ........ १४१
नाथा नकोरे अंतरू ........ १४३
कबीरांनी घातलेली साद ........ १४५
प्रेममयी मीरेची भक्ती ........ १४७
अमृत विकूनि कांजी प्याला ........ १४९
या ज्योती पुन्हा पेटवा ........ १५१
आत्मसुगंधाची लाट ........ १५३
गुरूसारखा दाता नाही ........ १५५
निरोप ........ १५७

# आपले जीवन आपल्या हाती

जीवनाचा प्रवाह कधीच सरळ असत नाही. वेडीवाकडी वळणे घेत, खाचखळगे ओलांडीत, वाटेत येणारी इतर संकटे कष्टाने पार करीत हा ओघ वाहत असतो. कधी तो आवेगाने धावतो, कधी त्याची गती अवरुध्द होते, कधी तो संपून जाणार असे वाटते पण पुन्हा तो झुळझुळू लागतो. या प्रवाहाचे पाणी पुष्कळ वेळा दूषित असते. त्यावर शेवाळही माजते. जोपर्यंत त्याच्यात वाहण्याचा गुणधर्म आहे तोपर्यंत पाणी स्वच्छ राहते; पण त्याच्यात फार लवकर विकृती उत्पन्न होऊ शकते. एक दिवस एका अज्ञात अशा काळ्याकुट्ट काळोखात हा ओघ नाहीसा होतो. तो प्रवाह कशासाठी वाहत होता आणि त्याला कोणत्या ठिकाणी पोहोचायचे होते, हे त्याचे त्यालाच कळत नसते. दैवाच्या गतीने चालना मिळणारा हा प्रवाह कुठेतरी भरकटत जातो. म्हणूनच त्याला प्रयोजन असावे, जाणीव असावी, त्याला एक वेळापत्रक असावे असे जीवनप्रवाहाचे तटस्थपणे चिंतन करणाऱ्या तत्त्ववेत्त्यांचे मत आहे. हेतुशून्य जीविताला काहीच अर्थ असत नाही. संत सूरदासाचे एक वचन आहे,

*जनम सब बातनमे बित गयो रे।*
*सुखसंपत माया के कारण ऐसे चलत गयो*
*ना हरिभजना ना गुरुसेवा ना कछु दान दियो।*
*सूरदास मिथ्यातन खोवत जब  ये जमही आन मिल्यो*
*सब दिन गये विषयके हेत सब दिन गये।*

आपले जीवन निरर्थक झाले. विषय विकारांच्या आहारी जाऊन आयुष्याचे अमोलिक क्षण बिनदिक्कत वाऱ्यावर उधळले. आता ते हरवलेले तारुण्यपूर्ण क्षण परत कसे मिळणार? अविचाराने खर्च केलेले ते आयुष्य पुन्हा मिळाले तर त्याचा विनियोग आपण सौंदर्यरूप परमेश्वराची उपासना करण्यात करू असा विचार बहुधा प्रत्येकाच्याच मनात म्हातारपणी येतो.

कदाचित वृध्दपणी डोळ्यांची दृष्टी मंद झाल्यावर मनाचे डोळे अधिक

स्वच्छपणे स्वतःकडे आणि जगाकडे पाहू शकत असावेत. ऐकण्याची शक्ती ओसरली म्हणजे पश्चातापाने विव्हळ झालेल्या मनाचे शब्द स्पष्ट ऐकू येऊ लागतात. विकारी तारुण्य संपुष्टात आल्यावर विचारशील वार्धक्याचा उदय होत असावा. मृत्यूचा किनारा दिसायला लागला म्हणजे बहुमूल्य जीवन आपण कवडीमोलाने काही विकारांना विकून टाकले, पदरातले हिरे लुटू दिले आणि क्षुद्र किंमतीच्या गारगोट्या मात्र पदरात बांधून घेतल्या याची जाणीव होते. एका अर्थाने उशिराने झालेली जाणीवसुध्दा काही अंशी लाभदायक ठरते. काही अभागी असतात, की आपण दिवाळखोर आहोत याचा त्यांना पत्ताच लागत नाही. मरणाचे काटेरी हात गळ्याभोवती आल्यानंतर अखेरच्या क्षणी जागृतीचा एखादा क्षीण किरण कदचित त्यांच्या दृष्टीपर्यंत पोहोचत असेल.

संत सूरदास बाहेरच्या डोळ्यांनी पाहू शकत नव्हते. पण त्यांची अंतर्दृष्टी स्वच्छ आणि भेदक होती. म्हणूनच केवळ इंद्रियांचे हट्ट पुरवण्यात आयुष्य वेचण्याची अज्ञानी प्रवृत्ती त्यांनी धिक्कारली. हरीचे भजन केले नाही, गुरुची सेवा केली नाही. देण्यासारखे काही जवळ असून, ते दुसऱ्याला दिले नाही याबद्दलचा अनुताप त्यांनी वर्णिला आहे.

परमेश्वराच्या भजनपूजनाची सर्वच साधूसंतांची कल्पना व्यापक आहे. विश्वाच्या अणुरेणूत परमेश्वररूपीचे सौंदर्य भरून उरले आहे आणि आपणही त्याच सौंदर्यसागरावरचे एक तरंग आहोत. आपल्याला वेगळे अस्तित्व नाही. परमात्म्याचाच एक अंशभाग आपण आहोत. त्या महनीय ज्ञानसूर्याचा आपणही एक किरण आहोत ही आत्मप्रतीती येण्यासाठी सत्य, शिव आणि सुंदर यांची आराधना भक्तीने करण्यातच जीविताचे सार्थक आहे. मुक्त जीवनाचा हा मंगल प्रवाह महन्मंगल अशा मुक्तीच्या महासागरात विलीन करावा. तेज तेजात मिसळून जावे हा विचार सर्वच ईश्वरोपासकांच्या मनात असतो. आपल्या जीवन प्रवाहाला वळण देणे, तो दूषित होऊ न देणे हे सर्वस्वी आपल्याच हातात असते. कारण आपणच आपले मित्रही असतो आणि शत्रू असतो.

*उध्दरावा सवे आत्मा खचू देऊ नये कधी*
*आत्माचि आपुला बंधू आत्माचि रिपु आपुला*

# वाचेवीण बोलावे

काव्याचा आस्वाद हृदयाने घ्यायचा असतो व तो घेताना त्या काव्याशी समरसता साधायची असते हे पुष्कळाना कळत नाही. कविता ही कवीच्या हृदयस्थ भावसंगीताचे सूर शब्दांतून सहज रीतीने प्रकट करीत असते. ते सूर आपल्या अंतःकरणात धारण करण्यासाठी जिवंत, संवेद्य आणि तरल, सौंदर्यप्रेमी असे मन असले पाहिजे.

संतांची कविता सुध्दा मनाच्या डोळ्यांनीच वाचली पाहिजे. हृदयाच्या कानांनी ऐकली पाहिजे. सर्वांगांनी ती आलिंगिली पाहिजे. कारण भावपूर्ण रसमय कविता म्हणजे कवीचे जीवनच असते. तर्ककठोर चिकित्सेच्या तराजूत रूक्षबुध्दीने कविता तोलणारा माणूस पंडित असला तरी रसिक होऊ शकत नाही. म्हणून तर संतकवी कबीराने 'ज्याला प्रेम ही अ.ीच अक्षरे माहीत नाहीत त्याचे पांडित्य व्यर्थ आहे' असे म्हटले. तुकोबांचा रस.ाळ अभंग, नामदेवांची भक्तीने उत्कट झालेली, कविता, ज्ञानेश्वरांची सौंदर्याच्या गंगेत न्हाऊन शुचिर्भूत झालेली सोज्वळ सुंदर वाणी बुद्धीच्या चिमटीत पकडण्याचा प्रयत्न करणाऱ्या बुद्धिवादाला ती नीटशी कळणारच नाही. कवीची वाणी कळण्यापेक्षा मनाला भिडण्यासाठी असते. उदाहरणादाखल कवीश्वर ज्ञानेश्वरांच्या या ओव्या पाहू.

आत्मज्ञानाच्या विषयावर ज्ञानेश्वर प्रवचन करीत होते. ते पुष्कळ विस्तृत झाले असे त्यांनाच वाटले; पण आत्मज्ञानासारख्या सुंदर विषयाचे कितीही निरुपण केले तरी त्यामुळे आनंद वाढतच जातो. रसहानी होत नाही हे सांगण्यासाठी काही अनुरूप, मर्मस्पर्शी, रमणीय दृष्टान्त त्यांनी दिले आहेत :

*अमृताची सांतवांकुडी। लागो कां अनुघडी॥*
*सुखाचा दिसी कोडी। गणिजतु का॥*
*पूर्णचंद्रेसी राती। युग एक असो न पाहाती॥*
*तरि काय पाहत आहाती। चकोरे ते॥*

अमृताचा वर्षाव सात दिवस चालू राहिला म्हणून त्याला कुणी विटेल

काय? सुखाचे कोट्यवधी दिवस गेले म्हणून त्याची कोणी मोजणी करतो काय? पूर्णचंद्र असलेली एका युगाएवढी दीर्घ रात्र असली तरी ती चकोरांना कधी संपावी असे वाटेल काय? त्याप्रमाणेच आत्मज्ञानाचे मधुर व्याख्यान आता पुरे झाले असे कोणाला होईल काय?

या प्रकारचे दृष्टान्त कवीने किती चातुर्याने आपल्या काव्यात पेरलेले असतात. यातला युक्तिवाद जितका समर्पक तितकाच मनाला आल्हाद देणारा आहे. असे नानाविध सौंदर्य बुध्दीच्या माध्यमातून स्वीकारता येत नाही. कवितारूपी कामिनीचे स्वागत करताना आपल्या हृदयीचे भावपुष्प उमलून आले पाहिजे आणि ते तिच्या हाती एखाद्या लुब्ध प्रेमिकाप्रमाणे हळुवार मनाने देता आले तर कविता आणि रसिक यांच्या मीलनाचा उत्सव घडू शकेल. भक्तीची आणि प्रेमाची, भोगाची आणि समर्पणाची, सुखाची आणि वेदनेची, रंगांची आणि नादांची कविता मनाच्या अंतर्मनाने सहज टिपून घेण्याची ज्याची क्षमता आहे त्याला ती कविता आपले बाहू पसरून भेटते. पांडित्यापासून ती दूर राहाते. रसिकाच्या मात्र मनात मिसळून जाते. ज्ञानेश्वरांचा पुढील अभंग तर्कबुध्दीने समजेल काय? त्याच्याशी वाचेवीण बोलावे.

*तुजमाजी विरावे तुज गिळूनि राहावे। तुझे रूप पाहावे रुपेवीण ॥*
*तू ते अवघे गुज म्यां सांगावे। वाचेवीण बोलावे निःशब्दकारे ॥*
*रखुमादेवीवरु वाचे निवविला। प्रसन्न जाला ब्रह्मा दाउनी ॥*

संतांची कविता गूढ, खोल अशा आत्मानुभूतीच्या भूमीतून उदयाला आली आहे. या कवितारूपी वेलीवर फुललेल्या अम्लान सुगंधित फुलांचा आस्वाद घेण्याची आपली मानसिक व भावनिक तयारी चांगली असल्याशिवाय त्यांचा गंध मिळणार नाही.

# राजधर्म आणि प्रजाधर्म

एकदा एका राजाच्या कर्तव्यभ्रष्टतेवर, दुष्प्रवृत्तीवर एका साधूने प्रतिकूल टीका केली. प्रजापालनाच्या आपल्या नियतधर्माकडे पूर्ण दुर्लक्ष करून हा राजा रंगढंगात बुडून गेला होता. जनतेची उपासमार होत होती. तिच्यावर नाना प्रकारची संकटे येत होती. पण वैयक्तिक सुखविलासाच्या पाशात गुरफटलेल्या या राजाचे तिकडे यत्किंचितही लक्ष नव्हते. तो साधू म्हणाला,

'ज्या राजाला आपला धर्म पाळता येत नाही, जो लोकसेवा, उदारता आणि शौर्यधैर्य विसरून जनतेकडे पाठ फिरवतो तो धर्माचा आणि जनतेचा शत्रू आहे. असा शासक केवळ दुःख आणि आपत्ती निर्माण करतो. त्याच्या हातातली सत्ता काढून घेणे हेच धर्मदृष्ट्या श्रेयस्कर आहे.'

त्या साधूच्या वचनात स्पष्टता, निर्भयता आणि प्रखरता होती. मृदुतेने बोलणारा हा संत अन्यायाची परिसीमा होत आहे असे पाहिल्यावर उमाळून उठला. राजालाही चार खडे बोल ऐकवणे त्याला आवश्यक वाटले. केवळ *आत्मध्यान करीत राहाणे इतकेच आपले कर्तव्य नसून, लोकजीवन घडवणारी* राजशक्ती उन्मत्त व कर्तव्यशून्य बनली असेल तर तिलाही मार्गदर्शन करणे हा आपल्या तपस्येचाच एक भाग आहे, अशी त्या तपस्व्याची धारणा होती.

लोकशक्ती आणि राजशक्ती यांवर विवेकाचा अंकुश ठेवण्याची जबाबदारी साधूसंतांची असते. स्वार्थरहित वृत्तीमुळे ते भयमुक्त असतात. आपल्यासाठी त्यांना काही मिळवायचे नसते. लोचटपणाने माखलेले ओशाळे शब्द स्वार्थी माणसाच्या तोंडी असतात. तो पावलोपावली राजसत्तेपुढे किंवा द्रव्यसत्तेपुढे वाकत असतो. निःस्पृह संताला असल्या सत्ता आणि मत्ता तुच्छ वाटतात. आत्मराज्याच्या सिंहासनावर आरूढ झालेला तो अनभिषिक्त सम्राट असतो. स्वार्थाचा लोप झाल्यामुळे त्याचे शब्द स्वच्छ, काहीसे कठोर पण हितकारक असतात. आजच्या जगात तथाकथित संतांच्या शब्दांतही ओशटपणा येत चालला याची खंत वाटते.

महाभारताच्या शांतिपर्वात भीष्मांनी प्रजापालन न करणारा राजा चोर आहे, असे समजून लोकांनी त्याला पदभ्रष्ट करावे असे स्पष्टपणे म्हटले आहे. भीष्मांच्या शब्दांत आत्यंतिक कठोरता आहे. महाभारतातला एक श्लोक असा आहे :

*अरक्षितारं हर्तारं विलोप्तारं अनायकम् ।*
*तं वै राजकलिं हन्युः प्रजाः संतह्य निर्घृणाम् ॥*

रक्षण न करता लोकांपासून जो कर घेतो आणि प्रजेचे शोषण करतो त्या राजारूपी कलीला प्रजेने शासन करावे. हा आशय महाभारतातल्या आणखी कित्येक श्लोकांतून प्रखरपणे व्यक्त झाला आहे. जो आपल्या विशिष्ट धर्माचे निष्ठापूर्वक पालन करीत नाही, त्याला भारतकारांनी दोष दिला आहे. राजाचा धर्म, प्रजेचा धर्म, अधिकाऱ्याचा धर्म, वैद्याचा, सैनिकाचा, व्यापाऱ्याचा, अध्यापक आणि विद्यार्थ्यांचा, नगरपालिकेचा, सामान्य सेवकाचा, फार काय कुटुंबातील प्रत्येक घटकाचा विशिष्ट असा 'धर्म' असतो. राजा जर राजधर्मापासून परावृत्त झाला, तर सारेच लोक आपापल्या धर्माचा उच्छेद करतील आणि त्यातून उत्पन्न होणारे धार्मिक आणि नैतिक अराजक राष्ट्राला जिवंत ठेवू शकणार नाही. मरगळून गेलेले राष्ट्र पुन्हा सर्वसमर्थ बनवायचे असेल, तर क्षुद्र स्वार्थ, लाचलुचपत वगैरे भ्रष्ट मार्ग सर्वांनाच सोडावे लागतील.

शांतिपर्वात भीष्म म्हणतात :

'हत्तीच्या एका पावलात इतर सर्व प्राण्यांची पावले सामावली जातात. त्याप्रमाणे राजधर्मात सर्व धर्मांचा समावेश होतो.'

यथा राजा तथा प्रजा, जसे नेते तसे अनुयायी, जसा गुरु तसा विद्यार्थी. समाजजीवनाला सुंदर आणि निरामय बनविण्यासाठी समाजाचे सारेच अवयव प्रथम निरोगी करण्यासाठी जंतुनाशक रसायने वापरावी लागतील. समाज केवळ एखाददुसऱ्या घटकाचा नसतो. तो लहानमोठ्या घटकांनी मिळून एकसंध बनावा लागतो.

# *तंबोऱ्याची तार*

आपल्या शरीरावर कोण प्रेम करीत नाही? निरोगी शरीर, समर्थ आणि सुंदर शरीर हे सुखाचे अत्यंत महत्त्वपूर्ण साधन आहे यात संशय नाही. सौंदर्याचे अनेक रंग डोळ्यांनी उपभोगता येतात, अनेक प्रकारचे रोमांचित करणारे स्पर्श शरीराच्या माध्यमातून मनात रुजतात. चित्रविचित्र, मधुर स्वरांचे लावण्य तृप्तीची एक लाट शरीरभर निर्माण करतात, ते केवळ शरीरामुळे. शरीराचे माहात्म्य नाकारण्यात अर्थ नाही. ते रोगट असेल किंवा दुबळे असेल तर जीवनातील सारे रस नीरस होतील. रस म्हणजेच जीवन. स्पर्श, रूप, रंग, गंध, नाद यांचा उत्कट उपभोग शरीराच्याच जिवंतपणामुळेच घेता येतो. म्हणूनच हे शरीर स्वच्छ, सुभग, कांतिमान् असेच राहावे ही माणसाची इच्छा सयुक्तिकच आहे.

पण काही लोक शरीराची निंदा करताना आढळतात. एका अर्थाने त्यांच्या निंदेतही थोडेफार तथ्य आहे. कारण नाना प्रकारच्या विकृती शरीरात उत्पन्न होऊ शकतात. सुखभोगाला अनुकूल असलेले शरीर पाहता पाहता रोगग्रस्त, असमर्थ, म्हातारे होऊ शकते. निष्प्राण झालेल्या शरीराचा काय उपयोग आहे? आचार्य गुणभद्र यांनी म्हटले आहे:

*माता जातिः पिता मृत्युराधिव्याधि सहाद्गतौ ।*
*प्रान्ते जन्तोर्जरा मित्रं तथाप्याशा शरीरके ॥*

उत्पत्ती ही ज्याची माता, मरण हा ज्याचा पिता, रोग हे ज्याचे भाऊ आणि म्हातारपण हाच ज्याचा मित्र असे हे शरीर आहे आणि त्या शरीरावर तुझी ममता आहे. शरीराविषयी सांगण्यात आलेला हा विचार विदारक असला तरी अवास्तव मात्र नाही. हा दृष्टिकोनही तर्कशुध्द आहे. शरीराचा द्वेष करावा किंवा घृणा करावी, या हेतूपेक्षा शरीराच्या आसक्तीत माणसाने गुंतून पडू नये. ही भूमिका गुणभद्राचार्यांनी घेतली आहे. संत ज्ञानेश्वरांनीही, 'तुवा शरीरपरां नो हावे, कामनाजात सांडावे' असे म्हणून शरीरपरायणतेचा निषेधच केला आहे.

शरीराविषयीचे अगत्य वेगळे आणि लोचट आसक्ती वेगळी. अगत्य जरूर असावे पण पावलोपावली आणि क्षणोक्षणी शरीराची गुलामगिरी पत्करणारा माणूस कोणतीही उन्नती साधू शकत नाही. कारण मनुष्याचे मन, त्याचा आत्मा हेच परमसत्य आहे. शरीर मात्र काही दिवस आपल्याबरोबर राहणार आहे. एक दिवस ते टाकूनच द्यावे लागणार आहे. आपली संगत सोबत ते फार काळ करू शकत नाही हे सत्य स्वीकारण्याशिवाय गत्यंतर नाही.

साधूसंतांनी, तत्त्ववेत्त्यांनी शरीराकडे पाहण्याचा वास्तव दृष्टिकोन मनुष्याला दिला आहे. पण आत्मिक प्रगतीच्या आड शरीर येऊ नये यासाठी शरीराचे वास्तव स्थान कोणते हे ओळखले पाहिजे. त्याचा धिक्कार करू नये पण त्याच्या मोहाचा विळखाही आपल्याभोवती पडू नये, असा समन्वयात्मक विचार त्यांनी व्यक्त केला आहे.

शरीर ही तंबोऱ्याची तार आहे. ती फार ताणली तर तुटून जाते आणि फार सैल सोडली तर संगीत र्निर्माण होत नाही. संत कबीरांनी हाच भाव आपल्या काव्यातून सहज सुंदरतेने व्यक्त केला आहे. कबीरांच्या मनाची तार तात्त्विक विचारात कशी झंकारत होती याचे दर्शन त्यातून घडते. खरे तर कबीरांच्या कविता हीच जीवनविचाराची रागिणी आळवणारी एक अद्भुत सतार आहे, ते म्हणतात:

*साधो, यह तन ठाठ तंबूरेका*
*खैचत तार, मरोरत खूंटी, निकसत राग हजुरेका*
*टूटे तार, बिखर गई खूंटी, हो गया धूरम धूरेका*
*कहे कबीर, सुनो भइ साधो, अगम पंथ कोइ सुरेका.*

तंबोऱ्याची तार ताणली की मंजुळ स्वर निघतो. तसाच संयमाने आणि इंद्रियदमनाने शरीररूपी तंबाऱ्यातून परमेश्वराची मधुर रागिणी कानी पडते. परमेश्वरी प्रेमसंगीत ऐकण्यासाठी शरीर-तंबोरा जवळ असावा. पण त्याच्या आत्यंतिक मोहात फसून संगीत हरवू नये.

❖❖

# जीवनाला 'परतत्त्वस्पर्श' व्हावा

संत ज्ञानेश्वरांनी उत्तम कवित्वाची मीमांसा करताना म्हटले आहे,
*'वाचे बरवे कवित्व। कवित्वि रसिकत्व। रसिकत्वी परतत्त्वस्पर्शु। जैसा॥'*

वाणीला कवित्वाचे, कवित्वाला रसिकत्वाचे अधिष्ठान असावे आणि रसमय काव्याला परमतत्त्वाचा स्पर्श व्हावा म्हणजे कविता सर्वांगांनी फुलून येते व तिचा सुवास रसिकांच्या मनात अखंड दरवळत राहतो. ज्ञानेश्वरांच्या मते कवितेला हा 'परतत्त्वस्पर्श' नितांत आवश्यक आहे.

काही कलावादी रसिकांना परतत्त्वस्पर्शाची आवश्यकता वाटत नाही. ते म्हणतात, 'काव्य ही एक कला आहे. कलेला या परतत्त्वस्पर्शाची किंवा आध्यात्मिक भावस्पर्शाची काहीच जरूर नसते. कोणत्याही कलेला स्वतंत्रपणे फुलू द्यावे. असली बंधने तिच्यावर घालू नयेत.'

परतत्त्वस्पर्श या शब्दाचा अर्थ काहीतरी गूढ, केवळ धार्मिक असा केल्यामुळे कित्येकांचा या शब्दाला विरोध आहे. परतत्त्वस्पर्शाचे साहित्य म्हणजे ज्यात श्रेष्ठ जीवनादर्शांचा आविष्कार आहे, ज्यात सत्य, शिव, सुंदर या मूल्यांचा प्रकाश आहे ते साहित्य. परतत्त्वस्पर्शाने सुंदर बनलेले, विशाल जीवनदृष्टीचे, मानवतेचा परिपोष करणारे साहित्य अनेक प्रतिभावंतांनी आणि संतांनी लिहिले आहे. ज्ञानेश्वरांची प्रार्थना अशी:

*नवरसां भरवी सागरु। करवी उचित रत्नांचे आगरु॥*
*भावार्थाचे गिरिवरु। निफजवी माये॥*
*संवादफळनिधाने। प्रमेयाची उद्याने॥*
*लावी म्हणे गहने। निरंतर॥*

आपल्या काव्यात नवरसांचे सागर उचंबळून यावेत, त्यात योग्य अलंकाररूपी रत्नांची खाण निर्माण व्हावी, भावार्थाचे उत्तुंग पर्वत त्यात सामावले जावेत, श्रीकृष्णाच्या गुणवर्णनानेच मला सामर्थ्य मिळावे आणि माझे श्रोते श्रवणरूपी राज्याच्या सिंहासनावर बसावेत, या विचारातच परतत्त्वाचे सौंदर्य

स्पष्ट झाले आहे. साहित्याच्या श्रेष्ठतेला हे तत्त्व एक प्रकारचे आगळे लावण्य प्राप्त करून देते, ही ज्ञानेश्वरांची भूमिका आहे. रामायण - महाभारतासारखे ग्रंथ महनीय ठरले याचे कारण या ग्रंथातून ग्रंथकारांची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी उदात्त आणि उच्च आहे. उथळ बुध्दीच्या, क्षुद्र दृष्टीच्या आणि सवंग वृत्तीच्या लेखकांनी व कवींनी कितीही सुंदर शब्द लिहिले तरी त्यांच्या साहित्यात हा 'परतत्त्वस्पर्श' नसतो. तो जीवनावर आणि मानवतेवर, मूल्यांवर प्रगाढ प्रेम करणाऱ्या, उन्नत अंतःकरणाच्या लेखणीला व वाणीला होऊ शकतो.

खरे तर परतत्त्वस्पर्शाचे वरदान हे हृदयाच्या विशालतेला मिळत असते. ज्याचे मन, माणुसकीने ओथंबलेले असते त्याच्याच कवित्वाला हे परमतत्त्व असा सुगंध देऊन जाते की तो युगानुयुगे ओसरत नाही. एका अर्थाने हा चैतन्यस्पर्श किंवा ईश्वरीस्पर्श म्हटला पाहिजे. एखाद्या विचारवंताच्या वा संताच्या किंवा एखाद्या तथाकथित अशिक्षित पण स्वार्थरहित, सज्जन सामान्य माणसाच्या साध्या शब्दांत देखील आगळी प्रत्ययकारिता आणि सहजसुंदरता येते याचे कारण त्याचे व्यक्तित्व आणि चरित्र एका परमउंचीवर गेलेले असते. अशांच्या जीवनालाच परतत्त्वस्पर्श झालेला असतो.

छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांच्याप्रमाणेच जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांत लोककल्याणासाठी रात्रंदिवस कार्य करणारे ध्येयवादी, मानवतेची उपासना करणारे जे थोर कार्यकर्ते असतात त्यांच्या संपूर्ण आयुष्यालाच हा अद्भुत असा परतत्त्वस्पर्श झालेला असतो. साहित्याला हा स्पर्श झाला की ज्याप्रमाणे ते *रसभावकल्पनांनी सुंदर, संपन्न बनते. त्याप्रमाणेच माणसाच्या आचार, विचाराला,* आयुष्याला, त्याच्या दृष्टिकोनाला, तो पाहत असलेल्या स्वप्नाला हा परमस्पर्श झाला तर हे मानवी जीवन सत्त्वसंपन्नतेचे माहेरघर बनेल. ज्ञानेश्वरांनी म्हटल्याप्रमाणे हे जग म्हणजे 'आनंदाचे आवार' बनेल. आणि 'अवघाचि संसार' सुखाचा होईल. परतत्त्वस्पर्श हा जीवनरूपी कवितेचा महत्त्वाचा आधार बनला पाहिजे.

◈◈

# तुम्हीच आता सज्जन झालात!

जगात सुजनतेचा, सुसंस्कृत वृत्तीचा, सुमधुर भाषेला कारण होणाऱ्या प्रेमवृत्तीचा प्राणवायू फारच कमी झाला आहे. माणसांना परस्परांशी जोडणारे स्नेहभावनेचे धागे विरळ झाले आहेत. जवळ राहूनही माणसे एकमेकांपासून दूर गेलेली दिसतात. त्यांच्यातले संबंध केवळ रुक्ष व्यवहारावर आधारलेले असल्यामुळे ते कृत्रिम व दिखाऊ स्वरूपाचेच आहेत. अशा प्रकारच्या वातावरणात संवेदनाक्षम मनांचा कोंडमारा होतो. घरातली माणसे सुध्दा एकमेकांशी फटकून वागतात. भावाबहिणीतला जिव्हाळा, बाप आणि मुलगा यांच्यातली आंतरिक ओढ, विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातली आपुलकी आज मावळत चाललेली दिसते. व्यापारी आणि ग्राहक, वैद्य आणि रोगी, फार काय जनता आणि सरकार सारेच परस्परांपासून भावनिक दृष्ट्या दूर गेलेले आहेत. एकमेकांना फसवण्यात आनंद मानणारी वृत्ती सर्वत्र आढळते.

भावनाशील, सत् प्रवृत्त माणसांची असल्या स्नेहशून्य स्वार्थी जगात विलक्षण घुसमट होते यात शंका नाही. आंतरिक जिव्हाळ्याचे, आत्मीयतेचे झुळझुळणारे झरे का बरे आटून गेले? सारेच वातावरण असे कशामुळे विटून गेले?

संत-सज्जन त्याचे उत्तर देतात. स्वार्थाचा प्रभाव वाढला. माणूस जोडण्यापेक्षा तो तोडून केवळ पैसा जोडावा आणि आपल्यापुरते एक जग निर्माण करावे, त्यात आपल्याशिवाय दुसऱ्या कुणालाही - आईबापालाही जागा ठेवू नये, या आत्मकेंद्रित वृत्तीचा अतिरेक झाला म्हणून हे घडते. चांगली माणसे भेटावीत आणि त्या सज्जनांच्या सहवासात सुखसंवाद करावा, त्यांच्या आनंदात आपण न्हाऊन निघावे. आपले समाधान त्यांना द्यावे ही जाणीव ओसरून गेली. आपले सत्तेचे पद, आपला पैसा आणि आपली व्यसने इतकी सामग्री असली की माणूस सुखी होतो. सत्तेभोवती आणि संपत्तीभोवती 'चार होयबा' आपोआपच मिळतात. त्यांच्या ओशट प्रशंसेचे शब्द ऐकण्यात काळ मजेत जातो. 'सुसंगति सदा घडो'

आणि सुजन वाक्य कानी पडो' ही भानगड हवीच कशाला? पण संत तुकोबा आपल्या सुखाची एक वेगळी कल्पना मांडतात,

*दसरा, दिवाळी तो चि आम्हां सण। सखे संतजन भेटतील ॥*
*आमुप जोडल्या सुखाचिया राशी। पार या भाग्यासी न दिसे आतां ॥*
*धन्य दिवस आजि जाला सोनियाचा। पिकली हे वाचा रामनामे ॥*
*तुका म्हणे काय होऊ ऊतराई। जीव ठेऊ पायी संतांचिया ॥*

संतांनाच संतसंगतीचे मोल कळू शकते. ज्याला आयुष्यात कधी संत भेटलाच नाही त्याला ही महती कशी कळणार? संत याचा अर्थ केवळ भगवी वस्त्रे परिधान केलेला आणि विठ्ठल विठ्ठल असा जप करीत राहिलेला माणूसच नसून त्याचा अर्थ व्यापक केला पाहिजे. तुकोबा ज्याप्रमाणे अंतरी निर्मळ होते, स्वार्थाच्या बाजारातील रोगट धूळ ज्याप्रमाणे त्यांनी झटकून टाकली होती आणि समतेच्या व प्रेमाच्या विटेवर विश्वरूपी विठ्ठलाला उभे करण्याची त्यांची धडपड होती त्याप्रमाणेच आचार, विचार असलेले सज्जन दिसले की तुकोबांनी येथेच तीर्थस्नान घडले म्हणून आपला आनंद व्यक्त केला आहे.

कोणत्याही मार्गाने अमाप संपत्ती गोळा करून ती घाणेरड्या व्यसनात उधळीत राहिलेल्या एका लक्ष्मीदासाने पश्चातापाने मला म्हटले,

'लहापणापासून मला संगत सोबत चांगली मिळाली नाही. वडिलांच्याच रस्त्याने मी चालत राहिलो. सज्जनांचा सहवास लाभला असता, निदान त्यांचे शब्द सारखे कानावर पडले असते तर आज एका लहानशा घरात देखील मी समाधान मिळवू शकलो असतो. बहुतेक आयुष्य संपले. पण जे फार थोडे उरले आहे ते सज्जनांच्या सेवा सोबतीत कंठावे म्हणतो. पण संतसज्जन भेटणे देखील दुर्मिळ झाले आहे.'

मी म्हणालो, 'तुम्हीच आता सज्जन झालात.'

# काय खावे? किती खावे?

उपवास करून शरीराला आणि मनाला विश्रांती देण्याचा विचार सर्व धर्मांत सांगितलेला आहे. या विचाराची कक्षा कित्येकदा फारच आकुंचित करून ठेवलेली दिसते. काही ठिकाणी तर याचा विपर्यासही केला जातो. उपवासाच्या दिवशी साध्या सात्त्विक अन्नापेक्षा चमचमीत व पौष्टिक पदार्थ प्रमाणापेक्षा अधिक खाल्ले जातात आणि त्यातून काही आजारही उद्भवतात. खाण्याच्या इच्छेवर स्वेच्छेने अंकुश ठेवून धर्मचिंतनात, ईश्वराच्या नामस्मरणात काही काळ राहावे आणि त्यातून मनभावनेचे शुध्दीकरण व्हावे, हा उपवासाचा प्रमुख हेतू आहे. खाण्याच्या वासनेला ज्याला थोडा वेळही आवर घालता येत नाही अशा चंचल, खादाड मनुष्याला काय म्हणावे?

केवळ धर्मशास्त्रच नव्हे, तर वैद्यकशास्त्रानेही उपवासाचे महत्त्व सांगितलेले आहे. वाटेल ते खाद्यपदार्थ, वाटेल तेव्हा, वाटेल तितके खाण्याची प्रवृत्ती हे दुबळ्या मनाचे द्योतक आहे. प्रवासात प्रत्येक स्थानकावर काही ना काही खाद्यपदार्थ पोटात रिचवण्याची चमत्कारिक सवय कित्येकांना लागलेली असते. काय खावे आणि किती खावे, यावर शरीराप्रमाणेच मनाचेही आरोग्य अवलंबून असते. पण हा सिध्दान्त कोणी फारसा मनावर घेत नाही. त्याचे दुष्परिणाम झाल्याशिवाय राहत नाहीत. आचार्य भद्रबाहू यांनी म्हटले आहे :

*हियाहारा मियाहारा, अप्पाहारा य जे नरा।*
*न ते विज्ञा तिगिच्छंति, अप्पाणं ते तिगिच्छगा॥*

जो माणूस हिताहारी, मिताहारी किंवा स्वल्पाहारी असेल, म्हणजेच जे हितकर असा मर्यादित आहार घेत असतील, त्यांच्यावर वैद्य उपचार करीत नाहीत. कारण ते आपले आपणच उपचार असतात. हा सिध्दान्त जितका आहारशास्त्राचा आहे, तितकाच तो धर्मशास्त्राचाही आहे. एकादशीला उपवास करणे, अष्टमी-चतुर्दशीला निराहारी राहणे, रमजानच्या महिन्यात अन्नाच्या वासनेवर नियंत्रण ठेवणे, यांमुळे संयमाची, वासना नियंत्रित करण्याची, मनाला

व शरीराला सवय होते.

अनेक साधुसंत आहाराच्या बाबतीत विलक्षण संयमी असतात. सात्त्विक स्वरूपाचे थोडेसे अन्न मिळाले, तरी ते संतुष्ट असतात. पण बहुसंख्य लोकांना जिभेचे चोचले पुरवण्यासाठीच खावेसे वाटते. असे लोक खाण्यासाठीच जगत असतात. जगण्यासाठी खाणे त्यांना माहीत नसते. ज्याला मानसिक, बौध्दिक आणि आत्मिक पातळीवर सुंदर जीवन जगायचे आहे, त्याने खाण्यापिण्यावर आसक्ती ठेवू नये. अन्न चवीने अवश्य घ्यावे, पण जीवनालाच बेचवपणा येईल इतकी चवढव करू नये, हा विचार तर्कशुध्द आहे. तो स्वीकारलाच पाहिजे. खाण्यातल्या आनंदाविषयी कोणाचे मतभेद नसतात; पण हा आनंद घेताना काय खायचे आणि किती खायचे, ही दोन पथ्ये ज्याला पाळता येतात, तो आनंदी होऊ शकतो.

दुसरे असे की, एखादा उत्तम खाद्यपदार्थ एकट्यानेच सेवन करण्यात फारसा आनंद नाही. आपण काय खातो, यापेक्षा कुणाच्या सहवासात खात आहोत, याला अधिक महत्त्व आहे. सज्जनांच्या सान्निध्यात सामान्य खाद्यपदार्थही अमृतमधुर वाटतात. दुर्जनांच्या सहवासात पक्वान्नांची रुचीही बिघडून जाते. संत कबीरांनी आहार आणि उपवास यासंबंधी काही मार्मिक विचार आपल्या दोह्यांतून मांडले आहेत. ते म्हणतात :

*दिनको रोजा रहत है, रात हनत है गाय,*
*यह तो खुत, वह बंदगी, कहुं क्यों खुसी खुदाय?*

दिवसा उपवास करायचा आणि रात्री गोहत्या करायची ही कसली भक्ती? असली हत्या परमेश्वराला मान्य होईल काय? कबीर पुढे म्हणतात - अर्धी कोरडी भाकरी मिळाली, तरी मी संतुष्ट आहे. पूर्ण भाकरीचा लोभ नाही. संतांचा हा संयमी विचार आणि आचार सामान्य माणसाला जमणार नाही. पण हितयुक्त आणि मितयुक्त सात्त्विक खाणे, हा सुखाचा एक सुलभ मार्ग आहे.

# आयुष्य मोजावया बैसला मापारी

खाटकाच्या दारात एखादा पशू बांधून ठेवलेला असतो. पुढ्यात टाकलेला हिरवा चारा तो चवीनं चघळत असतो. थोड्याच वेळात आपल्या गळ्यावरून सुरी फिरणार आहे याची त्याला किंचितही जाणीव नसते. अज्ञानी माणसाची हीच अवस्था आहे असे संतांचे, तत्त्ववेत्त्यांचे म्हणणे आहे. माणूस हा देखील यमाच्या दारात उभा आहे. तो अशा भ्रांतीत असतो की आपण जीवनानंदाच्या नंदनवनात विहार करीत आहोत. या प्रकारच्या अज्ञानातून आणि मोहातून मनुष्याने जागृत व्हावे आणि आयुष्याचा योग्य कार्यासाठी उपयोग करावा, ही संतांची भूमिका आहे.

खरे तर माणसाला मरणाची आठवण देऊन हताश करण्याची, त्याला निष्क्रिय बनवण्याची ही भूमिका नव्हे. या विचारात वैफल्य नसून एका विदारक सत्याचे दर्शन घडवून माणसाला सावधान करण्याचा यात हेतू आहे. मृत्यूचे वास्तव चित्र उभे केल्याबरोबर काही लोक हा अतिरेकी निराशावादी दृष्टीकोन आहे, अशी टीका करतात. पण इहलोकातले आपले वास्तव्य दीर्घकाळाचे आहे, आपण सर्वशक्तिमान आहोत, आपल्याला कोणी आव्हान देऊ शकत नाही, अशा अवास्तव अतिशयोक्त स्वप्नरंजनात माणसाने गुरफटून जाऊ नये व आपल्या कर्तव्याकडे दुर्लक्ष करू नये, यासाठी संत सांगतात की, 'राजा! वैऱ्याची रात्र आहे जागा राहा.'

*जरा, मरण व्यापै नही, 'मुवा' न सुणिये कोइ.*
*चल कबीर तिहि देसडे, वैद विधाता होई*

जेथे वार्धक्य नाही, जेथे मरणाची वार्ता कानी येत नाही, जेथे परमेश्वर हाच वैद्य आहे अशा देशी आपण जाऊ या. याचा अर्थ ईश्वराची उपासना आयुष्यात आपण करावी असे कबीरांना सुचवायचे आहे. ईश्वरत्वाची उपासना म्हणजे घरदार, कुटुंब, उद्योग व्यवसाय सारे सोडून एखाद्या डोंगर कपारीत ईश्वर नामाची जपमाळा ओढीत बसणे नव्हे. कर्तव्यकर्मे सोडणाऱ्याला ईश्वर

कसा लाभेल? आपली दैनंदिन कर्तव्ये उच्च पातळीवर जाऊन निष्ठने करण्याची आवश्यकता आहे. माझ्यातल्या परमेश्वराचे कार्य मी भक्तीने करीत आहे हा आत्मविश्वास ज्याच्या ठायी असतो तो दगड फोडणारा मजूरसुध्दा 'योगी' असतो. त्याने मरणाची भीती बाळगण्याचे कारण नाही. जो दररोज खऱ्या अर्थाने जगत असतो आणि इतरांना जगवीत असतो, त्याला काळपुरुषही वंदन करतो.

मृत्यूची आठवण संत पुनः पुन्हा करून देतात याचे कारण बहुसंख्य लोक आयुष्यरूपी अमोलिक धन अत्यंत क्षुद्र मोहावर आणि सुखभोगांवर पणाला लावतात आणि या जुगाराच्या खेळात पूर्णपणे नागवले जातात. त्यांच्यासाठी म्हातारपण व मरण या अवस्थांची जाणीव संत करून देत असतात. किनाऱ्याकडे वेगाने ऊचंबळून येणारी सागरलाट तितक्याच वेगाने परत फिरते. त्याप्रमाणे आलेले धन, मिळालेले आरोग्य आणि तारुण्य,, हातात असलेले जीवन, या साऱ्या गोष्टी फार लौकर अगदी अकल्पितपणे निसटून जाणाऱ्या आहेत. याकडे विचारवंतांनी जगाचे लक्ष वेधले पाहिजे. म्हणूनच माणसाला खाटकाच्या दारात बांधलेला पशू असे प्रतीकरूपाने म्हटले आहे. संत तुकोबा हीच गोष्ट आपल्या भाषेत सांगतात, 'अरे सावध राहा, सावध राहा' असेच ते म्हणतात :

*आयुष्य मोजावया बैसला मापारी। तू कारे वेव्हारी संसाराचा॥*
*नेईल ओढोनी ठाउके नसता। न राहे दुश्चिता हरिविण॥*
*कठीण हे दुःख यम जाचतील। कोण सोडवील तया ठायी॥*
*राहतील दुरी सज्जन सोयरी। आठवी श्रीहरी लवलाही॥*
*तुका म्हणे किती करिसी लंडायी। होईल भंडाई पुढे थोर॥*

◈◈

# निष्ठांची कवचकुंडले

व्यासांचे महाभारत हा एक 'विलक्षण' ग्रंथ आहे. या महाग्रंथात क्षुद्रतम माणसांपासून महत्तम अशा मानवापर्यंत विविध स्वरूपी व्यक्तिरेखा लेखकाने रेखाटल्या आहेत. मानवी मनाचे. सारे कंगोरे, साऱ्या रेषा, सारे रंग, गंध सूक्ष्मपणे समूर्त करणारी व्यासांची लेखणी किती समर्थ आहे, याची कल्पना येते. महाभारतातली कित्येक माणसे जिवंत आणि रसरशीत वाटतात. काही व्यक्ती तर आपले बलदंड बाहू थोपटून नियतीच्या विरुध्द बंडखोरपणे अशी प्रभावी झुंज देतात की, तो अटीतटीचा संघर्ष पाहताना वाचकाचे मन अंतर्मुख होते. व्यक्तिमनावर आपल्या शोधक आणि भेदक प्रतिभेचे क्ष-किरण टाकून त्या मनाचे सर्वांगदर्शन व्यास घडवितात. म्हणूनच महाभारतासारखे दुसरे नानाविध रंगछटांनी भरलेले व्यक्तिसंग्रहालय साहित्याच्या विश्वात आढळत नाही. ज्ञानेश्वर म्हणतात:

*म्हणऊनि महाभारती जे नाही।*
*ते नोहेचि लोकी तिही॥*
*येणे कारणे म्हणिपे पाही।*
*व्यासोच्छिष्ट जगत्त्रय॥*

पराक्रमी, महत्त्वाकांक्षी पण दुर्दैवी कर्णाच्या मनाचे, भावभावनांचे उभे-आडवे छेद लेखकाने कुशलतेने या ग्रंथात घेतले आहेत. हा दुर्योधनाचा निष्ठावंत मित्र, पांडवांचा द्वेष्टा पण तरीही काही उदात्त मूल्यांवर उत्कट भक्ती असलेला उदारमनस्क माणूस आहे. सूर्याचा हा पुत्र सूर्यासारखाच तेजस्वी आहे. सूर्याने त्याला पूर्वसूचना देऊन इंद्राच्या कपटाबद्दल जागे केले होते. पण तो म्हणाला:

*दास्यामि विबुधश्रेष्ठ कुण्डले वर्म चोत्तमम्।*
*नमे कीर्तिः प्रणश्येत त्रिषु लोकेषु विश्रुता॥*

'प्रत्यक्ष इंद्र कुटिल बुध्दीने याचक रूपात आला, तरी मी माझी कुंडले आणि उत्तम कवच हे सूर्यदेवा त्याला देऊन टाकीन. माझी त्रैलोक्यातील कीर्ती

नाहीशी होऊ नये. दुष्कीर्तीच्या जगण्यापेक्षा कीर्तीमान असे लोकसंमत मरण स्वीकारणेच मला योग्य वाटेल.'

कर्णाचे हे उद्गार त्याच्या मनस्वी, स्वाभिमानी आणि तत्त्वनिष्ठ वृत्तीवर स्वच्छ प्रकाश टाकतात. मरणाला भिणारी माणसे पावलोपावली भित्रेपणाने, लोचटपणाने आपल्या तुच्छ शरीराची कवचकुंडले जतन करण्याचा सारखा प्रयत्न करतात. जीवनाचे रक्षण करावे हे बरोबर आहे; पण जीवनातले सर्वोच्च सौंदर्यतत्त्व गहाण टाकून जीव वाचवण्यात काय अर्थ आहे?

कर्णाच्या ठायी सारेच सद्‌गुण नव्हते. तसा सर्वस्वी सद्‌गुणी माणूस क्वचितच असू शकेल. कर्ण अहंकारी व मत्सरी होता. सूडबुध्दीने तो पेटलेला होता. समाजाने आणि रूढीने त्याचा छळ केल्यामुळे असेल; पण तो मनातल्या मनात धुमसत होता आणि तरीही तो धीरवीर, उदारचरित, गुणपूजक होता. श्रीकृष्णाने त्याला त्याचे जन्मरहस्य सांगून पांडवपक्षाला येऊन मिळावे आणि हस्तिनापूरचे सिंहासन व द्रौपदी यांचा स्वामी व्हावे, असे सुचवले. सत्ता आणि सुंदरी, ज्येष्ठता आणि प्रतिष्ठा यांच्या लाभासाठी व लोभासाठी माणसे बिनदिक्कत सारी तत्त्वे पायदळी तुडवतात. आजच्या 'महाभारता' तही हे घडते. फक्त तत्त्वनिष्ठ कर्णाचा मात्र अभाव आहे. शकुनी पुष्कळ मिळतात पण कृष्ण, धर्म, भीष्म आणि कर्ण पुन्हा पुन्हा जन्माला येत नाहीत. दुःशासन मात्र पावलोपावली भेटतात आणि संस्कृतीचे वस्त्रहरण करतात. हीच विदारक शोकांतिका आहे.

श्रीकृष्णाने दाखवलेल्या प्रलोभनाला कर्ण बधला नाही. ज्या राधेने त्याला मातेचे वात्सल्य दिले तिला विसरून तो कुंतीकडे गेला नाही. दुर्योधनाला दिलेल्या निष्ठेला, वचनाला व मैत्रीला जागून त्याने मरण कवटाळले. निष्ठेची कवचकुंडले त्याने अभंग ठेवली! आज आम्हाला अशा कर्णांचीही आवश्यकता आहे. पण ते कोठे शोधायचे?

# *परब्रह्म त्याचे घरी*

कवी भर्तृहरीने सात शल्यांचा उल्लेख केला आहे.

'दिवसा चंद्र प्रकाशहीन होतो. सुंदरीला वार्धक्य येते. साजिरा, गोजिरा मनुष्य अज्ञानी असतो. कमलाशिवाय तळे दीनवाणे दिसते. धनवानालाही धनलोभ असतो. ज्ञानवंतांच्या घरात नेहमीच दारिद्र्य निवास करते आणि राजदरबारात दुष्टांचा प्रभाव असतो.'

या सात शल्यांमुळे कवी विषण्ण झाला आहे. सातवे शल्य माझ्या मते अधिकच तापदायक आहे. दुर्जनांचा प्रभाव अलीकडे जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत वाढत चालला आहे. निष्प्रभ झालेले, गलितगात्र होऊन प्रारब्धाला दोष देणारे कर्तव्यमूढ सज्जन आणि उत्तरोत्तर वाढत चाललेली, झेप घेत चाललेली दुष्प्रवृत्त लोकांची योजनाबध्द क्रियाशीलता हाच खरा चिंतेचा विषय आहे. माणसाचे सुख आणि दु:ख त्याच्या आजूबाजूच्या परिस्थितीवर अवलंबून असते. ज्या *समाजव्यवस्थेत आपण राहतो ती व्यवस्थाही मोठ्या प्रमाणात आपल्या आनंदाला* व अस्वस्थतेला कारण होते.

परवा एका भक्ताने आपली व्यथा सांगितली : आपल्या दैवताच्या दर्शनासाठी एका तीर्थक्षेत्राला तो गेला होता. देवदर्शनासाठी हजारो लोकांची रांग लागली होती. हा भक्त आपल्या हातात सुगंधी फुले आणि मनात उत्कट भक्तीचा सुवास घेऊन सहा तास रांगेत उभा होता. तेथील रक्षकाच्या किंवा पुजाऱ्याच्या हातावर शंभर रुपयांच्या नोटा ठेवून काही 'अत्यंत भाविक' लोक खुशाल देवाच्या गाभाऱ्यात विनासायास प्रवेश मिळवीत होते. अखेर उपाशी पोटी उभा असलेला हा वृध्द भक्त अशक्तपणामुळे खाली कोसळला. त्याला रुग्णालयात नेले. तेथेही त्याच्याकडे दुर्लक्ष झाले. कारण आपल्याकडे लक्ष वेधून घेण्यासाठी जे 'आदान-प्रदान' करावे लागते ते त्याला जमण्यासारखे नव्हते. देवाचिया द्वारी जाऊन क्षणभर नव्हे, तर तासन् तास ताटकळूनही त्याला दर्शन घडले नाही. धंदेवाईक लोकांनी देवदर्शनासाठी राजरोस 'धंदा' केला आहे. हे शल्य आज

भर्तृहरीला सर्वांत अधिक खुपले असते आणि त्याने सात शल्यांत याचा प्रामुख्याने उल्लेख केला असता.

संत नामदेवांनी एका अभंगात म्हटले आहे,

*धनमानबळे नाठविसी देवा। मृत्युकाळी तेव्हा कोण आहे॥*
*यमाचे यमदंड बैसतील माथां। तेव्हा तुज रक्षिता कोण आहे॥*
*मायेचे भूलीने भुलली सकळ। हे तुज न कळे कटकट॥*
*नामा म्हणे काय बहु बोलो फार। भक्तीविण नर अभागी तो॥*

नामदेव सत्य तेच सांगतात, पण आज या सत्याला निर्वासित व्हावे लागले आहे. भक्तीच्या क्षेत्रातही ठेकेदारी, वशिलेबाजी आणि लोचटपणा यांचे लोण पसरले आहे. आज 'दर्शनासाठी' कुणाच्या तरी हातावर निमूटपणे नोट ठेवावी लागते. इतके साधे दर्शनही महाग झाले आहे. 'देवाच्या दारी उभा क्षणभरी' यासाठी देखील काळ्या बाजारात काही ठिकाणी तिकीट घ्यावे लागत आहे.

संत जनाबाईसारखी भक्तीला सर्वस्व मानणारी आणि विठ्ठलदर्शनासाठी रात्रंदिवस तळमळणारी कवयित्री म्हणते:

*कां गा न येसी विठ्ठला। ऐसा कोण दोष मला॥*
*मायबाप तूंचि धनी। मला सांभाळी निर्वाणी॥*

खरे तर आपल्याच मनाच्या देव्हाऱ्यात आपल्या देवाची आपण निरतिशय प्रांजल भक्तीने प्रतिष्ठापना करावी. आपले मन आणि शरीर हेच एक पवित्र तीर्थक्षेत्र बनवावे. मनातला तो सर्वेश्वर आपल्याला सदैव पाहता येईल. मंदिरांतून देवदर्शन विकत मिळत असेल, तर त्या व्यापारी क्षेत्रात जाण्याच्या ऐवजी आपल्याच मनीमानसी एक मंदिर उभे करायला काय हरकत आहे? अशा तीर्थक्षेत्रांतच तो परमेश्वर वास्तव्य करतो. जनाबाई म्हणते:

*चोखामेळा अनामिक। भक्तराज तोचि एक॥*
*परब्रह्म त्याचे घरी। न सांगता काम करी॥*

ज्याचे मनी परब्रह्म असते त्याला एखाद्या तीर्थक्षेत्री जाण्याची जरुरी नसते. त्या वृध्द भक्ताच्याही ध्यानी हे शेवटी आले.

# पुण्य विकत मिळते काय?

गावात एका भयानक रोगाची साथ पसरली होती. माणसे मरत होती. गावातल्या प्रमुख औषधविक्रेत्याने त्या विशिष्ट रोगावरच्या औषधांची किंमत चौपट-पाचपट वाढवली होती. इकडे रोग पसरत होता आणि औषधविक्रेत्याच्या घरात लक्ष्मी सोनपावलाने प्रवेश करीत होती. कुणीतरी त्या औषध व्यापाऱ्याला प्रश्न विचारला,

"अशा आणीबाणीच्या वेळी तुम्ही औषधांची कृत्रिम टंचाई निर्माण करून नफेबाजी करीत आहात. गरीब रोग्यांना औषधोपचार मिळणे कठीण झाले आहे. माणसे पटापट प्राण सोडीत आहेत आणि तुम्ही औषधांचा काळाबाजार करीत आहात हे धर्मविरोधी, समाजविरोधी कृत्य नाही का? जीवनाचा आधार असलेली महत्त्वाची औषधे या वेळी तुम्ही खरे तर कमीत कमी किमतीत विकून माणसांना जगवले पाहिजे. निदान यावेळी भरमसाट किंमती तरी वाढवू नका."

तो औषधविक्रेता प्रश्नकर्त्याला तुसडेपणाने म्हणाला,

"रोगाची साथ मी आणली नाही. जी माणसे मरतात त्यांनी आपल्या कर्माला दोष द्यावा. किफायतशीर धंदा करण्याची हीच वेळ असते. धर्माचे म्हणाल, तर मी अंध-अपंगांसाठी वसतिगृह बांधले आहे. त्यांच्यासाठी अन्नछत्र उघडले आहे. धर्म मला कळतो. धंद्याच्या वेळेला धंदा आणि धर्माच्या वेळेला धर्म, असा माझा सरळ हिशेब आहे. धंदा आणि धर्म यांची मी भेसळ करीत नाही. दोन्ही गोष्टी निराळ्या आहेत."

दुसऱ्याच्या दुःखवेदनेवर आपली दिवाळी साजरी करण्याची ही मनोवृत्ती रोगापेक्षाही अधिक भयंकर आहे. शरीराचे रोग बरे होऊ शकतात; पण ज्यांचे मन रोगाने अंतर्बाह्य सडून गेले आहे, स्वार्थाने आणि लोभाने बरबटलेले आहे, त्याला जगातला कोणता धर्म वाचवू शकेल ? रोगांची साथ ही त्या औषध दुकानदाराला सुवर्णसंधी वाटत होती. आपण निष्णात धंदेवाईक आहोत म्हणून दुकानात धंदा महत्त्वाचा. तेथे धर्माचा विचार करण्याचे कारण नाही, असे त्यांचे

तत्त्वज्ञान होते. सामाजिक जाणीव, बंधुभावना, करुणा आणि प्रेम असल्या भावनांची व्यावसायिक नीतीच्या क्षेत्रात काहीच आवश्यकता नसते, हे त्याने गृहीत धरले होते. इतरांची अडचण हीच आपली संधी, हे त्याचे समीकरण होते. खरे तर हे बाजारबुणग्यांचे नीतिशास्त्र आहे. मानवतेचा हा किळसवाणा द्रोह आहे. संत तुकोबांचे म्हणणे वेगळे आहे :

*जोडोनिया धन उत्तम वेव्हारे। उदास विचारे वेच करी॥*
*उत्तमची गती तो एक पावेल। उत्तम भोगील जीव खाणी॥*

'उत्तम' व्यवहाराने धनसंपत्ती मिळवावी आणि एक प्रकारच्या 'उदासीनतेने' ती खर्च करावी. हे माझे नव्हे, हे समाजाचे आहे हे मनात जाणून द्रव्याचा योग्य विनियोग करावा; ही संतांची शिकवण सोन्यानाण्यांची तहान लागलेल्या धंदेवाईक माणसाला मानवणारी नाही. माणसे आपल्या कर्मांनी मरतात. आम्ही आमच्या कुशलतेने आणि दूरदृष्टीने पैसा कमवतो. तो कमावताना विचार धंद्याचा करावा. ते नीतीचे वा धर्माचे क्षेत्रच नव्हे! ही भूमिका राक्षसांची आहे. ही रोगट भूमिका कशी सुधारायची, हाच बिकट प्रश्न आहे. माणसाच्या अनिवार्य तृष्णेवर टीका करताना संत कबीरांचे उद्गार असे आहेत:

*की तृस्ना है डाकिनी। की जीवनका काल॥*
*और और निसदिन चहै। करै जीवन बेहाल॥*

तृष्णारूपी राक्षसी म्हणजे जीवनाचा 'काळ' आहे. आणखी हवे, आणखी हवे असे ही डाकीण रात्रंदिवस म्हणत राहते. जिवाचे हालहाल करते. प्राणघातक रोगांच्या साथीत औषधांचा काळाबाजार, दुष्काळात अन्नाचा काळाबाजार करायचा आणि एखाद्या संस्थेला देणगी देऊन किंवा अन्नछत्र चालवून 'पुण्यविकत' मिळवण्याचा हा धंदादेखील 'काळाबाजारच' नव्हे काय?

◈◈

# कीर्तनी कैसा वाढवला रंग

भक्तीने ओथंबलेली कीर्तनकाराची रसाळ वाणी अलीकडे क्वचितच कानावर येते. पण जेव्हा ती येते तेव्हा मनुष्याला खिळवून ठेवण्याचे, मंत्रमुग्ध करण्याचे तिचे सामर्थ्य प्रत्ययाला येते. नभोवाणी किंवा दूरदर्शनवरून कधी कधी कीर्तनाचे कार्यक्रम ऐकता येतात. पण आपण भाविक श्रोत्यांच्या मेळाव्यात बसलो आहोत, आणि समोर कीर्तनकार हातातल्या चिपळ्या वाजवीत एखादा अभंग तल्लीन होऊन गात आहे, सारे श्रोते त्या भक्तिरंगात रंगून निघाले आहेत, आपणही तो भक्तीचा सोहळा अनुभवीत आहोत, यातला आनंद आगळाच आहे. प्रसाद आणि माधुर्य यांनी नटलेली, भावनेला आवाहन करणारी कीर्तनकाराची भाषा व त्यात मिसळलेला पेटी-तबल्याचा आवाज, या साऱ्यांचा मनावर खोल परिणाम होतो. आता कीर्तनकारांची परंपरा क्षीण झाली. इतर प्रसारमाध्यमे घरोघरी पोचली. लोकांच्या अभिरुचीतही काही बरेवाईट बदल झाले. कीर्तन हे आपल्या सांस्कृतिक जीवनाचे अंग आता केवळ नाममात्र उरले आहे, याची मात्र खंत वाटते. कीर्तनपरंपरेचे प्रवर्तक म्हणून संत नामदेवांचा उल्लेख अटळ आहे. कीर्तनाच्या माध्यमातूनच या संतश्रेष्ठाने महाराष्ट्राच्या खडकाळ भूमीतून भक्तीचे पीक काढले. घराघरात आणि झोपडीझोपडीत संतवाणीची गंगा कीर्तनामुळेच वाहत गेली.

*नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी।*
*सर्व सांडूनी माझाई। वाचे विठ्ठलरखुमाई।*
*परेहुनि परते घर। तेथे राहू निरंतर।*
*अवघी सत्ता आली हाता। नामयाचा खेचर दाता॥*

कीर्तनाच्या ज्योतीने असंख्य हृदयातले दिवे प्रज्वलित होऊ शकतात, हे नामदेवांचे वचन अतिशयोक्तीपूर्ण नाही. कीर्तनातून होणारा नामाचा उत्कट गजर प्रत्येकाच्या हृदयाला असा आवेगाने भिडतो, की त्या गजरात प्रापंचिक जीवनातल्या दैनंदिन क्षुद्र विवंचना तात्पुरत्या बाजूला पडतात आणि मन उदात्ताच्या

उंचीवर काही क्षण तरी जाऊ शकते. कीर्तन म्हणजे करमणूक नव्हे. मनोरंजनाचे काही घटक त्यात असूनही मनाच्या शुध्दीकरणाची द्रव्ये त्यात विशेष असतात. नामदेवांसारखा एक आर्तभक्त हातातल्या वाद्याचे सूर छेडीत आपल्या भावपूर्ण, मोकळ्या आवाजात परमेश्वराला आळवणारा किंवा सुविचार सांगणारा एखादा प्रसन्न अभंग शेकडो श्रोत्यांसमोर देहभान विसरून गात आहे, हे दृश्य तेराव्या शतकात अभूतपूर्व होते. शतावधी, सहस्त्रावधी श्रोत्यांच्या अंतरंगात हळुवारपणे ज्ञानाचे किरण प्रविष्ट करणारी नामयाची संजीवक वाणी खरोखरच प्रभावी असली पाहिजे. अस्सल भावना आणि हृदयाची भाषा यांचा जेव्हा संगम होतो तेव्हा असे कीर्तन नवनिर्मिती करू शकते.

*काळ वेळ नसे नामसंकीर्तनी।*

*उच्चनीच योनी हेही नसे॥*

या नामसंकीर्तनाला उच्च-नीच भावाचे क्षुद्र कुंपण कधीच आड येऊ शकले नाही.

खरे तर आजच्या भाषेत कीर्तन हा एकपात्री प्रयोग होता. एकनाथ आणि तुकाराम या संतांनी ही परंपरा महाराष्ट्र संस्कृतीशी पूर्णपणे एकजीव करून टाकली. संस्कृतीच्या समृध्दीला कीर्तनसंस्थेने फार मोठे साह्य केले. संत गाडगे महाराजांचे कीर्तन हा तर एक अलीकडच्या काळातला अपूर्व अनुभव होता. हजारो माणसांना महाराज आपल्या बाह्यतः खेडवळ वाटणाऱ्या; पण अंतर्यामी ज्ञानसंपन्न असलेल्या वाणीच्या पाशात तासनतास बांधून टाकीत असत. संत एकनाथांनी म्हटले आहे :

*नित्य नवा कीर्तनी कैसा वोढवला रंग।*

*श्रोता आणि वक्ता स्वये झाला श्रीरंग॥*

ज्या कीर्तनात श्रोता आणि कीर्तनकार स्वतःच श्रीरंग होऊ शकतो अशी अनुभूती येते, ते कीर्तनाचे रंग आता फिकट होत चालले. एक सांस्कृतिक लेणे काळाच्या ओघात हरवू लागले, याची मात्र खंत वाटते.

# संयमाचे कुंपण आवश्यक

संतांच्या साहित्यात मनुष्याने संयमपूर्वक मन, बुध्दी, आणि इंद्रिये आपल्या स्वाधीन ठेवावीत, असा विचार अनेक वेळा येतो. या विचाराचा काही टीकाकार विपर्यास करतात. इंद्रियांचा संयम याचा अर्थ इंद्रियांच्या सुखांना पूर्णपणे नकार देणे असा होत नाही. ज्यांना संयमाची महती कळत नाही किंवा स्वैर, अनिर्बंध, उपभोग हेच श्रेष्ठ परमसुख आहे, असे ज्यांना वाटते ते संयम, त्याग, इंद्रियदमन या शब्दांची कुचेष्टा करतात. एक मद्यपिपासू कवी म्हणतो,

"या प्याल्यात आणखी ओत. आजचीही ओत आणि उद्याचीही ओत. खुशाल ओत. सारे प्याले मला रिते करायचे आहेत. आयुष्य अनिश्चित आहे, उद्याचा दिवस उगवलेला मला पाहायला मिळेल की नाही हे माहीत नाही. म्हणूनच आजच्या प्याल्यात उद्याचीही मदिरा भरली पाहिजे. आजच्या धुंदीत उद्याचीही धुंदी मिसळली पाहिजे. तारुण्याला, सुखोपभोगाला आणि मधुपान करणाऱ्या ओठांना कोणतीही मर्यादा नको, संयमाची कुंपणे मोडून टाका. आपल्या मनाचे वारू उन्मत्तपणाने आयुष्याच्या वाटेवरून दौडत राहू द्या."

या काव्यात बेफाम कल्पनाविलास असेल पण त्यातले विचार मात्र तर्कदृष्ट्या अत्यंत दुबळे आहेत. भविष्य अनिश्चित आहे. म्हणून केवळ वर्तमान क्षणाचाच विचार करावा. वर्तमान काळातच आकंठ बुडून जावे ही आत्मघातकी कल्पना आहे. खरेतर पशुपक्षीसुध्दा भविष्यकाळाची थोडीफार तरतूद करतात. मुंग्यादेखील पावसाळ्यासाठी अन्नधान्याची बेगमी करीत असतात. केवळ इंद्रियलंपट संयमशून्य माणूस मात्र भविष्याकडे पाठ फिरवून वर्तमानाचीच पूजा करीत राहतो. आज केलेला संयम आपल्याला उद्या उपयोगी पडतो. आज कणाकणाने मिळवलेली विद्या आणि संपत्ती उद्यासाठी, भविष्यकाळासाठी उपयोगी पडते. मन, बुध्दी आणि इंद्रिये यांचे लगाम खेचण्याची शक्ती नसेल तर ही घोडी चौखूर उधळतात आणि आपली चैतन्यशक्ती गमावून बसतात, हा सर्वसामान्य अनुभव आहे. सुखोपभोगासाठीच संयमाची - विवेकयुक्त संयमाची जरूर असते.

ज्ञानेश्वरांचे या बाबतीतले प्रतिपादन लक्षात घेण्यासारखे आहे:

*ये इंद्रिये जे जे म्हणती। ते तेचि जे पुरुष करिती॥*
*ते तरलेचि न तरती। विषयसिंधु॥*
*जैसी नाव थडिये ठाकिता। जरी वरपडी होय दुर्वाता॥*
*तरी चुकलाही मागौता। अपावो पावे॥*
*तैसी प्राप्तेही पुरुषे। इंद्रिये लाळिली जरी कौतुके॥*
*तरी आक्रमिला देख दुःखे। सांसारिके॥*

इंद्रिये जे जे म्हणतील ते ते करणारे लोक विषयसागराच्या पैलतीरी गेले असले तरी ते खरोखर गेले नाहीत. किनाऱ्याला आल्यावरही नाव वादळात सापडली तर तिला पुन्हा अपाय होतो. म्हणून आत्मज्ञान झालेल्या पुरुषानेही इंद्रियांचे लाड केले तर तो देखील संसारदुःखात बुडून जातो. आत्मज्ञानी व्यक्तीलाही आपल्याभोवती संयमाचे कुंपण उभारावे लागते. मोहाच्या वावटळीत कित्येक श्रेष्ठ तपस्व्यांचाही संयम भुसकटासारखा उडून गेल्याची उदाहरणे आहेत. म्हणूनच कोणत्याही मोहाला मनबुध्दीचे दार किती मर्यादेपर्यंत उघडायचे, याचे तारतम्य माणसाला असले पाहिजे. काही बलिष्ठ मोह दारावर धडक देत राहतात. त्यांना परतवून लावण्यासाठी ज्ञान, समजुतदारपणा, शुध्द आचार आणि संयम यांचे सैन्य सज्ञ असायला हवे. नाही तर संत केशवस्वामी यांनी म्हटल्याप्रमाणे अवस्था होईल.

*झुटा तेरा जप। भात रोटी गप*
*अतित सुरहे छप। तीन काल लेवे झडप*
*मु सु लेवे नाम। अंदर भरे काम*
*ऐसा बेकाम। तुज केव मिलेगा राम*
*तन लाते खाक। मन मे नापाक*

❖❖

# सीमोल्लंघन

दसऱ्याला सीमोल्लंघन करायचे असते. अटक ओलांडून पलीकडे आपले विजयी पाऊल टाकण्याची कल्पना सीमोल्लंघनात अनुस्यूत आहे. पुरुषार्थाच्या कल्पनेला प्रेरणा देणारी ही भूमिका आपल्या अस्मितेची द्योतक आहे. आजच्या परिस्थितीत अज्ञानाची, विषमतेची, शत्रुत्वाची सीमा ओलांडून ज्ञान, समता व मैत्री यांच्या सुंदर प्रदेशात पाऊल टाकायचे, ही जाणीव आणि कृती म्हणजेच सीमोल्लंघन म्हटले पाहिजे. पण दुर्दैव असे, की माणसे आपल्या जुनाट सीमा-मर्यादांना इतकी घट्टपणे बिलगून बसलेली असतात, की त्यांचे सीमोल्लंघन गावाच्या वेशीबाहेर पाऊल टाकण्यापुरतेच मर्यादित राहते. जन्मापासूनच ज्या आकुंचित कुंपणात माणूस राहिलेला असतो, ती क्षुद्र कुंपणे तोडून नवनवीन क्षितिजांचे दर्शन घेण्याची बुध्दी त्याला होत नाही. कोषातच राहिलेल्या सुरवंटाचे फुलपाखरू व्हायचे असेल, तर त्याने कोषाची सीमा ओलांडलीच पाहिजे. घरट्यात राहिलेल्या पाखराला सीमोल्लंघन केल्याशिवाय आकाशात भरारी घेता येत नाही.

"क्षुद्र स्वार्थाच्या बाहेर पडून समाजाभिमुख होणे, विश्वप्रेमी होणे म्हणजेच 'विजयादशमी' साजरी करणे ठरेल."

संत तुकोबांची दसरा-दिवाळीची संकल्पना वेगळी आहे. आपट्याची पाने देण्या-घेण्यात मने जुळतात काय, असाच जणू सवाल ते करीत आहेत. संत-सज्ञनांची भेट व्हावी, रामनामाच्या उच्चारणाने वाणी परिपक्व व्हावी, मनातले स्वार्थाचे आणि वैराचे भाव विरघळून जावेत, याला ते विजयोत्सव मानतात.

*दसरा दिवाळी तो चि आम्हां सण। सखे संतजन भेटतील॥*

सण-समारंभाच्या आपल्या कल्पना साचेबंद बनल्या आहेत. मिष्टान्नाची चव घ्यावी, नव्या कपड्यांत मिरवावे, फारतर घराला नवीन रंग द्यावा, गाण्या-बजावण्यात दिवस घालवावा; याच आपल्या आनंदोत्सवाच्या ठराविक सीमा आहेत. कपडे नवीन असतात, घरादारांचा रंग नवीन असतो; पण माणसाचे मन आणि त्यातल्या प्रवृत्ती मात्र जुन्या-पुराण्याच असतात. आपल्या जगण्याला,

आचार-विचाराला एखादी नवी भूमिका मात्र आपण देत नाही. त्यामुळे सण येतात आणि जातात; आपण आहोत तेथेच असतो. दिवाळीत नवा प्रकाश मिळत नाही. दसऱ्याला नवविचारांचे सोने लुटता येत नाही.

तुकोबांनी संत-सज्ञनांचा सहवास हाच दिवाळी-दसरा, असे म्हटले आहे. धम्मपदांतही अशाच आशयाचा विचार सांगितला आहे:

*स चे लभेय निपंक सहाय। सध्दिंचरं साधुविहारिधीरं॥*
*अभिभुय्य सब्बानि परिस्सयानि। चरेय्य तेनत्तमनो सतीमा॥*

परिपक्व विचारांचा, सुचरित आणि बुध्दिमान असा धीरोदात्त मित्र भेटला, तर सर्व संकटे दूर सारून जागरूकपणे, आनंदी मनाने त्याच्याबरोबर चालत राहावे. प्रगतीसाठी या प्रकारची मैत्रीच सुखावह होते. पण धीरवीर सज्ञन भेटत नसले, तर एकट्याने चालणे उत्तम. मूर्खांची संगत मात्र मुळीच स्वीकारू नये.

सज्ञनांच्या सहवासामुळे महत्त्वाकांक्षा जागृत होतात. विचारांचे उदात्तीकरण होते. क्षुल्लक स्वार्थ मावळून जातात. फुलांची संगत लाभल्यावर मातीही सुगंधित व्हावी, त्याप्रमाणे माणसाच्या जीवनात उत्तम बदल होऊ लागतात.

असेही एक 'सीमोल्लंघन' डोळ्यांसमोर उभे राहते, की परस्परांचे प्रदेश उद्ध्वस्त करण्याच्या सूड भावनेने पेटलेले राष्ट्रप्रमुख एकत्र येतात, हस्तांदोलन करतात आणि एकमेकांना आलिंगन देऊन म्हणतात:

*जोइ मिलै सो प्रीतिमे और मिले सब कोय।*
*मन सो मनसा मिले, देह मिले का होय?॥*

'भेटावे तर प्रेमाने भेटावे. प्रेम नसेल तर भेटण्यात काय अर्थ? नुसते देह एकमेकांना भेटले तर ते निरर्थक. मनामनांची भेट व्हावी."

संत कबीरांचे हे विचार कोणत्याही काळात आवश्यकच आहेत. राष्ट्रा-राष्ट्रातले - नव्हे जगातले वैरभावनेचे आणि द्वेष-मत्सराचे प्रचंड विस्फोट थांबवायचे असतील, तर शत्रुत्वाच्या साऱ्या भिंती उद्ध्वस्त करून 'हे विश्वचि माझे घर' या जाणीवेपर्यंत पोहोचणे, हेच खरे 'सीमोल्लंघन' ठरेल.

# कोणाही जीवाचा न घडो मत्सर

कित्येकांच्या मनातली सूडभावना वर्षानुवर्षे धगधगीत राहते. कोणावर तरी आपल्याला संधी मिळताच सूड उगवायचा आहे आणि पूर्वी झालेल्या पराभवाचे उट्टे फेडायचे आहे, ही इच्छा रात्रंदिवस त्यांना बेचैन करीत असते. जी वैरभावना आपल्या मनाची अस्वस्थता वाढवीत राहते, साऱ्या जीवनालाच एखाद्या शल्यासारखी खुपत राहते, ती शत्रुत्वाची जाणीव माणूस आपल्या मनातून काढून का टाकीत नाही? खरे तर क्रोध, द्वेष, मत्सर हे विकार पेट घेत आहेत असे वाटताक्षणीच त्यांवर संयमाचे आणि सुविचाराचे पाणी शिंपडणे आवश्यक असते. विकार भडकत गेले, की पसरलेल्या वणव्यामुळे आपल्याबरोबरच अनेकांची - निरपराधी लोकांचीही आयुष्ये होरपळून जातात. व्यक्तिगत पातळीवरदेखील द्वेष, मत्सर आणि सूड या भावना वाढू देऊ नयेत. त्या निर्माणच होऊ देऊ नयेत हा सर्वोत्तम मार्ग आहे.

पण सर्वसाधारण माणसाला ते सर्वस्वी साधणे शक्य नाही. प्रसंगविशेषी राग यावा, आपली प्रगती करून घेण्यासाठी थोडाफार मत्सरही हवा; पण सूडविचाराची चूड अहोरात्र पेटवून ठेवणे मात्र आपल्याच आरोग्याला विघातक आहे. 'धम्मपदातला' पुढील विचार सयुक्तिक वाटतो :

*अक्कोच्छि मं अवधि अजिनि मं अहासि मे।*
*ये तं उपनह्यन्ति वेरं तेसं न सम्मति॥*

'मला शिवीगाळ करण्यात आली. मला मारले. माझा पराभव केला. मला लुटण्यात आले, अशी मनामध्ये जे गाठ बांधून ठेवतात त्यांचे वैर कधीच संपत नाही.' खरे तर शत्रुत्वाला पूर्णविराम द्यायचा असेल तर मित्रत्वाला शुभारंभ केला पाहिजे. क्षुद्र विकार जेव्हा शमतात तेव्हाच सुविचारांची वाट किती सुंदर आहे याची जाणीव होऊ लागते. वैराने वैर कधीच शमत नाही, ते प्रेमानेच विझून जाते हा विचार प्राचीन काळापासून मांडण्यात आला आहे. पण विचार जुना असला तरी मनोविकारही तितकेच जुने आणि खोलवर मुरून बसलेले

आहेत. पंडिताला पंडिताचा मत्सर वाटतो. फार काय एखाद्या साधूलाही दुसऱ्या साधूबद्दल मनातून द्वेष वाटू शकतो. अशी उदाहरणे आहेत. पांडित्य आणि साधुत्व ही क्षेत्रे निर्विकारतेची असावीत अशी अपेक्षा आहे; पण आजची परिस्थिती अशी दिसते, की सर्वच लहान-मोठ्या क्षेत्रात विकारांचा स्फोट होत आहे. तो कसा थांबवायचा हाच एक यक्षप्रश्न आहे.

संत तुकोबांनी म्हटले आहे :

*कोणाही जीवाचा न घडो मत्सर।*
*वर्म सर्वेश्वर पूजनाचे।*

परमेश्वराची आराधना म्हणजेच प्रेमाची आणि शांतीची उपासना होय. दररोज देवपूजेत बराच वेळ व्यतीत करणारे एक देवभक्त पूजाविधी चालू असताना आज कोर्टात कोणाला कशी अद्दल घडवायची, कोणाला किती शिक्षा झाली पाहिजे आणि विशेषतः आपल्या विरोधकांना कसे नामोहरम करायचे याच्या योजना मनात आखीत असातात. तोंडाने स्तोत्र पाठ चालू असतो. हातांनी देवमूर्तीवर फुले वाहिली जातात; पण मन आणि बुध्दी मात्र वैराच्या गाठी मारत असते. ही देवपूजा होईल काय? काळाच्या एखाद्या लाटेबरोबर जेथे साम्राज्ये कोसळतात, राजमुकुट वाहून जातात, नवी सिंहासने तयार होतात तेथे आपण मात्र काही जुन्या वैराचे दोर चिवटपणाने वळीत असतो. त्यात द्वेष-मत्सराचा पीळ भरीत असतो.

एके दिवशी एक गृहस्थ म्हणाले, “दररोज सकाळी आम्ही आमचे घर स्वच्छ करतो. रोगट जंतू नाहीसे व्हावेत म्हणून सुगंधी उदबत्त्या लावतो. घरात भरपूर प्रकाश येऊ देतो. दारे-खिडक्या उघड्या ठेवतो; पण मनाच्या अनेक बिळांत विकारांचे रोगट जंतू सांभाळीत आणि पोशीत बसलो आहोत हे माझ्या लक्षात आले. मी जाहीर करतो की आजपासून माझे कोणाशी शत्रुत्व नाही. सारे माझे मित्र आहेत.”

त्या गृहस्थाच्या मुद्रेवर आनंद आणि उत्साह दिसत होता. नव्या जीवनाला आता त्याने सुरूवात केली होती.

# पेरलेले उगवते काय?

एका अधिकाऱ्याने आपल्या हाती असलेल्या सत्तेचा पराकाष्ठेचा दुरुपयोग करून प्रचंड संपत्ती मिळवली. बंगला, गाडी, उंची वस्त्रेप्रावरणे, परदेश दोरे या सर्व गोष्टींतून त्याने बेबंद सुख आणि उन्माद अनुभवला.

श्रेष्ठ जीवनमूल्यांचा उपहास करताना तो उध्दटपणे म्हणाला, 'देव आणि धर्म या भाकड कथा आहेत. आपल्या कर्माप्रमाणे आपल्याला फळ मिळते ही समजूत तर भ्रमिष्टपणाची आहे. ज्याच्या मेंदूत बुध्दी आहे व ज्याच्या बाहूंत ताकद आहे तो अमाप द्रव्य मिळवतो, अधिकारपदे हस्तगत करतो आणि साऱ्या सुख, विषयांचा भोग घेत वर्षानुवर्षे मजेत राहतो. लोक त्याच्यासमोर वाकतात, लाचार होतात, कर्मविपाक वगैरे तत्त्वज्ञान एकदम झूठ आहे."

त्या उन्मत्त श्रीमंताच्या बोलण्यात विलक्षण दर्प होता आणि नैतिक मूल्यांविषयी एक प्रकारची कडवट तुच्छता होती. आपण कोणत्याही मार्गाने - मग ती वाट वेडीवाकडी का असेना - जाऊन खोऱ्यांनी पैसा ओढला पाहिजे, हे त्याचे जीवनविषयक महनीय तत्त्वज्ञान होते. अशी अनेक माणसे समाजात आहेत. स्वार्थासाठी कितीही अधम पातळीवर उतरण्याची त्यांची तयारी असते. आपले कोणीच काही करू शकत नाही हा आत्मविश्वासही त्यांच्या ठायी जबरदस्त असतो.

पूर्वजन्म, कर्मविपाकाची कल्पना या गोष्टी कितपत खऱ्या हे निश्चितार्थी सांगता येत नाही. पण जे आपण पेरतो तेच केव्हातरी अंकुरते. हा मात्र निसर्गनियम आहे. महाभारताच्या शांतिपर्वात म्हटले आहे:

*सुशीघ्रमपि धावन्तं विधानमनुधावति ।*
*शेते सह शयानेन येन येन यथा कृतम् ॥*
*येन येन यथा अद्यत्पुरा कर्मसमीहितम् ।*
*तत्तदेकतरो भुङ्क्ते नित्यं विहितमात्मना ॥*

मनुष्य कितीही वेगाने धावत असला तरी त्याचे पूर्वजन्मीचे कर्म त्याचा

पाठलाग करीत असते. तो झोपला तर ते त्याच्यासह झोपते. चालू लागला की चालते. त्याने जे कर्म केले असेल ते त्याला एकट्यालाच भोगावे लागते. शास्त्रीय बुध्दीला हा विचार कितपत पटेल हे सांगता येत नाही. कारण पूर्वजन्म आणि पुनर्जन्म यावर अनेकांचा विश्वास असला तरी शास्त्रीय प्रमाणांनी ते सिध्द करता येत नाही. हे गृहीत धरून सुध्दा केलेले कर्म कधीतरी फळते हे मात्र सिध्द करता येते.

पन्नास वर्षांपूर्वी कोणाला तरी आपण साह्य केलेले असते. संकटातून वाचवलेले असते तो मनुष्य ध्यानीमनी नसताना आपल्या विपत्तीच्या काळी आपल्या पाठीशी समर्थपणे उभा राहतो. केव्हातरी कोणावर अन्याय केलेला असतो. पण कालांतराने त्या अन्यायाची विषारी फळे मात्र चाखावी लागतात. काटे पेरल्यानंतर काट्यांचीच झुडपे उगवावीत हे तर्कशुध्द नव्हे काय?

काही तत्त्ववेत्त्यांनी कर्मविपाकाची उपपत्ती मानलेली नाही. वैदिकांनी, जैनांनी, बौध्दांनी वेगवेगळ्या रीतींनी कर्मवाद मानला आहे. बौध्दांनी पुनर्जन्म मान्य केलेला नाही. पण या सूक्ष्म चर्चेत उतरण्यापेक्षा 'हासत कर्म करावे भोगावे रडत तेचि परिणामी' हा अनुभव दैनंदिन जीवनात प्रत्येकालाच येतो.

चोरी, दरोडा, खून, बलात्कार, हिंसा काही काळ निर्वेधपणे करता येत असेल, पण केलेली ही नीचकर्मे हळूहळू माणसाच्या जीवनात, त्याच्या प्रत्येक रक्तबिंदूत, विष कालवीत असतात. एक दिवस त्यांचा उद्रेक होतो. काही कर्मांची फळे ताबडतोब मिळतात, काहींचे फळ मिळायला पुष्कळ वर्षे लागतात.

वाममार्गाने सत्ता अणि संपत्ती भोगलेल्या त्या अधिकाऱ्याला आपल्या मुलांवर चांगले संस्कार करता आले नाहीत. आज व्यसनात संपत्ती उधळून कंगाल झालेला बाप आणि मुले कृतकर्माची आठवण करीत रडत आहेत. कर्मफल काहीही मिळो अथवा न मिळो चांगली वाट धरल्याचा एक सात्त्विक आनंद मात्र माणसाला लाभत असतो. तो त्याने सोडू नये, हाच याचा अर्थ.

◈◈

# मोह : सामान्य आणि असामान्य

आपण आयुष्यात कधीही मोहवश झालो नाही. मोहाचा प्रत्येक क्षण आपण धुडकावून लावला, असे जर कोणी सांगत असेल, तर तो मुक्तात्मा तरी असेल किंवा पूर्णपणे खोटे तरी बोलत असेल. प्रत्येकाच्याच जीवनात निरनिराळे मोह येऊ शकतात. कोणत्या तरी प्रलोभनाच्या मागे प्रत्येक जण काही काळ धावत गेलेला असतो. मोह अनेक प्रकारचे आणि अनेक पातळ्यांवरचे असतात. कोणाला कीर्तीचा, कोणाला प्रतिष्ठेचा, सत्तास्थानाचा, कोणाला कांचनाचा; कोणता ना कोणता तरी मोह प्रत्येकाला येऊन केव्हा तरी बिलगतो. मोहांच्या संगतीत सुखाला भरती येऊ शकते. व्यक्तीच्या कर्तृत्त्वाला आणि पुरुषार्थाला एखाद्या मोहामुळे प्रेरणा मिळू शकते. प्रत्यक्ष परमेश्वरसुध्दा भक्तीच्या मोहात गुंतून पडतो. मग इतरांची काय कथा?

सारीच प्रलोभने दिसायला सुंदर असतात; पण सारीच सौंदर्ये स्वीकारायची नसतात किंवा त्यांच्यामागे फरफटत जायचे नसते. मोहांना आपल्या जीवनात जरूर स्थान आहे; पण काही मोह सारे आयुष्य उद्‌ध्वस्त करू शकतात. सीतेला कांचनमृगाचा मोह पडला नसता, तर राम आणि सीता यांचे जीवन सुखमय झाले असते; पण त्या विलक्षण सुवर्णमृगाकडे पाहून सीता रामाला म्हणाली,

*आर्यपुत्र. अभिरामः असौ मृगौ हरति मे मनः।*
*आनयैनं महाबाहो क्रीडार्थं नो भविष्यति॥*

"आर्यपुत्र, किती सुंदर हे हरीण! याने माझ्या मनाचेच हरण केले. आपल्या मनोरंजनासाठी हे हरीण घेऊन या. याचे रूप अद्भुत आहे. याची कांती अवर्णनीय आहे. हे हरीण मला मिळालेच पाहिजे. कदाचित ते जिवंत हाती न लागले. तर निदान त्याचे सुवर्णमय कातडे तरी मला हवेच आहे."

त्या सुवर्णमृगाच्या सौंदर्याने रामाच्या मनात मोहाचे काही तरंग निर्माण झाले असावेत. खरे तर. रामचंद्र अत्यंत विचारी आणि संयमी होते; पण त्या कांचनमृगाला पकडण्याची कल्पना त्यांच्याही मनात दृढ झाली. सुवर्णाचा मृग

असंभवनीय असतो, हे त्यांना कळत होते; पण तरीही मोह आणि लोभ यांच्या कात्रीत सापडल्यामुळे या बुध्दिमान पुरुषाची बुध्दी त्या वेळी विचलित झाली.

सर्वसामान्य मनुष्याच्या आयुष्यात वेगवेगळी रूपे घेऊन कधीकधी असे कांचनमृग डोकावतात. राम आणि सीता निदान सोन्याच्या हरणाला तरी भुलले. सामान्य माणसे अतिक्षुद्र मोहाचा पाठलाग करीत राहतात. महापुरुषांच्या आयुष्यात येणारे मोह असामान्य असतात. पण अखेर काही मोहांच्या ठायी विनाशक शक्ती जबरदस्त असते. त्यांच्यावर विजय मिळवण्यासाठी सत् आणि असत् यांचा विवेक करणारी बुध्दी उपयोगात आणली पाहिजे. याचाच अर्थ जीवन जगताना तारतम्य जाणणारी विचारशक्ती जागी ठेवण्याची आवश्यकता आहे.

सारेच मोह विध्वंसक नसतात. मोहांचे काही क्षण रसिकतेने आयुष्याच्या पदरात स्वीकारयचे असतात. संतांना समाजमन स्वच्छ करण्याचा दुर्निवार मोह पडलेला असतो. या मोहाच्या आहारी जाऊन आपला वैयक्तिक प्रपंच ते बुडवून टाकतात आणि विश्वप्रपंचाच्या चिंतेत बुडून जातात. या बुडण्यातही एक प्रकारचे विलक्षण असे निर्मितिशील सुख आहे. कलावंतांच्या मनाला आपल्या कलेचा जबरदस्त मोह असतो. त्याच्यासमोर संपत्ती ओतली, तरी तो आपल्या कलेच्या उपासनेपासून परावृत्त होत नाही. सुंदर, सात्त्विक, शुभंकर, उदात्त, काव्यात्म स्वरूपाचे आपल्याला आणि जगाला आनंद देणारे दुःखितांचे अश्रू पुसून त्यांच्या मुद्रेवर सुखस्मित पसरवणारे, असे मोह पुढे होऊन हृदयाशी धरायचे असतात. असे मोह शोधण्यासाठी त्यांचा पाठलाग करायचा असतो. क्षुद्र मोहांना आपण बळी पडण्यापेक्षा श्रेष्ठ मोहांचा पाठलाग करताना आलेले अपयशसुध्दा माणसाला सुखदायक वाटते.

संतांना विठ्ठलदर्शनाचा विलक्षण मोह होता. आपल्या आराध्य दैवताचा मोह आणि भक्ती आनंदनिर्मिती करते. संत जनाबाई म्हणते,

*सावळी ते मूर्ती हृदयी बिंबली। देहोबुध्दि पालटली माझी साची॥*
*धन्य माझी भक्ती धन्य माझा भाव। हृदयी पंढरिराव राहतसे॥*

◈◈

# श्रीकृष्ण आणि अर्जुन

तहानेने व्याकुळ झालेल्या चातकाने पावसाच्या चार थेंबांची अपेक्षा करावी आणि करुणामेघाने त्याच्यावर आपल्या कृपेचा सतत वर्षाव करावा व चातकाच्या अनेक पिढ्यांची तृषा शमावी, असेच अर्जुनाच्या बाबतीत घडले. संभ्रमित झालेल्या अर्जुनासमोर काही प्रश्न उभे राहिले. पुरुषोत्तम श्रीकृष्णाने गीता सांगून अर्जुनाचेच नव्हे तर प्रत्येकाचेच आपल्या प्रतिभासंपन्न वाणीने आणि ज्ञानाने समाधान केले. मार्गदर्शक विचारांची भूक लागलेल्या अर्जुनवृत्तीच्या प्रत्येक तत्त्वजिज्ञासू व्यक्तीला गीतारूपी पक्कान्न देऊन या कल्पवृक्षाने तृप्त केले. कृष्णार्जुन संवादातून गीता निर्माण झाली.

ज्ञानेश्वरांनी कृष्णार्जुनांच्या व्यक्तिरेखा ज्ञानेश्वरीतून गीतेपेक्षाही अधिक विस्ताराने, परिणामकारकतेने चित्रित केल्या आहेत. या गुरु-शिष्यांचे अत्यंत हृदयस्पर्शी 'दर्शन' ज्ञानेश्वरीतून घडते. कृष्ण आणि अर्जुन या दोन्ही महनीय व्यक्तींविषयी ज्ञानेश्वरांना आत्मीयता आहे. म्हणूनच त्यांची चित्रे प्रत्ययकारी झाली आहेत. संभ्रांत अवस्थेतल्या विषण्ण अर्जुनाचे वर्णन ज्ञानेश्वरांनी एका अनुरूप प्रतीकातून केले आहे,

*म्हणोनि कृपा आकळिला। दिसतसे अति कोमाइला॥*
*जैसा कर्दमी रुपला। राजहंस॥*
*तयापरी तो पांडुकुमरु। महामोहे अति जर्जरु॥*
*देखौनी श्रीशारंगधरु। काय बोले॥*

करुणेच्या अधीन झालेला तो अर्जुन चिखलात रुतलेल्या राजहंसाप्रमाणे अत्यंत मलूल झालेला दिसला. महामोहाने जर्जर झालेल्या त्याला मग श्रीकृष्णाने उपदेश केला. 'चिखलात रुतलेला राजहंस' हा अर्जुनाचा उल्लेख किती उचित आहे हे सांगणेच नको. ज्ञानेश्वरांना अर्जुनाविषयी वाटणारी आदरयुक्त ममता यातून प्रकट होते. दुर्योधनाला त्यांनी राजहंस म्हटले नसते. श्रीकृष्ण अर्जुनाला अनेक प्रश्न विचारतात. हे प्रश्न मूळ गीतेत नाहीत. कवीच्या कल्पनेचा तो

समुचित आविष्कार आहे.

*विचारी तू अर्जुनु। की कारुण्ये कीजसी दीनु॥*
*सांग पां अंधकारे भानु। ग्रासिला आधी॥*
*ना तरी पवनु मेघासी बिहे। की अमृतासी मरण आहे॥*
*पाहे पां इंधनचि गिळोनि जाये। पावकाते॥*

आश्चर्यचकित होऊन श्रीकृष्ण विचारीत आहे, "तू अर्जुन! आणि तुला करुणाभावनेने इतके दीन बनवावे! अंधार कधी सूर्याला ग्रासू शकेल काय? वारा कधी ढगांना भ्याला आहे काय? अमृताला कधी मरण असते का? लाकूडच कधी अग्नीला गिळून टाकू शकेल काय? मिठाने पाणी विरघळून जाईल काय? कालकूटासारखे जहाल विष कोणाच्या तरी संसर्गाने मरेल काय? कोल्ह्याने सिंहावर आक्रमण करावे, असा अघटित प्रकार तू करीत आहेस."

एकापाठोपाठ एक असे प्रश्न श्रीकृष्णाने विचारले की त्या प्रश्नांतच सारी उत्तरे सामावलेली होती. श्रीकृष्णाच्याठायी अलौकिक वक्तृत्वगुण होता. भाषेचे सामर्थ्य व सौंदर्य अपार होते. बिनतोड युक्तिवाद होता. विचारांची शुध्दता होती. व्यक्तिमत्त्व प्रभावी होते. दूरवर पाहण्याची सूक्ष्मदृष्टी होती. आणि नीतीची व धर्माची ध्वजा उंच फडकवत ठेवण्याची महत्त्वाकांक्षा होती. इतके दुर्मिळ गुण एकत्र आलेल्या श्रीकृष्णाच्या शब्दांत विलक्षण जिवंतपणा असावा यात कसले आश्चर्य?

श्रीकृष्णाची घनगंभीर, तेजस्वी, चैतन्यमय वाणी अर्जुन मनाने ऐकू लागला. आणि मग हजारो सूर्यांच्या उदयाने प्रकाशाचा महासागर उचंबळावा त्याप्रमाणे अर्जुनाचे मन प्रकाशमय झाले. अर्जुनाला श्रीकृष्ण भेटला नसता तर ... ? अर्जुन म्हणाला,

"हे देवराया, सारा मोह संपला, सूर्याने डोळ्यांच्या जवळ येऊन अंधार दिसतो काय, असे डोळ्यांना विचारणे योग्य ठरेल काय? माझे सारे संशय, सारे मोह, साऱ्या भ्रांती पार वाहून गेल्या. आता केवळ तुझी आज्ञा मला प्रमाण आहे."

आणि अर्जुनाचा रथ गतिमान झाला.

# *स्थितप्रज्ञ कोण?*

भगवद्‌गीतेच्या दुसऱ्या अध्यायात स्थितप्रज्ञाची लक्षणे सांगितली आहेत. स्थितप्रज्ञ म्हणजे ज्याची वृत्ती, बुध्दी सुस्थिर झालेली आहे, ज्याचे मन कशानेही विचलित होत नाही, ज्याच्या मनबुध्दीत निरामय शांती नांदत आहे त्याला स्थितप्रज्ञ म्हटले आहे.

प्रश्न असा आहे की, संसारी मनुष्याला ही अवस्था प्राप्त होऊ शकते काय? कारण प्रपंचातले सुखदुःख, मोहलोभ, क्रोध-क्षोभ यांचा वेढा माणसाभोवती पडलेला असतो. समुद्रात ज्याप्रमाणे लहानमोठ्या लाटा सारख्या उचंबळत असतात आणि कधीकधी सागरावर वादळी वारेही घोंगावतात, तसेच या प्रपंचाचे आहे. मन कंपित होऊ नये हे सांगणे जितके सुलभ, तितकेच निष्कंप मनाने, समाधानी वृत्तीने राहाणे इतके कठीण की ते अशक्य कोटीतलेच वाटावे. मग असे स्थितप्रज्ञ कोण असतील?

*कामना अंतरांतील सर्व सोडूनि जो स्वये*
*आत्म्यांत चि असे तुष्ट तो स्थित-प्रज्ञ बोलिला ॥*
*नसे दुःखांत उद्वेग सुखाची लालसा नसे*
*नसे तृष्णा भय क्रोध तो स्थितप्रज्ञ संयमी ॥*
*सर्वत्र जो अनासक्त बरेवाईट लाभतां*
*न ऊल्लासे न संतापे त्याची प्रज्ञा स्थिरावली ॥*

आनंद आणि शोक यांच्या सीमा पार करून आपल्या आत्मस्वरूपातच संतुष्ट राहायचे, कोणत्याही आसक्तीचा लेप लागू द्यायचा नाही, अशा स्थितप्रज्ञ व्यक्ती सापडणे कठीण असले, तरी त्या असू शकतात. निदान स्थितप्रज्ञतेच्या वाटेने त्या प्रवास करीत असतात.

ज्ञानेश्वरांच्या साहित्यात आणि व्यक्तित्वात जी प्रसन्न शांती भरून राहिली आहे तिचे कारण हा महात्मा साधारण हर्षशोकाच्या अतीत झाला होता. अज्ञानी कर्मठांनी ज्ञानेश्वरांना आणि त्यांच्या भावंडांना जीवन असह्य केले. पण

त्यांच्या शिव्याशापांनी, त्यांच्या छळवादी वृत्तीने एखादा अपवादात्मक प्रसंग सोडल्यास ज्ञानेश्वर कधी अस्वस्थ झाल्याची नोंद नाही. उद्विग्नतेचा अंशही त्यांच्या सुप्रसन्न साहित्यात दिसत नाही. व्यक्तिगत पातळीवरच्या सर्व कामना विसर्जित करून विश्वजीवनाशी शांतपणे आपल्या आत्म्याचा सूर जुळवून विश्वात्मक चैतन्याच्या पट्टीत गात राहण्याची ज्ञानेश्वरांची संगीतसाधना हे स्थितप्रज्ञ वृत्तीचे अलौकिक दर्शन नव्हे काय?

आमच्या सुखदु:खांच्या जाणिवा आमच्या शरीराभोवतीच मर्यादित असतात. मनातल्या वासनाही शरीराभोवतीच घुटमळत असतात. शरीर हेच आमच्या दृष्टीने महनीय सत्य असते. आत्मस्वरूपामध्ये डोकावण्यासाठी आंतरिक दृष्टीच नसते. मग स्थितप्रज्ञतेचा स्पर्श तरी कसा होणार? जिवंत मन आणि जिवंत शरीर म्हणजे वासनाविकारांच्या लहरीवर तरंगित होत राहणे हीच आपली जीवनविषयक कल्पना असते. रागद्वेषांच्या, भोगोपभोगांच्या लाटांवर लाटा अनुभवण्यातच जीवनाची इतिकर्तव्यता सामावली आहे, असे आपल्याला वाटते. मग आपली प्रज्ञा सुस्थिर कशी होणार?

सुमारे आठ दशकांपूर्वीची गोष्ट. काशी नरेशाच्या पोटावर शस्त्रक्रिया करणे आवश्यक होते. त्यांनी बेशुध्द अवस्थेत आपल्यावर शस्त्रक्रिया करू नये, असा कमालीचा आग्रह धरला. ते म्हणाले, "शस्त्रक्रियेच्या वेळी माझ्या तोंडून वेदनेचा अस्पष्टही उद्‌गार निघणार नाही."

डॉक्टरांना ते अशक्य वाटले. बरीच चर्चा होऊन शस्त्रक्रियेला सुरूवात झाली. काशी नरेशांनी डोळे मिटून घेतले आणि ते गीतेचा प्रत्येक श्लोक मनात म्हणू लागले. आपल्यावर शस्त्रक्रिया होत आहे, याची जाणीवही त्यांना झाली नाही. मन, बुध्दी आणि आत्मा यांच्या साऱ्या शक्ती त्यांनी गीताचिंतनात एकवटल्या होत्या. शस्त्रक्रिया पूर्ण झाल्याचे त्यांना सांगण्यात आल्यावर ते मनाने लौकिक जीवनात उतरले.

याचा अर्थ आत्म्याच्या स्वरूपात, चिंतनात पूर्णपणे समरसता पावल्यावर अपूर्व शांतीचा, अलौकिक प्रसन्नतेचा प्रत्यय येतो. या अवस्थेलाच स्थितप्रज्ञाची अनुभूती म्हणता येईल काय?

# आत्मकल्याण व समाजकल्याण

काही धर्मपरायण व्यक्ती प्रपंचात असूनही प्रपंचापासून अलिप्त असतात. बाह्यात्कारी त्या संसारात रस घेतात, असे वाटले तरी संसाराचे त्यांना फारसे आकर्षण नसते. आत्मचिंतनाव्यतिरिक्त इतर कोणत्याही गोष्टी त्यांना मोह घालू शकत नाहीत. संन्यस्त वृत्तीच्या एका व्यक्तीला आग्रहपूर्वक एका गायनाच्या मैफलीत नेण्यात आले. गायनाचा कार्यक्रम संपल्यानंतर त्या सद्‌गृहस्थाला अभिप्राय विचारण्यात आला. तो काहीसा अपराधी स्वरात म्हणाला,

"क्षमा करा, गायन उत्तम दर्जाचे असेल. स्वर माझ्या कानावर पडत होते. पण मनात मात्र परमेश्वराच्या अपूर्व संगीताचे सूर मला जाणवत होते. मी ईशचिंतनात रममाण झालो होतो. मी माझ्या आत्मस्वरूपाचाच विचार करीत होतो. आत्मसंवादात पूर्णपणे मग्न झालो होतो."

अशा टोकाला गेलेल्या काही व्यक्ती असू शकतात. बाह्य जीवनापेक्षा त्यांना आत्मिक जीवनाशी समरसता साधता येते. या व्यक्ती आपल्या आत्मसुखात तल्लीन असतात. पण व्यापक सामाजिक जाणीव ठेवून साऱ्या समाजाशीच संवाद करीत असलेले काही संत असतात. ते आत्मचिंतनही करतात; पण समाजाच्या सुखदुःखांचे स्वरूप पाहून त्याला मार्गदर्शन करण्यासाठी त्यांचे चिंतन चालू असते. केवळ आत्मकल्याणाचा विचार करणारा साधू बहुधा लोकांपासून अलिप्त राहतो. आपल्या आत्म्यातल्या परमात्म्याची तो रात्रंदिवस निष्ठेने आराधना करीत राहतो. आपल्या आणि लोकांच्या सुखदुःखाने तो विचलित होत नाही. आकाशातून जाणारा बाण इकडे तिकडे न वळता सरळ आपल्या 'लक्ष्यबिंदुपाशी' पोहोचतो, तशी त्याची स्थिती असते. पण लोकाभिमुख वृत्तीचा समाजसुधारक संत जमिनीवरून वाहणाऱ्या जिवंत प्रवाहासारखा असतो. तो समाजमनाच्या भूमीला सजल, सुफल करीत, जनतेची तहान भागवीत वाहत असतो. दोन्ही प्रकारचे साधू मुक्तीचीच कामना करतात. पण दुसऱ्या प्रकारच्या साधूची वाट बिकट असली, तरी ती समाजाचा चेहरा-मोहरा बदलणारी आहे. संत तुकडोजी

म्हणतात:

*मंदिरी बैसोनि नाक दाबावे।*
*त्यापेक्षा मार्गीचे काटे उचलावे।*
*दुःखितासि प्रेमे पाणी पाजावे।*
*हे श्रेष्ठतीर्थस्थानाहुनि ॥*
*एक हात खोदावी जमीन।*
*हे पूजनाहूनि पूजन।*
*परिणाम शेकडो व्याख्यानांहून।*
*अधिक त्याचा ॥*

संत तुकडोजी यांनी वर्षानुवर्षे आपली वाणी आणि लेखणी समाजाच्या उत्थानासाठी रात्रंदिवस शिणवली. त्यांच्या कवितेत जितके काव्य आहे, त्यापेक्षा शतपटीने अधिक रसमय काव्य त्यांच्या हृदयात, व्यक्तित्वात आणि समग्र जीवनात भरलेले आहे. आधुनिक काळातला हा संत आपल्या प्राचीन संतांइतकाच निर्मोही, स्वार्थरहित आणि समाजवत्सल होता. मंदिरात बसून कर्मकांड आचरणाऱ्या एखाद्या कर्मठापेक्षा रस्त्यावरचे काटे बाजूला सारणारा आणि तहानलेल्या माणसाला आपुलकीने पाणी देणारा माणूस त्यांच्या दृष्टीने अधिक धार्मिक आहे. स्वामी विवेकानंदही म्हणाले होते,

"अनाथ बालकाच्या तोंडी ज्याला घास घालता येत नाही तो माझ्या दृष्टीने धार्मिक नव्हे."

ईश्वरापासून दूर नेणारे धर्म जेव्हा माणूस मान्य करतो, तेव्हा त्याने धर्माचीच विटंबना केलेली असते. देव अणि मंदिर आम्हाला पूज्य आहेत. पण माणूस हाच आपला केंद्रबिंदू असावा आणि त्याच्या विकासासाठी कष्ट करावेत, झुंजत राहावे, माणसाचाच देव करावा ही भूमिका साऱ्याच संतांनी घेतलेली असते. आत्मचिंतनातच आजूबाजूच्या समाजाचे निरीक्षण आणि चिंतन सामावून घ्यावे लागेल. तुकडोजी महाराज म्हणतात:

*आम्ही सर्वचि संतुष्ट राहू।*
*सर्व मिळोनि सर्व खाऊ।*
*राबू सर्व, सुखे सेवू।*
*जे जे असेल ते सगळे ॥*
*साधुसंत देवधर्म।*
*मानवोध्दारचि त्यांचे कर्म।*
*तेचि आठवूनि ऊध्दरू ग्राम।*
*तुकड्या म्हणे ॥*

◈◈

# कष्टेविण फळ नाही

आपले सारे जीवन परमेश्वरी इच्छेवर अवलंबून आहे. परमेश्वराच्या कृपेमुळेच आयुष्य, संपत्ती आणि कीर्ती लाभते म्हणून अखंड परमेश्वराचे स्तवन करावे, भजन-कीर्तन करावे असा उपदेश करण्यात येतो. परमेश्वर ही आद्य आणि अंतिम शक्ती आहे, असे मानणे वेगळे आणि आपला सारा भार त्या शक्तीवर टाकून तिची स्तुतिस्तोत्रे गाण्यात गुरफटून जाणे वेगळे. भक्तीला दुबळेपणाचे अधिष्ठान असेल आणि ही भक्ती प्रयत्नाला, पुरुषार्थाला चालना देत नसेल तर ती काय कामाची? असा विचारही संत साहित्यात आढळतो. समर्थ रामदासांनी म्हटले आहे:

*जनांचा लालची स्वभाव। आरंभीच म्हणती देव॥*
*म्हणिजे मला काही 'देव'। ऐसी वासना॥*
*कष्टेविण फळ नाही। कष्टेविण राज्य नाही॥*
*केल्याविण होत नाही। साध्य जनी॥*
*आधी कष्टाचे दुःख सोसिती। ते पुढे सुखाचे फळ भोगिती॥*
*आधी आळसे सुखावती। त्यांसी पुढे दुःख॥*

समर्थांचा आक्षेप असा, की लोकस्वभाव लालची असतो. सुरूवातीलाच म्हणजे कष्ट करण्यापूर्वी 'देवदेव' करण्याकडे त्यांची प्रवृत्ती असते. देवाने काहीतरी पदरात टाकावे, हा लोकांचा हव्यास असतो. 'जे आपल्याला मिळवायचे ते स्वप्रयत्नाने आणि पुरुषार्थाने मिळवावे' या विचारापेक्षा निष्क्रिय राहून देवाने मात्र आपल्यावर कृपा करावी, ही भूमिका स्वीकारली जाते.पण जीवनात कष्ट केल्याशिवाय फळाची अपेक्षा करणे, हे खरे तर दुर्बलतेचे लक्षण आहे. प्रपंच यशस्वी करण्यासाठी प्रयत्नांची आवश्यकता असते.

राज्याची स्थापना, औद्यागिक उत्कर्ष, व्यापार आणि शेती, शिक्षण, लोककल्याण, शस्त्रास्त्रांची निर्मिती, नवनवीन संशोधन, दुष्ट प्रवृत्तींचे दमन, शत्रूंचे निर्दालन या साऱ्या गोष्टींसाठी म्हणजेच जीवन सुस्थिर, समर्थ आणि

सुसंस्कृत करण्यासाठी अखंड कष्ट करावे लागतात. परमेश्वर ही अंतिम शक्ती आहे. पण प्रथम मनुष्याने आपली शारीरिक, बौध्दिक आणि आत्मिक शक्ती पणाला लावून नवनिर्मिती केली पाहिजे. केवळ नामस्मरणाने किंवा भजनपूजनाने समाजजीवनाची उभारणी होऊ शकत नाही. हे तारतम्य मनी बाळगले पाहिजे. परमेश्वर साह्य करतो. ही कल्पना संयुक्तिक आहे. पण जो समाज मनाची दुर्बलता झटकून आळस सोडून, दंड थोपटून परिस्थितीचे आव्हान स्वीकारून पुरुषार्थाची शर्थ करतो. त्यालाच ती ईश्वरी शक्ती उपकारक होते.

शूर योध्दे, महान राज्यकर्ते, श्रेष्ठ धर्मसंस्थापक, उद्योगपती, प्रतिभावंत या सर्वांच्या जीवनात पुरुषार्थी प्रवृत्तीला आणि नवरचनेच्या उत्कट उर्मीला, अखंड कष्टाला विलक्षण महत्त्व आहे. कोणाही निष्क्रिय, आळशी, अज्ञानी माणसाच्या मस्तकावर हात ठेवून परमेश्वराने त्याला 'आजपासून तू शूरवीर झाला आहेस महान बनला आहेस,' असे म्हटलेले नाही. असले चमत्कार कधी घडत नाहीत. समर्थांच्या म्हणण्याप्रमाणे :

*सामर्थ्य आहे चळवळीचे। जो जो करील तयाचे॥*
*परि तेथे भगवंताचे। अधिष्ठान पाहिजे॥*

लोककल्याणाच्या इच्छेने रचनात्मक चळवळ करणे म्हणजेच त्या चळवळीला भगवंताचे अधिष्ठान मिळणे, असे समीकरण मांडायला हरकत नाही. सोमनाथाच्या मूर्तीचा विध्वंस करणाऱ्या देवद्रोही प्रवृत्तीपुढे निष्क्रिय जनता जेव्हा हात जोडून उभी राहिली तेव्हा परमेश्वरही मदतीसाठी धावला नाही. एका बाजूने आध्यात्मिक शक्ती वाढवावी. भौतिक जीवनाला समर्थ आकार देणारी बौध्दिक आणि शारीरिक शक्तीही सतत जोपासल्याशिवाय ईश्वर संतुष्ट होत नाही.

❖❖

# *अमृत नासू देऊ नका!*

एक नवलकथा अशी की स्वर्गातले अमृत नासले. कल्पवृक्षाने निष्फळ व्हावे, सागराने निर्जळ बनावे, सूर्याने निष्प्रभ व्हावे, परमेश्वराने निष्प्रेम असावे, चंदन गंधहीन बनावे, चिरतारुण्य असलेल्या अप्सरांचे यौवन संपुष्टात यावे हे जसे असंभवनीय आणि चमत्कारिक, तसेच अमृत नासून जावे ही घटनाही अतर्क्य कोटीतली. पण स्वर्गावर सुध्दा कधीकधी संकट येऊ शकते. नरकातली दुर्गंधी इतकी उग्र असते, की त्यामुळे स्वर्गातले सुगंधी पारिजातकदेखील कधीकधी करपून जाऊ शकतात. म्हणूनच नरकाचा वारासुध्दा आपल्या सीमेच्या आत येऊ नये याची दक्षता घेऊन स्वर्गाच्या संरक्षकांनी सीमेवर बंदोबस्त ठेवला पाहिजे. स्वर्गाचा उत्कर्ष नरकाला कधीच सहन होत नाही. स्वर्गात नेहमी अशांतता निर्माण करण्याचे, त्याचे लचके तोडण्याचे नरकाचे प्रयत्न चालू असतात. शेजारीच नरक असल्यानंतर त्याच्यापासून सदैव सावध राहिले पाहिजे. पण अमृत पिऊन धुंद झालेले स्वर्गीय देव गाफील राहतात असे पाहून त्यांचे अमृतच प्रदूषित  करण्याचे कारस्थान रचले गेले आणि एके दिवशी अमृतच नासून गेले.

इंद्र विलक्षण चिंतेत पडला. त्याने नारदाला प्रश्न विचारला,

*अमृतासी रोग स्वर्गी जाहला पाही। अमरनाथ तेही गोड नसे॥*
*नारदाते प्रश्न करी अमरनाथ। शुध्द ते अमृत कोठे होय॥*

इंद्राने आणखीही विचारले असावे, 'हे मुनिराज, आमच्या नंदनवनाचे ओसाड  वाळवंट बनवण्याचा नरकाचा उद्योग आम्हाला माहीत आहे. पण आमचे अमृतही आता नासवले गेले. ते कुठे आणि कसे शुध्द होईल ते आम्हाला सांगा.'

नारदमुनींनी पंढरीचा पत्ता सांगितला. संतांच्या कीर्तनात तेथे देवही नाचतो. नामाचा गजर होतो. भक्तीचे शीतल वारे वाहतात. पंढरी ही 'कैवल्याची पेठ' आहे. तेथे हे अमृत घेऊन गेलास तर निश्चितपणे शुध्द होईल.

*अमृताचे ताट घेऊनी आला इंद्र। गर्जती सुखर जयजयकारे॥*
*देव सुखर आले पंढरीसी। नामा कीर्तनासी उभा असे॥*

संत चोखामेळा आपल्या पत्नीला म्हणाला, देवाने भेटून मला 'तुझ्या घरी आज पारण्यासाठी येणार असे सांगितले आहे.' भोजनाची तयारी करा. चोखामेळ्याच्या अंगणात देवादिकांच्या पंगती भोजनासाठी बसल्या. ही चमत्कारकथा नव्हे. देव भोजनासाठी कसा घरी येईल? 'अतिथी देवो भव' ही आपली भूमिका आहे. येणाऱ्या अतिथीला देवच मानावे ही आपली उदार संस्कृती आहे.

*चोख्याचे अंगणी बैसल्या पंगती। स्त्री ते वाढिती चोखियाची॥*
*अमृताचे ताट इंद्रे पुढे केले। शुध्द पाहिजे केले नारायणा॥*

विठ्ठलाने चोखोबाला नासलेले अमृत शुध्द करण्यास सांगितले.

चोखा या शब्दाचा अर्थच मुळी संपूर्ण शुध्द असा आहे. ज्याच्या श्वासनिःश्वासातून भक्तीच वाहत होती. ज्याच्या शब्दांत, वृत्तीत, दृष्टीत, मनाच्या अणुरेणूत भक्तीच तरंगत होती. ज्याचा मळ संपून गेला आणि जो केवळ 'चोख' उरला त्या चोख्याशिवाय अमृत कोण शुध्द करणार? इंद्रालाही ते शक्य नव्हते. चोखोबाने म्हटले परमेश्वराच्या नामस्मरणाने सारे अशुध्द शुध्द होऊन जाते. मग त्या अमृताची काय कथा? चोखामेळा आणि त्याची पत्नी दोघांनी मिळून आपल्या झोपडीत स्वर्गीचे अमृत शुध्द केले.

संत एकनाथांनी म्हटले आहे,

*'चोखियाच्या घरी शुध्द होय अमृत।*
*एकाजनार्दनी मात काय सांगू?'*

नरकाच्या संगाने स्वर्गातले वातावरण प्रदूषित होते. सारा वैभवशाली स्वर्ग आम्हाला जिंकायचा आहे अशा आरोळ्या नरकांत उठत असतात. घृणास्पद वासना आणि विकार स्वर्गात पसरवून देण्याचा हा कट असतो. म्हणून माणसाने आपल्या मनाचा आणि जीवनाचा स्वर्ग सदैव शुध्द राहील ही दक्षता घेतली पाहिजे. हृदयातले भक्तीचे आणि प्रेमाचे अमृत चोखामेळ्यासारखे शुध्द ठेवले पाहिजे. अमृत कधीही नासू नये.

# अहिंसा हा जीवनधर्म

धर्माचे हृदय कोणते असा प्रश्न विचारला तर अहिंसा हे धर्माचे प्राणतत्त्व आहे असेच म्हणावे लागेल. अहिंसेचा विचार सर्वधर्मपुरुषांनी, साधुसंतांनी विस्ताराने केला आहे. अहिंसावृत्तीच्या आधारानेच जीवन जगता येते. जीवनाचा विकास होतो. मनुष्याचे माणूसपण अहिंसक मनोवृत्तीनेच सिध्द होते. हिंसा आणि रक्तपात, जाळपोळ आणि लुटालूट, शत्रुत्व आणि स्वार्थासाठी आक्रमण या कृत्यांचे समर्थन कोणीही करू शकत नाही. वात्सल्य, प्रेम, करुणा, क्षमा, शांती, प्रसन्नता ही सारी अहिंसेचीच रूपे आहेत. व्यक्तिगत जीवनाबरोबरच सामाजिक आणि राष्ट्रीय जीवनात, किंबहुना वैश्विक जीवनातही या मूल्यांचा सुगंध पसरावा आणि विश्वसंस्कृतीची उभारणी अहिंसा, सहकार्य व प्रेम या तत्त्वांवर व्हावी, हे उत्कट स्वप्न महावीर-बुध्द यांच्यापासून साऱ्याच महात्म्यांनी रंगवले आहे.

संत ज्ञानेश्वरांनी गीतेवर भाष्य करीत असताना विशेषच विस्ताराने - जवळजवळ सवाशे ओव्यांतून अहिंसेची सूक्ष्म, सुंदर, काव्यपूर्ण चिकित्सा करून अहिंसेच्या सर्व पैलूंवर प्रसन्न प्रकाश टाकला आहे. आर्जव, मार्दव, दांभिकतेचा अभाव, आचारविचारातली शुध्दता, भाषेतली मधुरता, मनातले सौहार्द या सर्व गुणविशेषांचे प्रत्ययकारी चित्रण त्यांनी केले आहे. गीतेच्या तेराव्या अध्यायात 'अहिंसा' हा एक शब्द आला आहे. त्यावरून ज्ञानेश्वरांनी अहिंसेच्या सर्व सुगंधी पाकळ्यांचे सौंदर्यपूर्ण दर्शन आपल्या श्रोत्यांना घडवले आहे. खरे तर ज्ञानेश्वर हेच अहिंसेचे आणि प्रेमभावनेचे विलक्षण सोज्वळ, सत्त्वाढ्य असे प्रसन्न दर्शन आहे.

'ज्ञानेश्वरीतले पसायदान' हे अहिंसेचे उत्तुंग शिखर आहे. ज्ञानेश्वरांच्या या विचाराचा परिणाम तत्कालीन साहित्यावर आणि समाजजीवनावर दृढपणाने झाला. अहिंसकाच्या बोलण्याचे चित्र ज्ञानेश्वर रेखाटतात:

*तैसे साच आणि मवाळ। मितले आणि रसाळ॥*
*बोले जैसे कल्लोळ। अमृताचे॥*
*उरोधु वादुबळू। प्राणु पापढाळु॥*
*उपहास चाळु। वर्म स्पर्शु॥*

सत्य भाषण मृदुमधुर शब्दांतून तो असे करतो, की जणू अमृताचे तरंग निर्माण होत आहेत. वर्माला झोंबणारे असे उपरोधिक, विडंबक, भांडण लावणारे अधिक्षेपात्मक शब्द तो कधीच बोलत नाही. ही केवळ वाचिक अहिंसा नव्हे. हृदयातच स्नेहभाव असेल तर तो शब्दांतून प्रकट झाल्याशिवाय राहणार नाही. शस्त्रांनी जसा रक्तपात करता येतो. त्याप्रमाणेच तीक्ष्ण शब्दांच्या प्रहारानेही मनाला जखमा करता येतात. कोणाच्या तरी वर्मावर घाव घालण्यात माणसाला एक प्रकारचा आसुरी आनंद मिळतो; पण आपल्या हळुवार शब्दांनी आपण लोकांची मने फुलवीत आहोत ही जाणीव अधिक आनंदाची असते.

अहिंसक वृत्ती म्हणजे एखादी कृत्रिम आचारसंहिता नव्हे. जो ज्ञानवंत असतो तो अहिंसा धर्मानेच वागतो. उद्यानात सहज फिरतानाही सुसंस्कृत मनुष्य पाने-फुले तोडीत नाही. जे सुंदर आहे ते झडप घालून आपल्या ताब्यात मिळवावे आणि थोड्या वेळाने त्याचा चोळामोळा करून टाकून द्यावे हे माणूसपणाशीच विसंगत आहे असे ज्ञानेश्वरांनी मानले आहे. प्रेमी वृत्तीचा स्पर्श कसा असतो याचे वर्णन ते करतात:

*पावोनि तो स्पर्शु। मलयानिळु खरपुसु॥*
*तेणे माने पशु। कुरवाळणे॥*
*जे सदा रिते मोकळे। जैशी चंदनांगे निसळे॥*
*न फळतांही निफळे। होतीचि ना॥*

मलयपर्वतावरून येणाऱ्या वाऱ्याच्या झुळकीहूनही त्याचा हस्तस्पर्श सुखद असतो. अशा स्पर्शाने तो पशूंना कुरवाळतो. चंदनवृक्षाचे सर्व भाग सुगंधित असतात. त्यांना निष्फळ म्हणता येत नाही. अहिंसा हे आचारकांड नव्हे. ते जीवनाचे तत्त्वज्ञान आहे. अहिंसा हा आत्मधर्म आणि विश्वधर्म आहे.

# *जीवनाच्या रंगभूमीवर...*

मनुष्याच्या जीवनात अनेक लक्षणीय स्थित्यंतरे होत असतात. आयुष्याची पन्नास वर्षे घेतली तर या अर्धशतकात आयुष्याला कितीतरी वेगवेगळी अकल्पनीय वळणे मिळत असतात. दहा वर्षांपूर्वी आपल्याला जे सुखाचे पदार्थ मोलाचे वाटत होते, ज्या गोष्टींबद्दल आपुलकी व अभिमान वाटत होता त्यांच्याबद्दल आज तीच भावना असेल असे नाही. जसजशी वर्षे उलटतात तसतसे मनुष्याचे शरीरही काही प्रमाणात बदलत राहते. मन, बुद्धी आणि स्वभाव यांच्यातही थोडाफार किंवा विलक्षण पालट होऊ शकतो. जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन वय आणि अनुभव यांच्या अनुषंगाने बदललेला असतो. एकेकाळी प्रिय वाटलेले आदर्श गळून पडतात. नवे आदर्श प्रमाण मानावसे वाटतात. याचा अर्थ मानवी जीवनाच्या प्रवाहात निरनिराळ्या लाटा उत्पन्न होतात. कधी प्रवाहाचा वेग मंदावतो कधी तो वेगाने वाहायला लागतो. जीवन सदैव गतिमान आणि परिवर्तनशील असते. तारुण्याच्या काळात या प्रवाहात मोहक रंगतरंग उचंबळतात. पण हा काळदेखील आपली कात टाकतो. सळसळणाऱ्या तारुण्याला ओहोटी लागते. मनाच्या आभाळात भराऱ्या मारणारे सुंदर, काव्यमय कल्पनांचे पक्षी कुठे नाहीसे होतात हे कळत नाही. या चंचल मनाला आपल्या बाहुपाशात दीर्घ काळ पकडून ठेवण्याचा प्रयत्न सफल होत नाही. तत्त्वज्ञ आणि साधुसंत सांगतात 'आयुष्य म्हणजे ओंजळीत घेतलेले पाणी आहे. ते फार लवकर ओघळून जाते. ओंजळ अखेर रितीच राहते.' कबीरांनी म्हटले आहे:

*जैसे पंछी रैन बसेरा बसै बिरिछपर आई।*
*भोर भए सब आपुआपुको जहां तहां उडि जाई।*
*सागरमांही लहर उठत है गनिता गनी न जाई।*
*कहत कबीर सुनो भाई साधो, दरिया लहर समाई।*

रात्र झाल्यावर पाखरे वृक्षावर मुक्कामासाठी येतात. सकाळ झाल्याबरोबर जिकडे तिकडे उडून जातात. सागरावर सारख्या लाटा येत असतात. त्यांची

गणती कशी करणार? कबीर म्हणतो हे साधो, समुद्रात लाट फुटली. जीवन केवळ परिवर्तनशील आहे असे नव्हे तर ते केव्हा ओसरून जाईल हे सांगता येऊ नये इतके अस्थिर आहे. मनुष्य जीवनाच्या या स्वरूपावर तत्वचिंतक कवी भर्तृहरी याने एक मार्मिक श्लोक लिहिला आहे. त्यात त्याने म्हटले आहे, 'जीवनाच्या रंगभूमीवर मनुष्य थोडावेळ बालक होतो, थोडा वेळ तो कामरसिक तरुण होतो, कधी दरिद्री असतो केव्हा वैभव संपन्न असतो आणि अखेर हा नट म्हातारपणाने सुरकुतलेला होऊन पडद्यामागे म्हणजे यमाच्या निवासस्थानी आपली भूमिका संपवून निघून जातो.' आयुष्याच्या या रंगभूमीवर वेगवेगळ्या भूमिका वठवण्यासाठी वेगवेंगळी रंगरंगोटी करावी लागते. मुखवटे बदलावे लागतात. चालण्या-बोलण्यात आणि हसण्यात भूमिकेला अनुसरून बदल घडवावा लागतो.

पण एकच भूमिका करीत राहिलो तर आयुष्य कंटाळवाणे वाटेल. आयुष्यातले रस, रंग आणि गंध यांच्यात सारखा बदल होत असल्यामुळे मनुष्य अनेक भूमिकांच्या माध्यमातून जीवनाचा आणि जगाचा अन्वयार्थ लावू शकतो. स्वप्नांचे तारुण्य संपते आणि काटेरी सत्यांचे प्रौढत्व आणि वार्धक्य अनुभवायला मिळते. त्यामुळे मनाला व बुध्दीला पक्वता येऊ शकते. संथगतीने व सरळ रस्त्याने चाललेल्या नदीला दर्शनीय व्यक्तित्त्व नसते. वेड्यावाकड्या वळणांनी धावणारी, कधी डोंगरावरून दरीत उडी घेणारी, कधी एखादे गावचेगाव पोटात घेऊन वाहणारी तर तीरावरच्या प्रदेशाला सुंदर बनविणारी नदी आकर्षक असते आणि सुंदरही दिसते.

आपले जीवनही असे विविध वाटा-वळणांचे असले तर त्यात आगळा जिवंतपणा निर्माण होऊ शकतो. ज्ञानोबा-तुकोबांच्या आयुष्यात कितीतरी चढउतार आले, कोणी शिव्यांची लाखोली वाहिली. कोणी फुलांचे हार घातले. हे संत दोन्ही गोष्टींचा तटस्थपणे स्वीकार करीत आपली वाट चालत होते. शिव्याशाप देणाऱ्यांच्याही कल्याणासाठी आपल्या रसाळ वाणीच्या माध्यमातून प्रेमाचा सुगंध अर्पण करीत होते. कबीर, नामदेव, चोखामेळा आणि कान्होपात्रा, मीरा आणि रामदास प्रत्येक संताने मन लावून आपापल्या वेगवेगळ्या भूमिका वठवल्या. आपली भूमिका लहान असो, मोठी असो प्रामाणिकपणाने वठवण्यात जीवनाचे सार्थक आहे.

❖❖

# श्रेष्ठ ग्रंथांशी संवाद

'ज्ञानेश्वरी', 'तुकोबांची गाथा', 'रामचरितमानस' इत्यादी ग्रंथांची शेकडो पारायणे आत्यंतिक भक्तिभावाने करणारे लोक आहेत. अनेक भक्तांना हे ग्रंथ मुखोद्गत झालेले दिसतात. संतांचे काव्य त्यांच्या जिभेवर खेळत असते ही समाधानाची घटना आहे; पण या काव्यातील उदात्त भावविचारांचे, जीवनविषयक चिंतनाचे रसग्रहण सर्वसामान्य भक्त मनःपूर्वक करीत असतो असे मात्र कित्येक वेळा आढळत नाही. पारायण करणे हे एक कर्मकांड होऊन बसणे सयुक्तिक नव्हे. कितितरी भाविक पारायणे वगैरे न करता या ग्रंथांना वंदन करतात. ग्रंथांची पालखीतून मिरवणूक काढतात. उच्च स्वरात जयघोष करतात; पण तो ग्रंथ उघडून त्यातील निरुपण वाचून अथवा ऐकून त्याचा रसास्वाद त्यांनी घेतलेला असत नाही. पराकोटीच्या भाविकतेमुळे श्रेष्ठ ग्रंथांची केवळ पूजाअर्चा केली जावी, यापेक्षा जाणीवपूर्वक ग्रंथांच्या अंतरंगात हळुवारपणे प्रवेश करण्याची आणि त्यांतील वैचारिक व भावनिक सुगंधी प्राणवायू आपल्या जीवनात भरून घेण्याची प्रवृत्ती वाढली पहिजे. तीच धर्मग्रंथांची खरी पूजा होऊ शकेल.

दोन धर्माभिमानी आपसांत चर्चा करताना एकमेकांना सांगत होते, 'तुम्ही काही म्हणा, भगवद्गीतेसारखा अलौकिक ग्रंथ आजपर्यंत झालाच नाही. एकदा केव्हातरी सवडीनं तो मला वाचायचा आहे. 'गीता' हा महनीय ग्रंथ आहे यात शंका नाही.' ही चर्चा करणारी माणसे पदवीधर होती. सर्वसाधारण अर्धशिक्षित किंवा अशिक्षित भक्ताने 'ज्ञानेश्वरी' न वाचता तिची केवळ पूजा केली तर त्याला या परिस्थितीत दोष कसा द्यायचा? पण मानवाच्या संस्कृतीवर खोल परिणाम करणारे श्रेष्ठ धर्मग्रंथ सांप्रदायिक आकुंचितपणा बाजूला ठेवून वाचले पाहिजेत. आणि त्यांचे मनन केले पाहिजे. तुकोबांची गाथा, कबीरांचे दोहे वाचताना हळूहळू मनाचे आणि भावनांचे शुद्धीकरण होऊ लागते. जीवनातले सौंदर्य समजू लागते. आनंदाला आकार येऊ लागतो. तुकडोजी महाराजांनी याबाबतीत म्हटले आहे:

*संत ज्ञानदेव, मुकुंदराज। चक्रधर, नाथादि हंसराज॥*
*यांनीच सुलभ केले सहज। ज्ञान प्राकृत ग्रंथांतरी॥*
*समर्थ रामदासादि झाले। मुक्तेश्वर, मोरोपंतादि भले॥*
*गीता, अभंग गाथे लिहिले। महाराष्ट्र - ग्रंथकर्त्यांनी॥*
*स्वामी विवेकानंदादि संती। जुन्या-नव्यांची वाराया भ्रांति॥*
*ज्ञानदीप उजळले आपुल्या ग्रंथी। नाना भाषांमधूनी॥*
*त्या सर्वातूनि शोषूनि घ्यावे। जे तात्त्वि बोध-ग्रंथ स्वभावे॥*
*कर्मठतेच्या भरी न भरावे। अथवा शुष्क पांडित्याच्या॥*

श्रेष्ठ ग्रंथ माणसाच्या जीवनाची घडण करतात. कारण ज्यांच्या ज्ञानाला आणि प्रतिभेला परिपक्वता आलेली आहे अशा महनीय व्यक्तींनी या ग्रंथांची निर्मिती केलेली असते. 'ज्ञानेश्वरीसारखी' साहित्यकृती जो अभ्यासील त्याच्या आयुष्यात निकोप रसिकतेचे, चांगल्या विचारांचे सौंदर्य निर्माण होऊ शकते. ज्याने तुकाराम कंठस्थ केला त्याने तो हृदयस्थही केला पाहिजे. श्रेष्ठ संतांचे काव्य म्हणजे आनंदाचा परिपूर्ण डोह आहे. आनंदाच्या तरंगांनी उचंबळत असलेला हा डोह क्षुद्र सुख-दुःखातून काढून उच्चतर जीवनाच्या उंचीवर आपल्याला घेऊन जातो. बायबल असो, कुराण अथवा झेंदअवेस्ता असो, धम्मपद किंवा समयसार असो, या ग्रंथांनी माणसाचे सांस्कृतिक जीवन समृध्द केले. समर्थ बनवले. हे ग्रंथ अभ्यासणे म्हणजे त्या श्रेष्ठ ग्रंथकारांच्या आत्म्याशी 'संवाद' करणे होय. क्षुद्रांशी वाद करण्यापेक्षा महात्म्यांशी संवाद करण्याची संधी श्रेष्ठ ग्रंथ मिळवून देतात. संत ज्ञानेश्वरांनी गीताग्रंथाचे महत्त्व विशद करताना जे म्हटले ते सर्वच श्रेष्ठ धर्मसाहित्याबद्दल म्हणता येईल.

*की अविद्यतिमिररोखे। श्लोक सूर्याते पैजा जिंके॥*
*ऐसे प्रकाशिले गीतामिखे। राय श्रीकृष्णे॥*

अज्ञानरूपी अंधारावर चाल करून एकेक श्लोक जणू सूर्याला पैजेने जिंकतो असे श्रीकृष्णाने गीतारूपाने प्रकट केले. जीवनाचे उच्च तत्त्वज्ञान सांगणारे साहित्य मनुष्याने रसिकतेने प्रेमपूर्वक वाचले पाहिजे.

# सोन्याची बेडी

एका तत्त्ववेत्त्याने एक विरोधाभासात्मक विधान केले आहे. तो म्हणतो, 'मनुष्य जन्मतः स्वतंत्र आहे; पण तो ठायी ठायी शृंखलांत अडकून पडला आहे. हे साखळदंड त्याला तोडता येत नाहीत.'

खरे तर जन्म तरी मनुष्याच्या हातात कोठे असतो? याचा अर्थ तो जन्मापासून मरणापर्यंत बध्द आहे. मुक्तीची धडपड मात्र तो करीत असतो; पण अज्ञानामुळे अधिकाधिक बंधनांत गुरफटून जातो. आपण आपले स्वातंत्र्य पावलोपावली गमावीत आहोत, हे त्याच्या ध्यानातच येत नाही. प्रकाशाचा शोध अंधाऱ्या खोलीत बसून, डोळे मिटून कधीच करता येणार नाही. त्यासाठी प्रथम दृष्टिकोन स्वच्छ केला पाहिजे. बंद खिडक्या उघडल्या पाहिजेत. त्याप्रमाणेच मनाच्या आणि बुध्दीच्या बंद खिडक्या मनुष्याने प्रथम प्रयत्नपूर्वक उघडल्याच पाहिजेत. प्रकाशकिरणांचा ध्यास लागल्याशिवाय प्रकाशाची वाट दृष्टीसमोर येत नाही. बहुसंख्य लोकांचे सारे आयुष्य अंधारात व्यतीत होते. अंधाराची इतकी सवय होते, की उजेड मार्गात आला तरी हे लोक त्याच्याकडे पाठ फिरवतात. हे आश्चर्यच नव्हे काय? मुक्त होण्यापेक्षा बध्दावस्थेत राहण्याची ही प्रवृत्ती सर्व ज्ञानंवतांनी निंदिली आहे. समर्थ रामदास म्हणतात:

*परमार्थाचा अनादर। प्रपंचाचा अत्यादर॥*
*संसारभार जोजार। या नाव बध्द॥*
*सत्संगाची नाही गोडी। संतनिंदेची आवडी॥*
*देहेबुध्दीची घातली बेडी। या नाव बध्द॥*
*हाती द्रव्याची जपमाळ। कांताध्यान सर्वकाळ॥*
*सत्संगाचा दुष्काळ। या नाव बध्द॥*

प्रपंचाचा आदर जरूर करावा. प्रपंचाचा स्वीकार केल्यानंतर त्याचे वास्तवस्वरूप समजून घेण्याची आवश्यकता असते. सारा प्रपंच फेकून देण्याच्या योग्यतेचा आहे, असे रामदासांनी किंवा कोणत्याही संताने सांगितलेले नाही.

प्रपंचाची घृणा करावी, प्रपंच हा अंतर्बाह्य निंद्य आणि निषेधार्ह आहे असे कुणी म्हणत नाही. त्यातही सुख, प्रेम. वैभव, आनंद यांच्या रंगीबेरंगी रेषा अवश्य आहेत. प्रपंच करीत परमार्थाचीही साधना करता येते. परमार्थ आणि प्रपंच यांच्यांत जन्मजात शत्रुत्व आहे, असे मानण्यात फारसे तथ्य नाही. राज्याचा उपभोग घेणारा जनकासारखा राजा मनातून विरक्तच होता; पण देहबुध्दीच्या अवजड बेडीतून बाहेर पडण्याची जो इच्छा करीत नाही, ज्याला आत्मशक्तीचे भानही नसते. प्रपंच म्हणजे केवळ ऐंद्रियसुखांची दिवाळी साजरी करणे ही ज्याची समजूत आहे, त्या अज्ञानी माणसाला 'बध्द' ही संज्ञा दिली आहे. हातात द्रव्याची जपमाळ घेऊन सर्वकाळ कांताध्यान करणारा माणूस द्रव्याचा आणि कांतेच्या बेडीत अडकून पडला आहे, असे संतांचे म्हणणे आहे.

या अशा बेड्या आहेत की, मनुष्य आपण होऊन त्यांचे स्वागत करतो. काही बेड्या फुलांच्या असतात हे मान्य : म्हणूनच त्या तोडून टाकणे शक्य होत नाही; पण बेडी लोखंडाची असो, सोन्याची असो, फुलांची असो, अथवा कीर्तीची असो; साऱ्या बेड्या मनुष्याला बंदिवान करीत असतात. केव्हातरी त्या तोडून निर्भेळ स्वातंत्र्याचा आनंद मनुष्याने उपभोगला पाहिजे. घरट्याच्या बंधनात पक्षी अडकून पडला तर विशाल, व्यापक गगनाचे दर्शन घेण्याची संधीच त्याला लाभणार नाही. सभोवतालची बंधने पार केल्याशिवाय मुक्त आकाशातली भरारी काय असते, हे आपल्या आत्म्याचा पक्षी कसा जाणू शकेल? यासाठीच विकासाची दिशा दिसली पाहिजे. एकाच ठिकाणी मुक्काम करून राहणारा माणूस 'प्रवासी' राहू शकत नाही. ज्याला आत्मप्रगतीची वाट चालायची आहे, त्याने प्रपंचाच्या सुखदुःखांच्या वाटेवर दीर्घकाळ रेंगाळण्याचे कारण नाही. प्रपंच हा शेवटचा टप्पा नाही.

*स्वार्थ सांडून प्रपंचाचा। हव्यास धरिला परमार्थाचा॥*
*अंकित होईन सज्जनाचा। म्हणे तो मुमुक्षु॥*

◈◈

# पेरिल्याविण उगवेना

आयुष्याच्या उतरणीला लागलेल्या एका विलासप्रिय, धनाढ्य गृहस्थाला एके दिवशी एका शेतकऱ्याने काही कर्जाऊ रकमेची मागणी केली. त्या श्रीमंताने प्रश्न विचारला,

'तुला कशासाठी कर्ज पाहिजे आहे? पैसे घेऊन ते तू शेतीत घालणार त्याचा काय उपयोग आहे? तुझ्या अंगावर मी कधी उंची कपडे पाहिले नाहीत. पायातल्या वाहाणादेखील फाटलेल्या असतात. कधी घोड्यावरून वा गाडीतून फिरला नाहीस. जुन्यापुराण्या घरात राहतोस आणि शेतात खपतोस. आता मी जे कर्ज देईन त्यातून चांगले कपडेलत्ते घे. बायकोसाठी दोन सोन्याचे दागिने तयार करून घे. अरे आयुष्य कष्ट करण्यासाठी नाही.'

त्या शेतकऱ्याने नम्रतेने म्हटले, 'धनी, माफ करा. सोन्यानाण्यासाठी कपड्यालत्त्यासाठी मला कर्ज नको. नांगरणी, पेरणीसाठी, शेतीच्या कामासाठी पैका पाहिजे. म्हणून आपल्याकडे आलो. काही पेरले तरच उगवते. घाम गाळला तरच पीक येते. कष्टाशिवाय पोट भरणे आम्हाला रुचत नाही. आमची शेतकऱ्यांची जात. ज्याच्याजवळ जमीन आहे त्यानं काहीतरी पेरलं पाहिजे.'

त्या केवळ उपभोगवादी श्रीमंताच्या डोक्यात उशिराने प्रकाश पडला. कुणीतरी शेतकऱ्याच्या शब्दांत जीवनाचे तत्त्वज्ञान आहे, असे त्याला समजावून सांगितले. जो काहीच पेरत नाही, कष्ट करीत नाही, जमिनीची मशागत करीत नाही त्याच्या पदरात भविष्यात काहीच पडत नाही. म्हणून मनुष्याने जाणीवपूर्वक आपापल्या कार्यक्षेत्रात निर्मितिशील कार्य करावे, हा त्या शेतकऱ्याच्या बोलण्याचा अर्थ होता. हे तात्त्विक विश्लेषण चुकीचे नाही. जो प्रामाणिकपणाने परिश्रम करतो त्यालाच उपभोग घेण्याचा अधिकार असतो. उपभोगाला सुध्दा सेवेचे, सत्याचे आणि त्यागाचे अधिष्ठान असेल, तर तो भोग पूर्णपणे सुखदायक होतो. कोणतेही कष्ट न करता सुवर्णाच्या पात्रातून मिष्टान्न मिळाले, तरी ते फारसे रुचकर लागत नाही. समर्थ रामदासांनी म्हटले आहे:

*जिता सार्थक नाही केले। व्यर्थ आयुष्य निघोन गेले॥*
*मुळी धान्यचि नाही पेरले। ते उगवेल कैचे॥*
*जरी केले ईश्वरभजन। तरीच होइजे पावन॥*
*जैसे वेव्हारिता धन। राशि माथा लाभे॥*
*दिधल्याविण पाविजेना। पेरिल्याविण उगवेना॥*
*ऐसे हे वाक्य जना। ठाऊकेचि आहे॥*

मनुष्याचे जीवन हे एक कृषिकर्म आहे. आयुष्याची भूमी उपजाऊ बनविण्यासाठी तिच्यावर परिश्रमाने संस्कार करावे लागतात. केवळ यदृच्छेने किंवा नशिबाने जे उगवेल ते उगवेल, असे मानून दुर्लक्ष करणाऱ्याची शेती बुडाली म्हणून समजावे. जमिनीवर प्रेम करणारा, तिच्या व्यक्तिमत्त्वात आपले मन मिसळणारा भूमिपाल हाच खरा भूमीचा उपासक असतो. बहुतेक लोक आयुष्याची शेती केवळ आपल्या प्रारब्धावर सोडून देतात. म्हणून रामदास म्हणतात, मुळातच धान्य पेरले नाही, आयुष्य व्यर्थ घालवले आता या जमिनीतून काही उगवावे, अशी अपेक्षा करणे कितपत सुजाणपणाचे आहे? दिल्याशिवाय मिळत नाही. पेरल्याशिवाय उगवत नाही, ईश्वरस्मरण केल्याशिवाय पावन होता येत नाही. जीवन भक्तीशिवाय गेले तर मुक्ती तरी कशी मिळेल? हे विचार जितके आध्यात्मिक आहेत तितकेच व्यावहारिकही आहेत.

आयुष्य व्यर्थ घालवणाऱ्या त्या विलासी धनिकाच्या पदरात कोणतेच स्थायी स्वरूपाचे पीक पडलेले नव्हते. कारण आयुष्याच्या शेतीचे रहस्य त्याला कळलेच नव्हते. नियतीने दिलेली बुध्दी आणि श्रमशक्ती हे बियाणे त्याने उधळून टाकले. शेतमात्र कोरडे पडले.

संत तुकडोजी म्हणतातः

*एरव्ही उद्योगाविण जे भोगणे। ते मानवासि लाजिरवाणे॥*
*आळशासि खाणेपिणे। देणे असे महापाप॥*
*कामे सर्वचि मूल्यवान। त्यांची योग्यता समसमान॥*
*श्रीकृष्णे सिध्द केले उच्छिष्टे काढून। ओढिली ढोरे विठ्ठले॥*

समाजजीवनाची शेती जेव्हा उत्तमरीतीने पिकेल, तेव्हा आपल्याही आयुष्याचा मळा बहरेल. घामाचे पाणी मात्र या मळ्याला मिळाले पाहिजे.

❖❖

# मन माझे चपळ

*'मन माझे चपळ न राहे निश्चळ,'* असे तुकोबा म्हणतात.

जीवनातले सुख आणि स्वास्थ्य आपल्या मानसिक समाधानावर अवलंबून असते. मनाचा क्षोभ झाला, मन भयाने अथवा शंकाकुशंकांनी अस्वस्थ झाले; तर सारी सुखाची साधने जवळ असूनही सुखाची अनुभूती घेता येत नाही. पण प्रसन्नतेच्या लाटा मनात उठत असतील, तर सुखसाधने जवळ नसूनही मनुष्याला सुखशांतीचा प्रत्यय येत असतो. मानसिक संतुलन आणि समाधान हेच खऱ्या सुखाचे लक्षण आहे, असे म्हटले पाहिजे.

एक धनवंत रात्रभर आपल्या बिछान्यावर चिंतेने तळमळत होते.जो सौदा आपण केला तो अधिक व्यवहारचातुर्याने केला असता, तर आपल्याला पन्नास लाखांचा फायदा झाला असता आता केवळ वीस लाखांचाच फायदा होत आहे. तीस लाखांचे नुकसान झाले. ही जाणीव त्यांना शल्यासारखी बोचत होती. त्यांच्या वातानुकूलित शयनगृहात सुख देणारी सर्व साधने उपस्थित होती. मंद आवाजात सुरेल संगीताची ध्वनिमुद्रिका रेशमी स्वरांची उधळण करीत होती. त्यांच्या तापलेल्या, कपाळावर स्निग्धकोमल बोटे प्रेमाने फिरत होती. 'दूरदर्शनवर' कुणाचे तरी मोहक आणि मादक 'समीपदर्शन' होत होते. शयनगृहातल्या वातावरणात एक धुंद सुगंध तरंगत होता. पण आपण तीस लाख रुपये पाहता पाहता गमावले, हे दुःख त्या धनवंताच्या मनातून जात नव्हते. त्यांचे मन त्यांच्या ताब्यात नव्हते.

गीतेतला एक श्लोक या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे:

*प्रसन्न वृत्ति सौम्यत्व आत्म-चिंतन संयम।*
*भावना राखणे शुध्द मनाचे तप बोलिले।*

मन निरामय व्हावे, ते सदैव तृप्तीने काठोकाठ भरलेले असावे यासाठी प्रसन्नवृत्तीची, सौम्यपणाची, आत्मचिंतनाची आणि वैचारिक संयमाची जाणीवपूर्वक आराधना करावी लागते. मनाच्या या शुध्द स्थितीला मानसतप असे गीतेत

म्हटले आहे. शरीरतप एक वेळ सोपे असते. खरे तर तेही कठीणच म्हटले पाहिजे. पण मनाची चंचलता लक्षात घेतली, तर मानसतप हे अधिक दुस्तर स्वरूपाचे असते. कारण निरंकुश मनाला वाटेल तिकडे भ्रमंती करायला साऱ्या दिशा मोकळ्याच असतात. डोळे मिटून ध्यान करायला बसलो, की एका नर्तकीच्या शरीराची कशी लयबध्द हालचाल होत होती, हेच सारखे माझ्या मनाच्या डोळ्यांना स्पष्ट दिसू लागते आणि मी फारच अस्वस्थ होतो, अशी प्रांजळ कबुली एका तरुण साधूने दिली होती. तो नृत्यकलेचा भोक्ता नव्हता. त्याला त्या नाचणाऱ्या शरीराचे वासनात्मक आकर्षण होते. या परिस्थितीत तो कसले आत्मध्यान करणार? पण म्हणून निराश होण्याचे कारण नाही. गीतेतच या प्रश्नाचे उत्तर दिलेले आहे. अर्जुनाने विचारले होते, "हे कृष्णा, हे अतिचंचल, अत्यंत हट्टी असे मन फार बलवान आणि अभेद्य आहे. वाऱ्याप्रमाणे ते धावते. त्याला बांधून कसे ठेवायचे?" श्रीकृष्णाने म्हटले:

*असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् ।*
*अभ्यासेन तु कौंतेय वैराग्येण च गृह्यते ।।*

अर्जुना, मनोनिग्रह करणे कठीण असेल तरी अभ्यासाने आणि वैराग्याने मन आपल्या स्वाधीन ठेवता येते. या विधानात निश्चितच सत्य आहे. मन एकाग्र करण्याची, ते संयमाने समधात ठेवण्याची कला दृढनिश्चयी माणसाला प्रयत्नाने साध्य होऊ शकते.

एखादे सुंदर गाणे ऐकताना अथवा आपल्या आवडीची कलासाधना करताना इतर सर्व गोष्टी विसरून मनुष्य तल्लीन झालेला असतो. त्या वेळी मन एकाच केन्द्रबिंदूत गुंतलेले असते. अर्जुनाने द्रोणाचार्यांना म्हटले होते, "मला केवळ पक्ष्याचा डोळा दिसत आहे. झाड, फांद्या, पाने इतर काहीही दिसत नाही."

आपले मन संपूर्णतया उच्च मूल्यांवर केंद्रित व्हावे यासाठी अखंड प्रयत्न करणे आवश्यक असते. मनाच्या सामर्थ्याबद्दल संत कबीरांचे वचन असे आहे:

*यह मन तो शीतल भया,*
*जब उपजा ब्रह्मज्ञान ।*
*जेहि बैसंदर जग जरै सो पुनि उदकसमान ।*

शीतल आणि संयमी मनालाच ब्रह्मज्ञान होते. मन शीतल असेल, तर अग्निज्वालेचेही पाणी होते.

# *ऐसी कळवळ्याची जाती*

काही भावना इतक्या विलक्षण उत्कट असतात, की त्या व्यावहारिक हिशेबाच्या चौकटीत कधीच बसवता येत नाहीत. भावना आणि व्यवहार यांचे नाते नसतेच मुळी. एखादा राष्ट्रभक्त आपल्या राष्ट्रावर, त्याच्या स्वातंत्र्यावर आणि संस्कृतीवर जे अदम्य प्रेम करतो, ते कोणत्याही व्यावहारिक मोजमापाने मोजता येत नाही. प्रेम, मग ते देशावरचे असो, धर्मावरचे असो किंवा एखाद्या व्यक्तीवरचे असो, त्याचे गणिती पध्दतीने विश्लेषण होऊ शकत नाही. याचे कारण प्रेम किंवा भक्ती अमूर्त असते. तिने मनाचा सारा प्रदेश व्यापलेला असतो. साऱ्या जीवनालाच तृप्तीचे किंवा वेदनेचे दान देऊ शकणारी, अशी ही भावना असते. साऱ्या जीवनाच्या सार्थकतेसाठी अशा प्रकारची तीव्र, जिवंत भावना असावी लागते. ज्याची कशावरच श्रध्दा नाही, कुणावरही प्रेम नाही; कोणत्याही मूल्याविषयी भक्तिभाव नाही त्याच्या जगण्याला काय अर्थ आहे? श्रीकृष्णाच्या भक्तीने अंतर्बाह्य भारून गेलेली कृष्णप्रेयसी मीरा म्हणते:

*मै तो गिरधर के घर जाऊं।*
*गिरधर मारो सांचो प्रीतम देखत रूप लुभाऊं।*
*मेरी उनकी प्रीत पुराणी, ऊनबिन पल न रहाऊं।*
*जहां बैठावे तित ही बैठूं, बेचै तो बिक जाऊं।*
*मीरा के प्रभु गिरधर नागर, बार-बार बलि जाऊं।*

गिरधर हा माझा खरा प्रियकर आहे. त्याच्या सुंदरतेने मी लुब्ध झाले आहे. खरे तर त्याचे माझे प्रेम नवीन नाही. ते जुने-पुराणे, जन्मोजन्मीचे आहे. त्या प्रेमनिधानाशिवाय मला क्षणभरही राहता येणार नाही. त्या गिरधराच्या घरी मला गेलेच पाहिजे. तोच माझा प्रभू तोच माझे सर्वस्व.

भक्तीची आणि प्रेमाची केवढी विलक्षण वेगवान धारा या शब्दांतून खळाळत आहे आणि त्यामुळे या शब्दांचे काव्यमय सौंदर्य कसे वाढले आहे, किती गहिरे झाले आहे, याची जाणीव होते. कवितेचे आणि कलेचे रहस्य

भक्तिप्रेमातच साठवलेले असते. जीवनाचे सौंदर्यही अशाच भावनेत प्रत्ययाला येते. रडणाऱ्या बालकाच्या पाठीवरून मातेचा वत्सल हात फिरल्याबरोबर बालकाला आपण निराधार नाही, याची जाणीव होते आणि ते हसू-खेळू लागते.

ईश्वराची भक्ती हा एक भ्रम आहे म्हणून असल्या भ्रमिष्ट कल्पना बाजूला साराव्यात, असे म्हणणाऱ्या चिकित्सकांना एक प्रश्न विचारला पाहिजे. कोणता तरी आधार असल्याशिवाय - मग तो आधार काल्पनिक असला तरी त्याविना मनुष्याला आत्मविश्वासाने उभे राहता येईल काय? शुध्द बुध्दिवादी दृष्टीने कोणत्याही भावनेची अथवा श्रध्देची चिरफाड करता येणे शक्य आहे; पण त्यातून खाली काहीच उरत नाही. अन्नपाण्याने शरीर जगते. मनाने आणि भावनेने जगण्यासाठी मात्र भक्तीच्या, प्रेमाच्या प्राणवायूची आवश्यकता असते.

प्रचंड संपत्ती मिळवलेला एक लक्ष्मीचा लाल आपली व्यथा प्रकट करताना म्हणत होता, "ज्यासाठी मनापासून जगावे असे एखादे श्रध्देचे वा प्रेमाचे कारण मला अजून सापडले नाही. नुसत्या भौतिक समृद्धीने माझे समाधान होत नाही. आंतरिक समाधानासाठी या भौतिकतेच्या पलीकडे असलेल्या प्रदेशात काहीतरी मिळू शकेल; पण अजून मला वाट सापडत नाही." आंतरिक समाधानाची वाट अंतरात्म्यातच सापडू शकते. आपल्या कुटुंबातल्या व्यक्तींना सुखी करण्यासाठी दुःखातून आणि कष्टातून चालत राहण्यातदेखील आनंद असतो, हे बहिर्मुख वृत्तीच्या लोकांना समजत नाही. संत तुकोबा म्हणतातः

*लेकराचे हित। वाहे माऊलीचे चित्त॥*
*ऐसी कळवळ्याची जाती। करी लाभेविण प्रीती॥*
*पोटी भार वाहे। त्याचे सर्वस्वही साहे॥*
*तुका म्हणे माझे। तैसे तुम्हां संतां ओझे॥*

लाभाशिवाय प्रेम करण्यासाठी अंतरीचा प्रामाणिक उमाळा पाहिजे. तो असला म्हणजे जीवनाला सौंदर्याचे आणि आनंदाचे अधिष्ठान मिळते. तुकोबांची संतप्रीती अशीच होती.

# संतधर्म जीर्ण होत नाही

एका षट्खंड विजयी राजाची अशी गोष्ट सांगतात, की त्याला आपल्या सुदृढ, सुंदर, तरुण आणि तेजस्वी शरीराचा गर्व होता. त्याच्या देहकांतीची कीर्ती स्वर्गातही पोचली होती. एक देव गुप्तरूपाने राजाच्या प्रासादात आला. त्याला राजाचे तेजस्वी सौंदर्य पाहायचे होते. त्या वेळी तो चक्रवर्ती राजा आपल्या स्नानमंदिरात स्नान करीत होता. स्वर्गस्थ देवाने त्याचे विवस्त्र शरीरवैभव पाहिले आणि त्या दर्शनाने तो अत्यंत चकित झाला. आनंदाच्या भरात प्रकट होऊन तो राजाला म्हणाला,

"देवलोकातही असं दिव्य शरीरसौंदर्य पाहायला मिळत नाही. मी ऐकलेल्या तुझ्या कीर्तीपेक्षाही तू अधिक तेजःपुंज आहेस. यौवन आणि सौंदर्य यांचा इतका रुचिर संगम मी अन्यत्र कुठंही पाहिला नाही."

या प्रशंसेने राजा अत्यंत आनंदित झाला. त्याने त्या देवाला राजदरबारात येण्याचे आमंत्रण दिले. तो म्हणाला, "या वेळी माझ्या अंगावर वस्त्रं-आभूषणं नाहीत. वस्त्रालंकारांत मी किती सुंदर दिसतो, हे तुला राजसभेत आणखी दोन प्रहरांनी पाहायला मिळेल. तिथं जरूर यावं."

सिंहासनावर आरूढ झालेल्या राजाच्या शरीरावर अत्यंत उंची वस्त्रे आणि रत्नालंकार होते. त्याचा मुकुट अनेक कांतिमान रत्नांनी शोभिवंत दिसत होता. राजाधिराजाच्या मुद्रेवर प्रसन्न हास्य दिसत होते. त्याच्या अपूर्व सौंदर्याची आणि सामर्थ्याची स्तुती कवींनी व भाटांनी केली. स्वर्गस्थ देवाला उद्देशून राजाने आपल्या आकर्षक व्यक्तिमत्त्वाबद्दल प्रतिक्रिया विचारली. काहीशा खिन्न स्वरात त्या देवाने उत्तर दिले,

"महाराज, क्षमा करा. दोन प्रहरांपूर्वीचं आपलं तेज आणि सौंदर्य आता काहीसं सुकल्यासारखं वाटतं. आम्हा देवांना सूक्ष्म दृष्टी असते. स्नानगृहात आपण जेवढे तरुण आणि सुंदर दिसलात तेवढे आता दिसत नाही. प्रत्येक क्षण माणसाच्या शक्तीचं, सुंदरतेचं, तारुण्याचं शोषण करीत असतो. मी उद्या

आपल्याला पाहिलं, तर आतापेक्षाही आपण अधिक निस्तेज दिसाल. ही काळाची गती कोणी थांबवू शकत नाही."

धम्मपदातला एक श्लोक या संदर्भात उल्लेखनीय आहेः

*को नु हासो किमानन्दो निच्च पज्जलिते सति।*
*अन्धकारेन ओनध्दा पदीपं न गवेसथ॥*

सर्व काही पेटले असताना हास्य तरी कसले आणि आनंद तरी कसला? अंधार वेढीत असताना दिव्याचा शोध का करू नये? पुढे म्हटले आहे,

*जीरंति वे राजरथा सुचिता। अथो सरीरम्पि जरं उपेति॥*

राजाचा बलवान सुंदर रथसुध्दा जीर्ण होतो. शरीरसुध्दा कितीही शृंगारले तरी ते जीर्ण होणारच आहे. शाश्वत स्वरूपाचे धर्मतत्त्व मात्र कधीच जीर्ण होणार नाही. जसा आकाशाचा रंग कधी विटत नाही, जसा महासागर कधी आटत नाही, त्याप्रमाणेच धर्ममूल्यांचा स्वाभाविक रंग आणि गंध कधीही ओसरणार नाही अशी ग्वाही भगवान बुध्दाने दिली आहे. 'संतं च धम्मो न जरं उपेति।' 'संतांचा धर्म कधीही जुना-जीर्णशीर्ण होत नाही.'

सौंदर्य, तारुण्य, सामर्थ्य हे तर आनंदाचे, अभिमानाचे विषय आहेत. जीवन सुखप्रद होण्यासाठी यांची आवश्यकता आहे. तारुण्यात आणि ऐन सामर्थ्याच्या भरात मनुष्य काही रचनात्मक कामगिरी सामाजिक व राष्ट्रीय जीवनातही करू शकतो. या गोष्टी बुडबुड्यासारख्या चंचल आहेत, म्हणून त्यांच्याकडे उद्वेगाने अथवा उदासीनतेने पाहण्याचे कारण नाही. या शक्तींचा योग्य उपभोग घ्यावा आणि समाज जीवनासाठी विनियोगही करावा; पण या शक्तींचे अवास्तव स्तोम माजवून अहंपणाने फुगून जाणे हा शुध्द अविचार आहे. जे अशाश्वत आहे त्यापेक्षा जे चिरंतन आहे त्यावर लक्ष केंद्रित करावे, हा संतांचा उपदेश आहे. भगवान बुध्दाचे वचन असे आहेः

*सो करोहि दीपमत्तनो। खिप्पं वायम पण्डितो भव॥*

तू आपल्यालाच द्वीप बनव. तत्काळ विशेष प्रयत्न कर. ज्ञानी हो. निर्मल, निर्दोष हो. म्हणजे मग तू दिव्य अशा आर्यभूमीला पावशील. आपल्याजवळ उत्तम विचारांची शिदोरी बांधून घ्यावी. प्रवास दूरचा असला तरी सुखाचा होईल.

# मी काय मिळवले?

पन्नास वर्षांपेक्षा अधिक काळ शेतकऱ्यांच्या आणि कामगारांच्या चळवळीत निरसलपणे कार्य करणाऱ्या एका झुंजार कार्यकर्त्याला मी प्रश्न विचारला. एकंदर त्याचा जीवनविषयक अनुभव काय आहे, अशा आशयाचा तो प्रश्न. तो कार्यकर्ता म्हणाला,

"मी शेतकऱ्यांच्या आणि कष्टकऱ्यांच्या पदरात न्याय पडावा म्हणून आयुष्यात पुष्कळ संघर्ष केला. संघटना उभारल्या. भांडवलदारांबरोबर आणि शासनव्यवस्थेतल्या स्वार्थी प्रवृत्तीबरोबर पुष्कळ झगडा केला. घाम गाळणाऱ्या या श्रमजीवी लोकांच्या जीवनात थोडेफार आनंदाचे क्षण मी निर्माण करू शकलो; पण माझा ढासळता संसार मी सावरू शकलो नाही. माझ्या आयुष्यातल्या स्वास्थ्य-समाधानाची किंमत देऊन का होईना; पण शेतमजुरांच्या, कामगारांच्या घरात काही प्रमाणात हास्य, समाधान मी प्रयत्नपूर्वक निर्माण केलं. काही गमवावे लागते, कित्येक वेळा सर्वस्व द्यावे लागते; तेव्हा काहीतरी मोलाचे अल्पस्वल्प पदरात पडते. एका अर्थाने मी परमेश्वराचीच सेवा केली."

एका सेवाभावी वयोवृध्द डॉक्टरला असाच प्रश्न विचारला असता त्याने उत्तर दिले,

"हजारो रोगपीडितांवर मी मनापासून उपचार केले. रुग्णांच्या वेदना पाहून माझ्या काळजात कळ उठायची. कित्येकांना मरणाच्या जबड्यातून मी वाचवू शकलो नाही. यात कोवळी बालके होती, तरुण स्त्री-पुरुष होते. सर्व प्रकारचे उपचार करूनही माझ्या दुर्दैवी हातांना यश आले नाही. माझ्या दृष्टीसमोर अनेकांच्या आयुष्याची दोरी तुटून गेली. दुःख वेदना आणि रोग संपत नाहीत म्हणून अनेक वेळा मी असहाय होऊन अश्रू गाळीत होतो; पण रोगांबरोबर, मरणाबरोबर दोन हात करण्यात मी कधी कसूर केली नाही. अपयश अधिक पदरात पडले, त्या तुलनेने यश कमी मिळाले. पण कित्येक रोग्यांना मी पुन्हा आरोग्याचा आनंद देऊ शकलो, हे समाधानदेखील पुरेसे आहे."

जीवन द्वंद्वात्मक आहे. सुखापेक्षाही आपल्या हातात दुःख, वेदनेचे, दैन्याचे, वैफल्याचे अनेक क्षण पडतात. युगंधर महापुरुषांनादेखील यातनांच्या वाटेने चालावे लागले. पण आपल्या परीने जितके करणे शक्य आहे, तितके धर्म म्हणून केले पाहिजे. तो कामगार पुढारी आणि ते डॉक्टर सर्वस्वी यशस्वी झाले नाहीत; पण आपत्तींशी झुंज घेण्यात जे समाधान असते, ते त्यांना मिळाले. दुःखवादी दृष्टीनेच विचार करायचा झाला, तर तुकोबांचा अभंग आधारासाठी घेता येईल :

*सुख नाही कोठे आलिया संसारी। वांया हांवभरी होऊ नका॥*
*दुःख वांदवाडी आहे हा संसार। सुखाचा विचार नाही कोठे॥*
*चवदा कल्पेवरी आयुष्य जयाला। परी तो राहिला ताटीखाली॥*
*तुका म्हणे वेगी जाय सुटोनियां। धरुनि हृदयामाजी हरि॥*

या अभंगातून तुकोबांनी जरी निराशावादी विचार मांडला आहे, तरी त्यांची मूळ प्रकृती तशी नाही. 'ओले मूळ भेदी खडकाचं अंग, अभ्यासासी सांग कार्यसिध्दि॥' असे म्हणून 'भावबळे विष्णुदास। नाही नाश पावत॥' ही ग्वाही त्यांनी दिली आहे. संतांच्या मनात आणि काव्यात विफलतेचे क्षण अनेक वेळा येतात; पण आपल्या आत्म्याच्या ठायीच परमात्मा सामावला आहे, या प्रत्ययाने ते पुन्हा वाट चालू लागतात आणि इतरांनाही चालण्यासाठी बळ देतात. जीवनात तर यशापयशाचा खेळ सारखा चालूच आहे. पण प्रत्येक पराभावातून विजयाची स्वप्ने पाहण्याची आपल्या दृष्टीतली शक्ती जोपर्यंत मावळत नाही, तोपर्यंत आपण या दुःखमय जगात सुखमय परिवर्तन घडवू शकतो, ही जाणीव माणसाने ठेवली पाहिजे.

शोषित जनतेच्या त्या पुढाऱ्याला आणि रोग्यांवर अखंड उपचार करीत राहिलेल्या त्या डॉक्टरला जीवनाचे रहस्य सापडले होते. मी माझे कर्तव्य करीत आहे. अपयशाची मला क्षिती नाही. अपयशाच्या भीतीने निष्क्रिय होऊन राहणे हा मुर्दाडपणा आहे. जे थोडेफार विजयी क्षण मला भेटतील त्यामुळे नवा आनंद आणि उत्साह निर्माण होईल. हेच माझे श्रेय आहे. 'तस्मात् उत्तिष्ठ कौंतेय युध्दाय कृतनिश्चयः' हाच मार्ग आहे.

# लक्ष्मीपूजन

दिवाळीत ज्याप्रमाणे दीपोत्सव होतो, प्रकाशाचे पूजन होते, त्याप्रमाणेच लक्ष्मीचेही पूजन केले जाते. लक्ष्मी नसेल तर जीवन अंधारल्यासारखे वाटते. लक्ष्मीची आराधना हा पुरुषार्थाचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे. विरक्ताला संपत्तीचा मोह नसतो. पण जीवनातील सुख आणि सौंदर्य ज्याला उपभोगायचे आहे त्याने संपत्तीवर प्रेम करणे आवश्यकच आहे. व्यापार-उद्योगधंद्याला, राज्यरक्षणाला, भौतिक प्रगतीला लक्ष्मीचाच आधार असतो. महाभारतकारांनी धनाची प्रशस्ती अनेक ठिकाणी केली असून धनामुळेच समाजाचा आणि राष्ट्राचा उत्कर्ष होतो, असे स्पष्टपणे म्हटले आहे. 'शांतिपर्वात' दारिद्र्य हे एक पातक आहे आणि दारिद्र्याची प्रशस्ती करू नये, धनसंपत्तीकडे उचित दृष्टीने पाहावे असे प्रतिपादन आहे:

*अभिशस्तं प्रपश्यन्ति दरिद्रं पार्श्वतः स्थितम्।*
*दरिद्रे पातकं लोके न तत् शंसितुमर्हति॥*

दरिद्री माणूस शेजारी उभा राहिला असता एखाद्या पातकी माणसाप्रमाणे त्याच्याकडे पाहिले जाते. या जगात दरिद्री असणे हे पातक आहे. युधिष्ठिर हा राज्यवैभव, सत्ता आणि संपत्ती यांच्याविषयी काहीसा उदासीन होता. धर्म हेच त्याचे महत्त्वपूर्ण उद्दिष्ट होते. भीम, अर्जुन, कृष्ण आणि द्रौपदी यांनी वेळोवेळी त्याला लक्ष्मीचे महत्त्व पटवून दिले. अर्जुनाने म्हटले आहे, 'धनाच्या योगानेच कुळाचा अभ्युदय होतो. धर्मांचीही वाढ होते. निर्धनाला इहलोक आणि परलोक सारखाच.'

संपन्नतेचे हे गुणसंकीर्तन यथोचितच आहे. चार पुरुषार्थांपैकी अर्थ या पुरुषार्थाला प्रत्येक काळात सर्वाधिक महत्त्व दिले गेले. आज तर धर्म आणि मोक्ष जणू काही निरुपयोगी मानले जावेत इतके त्यांचे स्थान खालावलेले आपण पाहतो. अर्थ आणि काम ही दोन सूत्रे हातात असल्यावर जीवनाचा वारू दशदिशा पादाक्रांत करू शकेल असे सामर्थ्य त्यात आहे, ही धारणा दृढमूल

झालेली दिसते. प्रश्न असा आहे, की अर्थ आणि काम यांच्या बळावर रावणाला *आणि दुर्योधनाला का* विजयी होता आले नाही? प्रत्येक पुरुषार्थाला मानवी जीवितात एक विशिष्ट असे स्थान आहे. स्थानभ्रष्ट होऊन एखादी प्रवृत्ती स्वैर तांडव करू लागली, तर ते जीवन नष्टभ्रष्ट झाल्याशिवाय राहत नाही. कालच्या आणि आजच्या जगात याची वाटेल तितकी चित्रे दिसू शकतात. तुकोबांनी एका अभंगात धनाचे महत्त्व आणि मर्यादा दोन्हींचेही वर्णन केले आहे.

*धनवंतालागी। सर्वमान्यता आहे जगी॥*
*माता पिता बंधु जन। सर्व मानिती वचन॥*
*जव मोठा चाले धंदा। तंव बहिण म्हणे दादा॥*
*सदा शृंगारभूषणे। कांता लवे बहुमाने॥*
*तुका म्हणे धन। भाग्य अशाश्वत जाण॥*

जे धन आपण परिश्रमपूर्वक मिळवतो ते आपल्या कुटुंबासाठी उपयोगी पडावे, आपले कौटुंबिक आयुष्य सुखसंपन्न व्हावे, हा प्रधान हेतू त्यात असतो. यात आक्षेपार्ह काहीच नाही. पण अत्यंत घृणास्पद मार्गाने जाऊन एक प्रकारच्या अनावर अधाशीपणाने केवळ सोने-नाणे गोळा करण्यातच पराक्रम आणि यश सामावले आहे, असे मानणारी अधम प्रवृत्ती कालच्याप्रमाणे आजही आहे. कदाचित आजच्या जगात लक्ष्मीच्या पायावर लाचारीने लोळण घेणारे लोक संख्येने अधिक आहेत. ज्या लक्ष्मीला धर्माचे अधिष्ठान नाही, सरस्वतीची सोबत नाही, चारित्र्याची संगत नाही अशी संपत्ती नाना प्रकारच्या अनर्थांना जन्म दिल्याशिवाय राहणार नाही. आम्हाला पराक्रमी आणि धर्मप्रेमी विष्णूचे पाय चेपीत बसलेली किंवा सुंदर चारित्र्याच्या शुभ्र कमळावर विराजमान झालेली शुभलक्ष्मी पाहिजे. स्मगलरांचा नाना प्रकारच्या गुन्हेगारांचा, समाजद्रोह्यांचा, आणि उदात्त मूल्यांचे वस्त्रहरण करीत राहिलेल्या दुःशासनांचा हात धरून चालणारी लक्ष्मी नको आहे. लक्ष्मीचे पूजन अवश्य करावे, पण हे लक्ष्मीपूजन प्रीती, भक्ती, न्याय आणि माणुसकी यांच्याकडे अभिमुख होऊन केले पाहिजे.

❖❖

# *वैष्णवां संगती सुख*

'नाटक' हे आजच्या जीवनाचे एक अविभाज्य अंग होऊन बसले आहे. बोलायचे एक आणि करायचे दुसरेच, या नीतीत जो निपुण असतो त्याला व्यवहारकुशल, मुत्सद्दी, चतुर मानण्यात येते. 'येन केन प्रकारेण' संपत्ती मिळविणाऱ्या माणसाने संपत्तीचा लोभ किती घातक असतो, यावर प्रवचन द्यावे आणि वाममार्गाने ती हव्यासाने मिळवीत राहावे, अशी नाटकीय दृष्ये या जगात पुष्कळ पाहायला मिळतात. प्रत्येक क्षेत्रात या प्रकारचे नाट्यप्रयोग चालू आहेत. त्यामुळेच दांभिकतेवर प्रहार करण्यासाठी कधीकधी संतांनाही रुद्रावतार धारण करावा लागतो. ज्याच्या मनात अन्यायाची ओढ आहे आणि ज्याला अन्यायाच्या मार्गानेच प्रतिष्ठा मिळवायची आहे तो धूर्त मनुष्य सज्जनतेचा मुखवटा घेऊन अष्टौप्रहार न्यायाची जपमाळ ओढीत बसतो. एका पायावर स्थिर उभा राहिलेला बगळा हे तपाचे प्रतीक मानणाऱ्या वेड्या मनोवृत्तीला ते 'बकध्यान' आहे हे समजत नाही. म्हणूनच नाटकी प्रदर्शनाच्या या जगात बगळे तपस्वी ठरतात. हंसांना मात्र कोणी ओळखत नाही. या घटनेचा विषाद वाटून काही संतांनी आपल्या काव्यातून असल्या विसंगतीवर टीका केली आहे.

जीवन ही एक साधना आहे. मनाच्या शुध्दतेने या साधनेला यश प्राप्त होते. बाह्य अवडंबर माजवल्यामुळे मनाचे शुध्दीकरण कसे होणार? अंतरंग स्वच्छ नाही. बहिरंग मात्र सुंदर आहे, या अवस्थेवर संत कबीरांनी केलेली टीका मार्मिक आहे अध्यात्मसाधना हे नाटक नसून ते एक वास्तव आहे. हे सांगताना कबीरांच्या वाणीला उपहासाचा आणि विडंबनाचा झालेला स्पर्शही मनावर परिणाम करतो:

*मन ना रंगाये, रंगाये जोगी कपरा।*
*आसन मारि मंदिरमे बैठे, ब्रह्म छाडि पूजन लागे पथरा।*
*कनवा फडाय, जटवा बढौल, दाढी बढाय जोगी होइ गैले बकरा।*

*जंगल जाम जोगी धुनिया रमौले, काम जराय जोगी होइ गैले हिजरा।*
*मथवा मुंडाय जोगी कपडा रंगौले, गीता बाचके होय गैले लबरा।*
*कहहि कबीर, सुनो भाई साधो, जमदर बजवा बांधल जैवे पकरा।*

मनाला अध्यात्माचा रंग नाही. कपड्याला मात्र तो आवर्जून रंग देतो. जटा वाढवून आणि दाढी ठेवून बकरा होतो. जंगलात जाऊन धुनी पेटवून बसतो. हा सारा मिथ्याचार आहे. हे एक 'नाटक' आहे. आपल्या साधुत्वाची आणि त्यागाची टिमकी वाजवीत बसलेल्या या तथाकथित योग्याला ज्ञानप्राप्ती कशी होणार? पण अशा मिथ्याचार करणाऱ्या लोकांचे 'ज्ञान' हे उद्दिष्ट नसतेच मुळी. अरण्यात राहून सुध्दा, एकांतात बसून सुध्दा, यांच्या मनाची बाजारपेठ झालेली असते. या पेठेत सर्व प्रकारची दुकाने असतात. व्यवहार चालू असतो. कबीरासारखे संत हे पाहून उद्विग्न होतात. सज्जनांच्या मनाला येणारी उद्विग्नता आणि दुष्ट दांभिकांच्या मनात उत्पन्न होणारा आसुरी आनंद ही या जीवनातली चमत्कारिक अशी शल्ये आहेत.

जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत अशी विसंगत, विकृत दृश्ये दिसावीत हाही जीवनाच्या प्रकृतीचाच एक घटक बनला आहे काय? यामुळेच सत्प्रवृत्तीच्या लोकांना जीवन तापदायक होते. या ढोंगी जगाशी संबंधच नको, असा उद्वेगजनक विचार ते करू लागतात. पण ही परिस्थिती सुधारण्याचे काम त्यांचेच असते. एकीकडे उदात्त मूल्यांची वनराई उद्ध्वस्त करणारे संहारक हात विनाशाच्या कार्यात गुंतलेले असतात, तर दुसरीकडे काही थोडे निर्मितिशील हात समाजाच्या भूमीत नवीन रोपांची लावणी करीत असतात. हा खेळ चालूच आहे. संत सज्जन ओळखून त्यांच्या पावलांवर पाऊल टाकणारी सात्त्विक मनोवृत्तीही जगात आहे. म्हणूनच तुकोबा म्हणतातः

*वैष्णवां संगती सुख वाटे जीवा। आणीक मी देवा काही नेणे॥*
*गाये नाचे उडे आपुलिया छंदे। मनाच्या आनंदे आवडीने॥*

म्हणून खरे वैष्णव भेटले पाहिजेत.

# गरज आणि उपभोग

एकदा एका परिचित गृहस्थाच्या घरी काही कामानिमित्त जाण्याचा योग आला. ते गृहस्थ आपल्या कपड्यांच्या घड्या घालीत बसले होते. त्यांचे तऱ्हेतऱ्हेचे कपडे होते. वस्त्रप्रावरणांचा तो जंगी ढीग पाहून मी त्यांना सहज प्रश्न केला, 'वर्षाचे एकूण दिवस लक्षात घेतले, तर सबंध वर्षात यांतला प्रत्येक कपडा निदान काही तास तरी तुम्हाला वापरता येईल, असे दिसत नाही. इतक्या कपड्यांची गरज तुम्हाला खरोखरच आहे काय?

त्या गृहस्थांनी फारसे समाधानकारक उत्तर दिले नाही, पण विविध प्रकारच्या कपड्यांचा त्यांना हव्यास आहे हे मात्र समजले. गरज असणे आणि हव्यास असणे यात पुष्कळ अंतर आहे. कपड्यांपासून पादत्राणांपर्यंत कसोशीने साऱ्या वस्तूंचा अमर्याद संग्रह करून ठेवणारे लोक असतात. त्या संग्रहाचा त्यांना अभिमान वाटत असतो. पण वास्तविक इतक्या वस्तूंची आवश्यकता नसते. या बाबतीत बहुसंख्य माणसांची मने लहान मुलांसारखी चंचल, बालिश असतात. कोणतेही नवे खेळणे पाहिले, की ते हस्तगत झाले पाहिजे असा त्यांचा हट्ट असतो. गरज असो किंवा नसो, त्यांचा लोभ वाढत असतो. एका ऋषीला काही गुंज - दोन मासे सोन्याची जरूर होती. राजाने त्याला कितीही सोने घ्या सांगितले. तेव्हा त्याचा लोभ वाढतच गेला.

*जहा लाहो तहा लोहो लहा लोहो पवड्ढइ।*
*दोमासकयं कज्जं कोडीए वि न निट्ठियं॥*

जसा लाभ होतो तसा लोभ लाभामुळे वाढतच जातो. दोन मासे सोन्यासाठी आरंभिलेले काम कोटी रुपयांनीही संपत नाही.

आपल्या गरजा शक्य तिक्या मर्यादित ठेवाव्यात असे धर्मशास्त्र सांगते. पण गरजा वाढवीत राहिल्यामुळेच प्रगती होते, नवनवीन शोध लागतात. पुरुषार्थही घडतो असे अर्थशास्त्र सांगते. या दोन शास्त्रांचा दृष्टिकोन परस्परविरोधी आहे. पण दोघांच्याही विचारसरणीत काही अंशी सत्य आहे. गरजा मर्यादित केल्यामुळे

मानसिक शांती मिळू शकते. एका गरजेतून दुसरी आणि दुसरीतून तिसरी असे दुष्ट चक्र फिरत राहते. एकाने प्रश्न विचारला,

'भिक्षेकऱ्यापाशी विशेष काही नसते. त्याने कशाचा संग्रह केलेला नसतो. त्याला सुखशांती मिळते काय?' दरिद्री भिकाऱ्यापाशी भौतिक अर्थाने कशाचा संग्रह नसेल पण त्याच्या मनात मात्र भोग्य वस्तूंचा त्याने संग्रह करण्याची दुराराध्य वासना, ठेवली असेल तर त्याला मानसिक सुख मिळणेच शक्य नाही. भर्तृहरीने एका श्लोकातून मानसिक सुखावर आणि आनंदावर जे मार्मिक भाष्य, केले आहे ते महत्त्वपूर्ण आहे. तो म्हणतो,

'वल्कले परिधान करूनही आम्ही संतुष्ट असतो. तुम्ही उंची वस्त्रप्रावरणे वापरल्यामुळे संतुष्ट होता. आपल्या दोघांचाही संतोष सारखाच नव्हे का?

*स तु भवतु दरिद्रे यस्य तृष्णा विशाला।*
*मनसि च परितुष्टे को अर्थवान को दरिद्रः॥*

ज्याची तृष्णा अनिवार आहे, तो खरा दरिद्री आहे. मन जर प्रसन्न असेल तर कोण श्रीमंत आणि कोण गरीब? मानसिक सुख आणि समाधान हेच जीवनातले श्रेष्ठ उद्दिष्ट आहे. ज्या मनाला संयम आणि विवेक यांचा आधार असतो ते मन आनंदाच्या लहरींवर तरंगत असते. आनंद ही मनाची अवस्था लोभ आणि मोह यांच्याकडे पाठ फिरवल्याशिवाय प्राप्त होत नाही. प्रचंड सत्ता आणि अमाप संपत्ती व भरपूर भोग्य वस्तू मिळाल्या म्हणजे सुखाचा रस्ता सापडला असे ज्यांना वाटते त्यांना सुखाची कल्पना करण्याइतकेही ज्ञान नाही असेच म्हणावे लागेल. गरजेइतकेच घ्यावे आणि आपली गरज दुसऱ्याच्या सुखावर आक्रमण करण्याइतकी असू नये ही भूमिका आता केवळ धर्मशास्त्राची नसून ती समाजशास्त्राचीही आहे.

माझ्याप्रमाणेच माझ्या कुटुंबातल्या व्यक्तींना, माझ्या समाजातील लोकांना, देशातीलच नव्हे, तर साऱ्या मानवतेला जगायचे आहे हे लक्षात ठेवून गरजा आणि उपभोग यांचे गणित बसवले पाहिजे.

# आत्मानंद

मरणोत्तर आत्म्याचे काय होते? या प्रश्नाविषयी सर्वांनाच विलक्षण कुतूहल असते. तत्त्ववेत्त्यांनी निरनिराळ्या प्रकारे याची उत्तरे दिलेली आढळतात. ज्यांनी आत्माच मानला नाही त्यांना या पश्नाने कुंठित केले नाही. देह आणि आत्मा एकच आहेत किंवा देह हेच सत्य आहे. अशी ज्यांची भूमिका आहे त्यांनी, 'भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनम् कुतः?' असे म्हटले. एकदा हा देह चितेत भस्म झाल्यानंतर तो पुन्हा परत कसा येणार? याचा अर्थ मृत्यू म्हणजे शेवट. साऱ्याच गोष्टी तेथे संपून जातात. पुढे काहीच नाही. काही जणांच्या मते मृत्यू ही नव्या जन्माची नांदी आहे. नाटकाचा एक प्रयोग संपला. नाटक संपले तरी रंगभूमी अस्तित्वातच असते. खाली पडलेला पडदा पुन्हा वर जातो आणि रंगभूमीवर नव्या नाटकाच्या प्रयोगाला सुरुवात होते. खरे तर हा विचार आनंददायक आहे. आशावादी आहे. उत्साहवर्धक आहे. आता अस्तित्वच विरघळून जाणार आणि अभावाचे आपण एक घटक बनणार, या निराश विचारांपेक्षा एका नाटकातली भूमिका संपली, आता नवा मेकअप् करून नव्या वेषभूषेत नव्या नाटकात एक भूमिका वठवायची आहे. हा विचार मनाला प्रफुल्लित करणारा आहे. म्हणूनच मरणारा माणूस कित्येक वेळा 'ईश्वराची इच्छा असेल तर पुन्हा भेटू असे म्हणतो.' 'भेटेन नऊ महिन्यांनी' यासारख्या कविता प्रसिध्दच आहेत. 'गीतेत' म्हटले आहे.

*सांडूनियां जर्जर जीर्ण वस्त्रे*
*मनुष्य घेतो दुसरी नवीन*
*तशी चि टाकूनि जुनी शरीरे*
*आत्मा हि घेतो दुसरी निराळी*

आत्म्याच्या अमरत्वाबद्दल ग्वाही देणारा हा श्लोक मनाला नवी उभारणी देतो. मरणाच्या अंधाऱ्या रात्रीनंतर पुनर्जन्माचा प्रकाश पुन्हा उदयाला येणार आहे आणि माझ्या अंगांगात ते चैतन्यदायी किरण प्रविष्ट होणार आहेत.

नवजीवनाचे गीत जिभेवर घोळवीत नवी दमदार पावले मला पुन्हा टाकायची आहेत, या विचाराचे स्फुरण विलक्षण असते. खरोखरच पुनर्जन्म आहे की नाही हे सामान्यपणे सांगणे फार कठीण आहे.

भ. महावीरांनी 'उत्तराध्ययनसूत्रात' म्हटले:

*नो इंदियग्गेज्झ अमुत्तभावा,*
*अमृतभाषा विय होइ निच्चो।*

आत्मा अमूर्त असल्यामुळे तो इंद्रियग्राह्य नाही आणि अमूर्त असल्यामुळेच तो नित्य आहे. आत्म्याचा अंत होत नाही. असेच मत येथे व्यक्त झाले आहे. आपल्यातले चैतन्यतत्त्व सदैव विद्यमान असते. ते कधीही हरवत नाही, म्हणून त्या तत्त्वालाच जाणून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे दार्शनिकांनी, संतांनी सागितले आहे.

आत्म्याचे अस्तित्व आणि त्याची मरणोत्तर अवस्था या प्रश्नासंबंधी कितीही चर्चा केली तरी जगातले श्रेष्ठ विचारवंत एका विशिष्ट निष्कर्षापर्यंत आलेले दिसत नाहीत. काही प्रश्न माणसाच्या बुध्दीला सदैव आव्हान देत असतात. त्यांपैकीच हा एक यक्षप्रश्न आहे. याचा विचार करण्याच्या चक्रव्यूहात सापडण्यापेक्षा माझी आजची - या जन्मातली भूमिका मनापासून उत्साहाने करीत राहण्यातला आनंद माझ्यापासून कोणी हिरावून घेऊ शकत नाही. प्रेमाचा आणि आनंदाचा संदेश देत निघालेल्या एका साधूला प्रश्न विचारण्यात आला,

"-महाराज, आपण सर्वांशी नम्रतेने वागता. सर्वांना मदत करण्याचा प्रयत्न करता. रडणारे मूल दिसले तरी त्याला हसवता, दु:खीकष्टी दिसला की त्याची सेवा करता, पुढच्या जन्मी परलोकात आपले कल्याण व्हावे या इच्छेने तुम्ही हे सारे करता काय?-"

तो साधू हसला व म्हणाला,

"पुढचा जन्म आहे की नाही हे मला माहीत नाही. तो असो वा नसो. परलोकाची मला क्षिती नाही. इहलोकातले जीवन सुंदर आणि निरामय व्हावे याचा अर्थ तसे बनवण्याचा आपण प्रयत्न करावा. प्रयत्न करण्यातला आनंद हाच खरा आत्मानंद आहे.-"

# *संत कवितेची भेट*

लोकजीवनातील नाना रसरंगांचे रुचिर दर्शन प्रतिभावंत कवी घडवू शकतो. सुख आणि दुःख, वैभव आणि दारिद्र्य, जीवित आणि मृत्यू या सर्व अवस्थांचे चित्रीकरण कवीची शब्दकुंचली करू शकते. म्हणूनच कवीला शब्दसृष्टीचा ईश्वर मानले आहे. नवनिर्मिती करण्याचे सामर्थ्य सर्वच कवींत असू शकत नाही. काही थोडे कवी महान असतात. त्यांच्या प्रतिभेच्या कुशीतून नवी सृष्टी जन्म घेते. कारागीर कागदाची फुले तयार करतो ती 'दर्शनीय' असतात पण त्यांच्यांत तो सुगंध ओतू शकत नाही. एका सुभाषितात म्हटले आहे :

*सौवर्णानि सरोजानि निर्मातुं सन्ति शिल्पिनः ।*
*तत्र सौरभनिर्माणे चतुरश्चतुराननः ॥*

सुवर्णाची कमले कारागीर निर्माण करू शकतात; पण सुवासिक कमले केवळ ब्रह्माच उत्पन्न करू शकतो. ज्यांच्या शब्दांना भावनेचा आणि विचारांचा अवीटमधुर सुवास येतो असे कवी तपस्येतूनच निर्माण होऊ शकतात. काव्याचे शास्त्र शिकून फार तर शब्दांची कृत्रिम कविता जुळवता येईल पण कवितेचा निर्झर हृदयातून खळाळत वाहावा यासाठी केवळ कवितेवर नव्हे, तर जीवनातील उदात्त मूल्यांवर, सौंदर्यावर, साधुत्वावर आणि सामर्थ्यावर अपार प्रेम असावे लागते. प्रेमभावनेच्या उमाळ्यातून कवितेची धार झुळझुळू लागते. शास्त्रांचे अध्ययन केलेल्या प्रकांड पंडितांची कविता आज कोणाला फारशी आठवत नाही; पण भावभक्तीचा उत्कट स्पर्श झालेली, अशिक्षित समजल्या गेलेल्या संतांची कविता मात्र चाचपडणाऱ्या माणसाच्या हातातली काठी होऊन बसली आहे. नितळ मनाचे स्वच्छ आभाळ या काव्यातून जाणवते. उदाहरणार्थ तुकोबांचा हा अभंग कितीही वेळा वाचला तरी मन अतृप्त राहते. शब्द साधे, पांडित्याचा प्रयत्न नाही, काव्य जुळवण्याची खटपट नाही. कारण कवी म्हणवून घेण्याची धडपड नाही. आंतरिक अनुभूतीतून उचंबळून आलेल्या अकृत्रिम शब्दांच्या

माध्यमातून कवितेने आकार घेतला :

*कन्या सासुऱ्यासि जाये। मागे परतोनि पाहे॥*
*तैसे जाले माझ्या जिवा। केव्हा भेटसी केशवा॥*
*चुकलिया माये। बाळ हुरु हुरु पाहे॥*
*जीवनावेगळी मासोळी। तैसा तुका तळमळी॥*

सासरी जाणारी कन्या, हुरुहुरु पाहणारा बाळ आणि जीवनावेगळी मासोळी हे तीन दृष्टांत इतके अनुरूप आहेत की ते काळजालाच हात घालतात. सासरी जाणाऱ्या कन्यकेच्या मुद्रेवरची व्याकुळता 'मागे परतोनी पाहे' या तीन शब्दांत तुकोबांनी किती सहजपणे टिपली आहे. ही ओळ वाचताना आपलीच कन्या सासरी जाण्यासाठी निघाली असे वाटून कंठ दाटून येतो व डोळे ओलावतात. गर्दीत चुकलेल्या आईला हुरुहुरु पाहणारा बाळ आपल्या वात्सल्याला येऊन बिलगतो.

प्रापंचिक जीवनातले सुखदु:खात्मक अनुभवांचे हे भावनिक स्पर्श तुकोबा, जनाबाई, चोखोबा, सावतामाळी आपल्याला अगदी सहजपणाने देऊ शकतात. विद्वत्तेच्या भाराने दबून गेलेली कविता पुस्तकातच राहते. दुर्बोध कविता फार तर चिमूटभर विद्वानांशी वादविवाद करीत असेल पण संतांच्या प्रेममय भक्तिमय जिवंत काव्यधारा सामान्य माणसांशी शतकानुशतके हितगुज करीत आहेत. देवाची आणि धर्माची कविता लिहिली म्हणून संतकविता लोकांनी स्वीकारली हे म्हणणे फारसे बरोबर नाही. संतांची कविता देवाची असण्यापेक्षा ती माणसांचीच अधिकांशाने आहे. म्हणून ही कविता माणसाच्या काळजात घर करून राहिलेली. मी तर संतांच्या कवितेची, 'माणसांनी माणसांसाठी लिहिलेली माणुसकीची कविता' अशी व्याख्या करतो. अशाच कवितेत देवही दिसतो कारण त्यात मुळात 'माणूस' असतो. संत जनाबाई म्हणते:

*पक्षी जाय दिगंतरा। बाळकांसी आणि चारा॥*
*घार हिंडते आकाशी। झांप घाली पिलांपाशी॥*
*माता गुंतली कामासी। चित्त तिचे बाळापाशी॥*
*तैसी आम्हांसी विठ्ठल माये। जनी वेळोवेळी पांहे॥*

या कवितेच्या सौंदर्याबद्दल आणखी काय सांगायचे?

# *पेरणारे हात समर्थ व्हावेत*

स्वातंत्र्य आणि लोकतंत्र ही मूल्ये प्रमाण मानणाऱ्या देशांत खरे तर विचार-भिन्नतेच्या कारणांवरून हिंसा आणि रक्तपात होऊ नये. लोकमताचा कौल मागणाऱ्या उमेदवारांची व त्यांच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांची जेव्हा भीषण हत्या होते तेव्हा स्वातंत्र्याचा अधिकारच पायदळी तुडवण्यात येतो. मनुष्याचे मूलभूत स्वातंत्र्य अबाधित राहिले पाहिजे असा आग्रह धरणारी विचारधारा आजच्या सुसंस्कृत आणि उदार वृत्तीच्या जगातही सतत लाथाडली जात आहे. याचा अर्थ माणसांचा माणसांवर विश्वास नसून तो बंदुका, मशिनगन्स आणि विध्वंस करणारी अनेक प्रकारची शस्त्रे यांच्यावरच अटळपणे आहे हे स्पष्ट होते. कौरवांनी पांडवांना कपटाने लाक्षागृहात जाळून टाकण्याचा प्रयत्न केला या घटनेची आठवण बुजू नये म्हणूनच की काय आजही जाळपोळ करून घरे आणि वस्त्या बेचिराख करून टाकण्यात येतात. रावण सुसंस्कृत असल्यामुळे हाती प्रचंड सत्ता असूनही त्याने सीतेवर अत्याचार केला नाही. पण क्षुल्लक नगरसेवकसुध्दा क्षुद्र सत्तेच्या उन्मादाने कायद्याच्या राज्यात स्त्रियांची लाजिरवाणी विटंबना करण्यात आपल्या पौरुषाचा विजय मानतात. जुन्या काळात माणूस प्रगत झाला नव्हता. आता आधुनिक काळात तो अधिक प्रगत बनल्यामुळे हिंसा, अन्याय वगैरे प्रकरणांना भरती आलेली आहे.

भगवान महावीरांनी ज्ञानाची, संस्कृतीची व्याख्या करताना म्हटले होते :

*एयं खु नाणिणो सारं जं न हिंसइ किंचन।*
*अहिंसा समयं चेव एतावन्तं वियाणिया॥*

ज्ञानी असण्याचे सार हेच की कोणत्याही प्राण्याचा घात करू नये. अहिंसामूलक समता हाच धर्म आहे. ही गोष्ट नेहमी लक्षात ठेवली पाहिजे. कारण जीवन सर्वांनाच प्रिय आहे. निसर्गानेच जीवांना जगण्याचा अधिकार दिलेला असल्यामुळे तो आपल्या नीचतम स्वार्थासाठी दानवी शक्तीच्या जोरावर काढून घेणे पूर्णपणे चुकीचे आहे. आपल्याही जगण्याचे स्वातंत्र्य दुसरा कोणीतरी

नष्ट करू शकतो. पिसाटाप्रमाणे गोळ्या झाडीत, प्रदेशचे प्रदेश उद्ध्वस्त करीत आणि माणसांच्या रक्ताचे पाट वाहवीत निघालेला आजचा शस्त्रास्त्रसंपन्न माणूस म्हणजे राक्षसी प्रवृत्तीचा किळसवाणा आविष्कार आहे. महाभारतातले दुर्योधन आणि दुःशासन कितीतरी सभ्य होते असे म्हणण्याची आपत्ती आज आली आहे. जगण्यासाठीच आपला जन्म असतो. जगणे, उमलून येणे, सुविचाराच्या सुगंधाने दरवळून जाणे, आपल्या स्नेहजीवनातले सौंदर्य इतरांच्या आयुष्यात उत्पन्न करणे, माणूसपणाचे विकसन करीत ते देवत्वापर्यंत पोहोचवणे हेच जीवनाचे परम उद्दिष्ट असते. मरण्यासाठी आणि मारण्यासाठी नव्हे, तर जगण्यासाठी आणि जगवण्यासाठी व सृष्टीला सुंदर बनवण्यासाठी हे जीवन आहे. उदात्त संयमी जीवनाचा जयजयकार साधुसंतांनी यासाठीच केला. ते म्हणतात, 'तू ज्याला ठार करू इच्छितोस तो तुझ्यासारखाच चैतन्ययुक्त प्राणी आहे. खरे सांगायचे तर तो तूच आहेस.' भगवान बुध्दाने म्हटले आहे :

*परदुक्खूपधानेन उत्तनो सुखमिच्छति ।*
*वेर संसग्गसंसट्ठो वेरा सो न पमुच्चति ॥*

दुसऱ्याला दुःखी करून जो आपले सुख मिळवू इच्छितो तो वैरसंसर्गात सापडलेला वैरातून कधीच बाहेर पडू शकत नाही. या प्रकारचे विचार 'ख्रिस्त' व महंमद पैगंबर, बसवेश्वर आणि नानक वगैरे महनीय धर्मपुरुषांनी अनेक वेळा सांगितले. येशू ख्रिस्ताने तर आपल्याला सूळावर चढवणाऱ्या खुनी अधमांनाही परमेश्वराने क्षमा करावी म्हणून प्रार्थना केली. पण महापुरुषांना हवे असलेले परिवर्तन अजून तरी आलेले नाही. परिवर्तन एका रात्रीत होत नाही, एका शतकातही होत नाही. महान प्रतिभावंत धर्मपुरुषांची स्वप्ने यथार्थपणे समजून घेऊन ती हृदयात जोपासायला आणखी काही सहस्त्र वर्षांची वाट पाहावी लागेल. शांती, क्षमा आणि प्रेम यांची बीजे पेरीतच राहिले पाहिजे. पेरणारे हात बळकट व्हावेत.

# वसंत आहे, तीवर गात राहा

एका साधूला एका गृहस्थाने प्रश्न विचारला,

"महाराज, मी माझा प्रपंच अत्यंत कुशलतेने केला. सारी कौटुंबिक कर्तव्ये पार पाडली, अतिशय सामान्य अशा परिस्थितीतून मी माझ्या प्रयत्नाने आज एक मोठा धनिक व्यापारी होऊन बसलो आहे. कोणत्याही गोष्टीची आता मला उणीव नाही. आता परमेश्वरप्राप्तीसाठी मी कोणत्या मार्गाने जावे याचे मला मार्गदर्शन करा."

त्या धनिकाच्या अंगावर उंची कपडे होते. दोन्ही हातांच्या बोटांत हिऱ्या-मोत्यांच्या अंगठ्या होत्या. मुद्रेवर सुखवस्तूपणाचा रंग होता. परमेश्वरप्राप्तीची त्याला ओढ लागली आहे याचे कोणतेही चिन्ह त्याच्या ठायी दिसत नव्हते. आता करायला काही उरले नाही तेव्हा ईश्वराची आराधना मधून मधून सवडीने करून पाहू हीच त्याची भूमिका होती. सवड होती तेव्हा ईश्वरप्राप्तीचा एक नाद वेळ जाण्यासाठी लावून घ्यावा अशाच हेतूने तो बोलत होता. सुट्टीच्या दिवसांत विद्यार्थ्यांसाठी ज्याप्रमाणे महिनाभर छंदवर्ग असतो त्याप्रमाणे या छंदवर्गात प्रवेश मिळवावा अशी त्याची सहज इच्छा होती.

त्या साधूच्या मुखावर स्मित पसरले. ते म्हणाले, "इतकी काय घाई आहे? परमेश्वर कोठे पळून जात नाही. तुम्ही आणखी काही काळ विश्रांती घ्या.सवडीने या विषयावर बोलू."

त्या बोलण्यातला उपहास त्या यशस्वी धनवंताला समजला नाही. त्याचे समाधान झाले. तो साधू मात्र मनात विषण्ण झाला. सारे उद्योगधंदे करून झाल्यानंतर सवडीने परमात्म्याची उपासना करायची हा विचार त्याला क्लेशदायक वाटला. ईश्वराचा शोध स्वामी विवेकानंदांनी सवडीने केला नाही. ज्ञानेश्वर, नामदेव, कबीर इत्यादी संतांनी आयुष्यातली इतर महत्त्वाची कामे संपल्यानंतर परमेश्वरी कृपेसाठी प्रयत्न केला नाही. साऱ्या जीविताचीच ती साधना होती. आपल्या साऱ्या भावभावनांचे, सर्व आशाआकांक्षांचे विसर्जन त्यांनी ईश्वर नावाच्या

ध्येयासाठी उत्कटतेने केले होते. परमेश्वर  हा त्यांचा ध्यास होता. तहानलेल्या हरिणाला पाण्याशिवाय काही सुचू नये तसे ईश्वरप्रेमाची तहान लागलेले हे भक्त त्या परम, दिव्य सौंदर्याचा झरा शोधण्यासाठी वणवण भटकत होते. आपल्या सवडीप्रमाणे जर तो विश्वाचा सूत्रधार भेटू शकला असता, तर मग काहीच प्रश्न नव्हता.

संत पलटूदासांचे एक भावोत्कट पद आहे:

*क्या सोवे तू बावरी, चाला जात बसंत।*
*चाला जात बसंत, कंत ना घर में आए॥*
*धृग जीवन है तोर, कंत बिन दिवस गंवाए।*
*गर्व गुमानी नारि फिरे, जोवन की माती॥*
*खसम रहा है रूढि, नाही तू पठवै पाती।*
*लगै न तेरो चित्त, कंत को नाहि मनावै॥*
*कापर करै सिंगार, फूल की सेज बिछावै।*

जीवनाचा वसंतऋतू निघून चालला आहे आणि तू मात्र अजूनही निद्रिस्त आहेस. तुझे जीवन व्यर्थ होत आहे. घरी प्राणप्रिय आलेला नाही. त्या जिवलग प्रियकराशिवाय तू आयुष्य घालवते आहेस. तुझे तारुण्य निरर्थक होत आहे. अजून तू तुझ्या प्राणवल्लभाला पत्र पाठवले नाही. अजूनही तू त्याची आळवणी करीत नाहीस. केवळ शृंगार करून आणि फुलांची शय्या सजवून काय होणार? वसंत तर निघून चालला आहे. प्रियतमाला साद घाल म्हणजे प्रतिसाद मिळेल.

या पदात भावसौंदर्याचा वसंतऋतू फुलला आहे. खरे तर ही प्रेमाची महती गाणारी, शृंगाराचे स्वागत करणारी कविता आहे; पण या कवितेतला कांत हा भक्तांच्या जीविताला तृप्तीचे वैभव देणारा परमात्मा आहे; वसंत ऋतू निघून गेल्यावर, पानेफुले गळून गेल्यावर ईश्वरी प्रेमशृंगाराचे गीत मुक्तकंठाने कसे गाता येईल? वसंत आहे तोवर गात राहा.

❖❖

# वक्त्याची भावना आणि भाषा

कवीश्वर ज्ञानेश्वरांच्या रसपूर्ण वक्तृत्वसौंदर्याचे नितांतसुंदर उन्मेष 'ज्ञानेश्वरी'तून प्रकट झाले आहेत. श्रोत्यांचे भान ठेवून त्यांची मने फुलवीत, त्यांत तत्त्वज्ञानाचे अमृत हळुवारपणे ओतणारा ज्ञानेश्वरांसारखा वक्ता दुर्मिळ म्हटला पाहिजे. 'गीता' या ग्रंथावरचे आपले काव्यमय भाष्य या श्रेष्ठ कवीने श्रोत्यांना ऐकवीत मंत्रमुग्ध केले आहे. श्रोत्यांचे मन आकृष्ट करून घेण्यासाठी ज्ञानेश्वर श्रोत्यांशी स्नेहपूर्ण सलगी करतात, मधुर संवाद करतात आणि श्रोत्यांना आपल्याकडे सहजपणे वळवून घेतात. हे सारेच चित्र अत्यंत दर्शनीय आहे. मृदुल, काव्यमय आणि हृदयस्पर्शी कसे बोलावे हे ज्याला शिकायचे असेल, त्याने ज्ञानेश्वरीत श्रोत्यांशी कवीने केलेला मनोरम संवाद पुन्हा पुन्हा वाचावा. रुक्षतेचा, तत्त्वजडतेचा, दुर्बोधतेचा लेशही त्यात नाही. काव्यमय वाणीचे पैंजण घालून ज्ञानेश्वरांच्या लावण्यसंपन्न लेखणीने केलेले विलोभनीय नृत्य या ग्रंथात सर्वत्र पाहायला मिळते. गीतेत प्रकट झालेल्या 'कृष्णार्जुन संवादाचे' सुख श्रोतृवर्गाला अनुभवता येईल. हा आशय ज्ञानेश्वरांनी काव्यरसात आणि कल्पकतेच्या, अलंकारिक भाषेच्या सुवासात जणू बुचकळून आपल्यासमोर ठेवला आहे. कवितेमुळे ओवी खुलते; पण ज्ञानेश्वरांच्या ओवीमुळे कविताच स्वतःला धन्य समजते. ओवीच्या अंगप्रत्यंगांत शिरण्यासाठी मूर्तिमंत काव्यच जणू उत्सुक होते, अशी ज्ञानेश्वरीची स्थिती आहे:

*आजि श्रवणेंद्रिय पिकले। जे येणे गीतानिधान देखिले॥*
*आतां स्वप्नचि हे तुकले। साचासारिसे॥*
*आधीचि विवेकाची गोठी। वरी प्रतिपादी कृष्ण जगजेठी॥*
*आणि भक्तराजु किरीटी। परिसत असे॥*
*जैसा पंचमालापु सुगंधु। की परिमळु आणि सुस्वादु॥*
*तै भला जाहला विनोदु। कथेचा इथे॥*

आज कानांचे भाग्य उदयाला आले. एखादे सुंदर स्वप्न खरे व्हावे,

त्याप्रमाणे गीतेचे भांडार त्यांना पाहायला मिळत आहे. मुळातच ही विवेकाची कथा आणि त्यात तिचे वर्णन जगजेठी कृष्ण करीत आहेत आणि भक्तराज अर्जुन त्याचे श्रवण करीत आहेत. पंचमाचा आलाप आणि उत्तम सुगंध व रुची यांचा संगम व्हावा, तसा या कथेचा सुयोग आला आहे. ही अमृताची गंगा लाभली आहे. आता सर्व इंद्रियांनी कानांचा आधार घेऊन गीतेचे संवादसुख भोगावे, असे शब्द जेव्हा आपल्या प्रवचनाच्या आरंभीच ज्ञानेश्वर उच्चारतात, तेव्हा श्रोत्यांना श्रवणभक्तीचा दिवाळसण आला, असे वाटल्यास काहीच आश्चर्य नाही. श्रोत्यांना प्रमुदित आणि प्रबोधित करणारे वक्तृत्व हा ज्ञानेश्वरांच्या भाषेचा विशेष आहे. कित्येक तथाकथित वक्ते, कडवट, उबग आणणारे, अकारण निंदानालस्ती करणारे विषारी शब्द बोलतात आणि मग श्रोत्यांच्या मनातही एक प्रकारची कडवट चव निर्माण होते. विषयाला अनुरूप बोलावे; पण त्याआधी श्रोत्यांची मने स्निग्ध भाषेने आपल्याकडे ओढून घ्यावीत. या कलेचा प्रकर्ष ज्ञानेश्वरांच्या ठायी झालेला दिसतो.

कवी, ग्रंथकार, कलावंत, वक्ता यांनाच केवळ प्रभावी भाषेची आवश्यकता असते, असे नव्हे. ती साऱ्यांनाच असायला हवी. वाणीचा प्रभाव हा अखेर हृदयस्थ भावनांच्या उत्कटतेचा आणि सच्चेपणाचा प्रभाव असतो. कोणतीही अढी ठेवून मनुष्य बोलू लागला किंवा लिहू लागला की, ते सारे कागदी फुलासारखे कृत्रिम होते. पांडित्याच्या शब्दांपेक्षा प्रेमाचे शब्द अधिक परिणामकारक ठरतात हा आजपर्यंतचा इतिहास आहे. कृष्णाने अर्जुनाचा केवळ धिक्कार करून त्याला लढण्याची कठोर आज्ञा केली असती, तर अर्जुन मनापासून लढू शकला असता काय हा प्रश्न आहे. त्याला प्रेमाने आणि बुध्दिवादाने आपलेसे केल्याशिवाय अर्जुनाच्या शंका दूर झाल्या नाहीत. ज्ञानेश्वरांच्या दृष्टीत, वृत्तीत आणि उक्तीत प्रेम असल्यामुळे ते आले, त्यांनी पाहिले आणि ते जिंकले.

# अहंकार हेच अज्ञान

अहंकाराचा वारा लागला की, कर्तृत्व हळूहळू ओसरू लागते, असा इतिहास आहे. मदाने उन्मत्त झालेल्या बलिष्ठ हत्तीला सुध्दा एखादा समर्थ वनराज भेटतो आणि मग त्या हत्तीला रानोमाळ पळ काढावा लागतो. आपल्या सामर्थ्याबद्दल वास्तव अभिमान असण्यात काहीच गैर नाही, पण अभिमानाचे रूपांतर पाहता पाहता अहंगंडात व उन्मत्तपणात होऊ लागते. अनेक कारणांनी अहंकाराची विषवल्ली मनाच्या भूमीत फोफावत जाते. सत्ता, संपत्ती, तारुण्य, सौंदर्य, पांडित्य, सामर्थ्य अशी अनेकविध कारणे अहंकाराला खतपाणी घालीत असतात. एका अधिकाऱ्याला अशी सवय होती की, भेटायला आलेल्या माणसाला निदान अर्धा तास तरी बाहेर तिष्ठत ठेवायचे. 'साहेब कामात आहेत', 'साहेब मीटिंगमध्ये आहेत,' 'तासभर थांबावे लागेल' अशी वाक्ये भेटीसाठी आलेल्या माणसाला सेक्रेटरी तुटकपणे सांगायचा. साहेब मात्र आपल्या कार्यालयात एखादे फिल्मी मासिक चाळीत पंख्याखाली बसलेले असायचे; पण आपल्याला भेटण्यासाठी आलेल्या व्यक्तीला बराच वेळ तिष्ठत ठेवल्याशिवाय त्यांच्या अहंकाराचे समाधान व्हायचे नाही. आपण अधिकारी आहोत. आपली भेट इतक्या सुलभतेने मिळू लागली, तर आपले महत्त्व काय उरणार? ही त्यांची भूमिका होती.

एखाद्या पंडिताला ज्ञानाची नशा चढलेली असते. असेच एक पंडितप्रवर श्रेष्ठ व्यक्तीसंबंधी अनुदारपणे एकेरी ऊल्लेख करून बोलत. हे सारेच प्रकार लज्जास्पद आहेत. संत तुकोबांच्या मते:

*कोडियाचे गोरेपण। तैसे अहंकारी ज्ञान॥*
*त्यासी आता रिझे कोण। जवळी जाता चिळसवाणे॥*

गर्वाने वेढलेल्या ज्ञानाचा तुकारामांनी असा मर्मभेदक उपहास करावा, हे सयुक्तिकच आहे. कारण असल्याच गर्वोध्दत, स्वतःला पंडित समजणाऱ्या काही लोकांनी तुकोबांची यथेच्छ निंदानालस्ती करून आपल्या प्रतिष्ठितपणाचे प्रदर्शन मांडले होते. खरे तर शास्त्र-पुराणे, गीता नित्य वाचणाऱ्या या पंडितानां त्या

गीतेचे मर्म कळले नव्हते. 'पंडिताः समदर्शिनः' हे वचन तोंडपाठ असलेले लोक उच्चनीचत्वाचा बडिवार माजवून सामान्य माणसाला तुच्छ लेखीत होते. जे ज्ञान माणसाचे माणूसपण नाकारते ते 'कोडियाचे गोरेपण' आहे, असे म्हटले तर ते यथायोग्यच नव्हे काय?

रामेश्वरभट्ट नावाच्या एका महाविद्वानाने तुकारामांची अहंकाराच्या आधीन होऊन निंदा केली. छळही केला. पण तुकोबांची विशाल जीवनदृष्टी, त्यांचे महनीय व्यक्तित्व, त्यांची विलक्षण क्षमाशीलता आणि त्यांचे तपःपूत ज्ञान यांचा प्रत्यय आल्यावर रामेश्वर भट्टाची धुंदी पार उतरून गेली. तो स्वच्छ दृष्टीने या साधुपुरुषाकडे पाहू लागला. ईश्वरीय प्रकाशाचे किरण ज्ञानी भक्ताच्या हृदयातून कसे परिवर्तित होतात याचे दर्शन त्याला घडले. अहंता निरसून गेली. नम्रतेचा उदय झाला. काट्यांची फुले झाली. अंधार निवळला. आकाश उजळले. पांडित्याला भक्तीपुढे लीन व्हावे लागले. रामेश्वरभट्टाने तुकारामांचे शिष्यत्व पत्करून अभंगरचना केली. एका अभंगात ते म्हणतातः

*पंडित वैदिक अथवा दशग्रंथी। परि सरी न पावती तुकयाची॥*
*शास्त्रही पुराणे गीता नित्यनेम। वाचिताती वर्म न कळे त्यांसी॥*
*तैसा नव्हे तुका वाणी व्यवसाई। भाव त्याचा पायी विठोबाचे॥*
*भक्ती ज्ञान आणि वैराग्य आगळा। ऐसा नाही डोळां देखियेला॥*

'अमृताची वाणी वरुषणाऱ्या' तुकोबांच्या व्यक्तित्वाचे हे 'दर्शन' रामेश्वरभट्टला झाले आणि तो कृतार्थ झाला. अहंकाराची बांडगुळे बळकट झाडालाही खाऊन टाकतात. म्हणूनच माणसाने आपल्याकडे अत्यंत सूक्ष्म व शोधक दृष्टीने पाहावे ही संतांची शिकवण आहे. नाहीतर नेहमीचा अनुभव असा येतो की, दुसऱ्याच्या डोळ्यांतले कुसळ दिसते, पण आपल्या डोळ्यांतले मुसळ मात्र दिसत नाही.

अहंकाराचे बुडबुडे केव्हातरी फुटतातच. पण ते उत्पन्नच होऊ नयेत यासाठी वास्तवाच्या तराजूत स्वतःला तोलून पाहिले पाहिजे. हे घडत नाही. म्हणूनच व्यक्तींचेच नव्हे, तर राष्ट्रांचेही अहंकार अकारण फुगत जातात. सर्व प्रकारचा अहंकार म्हणजे मूर्तिमंत अज्ञानच नव्हे काय?

# आत्मानुभूती आणि पांडित्य

कोणत्या वयात मनुष्याच्या मनात विरक्तीचे बीज रुजेल आणि तो संन्यास धारण करील, हे निश्चितार्थाने सांगता येत नाही. ज्या मनात ज्ञान आणि विवेक असेल, ते मन जगातल्या आभासात्मक भोगापासून परावृत्त होऊ शकते. आद्य शंकराचार्य, ज्ञानेश्वर, रामदास यांच्या चित्तात ज्ञान आणि वैराग्य अगदी कोवळ्या वयात दृढ झाले. बहुसंख्य लोकांना सुखदु:खात्मक प्रपंचात सर्वार्थांनी गुरफटून जाणे आवडते. विचार आणि वैराग्य या प्रदेशाकडे ते ढुंकूनही पाहत नाहीत. सारी गात्रे थकली तरी मनातला भोगाचा अग्नी धगधगत असतो.

पंचाऐंशी वर्षांचे एक म्हातारबुवा आपण आपल्या तारुण्यात कसे बेबंद उपभोग घेतले याच्या सुरस कथा आजही लालायित वृत्तीने आळवून आणि घोळवून सांगतात. भूतकाळात जमा झालेले रंगढंगांचे ते जग अद्यापही त्यांच्या मनातून गेलेले नाही. जो प्रदेश मागे पडला त्याच्या आठवणींची जपमाळ माणूस जपत राहतो. याचा अर्थ तो वर्तमानक्षणात जगतच नाही. जुने भोगात्मकतेचे रंग संपले. आता त्यागाचे, सेवेचे, चिंतनाचे रंग न्याहाळावेत, असा विचारही बहुसंख्य लोकांच्या मनात उद्‍भवत नाही.

काही थोड्या व्यक्ती मात्र मनाने सारख्या विकसित होत असतात. तारुण्यातले मोह त्यांनी नाकारलेले नसतात. उपभोगाकडे पाठ फिरवलेली नसते, पण जसजसे ते आयुष्याची वाट चालत राहतात, तसतशी त्यांची मनोवृत्ती, आचारविचार यांच्यात औचित्यपूर्ण बदल होत राहतो. अत्यंत कोवळ्या वयात निवृत्तीचा, विरक्तीचा विचार सहसा मनात येत नाही कारण ज्ञान आणि अनुभूती यांची पुरेशी शिदोरी जवळ नसते. काही अपवादात्मक व्यक्तींच्या मनात शुध्द ज्ञानाची पहाट लवकर उजाडते. त्यांचा येथे प्रश्न नाही. पण काही अशी उदाहरणे सापडतात, की एखाद्यावर मारून मुटकून ऐन तारुण्यातच संन्यास लादलेला तरी असतो किंवा त्याने अज्ञानाने स्वत:वर लादून घेतलेला असतो. आत्मज्ञान आणि अनुभूती नसते.

*आतम अनुभव ज्ञान की जो कोइ पूछै बात*
*सौ गुंगा गुड खाइकै कहै कौन मुख स्वाद?*

पढीक ज्ञान आणि आत्मानुभव यांची गोष्टच विचारू नका, असे संत कबीरांचे म्हणणे आहे. मुका मनुष्य गुळाच्या रुचीबद्दल काय बोलणार? प्रत्यक्ष अनुभूती ही ग्रंथाध्ययनातून आलेल्या पांडित्यापेक्षा कितीतरी प्रभावी असते. ज्ञानेश्वर - रामदासांच्या मनातल्या विरागतेला आत्मानुभूतीची भरभक्कम बैठक होती. त्यांचे वैराग्य केवळ ग्रंथ वाचून निर्माण झालेले नव्हते, म्हणूनच ते त्यांच्या जीवनात सर्व प्रकारे मुरले होते.

एकदा एकोणीस-वीस वर्षांच्या एका तरुण संन्यासिनीचे प्रवचन मी ऐकले. तिची प्रतिपादन शैली चांगली होती. पण केवळ ग्रांथिक ज्ञानावर तिची विरक्ती आधारलेली असावी असे वाटले. काही जणांना संन्यस्त वृत्तीचाही मोह पडतो तसे कदाचित तिच्या बाबतीत घडले होते काय? कारण माणसाच्या जीवनासक्तीवर विदारक टीका करताना ती केवळ पुस्तकी दृष्टान्त देत होती. तिच्या शब्दांना अनुभवाचा गंध नव्हता. शिकलेल्या शब्दांचे ज्ञान आहे, पण अनुभव मात्र जवळजवळ नाही, या परिस्थितीत तिच्या मनातले वैराग्य किती काळ स्थिर राहील, हा प्रश्न होता.

ग्रंथांतून जन्माला आलेले वैराग्य मोहाच्या एकाच लाटेबरोबर वाहून जाऊ शकते. ज्या विरक्तीला चिंतन, तपस्या आणि अनुभूती यांचा आधार नाही, ती विरक्ती केव्हा निरसून जाईल, हे सांगता येत नाही. अनुभवाच्या भट्टीतून तावून सुलाखून निघालेले तुकोबा कठोर आत्मपरीक्षण करीत म्हणतातः

*वाचेच्या चापल्ये बहुजालो कुशळ। नाही बीजमूळ होता आले॥*
*म्हणोनि पंढरीराया दुःखी होते मन। अंतरीचे कोण जाणे माझे॥*
*पूज्य जालो अंगा आला अभिमान। पुढील कारण खोळंबले॥*
*तुका म्हणे खूण न कळो चि निरुती। सापडलो हाती अहंकाराचे॥*

जोपर्यंत अनुभवाचे बीजमूळ दृढ होत नाही, तोपर्यंत खरे आत्मज्ञान लाभत नाही.

# मनातच आहे तीर्थक्षेत्र

अनेक तीर्थयात्रा करून आलेल्या यात्रिकाच्या मनात आणि जीवनात आध्यात्मिक सौंदर्याची पहाट उदयाला येईलच असे नाही. आणि ज्याने कधीच तीर्थाटन केले नाही, जो केवळ आपल्या प्रपंचातच राहिला त्याच्या आयुष्यातही कधी-कधी उच्च आचार-विचारांचे वैभव प्रकट होऊ शकते. तीर्थयात्रा केवळ शरीराला घडते. मन मात्र तीर्थाभोवती प्रदक्षिणा न घालता भलत्यासलत्या मोहाभोवती पिंगा घालीत राहते. अशा परिस्थितीत तीर्थयात्रा निष्फळ ठरते. कोणी काशीला जातो, कोणी मक्केला जातो. या तीर्थयात्रांना दरवर्षी लक्षावधी भाविक जात असतात. परतल्यानंतर त्यांच्या जीवन पध्दतीत, वैचारिक स्थितीत काही मौलिक बदल झाले आहेत असे आढळत नाही. प्रवास मात्र घडतो. नवा प्रदेश पहायला मिळतो. काही दिवसांची सहल होते. म्हणूनच तुकोबांनी, 'जाऊनियां तीर्था तुवां काय केले? चर्म प्रक्षाळिले वरीवरी' असे स्पष्टपणे म्हटले आहे. कबीरांनी असेच मर्मभेदक उद्‌गार काढले आहेत. ते म्हणतात:

*मथुरा जावै द्वारिका, भावै जावै जगनाथ।*
*साध संगति हरिभजन बिन, कछू न आवै हाथ॥*
*मेरो संगी दोइ जन, एक वैष्णौ एक राम।*
*वो है दाता मुकति का, वो सुमिरावै नाम॥*
*हरि सेती हरिजन बडे, समझि देखु मन मांहि।*
*कह कबीर जग हरि विषे, सो हरि हरिजन मांहि॥*

मथुरेला जा, द्वारकेला जा अथवा जगन्नाथपुरीला जा; जगातल्या कोणत्याही तीर्थक्षेत्री गेलास तरी हातात काही पडणार नाही. साधु सज्जनांच्या संगतीशिवाय आणि मनात चालणाऱ्या हरिभजनाशिवाय कशाचाच उपयोग नाही. तीर्थस्थळे जेथे आहेत तेथेच राहतील. यात्रिकाच्या मनाचे रूपांतर जोपर्यंत तीर्थात होत नाही, तोपर्यंत सारे उपचार निरर्थक होतात. केवळ तीर्थक्षेत्री जाण्यामुळे किंवा गंगा-चंद्रभागा-गोदा यांच्या पाण्यात स्नान केल्यामुळे पाप धुतले जाऊन मनुष्य

पुण्यशील बनला असता, तर आजच्या जगाचे नंदनवन झाले असते. नद्यांचे पाणी मात्र माणसाने दूषित करून ठेवले आहे. म्हणूनच बसवेश्वरांसारखा धर्मपुरुष म्हणतो, 'बंधूनो, तीर्थात बुचकळ्या मारून काय होणार? आजपर्यंत काय झाले? तीर्थाच्या पाण्यात बुडी घेतल्यामुळे तुमचे अंतरंग शुध्द झाले का? परद्रव्याची आणि परस्त्रीची अभिलाषा प्रथम सोडा. हृदयात साठवलेला मळ धुवून टाका. नुसत्या तीर्थस्नानाने शुचिर्भूत होता येत नाही.

*पाप करुन तीर्थी बुडाले, तरी काय जाईल पाप?।*
*तीर्थी बुडून केले पाप तरी पाप असते पाप॥*

ही सारी टीका टिप्पणी केवळ तीर्थयात्रेच्या संदर्भातच सयुक्तिक आहे असे नाही. सर्व प्रकारच्या कर्मकांडांना हा विरोध आहे. मूळ भूमिका विसरून भाविक माणसे औपचारिक गोष्टींवर आणि क्रिया पध्दतीवर अवास्तव भर देतात, तेव्हा आत्मा हरवतो आणि कलेवर तेवढे उरते अशी अवस्था होते. देवापेक्षा देव्हाऱ्यालाच महत्त्व येते. अन्नपाण्याचा त्याग एक दिवस केला म्हणजे उपवास घडतो, अशी समजूत आहे. मनात नाना प्रकारच्या विषयांचे मोहोळ उठलेले असते. वासनेच्या मधमाशा घोंघावत असतात; पण कर्मकांडी भक्त, एक दिवस उपवास केला या खोट्या समाधानात गर्क होतो. त्याप्रमाणे तीर्थयात्रा केल्यामुळे पातकांचा निरास झाला, आता आपल्या आयुष्यात सुखसंपन्नता येईल ही अपेक्षा करणे चुकीचे आहे. आपल्या मनाच्याच प्रदेशात शुध्द भक्तिभावानेच तीर्थक्षेत्र उभारणे शक्य असते. प्रथम सद्भावनांनी, शुभंकर विचारांनी मनाची भूमी विशुध्द बनविली पाहिजे. हे कार्य एकट्याला करता येत नाही म्हणून साधुसंतांचा सहवास मिळविता यावा. कारण संत हे ईश्वरत्वाचे प्रतीक असते. संत परिसासारखे सुवर्णत्व प्रदान करू शकतात. संतांच्या सहवासात राहणे म्हणजेच तीर्थक्षेत्रात निवास केल्यासारखे आहे.

*तुका म्हणे माझ्या जीवाचे जीवन।*
*सोइरे हरिजन प्राणसखे॥*

# गीता नावाचा कल्पवृक्ष

शाळेत विद्यार्थी असताना गीतेचे काही श्लोक आमच्याकडून पाठ करून घेतले जात होते. त्या वेळी त्या श्लोकांचा अर्थ समजला नव्हता. आजही तो सर्वार्थाने समजला आहे असे म्हणवत नाही; पण एकेक श्लोक चिंतनाला गती देतो. जसजसा विचार करावा, तसतसे पूर्वी लक्षात न आलेले तत्त्वसौंदर्याचे वेगळेच अंग दृष्टीसमोर येऊ लागते. कित्येक ज्ञानवंतांनी सारे जीवन गीतेच्या अखंड व्यासंगात व्यतीत केले. एक अभ्यासक मला म्हणाले,

"तत्त्वज्ञानाच्या वनात 'गीता' नावाचा कल्पवृक्ष शतकानुशतके सावली देत उभा आहे. ज्याची मागण्याची इच्छा उदंड असेल, त्याच्या पदरात हा वृक्ष इच्छित फळ टाकतो. ती फळं स्वीकारण्यासाठी आपल्या मन-बुध्दीचा पदर मात्र बळकट असला पाहिजे. संसारतापानं पोळलेल्या असंख्य लोकांना या महावृक्षाचा वारा जरी स्पर्शून गेला, तरी त्यांच्या चित्ताची व्याकुळता कमी होऊ शकेल. हे विधान मी अंधश्रध्देनं करीत नाही. 'गीता' हा ग्रंथ ज्ञान आणि कर्म व भक्ती यांचा संगम घडवून आणतो. विचारशक्ती, पुरुषार्थ आणि जीवनश्रध्दा म्हणजेच ज्ञान, कर्म व भक्ती असा मी अर्थ करतो. जेव्हा जेव्हा मी उद्विग्न होतो, भांबावून जातो, तेव्हा तेव्हा गीतेतले स्पष्ट, शुध्द, नि:शंक विचार माझ्या पाठीवर हात फिरवून म्हणतात, "जीवन जगण्यासाठी आहे. लढण्यासाठी आहे, विजयासाठी आहे. आपलं कर्तव्य करीत राहा."

*स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः।*
*स्वकर्मनिरतः सिद्धिं यथा विंदति तच्छृणु॥*

आपापल्या कर्माच्या ठायी रममाण झालेला मनुष्य सिध्दी पावतो. त्याला सिध्दी कशी प्राप्त होते, हे मी तुला सांगेन.

या श्लोकातून गीताकारांचा विलक्षण आत्मप्रत्यय प्रकट झाला आहे. आपले कर्तव्य उत्कटतेने व निष्ठापूर्वक करणारा खऱ्या अर्थाने जीवन जगतो. म्हणूनच जिवंतपणे जगण्याचा रसरसीत संदेश देणारा 'गीता' हा जीवनशास्त्रावरील

अपूर्व ग्रंथ आहे.

त्या अभ्यासकाने जणू काही गीतेचे सारच थोडक्यात सांगितले. भारताच्या प्रतिभासंपन्न भूमीतून गीतेसारखेच आणखीही काही महनीय वृक्ष निर्माण झाले आहेत. या वृक्षांच्या सावलीत थोडा वेळ का होईना, ज्याने बसण्याचा सुखानुभव घेतला नाही, त्याच्या दुर्दैवाची खंत वाटते. शाळेत असताना दुसऱ्या अध्यायातला मुखोद्‌गत झालेला एक श्लोक आजही कधी कधी माझ्या रक्तात नवी उष्णता निर्माण करतो. जगण्याचे आणि मरण्याचे भेकड व बुळबुळीत हिशेब करीत बसलेल्या मनाला एक तीव्र, पण उत्साहवर्धक विचार देऊन हा श्लोक सावध करतो. कसे जगावे आणि कसे मरावे, या प्रश्नाचे स्वच्छ उत्तर देणारा हा श्लोक व्यक्तीच्या, समाजाच्या आणि राष्ट्राच्या जीवनाचा आधार बनला पाहिजे, तरच आम्हाला धर्माने आणि प्रतिष्ठेने जगता येईल.

*हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।*
*तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युध्दाय कृतनिश्चयः ॥*

पौरुषाची महती गाणारा हा श्लोक आहे. युध्दाचा कृतनिश्चय करून उठणे म्हणजे केवळ लढाईवर निघणे, असा संकुचित अर्थ घ्यायचा नाही. जीवनाच्या समरांगणात वेगवेगळ्या पातळ्यांवर धर्मबुध्दीने लढले पाहिजे. हा लढा देताना कोणतीही अधार्मिक, अनैतिक, लाजिरवाणी अशी तडजोड स्वतःबरोबर किंवा इतरांबरोबर न करता अटीतटीने, अपराजित वृत्तीने झुंज दिली पाहिजे. मनाचा झुंजारपणा अभंग राहणे हेच जगण्यातले सामर्थ्य आणि सौंदर्य आहे. 'गीता' वाचताना आपणही 'कृष्ण' बनावे. गीतेने सर्वसामान्य माणसाला अर्जुनाच्या आणि कृष्णाच्या पातळीवर नेले. आणि जेथे कृष्णार्जुनसंगम होतो तेथे विजयश्री वरमाला घेऊन उभी असते. गीतेचे हे शाश्वत स्वरूपाचे वरदान आहे.

◈◈

# *स्वप्नीचे धन*

हे मानवी जीवन एखाद्या विलक्षण स्वप्नासारखे अद्भुत आणि क्षणभंगुर नाही काय? जागृतीचा स्पर्श झाल्याबरोबर स्वप्न विरून जाते आणि वास्तवाचे भान येते. स्वप्नातले सारे रंग वितळून जातात. पण अशा वेळी अंतर्मुख वृत्तीचा मनुष्य विचार करू लागतो. स्वप्नातली श्रीमंती, स्वप्नातले सुखोपभोग आणि ते सत्तावैभव जसे पाण्यावरच्या बुडबुड्याप्रमाणे क्षणजीवी असते त्याप्रमाणे हे वास्तव जीवनसुध्दा अवश्य वितळून जाणारे एक सुखदुःखात्मक, चमत्कृतीपूर्ण स्वप्नच नव्हे काय? वस्तुनिष्ठ दृष्टीने विचार करणाऱ्या माणसाला सभोवतालचे जग आणि आपले जीवित स्वप्नासारखे चंचल आहे हे पटल्याशिवाय राहत नाही. आपले बालपण हे एक स्वप्न होते. त्यानंतर उदयाला आलेले तारुण्य हेही एक स्वप्नच होते. भूतकाळात गेलेला प्रत्येक क्षण आता या वर्तमान क्षणी स्वप्नासारखाच आभासात्मक वाटतो. कोणताही क्षण - मग तो विजयाचा असो, दारुण मनोभंगाचा असो, प्रिय समागमाचा किंवा विरहाचा असो, आपल्या हातात कधीच कोणाला पकडून ठेवता येत नाही. मावळतीच्या क्षितिजावर ढगांच्या चित्रविचित्र आकृती उत्पन्न व्हाव्यात आणि पाहता पाहता त्या नाहीशा व्हाव्यात, तसे आपले आयुष्य आहे, असे म्हटले तर निराशावादाचा आरोप होऊ नये.

सर्वसामान्य माणसालाही जीवनाच्या नाटकातले प्रसंग तात्पुरते व कृत्रिम आहेत असे वाटत असते, पण नाटकालाच सत्य समजून त्याला पराकाष्ठेच्या चिवटपणाने चिकटून बसण्याची तो धडपड करीत असतो. यावर तत्त्वज्ञ संतांनी टीका केली आहे. त्यांनी माणसाच्या दुर्धर लोभावर आणि मोहावर फटकारे मारून त्याला सावध करण्याचा प्रयत्न केला आहे. हे सत्य सांगितल्यामुळे त्यांना जीवनद्वेष्टे म्हणणाऱ्या टीकाखोरांची मात्र दया येते. संत ज्ञानेश्वरांचा हा अर्थपूर्ण अभंग पाहावा...

*मृगजळाचा जळी चाळिसि जळचरे। कैंचे जळ तेथे कोठे मत्स्य रे॥*

*नाथिलिच खटपट करील किती। गगनीची सुमने तुरंबिसी मस्तकी॥*
*वांझेचिया सुता रचसिल मारे। कैंचा पुत्र तेथे कायि संव्हारे॥*
*ऐसी नाथिलीचि नाटके आचरसी किती। ज्ञानदेव म्हणे सहजे निवृत्ति॥*

मृगजळाच्या डोहात जळही नसते आणि जळचरेही नसतात. त्या डोहात मासे कसे असतील? आकाशाची फुले मस्तकी धारण करून त्यांचा सुगंध घेण्याची खटपट करण्यात काय अर्थ? वंध्येला पुत्रावर कसे प्रेम करता येईल? जी मुळातच नाहीत ती नाटके कशी बरे करता येतील? ' स्वप्नीचे धन ते धनचि नव्हे', 'अभ्रीची छाया ते छायाचि नव्हे। तैसे विषयसुख नव्हे नव्हे रया।'

ज्ञानेश्वरांचा हा विचार विरसपूर्ण असाला तरी सुज्ञ माणसाला त्यातले सत्य मान्य करण्याशिवाय गत्यंतर नाही. आपले जीवन हे स्वप्नवत, मृगजळवत आहे याचा प्रत्यय येतो. मागील वर्षी माझ्या एका मित्राने कन्येचा वाङनिश्चय सोलापुरात अत्यंत उल्हासाने, थाटामाटात केला. संध्याकाळी तो लातूरजवळील आपल्या खेड्याकडे निघून गेला. दुसऱ्या दिवशी पहाटे झालेल्या भूकंपात त्याचे घरदारच नव्हे, तर सारे गाव नष्ट झाले. घराचा आणि माणसांचा पत्ताच लागला नाही. वाङनिश्चय समारंभातला तो आनंद, ते वाद्यसंगीत, ते पक्वान्न भोजन, तो हास्यविनोद आणि तो प्रचंड उत्साह हे सारे मृगजळ नव्हते काय?

पण स्वप्नासारखे चंचल असलेले जीवनसुध्दा सुंदर आणि निरामय बनवण्याचा सत्यमय प्रयत्न केलाच पाहिजे. सारे आभासात्मक म्हणून जीवनाची हेटाळणी करा, उपेक्षा करा, असे मात्र कोणत्याही संतमहंताने सांगितलेले नाही. स्वप्नात हरवू नका. वास्तवाकडे वास्तवदृष्टीने पहा, इतकाच त्याचा अर्थ आहे. आपले जीवित आपल्यालाच घडवायचे आहे.

*'बाप रखुमादेवी वरा, विठ्ठला शरण जाइजे रया।'*

# तरुणांचा धर्म

तारुण्य हा जीवनातला वसंत ऋतू आहे. तारुण्याचा संचार झाला, की मनात आणि शरीरात परिवर्तन होऊ लागते. दृष्टीत आणि वृतीत सौंदर्य भरू लागते, ओठांवर उन्मादाचे गाणे खेळू लागते, पराक्रमाला नवे अंकुर फुटतात, अन्यायाची चीड येते, न्यायासाठी लढताना प्राणांचीही क्षिती वाटत नाही. रुक्ष जीवनात तारुण्यामुळे नवे आल्हादक रंग खुलू लागतात. खरे तर गद्यप्राय जीवनाचे *काव्यात* रूपांतर करण्याची किमया यौवनात असते; पण तारुण्याचे काही दुष्परिणामही होऊ शकतात. अज्ञानी आणि अविचारी माणसे तारुण्याच्या धुंदीत उभ्या आयुष्याची अशी वाताहात करू शकतात, की उद्‌ध्वस्त झालेले जीवन पुन्हा जोडता येत नाही. संयम आणि समजूतदारपणा यांचे अधिष्ठान असेल, तर तारुण्यातून एका समर्थ व सुंदर जीवनाची उभारणी करण्यात येते; पण तारुण्याच्या मदाने झिंगलेल्या बुध्दीने स्वतःबरोबरच इतरांचीही जिंदगी नष्ट-भ्रष्ट केलेली आढळते. संत तुकोबांनी या अवस्थेचे केलेले वर्णन विशेषच परिणामकारक आहे:

*तारुण्याच्या मदे न मानी कोणासी। सदा मुसमुसी घुळी जैसा ॥*
*अठोनी वेठोनी बांधला मुंडासा। फिरतसे म्हैसा जनामधी ॥*
*श्वानाचिया परी हिंडे दारोदारी। पाहे परनारी पापदृष्टी ॥*
*तुका म्हणे ऐसी थोर हानी जाली। करिता टवाळी जन्म गेला ॥*

सुविचारांचे संस्कार ज्यांच्यावर घडलेच नाहीत, ज्यांच्या वर्तनाला आणि वाणीला कसलाही धरबंध उरलेला नाही, अशा अडाणी मूर्खांच्या हातातली तारुण्याची शक्ती म्हणजे समाजावरचे संकट असते. मुसमुसणारा रेडा ज्याप्रमाणे माजोरीपणे कोणालाही धडक देतो, तशी अवस्था या प्रकारच्या तरुणांची असते. 'घुळी' आणि 'म्हैसा' या दोन प्रतिमा योजून तुकोबांनी अशा प्रवृत्तीविषयीचा आपला तिरस्कार व्यक्त केला आहे. आज तुकोबा असते तर या अभंगात

आणखी काही उदाहरणे देऊन तरुणांच्या दुष्प्रवृत्तीवर त्यांनी आणखी तीव्रतेने प्रहार केले असते. आजचा तरुण हा त्यांना विलक्षण चिंतेचा विषय वाटला असता आणि एरवी शांत असणारे तुकोबा 'मोजून माराव्या पैजारा' असे म्हणाले असते.

तारुण्यावस्था ही केवळ व्यक्तिजीवनाची नव्हे, तर राष्ट्रजीवनाचीही महनीय संपत्ती आहे. या अवस्थेत उत्कट भावनेने उदात्त मूल्यांचे, सुंदरतेचे, आदर्शांचे पूजन करण्याची प्रवृत्ती तरुण मनात उचंबळून यावी. एखादी शुभंकर महत्त्वाकांक्षा निर्माण व्हावी. तरुण पिढीने हातात टाळ - चिपळ्या घेऊन 'विठ्ठल विठ्ठल' असे भजन करावे असा विचार तुकोबांना अभिप्रेत नाही. भजन-पूजनातलाही आनंद घ्यायला प्रत्यवाय नाही; पण ज्याची मनोभावे पूजाअर्चा करावी असा वीरत्वाचे प्रतीक असलेला 'देव' तरुणांच्या निर्मितिशील शक्तीतून घडवला जावा. तारुण्य हे असे एक बलदंड वादळ आहे, की जे सामाजिक आणि धार्मिक अन्यायावर प्रचंड शक्तीने तुटून पडू शकेल. तरुण हे स्थितिवादी नसतात. त्यांना गती-प्रगती प्रिय असते. नवनवीन आकाशात आपल्या गरुडपंखांनी उड्डाण करण्याची प्रेरणा मिळणे म्हणजेच विठ्ठलाची प्राप्ती होणे आहे. यालाच 'परमेश्वराचे नामसंकीर्तन' म्हणता येईल. पराक्रम हे ईश्वराचेच रूप आहे.

दुसरी आपत्ती अशी, की तरुण वयात 'म्हातारपण' आलेले अनेक तरुण आज दिसतात. वसंत ऋतूचा स्पर्श होऊनही झाडांना पालवी फुटू नये, तसा हा एक प्रकार आहे. कुटुंब, समाज आणि राष्ट्र यांसंबंधीची कर्तव्ये तरुणांनी पार पाडावीत, हीच साधुसंतांची अपेक्षा आहे. हतवीर्य झालेल्या तारुण्याला उद्देशूनच 'गीता' सांगितली गेली:

*निर्वीर्य तू नको होऊ न शोभे हे मुळी तुज।*
*भिकार दुबळी वृत्ति सोडुनि ऊठ तू कसा॥*

# परमेश्वराची भाषा

परमेश्वराला कोणती भाषा कळते, असा प्रश्न एकदा उपस्थित करण्यात आला. संस्कृत ही प्राचीन भाषा असल्यामुळे आणि वेदोपनिषदादी ग्रंथ संस्कृतात असल्यामुळे, ईश्वराला संस्कृत भाषा कळते किंवा ती त्यानेच निर्माण केली आहे म्हणून भक्त आणि परमेश्वर यांना जोडणारी संस्कृत भाषा ही महत्त्वाची कडी आहे, असे मत अभिनिवेशाने मांडण्यात आले. कोणी ग्रीक-लॅटीनचे, कोणी अरेबिक, कोणी तमीळ-तेलगुचे आणि कोणी मराठीचेही समर्थन केले. एकजण म्हणाला, "जगातल्या सर्व भाषांचा निर्माता परमेश्वरच आहे. भिन्नभिन्न प्रदेशांतल्या लोकांना आपला संदेश कळावा, म्हणून त्याने निरनिराळ्या धर्मग्रंथांची निर्मिती केली. त्याला कळत नाही, अशी कोणतीही भाषा अस्तित्वात नाही. कारण तो सर्वज्ञाता आहे."

हा विचार वाद करणाऱ्या लोकांना मान्य झाला नाही. ते अधिकच आग्रहाने, खरे तर दुराग्रहाने आपले मत अंतिम आहे असे कंठरवाने सांगू लागले. प्रत्येक जण ईश्वराला एका विशिष्ट भाषेच्या चौकटीत बसवण्याचा प्रयत्न करीत होता. आता या लोकांना कोणत्या विशिष्ट भाषेत उत्तर द्यावे?

संत कबीराने पूर्वीच उत्तर दिले आहे. ते म्हणतात, "अरे, मशिदीतून तू का मोठ्याने पुकारतोस? तो अल्लाह बहिरा आहे काय? मुंगीच्या पायातल्या घुंगराचा सूक्ष्म ध्वनीसुध्दा त्याला ऐकू येतो. अरे पंडिता, आसन ठोकून जपमाळ घेऊन तू बसलास आणि काहीही बोललास तरीही तुझ्या हृदयातील कपटाची कात्री त्याला दिसू शकते."

कबीरांनी ईश्वरी सामर्थ्याला जाणले होते. म्हणूनच कोणत्याही सीमेत तो सर्वशक्तिमान, सर्वव्यापी, सर्वात्मक असा सर्वेश्वर बांधला जात नाही, याची त्याला जाणीव होती. भाषेवरून किंवा पूजेच्या भिन्नभिन्न पध्दतींवरून कलह माजवणारे आणि परमेश्वराच्या नावाने निरर्थक आरोळ्या ठोकणारे परमेश्वराचे अभिमानी नसून, ते आपापले अहंकार जपत असतात यात शंका नाही. त्याला

कोणती भाषा कळते हा प्रश्नच हास्यास्पद आहे. अजाण बालकाची भाषा आईला कशी कळते? खरे तर त्या बालकाला शब्दोच्चारही करता येत नाही. पण त्याच्या मनातला भाव सहजपणे टिपून घेणारे मातृहृदय वत्सल आणि संवेदनशील असते. संत जनाबाई एका अभंगात म्हणते:

*वाट पाहतो मी डोळां। कां गा न येसी विठ्ठला॥*
*तूं वो माझी निज जननी। मज कां टाकियले वनी॥*
*धीर किती धरुं आतां। कव घाली पंढरीनाथा॥*
*मला आवड भेटीची। धनी घेईन पायांची॥*
*सर्व जिवांचे स्वामिणी। म्हणे जनी मायबहिणी॥*

भक्ताहून परमेश्वर वेगळा असत नाही. त्यामुळे जी भाषा भक्ताची, तीच त्याची असते. जनाबाईची भाषा परमेश्वराला कळू शकते. खरे सांगायचे तर ज्योत धारण करणारी पणती किंवा दीपक, यांचा आकृतिबंध महत्त्वाचा नसून तेवणाऱ्या ज्योतीतून प्रकट होणारा, स्फुरण देणारा प्रकाश महत्त्वाचा असतो. जो भक्त असेल त्याला वास्तविक पाहता कोणत्याही भाषेची आवश्यकता नाही. परमेश्वराला केवळ भाव कळतो, भक्ताचा स्वभाव आणि प्रभाव कळतो. भाषा ईश्वर निर्मित नाही, ती माणसांनीच निर्माण केली. धर्मग्रंथही माणसातल्या ईश्वरी प्रतिभेने लिहिले गेले. त्यांतले विचार शाश्वत गंधाने दरवळलेले आहेत. भाषा ही वरच्या आवरणासारखी असते; पण धर्मग्रंथांची भाषा हीच महत्त्वपूर्ण मानून त्यातल्या चिरकालिक विचारांकडे पाठ फिरवणारे लोक एका अर्थाने धर्माशी आणि परमात्म्याशी द्रोह करीत असतात असेच म्हटले पाहिजे. अमृताचा त्याग करून भांड्याच्या आकाराबद्दल भांडण करणाऱ्या अज्ञानी भांडखोरांना कोणती शिक्षा द्यावी? खरे तर त्यांना वेगळी शिक्षा देण्याचे कारण नाही. ते अमृताला मुकले आणि क्षुद्रपणे भांडत बसले, हीच शिक्षा त्यांना पुरेशी नाही काय? एका कवीने म्हटले आहे:

*पात्र सोन्याचे असो, मृत्तिकेचे। वेड मजला आतल्या अमृताचे॥*

# शुध्द करी चित्त

जगण्यासाठी मनुष्याला नाना प्रकारचे अटीतटीचे संघर्ष करावे लागतात. अनेक वेळा या संघर्षात त्याला दारुण पराभव पत्करावा लागतो; पण पराजयाचे विष पचवून पुन्हा विजयाची स्वप्ने मनात रेखाटीत मनुष्य चालत राहतो. विजयाचे क्षण क्वचितच आयुष्याच्या पदरात पडतात. पराभवाची असंख्य छिद्रे पडून जीर्ण-शीर्ण झालेले आयुष्याचे वस्त्र अखेर फाटून जाते. या साऱ्या प्रक्रियेला 'जीवन' ही संज्ञा दिली जाते. हेच जीवनाचे वास्तवरूप आहे. सुखाचे, आत्यंतिक आनंदाचे, तृप्तीचे कितीसे क्षण मनुष्य आपल्या वाटचालीत मिळवू शकतो, या प्रश्नाचे उत्तर सत्याला स्मरून द्यायचे असेल, तर हे जीवित म्हणजे निराशेच्या भूमीत उगवलेले आणि दुःखाच्या कडवट पानाफुलांनी लहडलेले वेदनेचे आणि संघर्षाचे झाड आहे. केव्हा तरी आनंदी क्षणांची चार-दोन पाखरे क्षणमात्र याच्या फांद्यावर बसून आशेचे सूर आळवतात आणि कायमची अंतर्धान पावतात. हेच खरे जीवनाचे दर्शन आहे:

*जो देखो सो दुखिया देखा, तनुधरी सुखी न देखा*
*उदयअस्तकी बात कहत हो ताकर करहु बिबेखा*
*बाटे बाटै सब कोइ दुखिया क्या गिरही, बैरागी*
*शुकाचार्य दुखहीके कारन गरभै माया त्यागी*

संत कबीराचे हे निरीक्षण आहे. पावलोपावली त्याला दुःखपीडित लोक भेटले. जो जो दिसला, तो तो कोणत्या तरी विवंचनेने, वेदनेने व्याकूळ झालेला होता. जोगी, जंगम, तापस सारेच असमाधानी होते. आशा आणि तृष्णा यांनी वेढलेले होते. सुखाची कल्पना करून चालताना पदोपदी संकटांच्या रस्त्यावर ठेचा खात होते. खाचखळग्यांत पडत होते. सुख मात्र दृष्टिक्षेपातही येत नव्हते.

आजच्या प्रगत वैज्ञानिक जगात कबीरांच्या या विचारावर टीका करून कोणी विद्वान म्हणेल, की 'ठेचा खात खातच जगाची प्रगती झाली आहे. कबीराच्या काळात हे जग होते त्यापेक्षा अधिक विकसित झालेले सुंदर जग

विज्ञानाच्या बळावर माणसाने निर्माण केले आहे. आता हा दृष्टिकोन जुना झाला. तुलसी - कबीर - नामा आणि तुका हे जुन्या जगाचे प्रतिनिधी आहेत. आमचे नवीन जग त्यांना समजण्यासारखे नाही.'

*त्या विद्वानाने आपल्या सभोवतालच्या जगाकडे आणि आपल्या अंतरंगातील* जगाकडे एक शोधक दृष्टी टाकली, तरी त्याला या जगात प्रतिक्षणी उगवून येणाऱ्या आणि फोफावणाऱ्या तऱ्हेतऱ्हेच्या दु:ख-यातनांची जाणीव होईल. विज्ञानातून काही सुंदर सुखे निर्माण झाली, असे तो समजतो; पण माणसाने आपल्या बुध्दीच्या, शक्तीच्या आणि अदम्य विकारांच्या सामर्थ्याने सहस्त्रावधी दु:खे निर्माण करून ठेवली आहेत. आपणच वाढवलेल्या या विषारी काट्यांच्या रस्त्यातून तो चालत आहे. ज्ञानविज्ञान वाढताना हृदयाची जोपासना करण्याचे मात्र तो विसरून गेला. त्यातूनच ही अनर्थ परंपरा उदयाला आली. कबीरांप्रमाणेच सर्वच साधुसंतांनी विवेकावर आधारलेले साधे, स्वच्छ संयमित जीवन जगण्याची दिलेली शास्त्रशुध्द शिकवण मनुष्य हरवून बसला. तंत्रज्ञानाने तो पन्नास मजल्यांची इमारत - जी आकाशाला भेदून उंच जाते - सहज उभी करू शकतो. त्या उत्तुंग इमारतीसमोर माणूस मात्र खुजाच असतो. खुज्या राहिलेल्या माणसाने गगनचुंबी शिल्पे उभी केली; पण स्वत:ची उंची मात्र तो वाढवू शकला नाही, हे शल्य विचारावंतांना कायमचे टोचत राहील.

प्रथम आपले मन आणि जीवन शुध्द केल्याशिवाय आनंदाचा शोध लागणार नाही. म्हणून तुकोबा आपल्या अकृत्रिम शब्दांतून सांगतात:

*बैसोनि निवांत शुध्द करी चित्त। तया सुख अंतपार नाही॥*

दु:खपूर्ण जगातदेखील शुध्द सुख आपल्या मनात आपण शोधू शकतो. त्यासाठी ध्यान आणि ज्ञान हवे, हेच संतांचे सांगणे आहे.

❖❖

# या रणांगणात उभे राहा

किती‌ही समर्थ मनुष्य असला तरी आपल्या ललाटीचा लेख तो पुसू शकत नाही, असे म्हणतात. जे प्रारब्धात आहे ते कोणत्याही परिस्थितीत घडल्याशिवाय राहत नाही. म्हणून मानवी पराक्रमापेक्षा त्याचे प्राक्तन हेच अधिक श्रेष्ठ असते, अशी एक विचारधारा आहे. श्रीकृष्णासारख्या महान सामर्थ्यवंताला, योगेश्वराला, अन्यायी सत्ता बाहुबालाने उलथून टाकणाऱ्या व नवी सिंहासने निर्माण करणाऱ्या पुरुषोत्तमाला आपल्या डोळ्यांदेखत यादवकुळाचा विनाश पाहावा लागला. जळणारी द्वारका त्याला वाचवता आली नाही. या ज्ञानवंताला निर्जन वनात व्याधाच्या हातून मरण पत्करावे लागले. याचा अर्थ जो विधिलेख असतो त्यावरची वज्राक्षरे पुसून टाकणारे हात कोठेच नसतात. म्हणूनच भर्तृहरीने एका श्लोकात 'दैवालाच शरण जाणे योग्य असून पौरुष मात्र व्यर्थ आहे, त्याचा धिक्कार असो,' असे स्पष्टपणे म्हटले आहे.

पुरुषार्थ आणि प्रारब्ध यात काय अधिक समर्थ आहे, यासंबंधीचा वाद अत्यंत जुना आहे. कधी दैव बलवान ठरते, तर कधी प्रयत्न वरचढ ठरतो. मानवी जीवितात या दोन्ही घटकांना महत्त्वाचे स्थान आहे, असे म्हणता येईल. पुरुषार्थाने मिळवावे आणि प्रतिकूल दैवाने सारे नष्ट करावे, हा अनुभव सार्वत्रिक आहे. संत कबीर यांच्या काव्यात ही विदारक खंत प्रकट झाली आहे.

*कोइ कर महल, कोइ कर टाटी। उडी जाय हंस, पडी रह माटी॥*
*आवत संग न, जात संगाती। कहा भए दल बांधे हाथी॥*
*कहै, कबीर, अंतकी बारी। हाथ झारि ज्यों चला जुगारी॥*

कुठला महाल? कुठली दारे? हंस उडून गेला म्हणजे सारी माती उरते. सोबत/कुणी येत नाही. आणि जातही नाही. मग कशासाठी हत्ती-घोडे आणि सैन्य उभे करायचे? कबीर म्हणतो, जुगारी जसा हात झटकून जातो, त्याप्रमाणे जायचे आहे. या काव्यपंक्तीतून संत कवीचा विरक्तिपूर्ण विचार प्रकट झाला आहे. महाल, वैभव, गजदल, सैन्यदल पुरुषार्थातून उत्पन्न होते; पण प्रारब्धाच्या

पुढे हे सारेच तुच्छ, नगण्य ठरते, असे सांगून काळ किंवा दैव हाच घटक अधिक समर्थ असतो, अशी भूमिका भर्तृहरीप्रमाणेच कबीर यांनीही घेतली आहे.

पण केवळ नशीब तेवढे एकमेव कारण मानून परमेश्वरालासुध्दा निर्वाह करता येणार नाही. विश्वाची रचना करण्याचा, नवनिर्मितीचा आणि जे जुनेपुराणे झाले असेल ते नष्ट करण्याचा अखंड उद्योग तो विश्वकर्मा युगानुयुगे करीत राहिला आहे. जे घडणार असेल ते घडेल, जे मोडणार असेल ते मोडेल, आपण जे जे होईल ते ते पहावे, अशी निष्क्रिय भूमिका प्रत्यक्ष परमेश्वरसुध्दा घेऊ शकत नाही. माणसाने ही भूमिका स्वीकारली, तर जीवनाची जीवनकळाच नष्ट होईल. फुलांचे निर्माल्य होते, या प्रारब्धाला भिऊन कळ्यांनी फुलू नये काय? फुलण्यात आणि फुलवण्यात कर्तृत्व आहे. पराक्रम आहे म्हणून तर दैववाद मान्य असणाऱ्या संतांनाही माणूस घडविण्याचा भगीरथ प्रयत्न केला. प्रारब्धाला परमेश्वर मानण्यापेक्षा आपल्यातल्या पराक्रमाला आणि निर्मितीशीलतेला परमेश्वर मानून 'हे राज्य व्हावे ही श्रींची इच्छा आहे' असे म्हणणारा राज्यनिर्माता मला वंदनीय वाटतो. कबीर म्हणतात:

'शूर हे नाव धारण केल्यावर भय कुठले? या रणांगणात धीराने व जिद्दीने उभा राहा आणि छातीवर बाण झेलून घे.' भगवद्गीता तरी वेगळे काय सांगते?

❖❖

# प्रार्थना

'प्रार्थना हे एक अनावश्यक कर्मकांड आहे. प्रार्थनेतून नेमके काय निष्पन्न होते?.....

भाबडेपणाने हात जोडून आणि डोळे मिटून चिंतन केल्यामुळे काही कर्तृत्व करून दाखवता येते असे वाटत नाही. प्रार्थनेला एक प्रकारची शरणागत मनोवृत्ती आवश्यक असते. ती आपल्या कर्तृत्वाला मारक ठरते. म्हणून एखाद्या देवताची, परमेश्वराची दीनवाणीने आळवणी करणे आणि त्याच्या कृपेवर अवलंबून राहणे मला मान्य नाही.'

एका विचारवंताने प्रार्थनेच्या संदर्भात असे विचार व्यक्त केले. स्वतःला बुध्दिनिष्ठ म्हणवणाऱ्या या विद्वानाने चुकीच्या दिशेने विचार करून हे विपरीत मतप्रदर्शन केले आहे. प्रार्थनेत शरणागतीची भावना अवश्य आहे. विश्वातल्या महनीय शक्तीपुढे विनम्र होण्यात काही कमीपणा आहे असे का मानायचे? माणूस कितीही शक्तिशाली बनला तरी निसर्गातल्या, विश्वातल्या विराट, अतिबलाढ्य शक्तीच्यापुढे तो क्षुद्रच मानाचा लागेल. पण क्षुद्रालाही बलवान बनवणारी प्रार्थना ही महानतेची उपासना करण्यासाठी प्रेरणा देणारी शक्ती आहे. यात संशय नाही.

*तत् सवितुर् वरेण्यं भर्गोदेवस्य धीमहि धियो यो नः प्रचोदयात्*

या गायत्री मंत्रातून आपल्या बुध्दीला प्रेरणा आणि गती मिळावी म्हणून अशी उत्कट प्रार्थना केली आहे. 'तेजोनिधी सूर्याला उद्देशून म्हटले आहे, 'सूर्यतेजाचे आम्ही ध्यान करू. 'भर्ग' हा शब्द उर्जावाचक आहे. सूर्याच्या दाहक तेजात ज्याप्रमाणे सारी अशुध्दता आणि अंधार यांचे दहन होते त्याप्रमाणे आमच्याही मनातल्या दुरिताचा अंधार व अपवित्रता भस्मसात् व्हावी आणि आमच्या जीवनाला निष्कलंक तेजस्वीपणा, लखलखीतपणा यावा अशी भावना त्यात तीव्र आहे. जे घडावे असे वाटते ते घडलेच पाहिजे अशी शुध्द मनाने इच्छा पुन्हा पुन्हा प्रकट करण्यामुळे मानसिक सामर्थ्य वाढते. प्रार्थनेतून

आत्मशक्तीला जाग येते. मनाच्या शुध्दीकरणाला प्रार्थनेतले विचार सहायक ठरतात. त्यातमुळेच मनुष्य या ना त्या स्वरूपात प्रार्थना करून प्रगतीचा मार्ग शोधीत असतो. प्रार्थनेचे शब्द लाचारीचे नसतात. त्यात नम्रता असते. मानची ऋजुता आणि प्रसन्नता यांचेही दर्शन होते.

*यो विश्वमि विपश्यति भवना संच पश्यति। सनःपर्षदति द्विषः*

जो विश्वाभिमुख होऊन चिंतन करतो, ध्यान करतो तो द्वेषभावनेच्या पलीकडे जाऊ शकतो. 'विपश्यना' याचा अर्थ विश्वाला दृष्टीसमोर ठेवून त्याचे मनन करीत राहणे. त्याचे कल्याण इच्छिणे. अशी प्रार्थना करणारा माणूस भेदभावनांच्या सीमा ओलांडीत असतो.

'ज्ञानेश्वरांचे पसायदान' ही एका शुध्दात्म्यातून प्रकट झालेली शुध्द आणि समर्थ वाणी आहे. या वाणीला व्यक्तिगत स्वार्थाचा लेशही लागलेला नाही. विश्वजीवनाशी संवाद साधून करुणा, प्रेम आणि मुदिता यांचे सिंचन करणारी ही प्रार्थना मानवी संस्कृतीचे भूषण आहे.

'माझ्या मनातून द्वेषमत्साराचे विषारी जंतू नाहीसे होवोत. मी नित्य 'वर्धमान' होत राहो. माझे ज्ञान आणि शक्ती समाजाच्या मंगलासाठी उपयुक्त होवो.' अशा प्रकारचा विचार दररोज काही क्षण जरी मनात उद्भवला तरी ही प्रार्थना आपल्याला निरामय आनंदाची प्राप्ती करून देऊ शकेल. संत नामदेवाने केलेल्या प्रार्थनेतले सात्त्विक सौंदर्य लक्षणीय आहे.

*आकल्प आयुष्य व्हावे तयां कुळा। माझिया सकळां हरिच्या दासां।*
*नामा म्हणे तयां असावे कल्याण। ज्या मुखी निधान पांडुरंग॥*

मनुष्याला उदात्ताच्या उंचीवर नेऊन जीवनाच्या सुगंधाचा अनुभव देणारी प्रार्थना आपल्या मुखी नित्य असावी, हीच प्रार्थना.

◈◈

# सद्बुध्दि थेकुटी म्हणो नये

बुध्दीचा सदुपयोग करणाऱ्यांपेक्षा तिचा विकारवश होऊन दुरुपयोग करणारे लोक जगात अधिक आहेत. मानवजातीच्या कल्याणासाठी शास्त्रीय शोध लावणाऱ्या व त्यासाठी आयुष्य खर्च करणाऱ्या शास्त्रज्ञांच्या प्रज्ञेला वंदन केले पाहिजे. आपले प्राण पणाला लावून कित्येकांनी भयानक रोगांवरची औषधे तयार केली. रुग्णांचे वेदनामय जीवन बदलून त्यांच्या मनात आनंदाचे आणि उत्साहाचे वारे त्यांनी खेळवले. हे देखील साधुसंतांच्याच पातळीवरचे सज्जन आहेत. रोगटपणा निरसून आरोग्याचे वातावरण निर्माण करण्यासाठी त्यांनी आपल्या ज्ञानाचा विनियोग केला नवनिर्मिती करणे हेच बुध्दिमत्तेचे महत्त्वपूर्ण कार्य आहे. पण कित्येक बुध्दिमान माणुसकीशी वैर करतात. संस्कृतीचा विध्वंस करण्यासाठी नवनवीन शस्त्रे शोधून काढतात. त्यांच्या बुध्दिप्रभावामुळे जगात दुःखवेदनेचे असंख्य चित्कार उमटतात. हजारो माणसे मृत्युमुखी पडतात. नीती आणि धर्म यांच्या विनाशाला कारणीभूत होणारी कुटिल बुध्दी हे जगावरचे भयानक संकट आहे. बुध्दीला नैतिकतेचा भरभक्कम पाया असावा, ही साधुसंतांची भूमिका या दृष्टीने योग्यच आहे. संतांना अभिप्रेत असलेली बुध्दी केवळ भौतिक स्वरूपाची नाही. त्यांना सत्वसुंदर, विवेकनिष्ठ अशी आध्यात्मिक स्वरूपाची बुध्दी स्वागतार्ह वाटते:

*जैसी दीपकळिका धाकुटी। परि बहु तेजाते प्रगटी।*
*तैसी सद्बुध्दि हे थेकुटी। म्हणो नये॥*
*पार्था बहुती परी। हे अपेक्षिजे विचारशूरी।*
*जे दुर्लभ चराचरी। सद्वासना॥*

संत ज्ञानेश्वरांनी सद्बुध्दीचा गौरव केला आहे. ज्याप्रमाणे दीपज्योत लहान असली तरी ती पुष्कळ प्रकाश देते, त्याप्रमाणे सद्बुध्दीला लहान समजू नये. विचारशील लोक दुर्लभ असलेल्या या सत्वबुध्दीची सतत इच्छा करतात. इतर वस्तू वाटेल तितक्या मिळतात, पण परीस मिळत नाही. किंवा अमृताचा

बिंदू सुदैवानेच लाभतो. त्याप्रमाणे परमात्म्याकडे आकृष्ट झालेली सद्बुध्दी दुर्मिळ आहे. ज्ञानेश्वरांच्या मते परमतत्त्वाचा शोध घेणारी बुध्दी हीच श्रेष्ठ बुध्दी होय. अविचाराकडे वळलेली बुध्दिमत्ता म्हणजे दुर्बुध्दीचे अथवा अज्ञानाचे स्पष्ट द्योतक आहे.

'अध्यात्मविद्या विद्यानाम्' सर्व ज्ञानात अध्यात्माचे ज्ञान परमोच्च कोटीचे आहे, हा निष्कर्ष सर्वच संतांनी काढला आहे. आज भौतिकतेचा प्रकर्ष झाल्यामुळे अध्यात्मज्ञान दुर्लक्षित झाले, पण माझ्या ज्ञानामुळे मी यथाशक्ती इतरांना संरक्षण देईन, इतरांची जीवने फुलवण्याचा माझ्या अल्पमतीप्रमाणे प्रयत्न करीन, असे म्हणणारा माणूस सद्बुध्दीची उपासानाच करीत असतो. गावातल्या झोपडपट्टीत जाऊन तेथील मुलामुलींना गोळा करून त्यांना नियमाने वर्षानुवर्षे शिकवणारा एक साधा गरीब शिक्षक माझ्या परिचयाचा आहे. तो पदवीधर नाही. कोणत्याही शास्त्राचा तो पंडित नाही. एका प्राथमिक शाळेत नोकरी करून उरलेल्या वेळात संध्याकाळी दोन-अडीच तास निरपेक्षपणे शिकवण्याचे काम तो करतो. या साध्या माणसाच्या ठायी माणुसकीची जी ज्योत तेवत आहे, तिलाच 'सद्बुध्दी' म्हणायला मला प्रत्यवाय वाटत नाही.

परवा एक 'वंदनीय, प्रातःस्मरणीय, ज्ञानसंपन्न' आचार्य आपल्या भक्तांना 'दर्शन आणि ज्ञान' देण्यासाठी आले होते. त्यांच्या पाद्यपूजेसाठी पाच हजार आणि बौद्धिकासाठी दहा हजार रुपये भक्तांनी त्यांना प्रेमाने दिले. झोपडपट्टीत जाऊन शिकवणारा तो सामान्य शिक्षक बुध्दीचा अधिक सदुपयोग करीत होता.

# आत्मलाभ हेच परमसुख

'शाकुंतल' नाटकातल्या एका भावोत्कट घटनेचा उल्लेख काव्यरसिक पुन्हापुन्हा करतात. शकुंतला सासरी जाण्यासाठी निघाली आहे. कण्व ऋषींची ती मानसकन्या आहे. कण्व हे अत्यंत ज्ञानसंपन्न, तपोवृध्द ऋषी आहेत. जीवनातल्या हर्ष-शोकांच्या प्रसंगाकडे स्थिर दृष्टीने पाहणारे ते तत्त्ववेत्ते आहेत. स्थितप्रज्ञ आहेत. पण तरीही जिला बालपणापासून वाढवले, जोपासले ती आपल्या तपोवनाचे चैतन्य असलेली शकुंतला आता आपल्याला पारखी होत आहे, हे पाहून कण्वांचेही हृदय दाटून आले. डोळ्यांत अश्रू उभे राहिले. त्यांच्या निष्कंप मनात शकुंतलेच्या वियोगाने अनेक आर्त कंपने निर्माण झाली. एखादे शांत सरोवर उचंबळून यावे त्याप्रमाणे त्या योग्याचे मन सैरभैर झाले. या घटनेचा अर्थ असा होतो, की श्रेष्ठ ज्ञानवंताला सुखदुःखांच्या वेढ्यात आपल्या मनाची तटस्थता टिकवता येत नाही. ज्ञानी मनुष्य हा देखील अखेर मनुष्यच असतो. गीतेच्या बाराव्या अध्यायात परमेश्वराच्या अनन्य भक्ताचे लक्षण पुढील श्लोकात सांगितले आहे:

*अनपेक्षः शुचिर्दक्षः उदासीनो गतव्यथः ।*
*सर्वारम्भपरित्यागी यो मद्भक्तः स मे प्रियः ॥*

ज्याला कशाचीच अपेक्षा नाही, जो शुचिमान तत्त्वदृष्टीचा, उदासीन, प्रापंचिक दुःखांपासून मुक्त, अहंकाररहित असा जो माझा भक्त आहे तो मला प्रिय आहे. हे श्रीकृष्णाचे वचन ऐकताना अर्जुनाला आनंद वाटला असेल. पण भक्ताची ही लक्षणे महनीय तपस्व्यालासुध्दा आत्मसात करणे कठीण आहे. आपली कन्या नसूनही कण्व ऋषींच्या मनात शकुंतलेविषयी अपार वात्सल्य होते. त्यांच्या सुखदुःखांचे ती कारण होती. कालिदासाने एका तपोधन संताच्या मनातील दुर्दम्य भावनावेग चित्रित करून कण्वाचे मानुषीकरण केले आहे. रामायणातही सीतेचे अपहारण झाल्यानंतर रामचंद्रासारख्या धीरवीर प्रेमिकाचा उत्कट शोक वाल्मिकीने वर्णिला आहे. राम हाही माणूसच होता. संसारात राहून

संसारातील इष्ट-अनिष्ट गोष्टींपासून संपूर्णपणे म्हणजे शंभर टक्के अलिप्त राहणे शक्य होत नाही. प्रज्ञावंत आणि संतसुध्दा भावनेच्या आहारी जाऊन मानसिक संतुलन गमावून बसतात. मनातली वादळे जिंकणे कठीण असते. म्हणूनच प्रपंचात उद्भवणारे शोकाचे, क्षोभाचे लाभहानीचे क्षण शांतपणे, चित्त विचलित होऊ न देता स्वीकारले पाहिजेत. हे तत्त्वज्ञान गीतेने सांगितले आहे.

काही प्रसंग अत्यंत अपवादात्मक असतात. अशा वेळी साधुसंतांच्या अथवा तत्त्वज्ञांच्या मनाचा तोल सुटू शकतो. संतुलन बिघडले, की अस्वस्थता आणि दु:ख यांचे चक्र फिरू लागते. ते निग्रहाने थांबवणे हेच ज्ञानाचे कर्तव्य ठरते. नाहीतर भावनेच्या, विकारांच्या तांडवात मनुष्याची सारखी फरफट होत राहते. आकाशात असलेले मेघ विरून जातात आणि पुन्हा आकाश स्वच्छ निळेभोर दिसू लागते त्याप्रमाणे आपले मन निर्विकल्प, निरुपाधिक, निष्कलंक ठेवले पाहिजे ही शिकवण सयुक्तिक आहे. मनोवृत्ती तटस्थ ठेवण्याचा प्रयत्न नित्य करीत राहणे आवश्यक आहे. हर्ष विषादाचे शेकडो क्षण दररोज आपल्यासमोर येऊन आपल्याला उत्तेजित करण्याची धडपड करीत असतात. समंजस मनुष्य तिकडे दुर्लक्ष करतो. त्या क्षणांचे तो लाड करीत नाही. त्यांची उपेक्षा करून आपल्या मनाची दारे तो बंद करतो. त्यामुळे आतली हवा प्रदूषित होत नाही. या बाह्य खेळापेक्षा आपण आपल्या आत्म्याच्या संगतीत आहोत, आपण आत्मलीन आहोत ही त्याची जाणीव वाढत जाते आणि विश्वात्म्याशी त्याचा संवाद सुरू होतो. ज्ञानेश्वर म्हणतात:

*जो आत्मलाभासारिखे। गोमटे काहीच न देखे।*
*म्हणोनि भोगविशेखे। हरिखेजेना॥*

योगी पुरुष निर्द्वंद्व वृत्तीचा बनतो. तो प्रपंचात फार काय आपल्या शरीरातही नसतो. आत्मप्राप्तीतच तो संतुष्ट असतो.

◈◈

# ‘मयूराच्या’ आर्त ‘केका’

संतकवी, पंडितकवी आणि शाहीरकवी असे जे कवींचे वर्गीकरण केले जाते, ते मला तरी कृत्रिम आणि वरवरचे वाटते. ज्ञानेश्वरांत संतत्व, कवित्व आणि पांडित्य हे तिन्ही प्रवाह परस्परांत इतके मिसळून गेले होते, की त्यांना संत कवी म्हणावे, की पंडित कवी म्हणून संबोधावे हाच प्रश्न आहे. प्रत्येक संत कवीत ग्रंथाध्ययनातून येणारे पांडित्य नसेल; पण त्याच्यात जीवनानुभवातून येणारी बुद्धिमत्ता, समजूतदारपणा निश्चितच होता. परमेश्वर सोवळाही नाही आणि ओवळाही नाही तो सर्व भेदांच्या पार आहे असे सांगून उसाचा वाकडेपणा रसात असूच शकत नाही हे विधान करणारा संत चोखामेळा पंडित नव्हता, असे म्हणता येईल काय? पुस्तकी पंडितालाही घोकंपट्टी करून जे कळत नाही ते ज्ञान अनुभवाचे चटके सोसून तुकोबा, कबीर यांनी मिळवले नव्हते काय? संतकवी हे पंडित कवीही होते आणि काही पंडितांत संतत्वाचा झराही झुळझुळत होता. आजदेखील असा पंडित भेटणे शक्य आहे, की जो संतपणाच्या भूमीवर विनम्रपणे उभा आहे. अध्यात्माची आणि वैराग्याची सावलीही ज्यांच्या अंगावर फारशी पडली नाही असे काही लावणीकार शाहीर आयुष्याच्या अखेरीला डफाऐवजी वीणा घेऊन विरक्तीची गीते गात होते. त्यावेळी त्यांची पाऊले संतत्वाचा मागोवा घेत होती.

आम्ही विवेचनाच्या सोयीसाठी काही समीकरणे मांडून ठेवतो.

पंडिती कवितेचा मुकुटमणी असा ज्यांचा उल्लेख होतो ते संतवृत्तीचे कवी मोरोपंत आयुष्याच्या अखेरीला भक्तीने चिंब भिजलेली ‘केकावली’ लिहितात. ते म्हणतातः

*कृतांतकटकामलध्वजजरा दिसो लागली; पुरःसरगदांसवे झगडता तनू भागली*

मोरोपंतांच्या या प्रसिध्द काव्यपंक्ती आहेत. म्हातारपण दिसू लागले आणि पुढे पुढे सरसावरणाऱ्या रोगांबरोबर झगडताना शरीर थकून गेले. अशा वेळी परमेश्वरी साह्यासाठी मयूराने हा टाहो फोडला आहे. सारीच ‘केकावली’

भावोत्कट आणि आर्तमय आहे. भक्त जेव्हा हृदयापासून परमेश्वरी शक्तीला साद घालतो, तेव्हा ती करुणोदात्त काव्यात परिणत झाल्याशिवाय राहत नाही. मोरोपंत हे मुळातच धर्मनिष्ठ आणि प्रतिभावंत होते. भावशून्य पांडित्याच्या मालिकेत या पंडिताला कुणीच बसवणे शक्य नाही. म्हतारपणाची छाया पडायला लागल्यावर सर्वार्थांनी सावध होणारे जे प्रज्ञावंत असतात त्यांत मोरोपंतांचा अंतर्भाव होतो.

'केकावली' हे भक्तीचे, अनुतापाचे, आत्मजागृतीचे, मनाचे उदात्तीकरण करणारे रसमयकाव्य आहे. मोरोपंतांच्या इतर काव्यात पांडित्याचा आविष्कार आहे, बुध्दीचा विलास आहे. शब्दालंकारांचा खेळ आहे पण 'केकावलीत' मात्र भक्ताच्या डोळ्यांत दाटून आलेल्या प्रामाणिक अश्रूंचा गंध आहे. मोरोपंतांच्या हृदयीची स्पंदने या काव्यात ऐकू येतात. हे काव्यासाठी काव्य नसून, जिवा शिवाच्या भेटीसाठी उचंबळून आलेले काव्योद्‌गार आहेत. केव्हा तरी माणसाला चिरंतनाची ओढ लागते. केव्हा तरी त्याला आपले कुणीच नाही, शरीरही आपले नाही, आपला जिवाचा सखा एकच आहे याची जाणीव होते. त्या तीव्र जाणीवेची आनंददायक वेदना 'केकावली'तून मुखरित झाली आहे. मोरोपंतांच्या प्रतिभेचे सुभग दर्शन 'केकावली' त होते. 'शरणागत' कवी म्हणतो:

*प्रभो! शरण आलियावरी न व्हा कधी वाकडे*
*म्हणोनि इतुकेचि हे स्वहितकृत्य जीवांकडे*
*प्रसाद करिता नसे पळ विलंब बापा! खरे,*
*घनांबु न पडे मुखी उघडिल्याविना पाखरे*

पांखराने चोच उघडल्याशिवाय त्याच्या तोंडी पावसाचे थेंब पडत नाहीत हे जाणून 'मयूराने' करुणामेघाची परमेश्वराची आर्त भावाने आळवणी केली आहे.

❖❖

# दिवस आणि रात्र

प्रकाश आणि अंधार, दिवस आणि रात्र ही प्रतीके अनेक वेळा तात्त्विक चर्चेत योजली जातात. ईश्वरी साक्षात्कार होणे म्हणजे दिवस उजाडणे, नवा प्रकाश दृष्टीसमोर पसरणे, असा केला जातो. साक्षात्कारासाठी तळमळत राहिलेल्या भक्ताला ती निराश अवस्था म्हणजे अंधारी रात्र वाटते. 'तमसो मा ज्योतिर्गमय' काळोखाकडून प्रकाशाकडे न्या. याचा अर्थ बध्दावस्थेतून मला मुक्त करा. 'दुरितांचे तिमिर जावो. विश्व स्वधर्मसूर्ये पाहो' यातही तिमिर आणि सूर्य या प्रतिमा अज्ञान व ज्ञान या अर्थाने योजलेल्या आहेत. अशा प्रतिमांतून अर्थ अधिक स्पष्ट आणि सुभग होतो. आध्यात्मिक तत्त्वज्ञानात तर या प्रतिमा पुन्हा पुन्हा भेटतात. भगवद्‌गीतेच्या दुसऱ्या अध्यायातला एक श्लोक या दृष्टीने लक्षणीय वाटतो. कमी शब्दांत व्यापक अर्थाची उत्कट योजना या श्लोकात झाली आहे. खरे तर 'गीता' हा ग्रंथच मर्यादित शब्दांतून अमर्याद भावार्थ प्रकट करणारा आहे:

*या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी।*
*यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः॥*

सर्व प्राणिमात्रांची जेव्हा रात्र असते तेव्हा संयमी म्हणजे ज्ञानी, तत्त्वचिंतक, इंद्रियांवर स्वामित्व मिळवलेला साधू पूर्णपणे जागा असतो. आणि सर्वांना जो दिवस वाटतो तो मात्र या तपस्व्याला रात्रीचा काळोख वाटतो. विचारांची अनेक प्रकाशमान वर्तुळे मनात निर्माण करणारा हा एक अर्थपूर्ण श्लोक आहे. सारे जग अज्ञानाच्या, मोहाच्या आणि वासनेच्या अंधारलेल्या रात्रीच्या बाहुपाशात गुरफटून गेलेले असते, तेव्हा स्थितप्रज्ञ असा संयमी मनुष्य आत्मजागृतीच्या उजेडात वावरत असतो. मोहलोभाच्या, क्षोभाच्या, दुःखवेदनेच्या अंधारलाटा त्याच्यापर्यंत पोचूच शकत नाहीत, तो झोपलेला नसल्यामुळे त्याला भ्रांतिष्ट स्वप्ने पडत नाहीत. जणू त्याचा आत्मा त्याला सदैव सांगत असतो, 'राजा, वैऱ्याची रात्र आहे जागा राहा.' सूर्याला अंधार कधीच भेटत नाही. तो पाहावा म्हटले

तरी पाहता येत नाही. त्याप्रमाणेच व्यापक जाणिवेचे प्रसन्न किरण घेऊन जीवनाची यात्रा करणारा हा प्रबोधनवादी यात्रिक रात्रीपासून दूर असतो. त्याचे वर्णन गीतेत केलेले आहेचः

*कामना अंतरातील सर्व सोडूनि जो स्वये।*
*आत्म्यांत चि असे तुष्ट तो स्थित-प्रज्ञ बोलिला॥*
*नसे दुःखांत उद्वेग, सुखाची लालसा नसे।*
*नसे तृष्णा भय क्रोध, तो स्थित-प्रज्ञ संयमी॥*

जो आपल्या आत्म्यातच संतुष्ट आहे, त्याला अंधाराचे पाश बांधून ठेवतील. हे कसे शक्य आहे? कारण तो अखंड प्रकाशयात्री आहे. साऱ्या जगाला अज्ञानामुळे जेव्हा लख्ख उजाडले असे वाटते, तेव्हा ती मोहमयी रात्र आहे याची जाणीव तो इतरांना करून देतो.

आजच्या जगात हिंसा आणि अत्याचार, अधर्म आणि अनीती, भ्रष्टाचार व सर्व प्रकारचा दुराचार दिवसाउजेडी होत आहे. प्रकाशात होणारे हे सारे प्रकार माणसांच्या डोक्यात घट्ट रुजून बसलेली जी अज्ञानाची रात्र आहे तिचेचे हे स्वरूप आहे. हा काळोख निरसून टाकला पाहिजे. काळोखाचा हा पडदा ज्ञानाचा एकच कोवळा किरण आला तरी पाहता पाहता वितळून जाऊ शकतो. पण माणसे मुर्दाड आहेत. अंधारात खुरडत राहण्यात आणि अंधाराचे वस्त्र परिधान करण्यात आनंद मानतात. त्यामुळे अंधारातून अधिक अंधाराकडे, खोल खोल काळोखाकडे त्यांचा प्रवास चालू आहे. या काळ्याकुट्ट वातावरणाचा भेद करण्यासाठी प्रकाशाची आराधना आवश्यक आहे. जीवनदृष्टीचा विकास, आपपर भावाचा लोप, हेच यथार्थ ज्ञान आहे. त्याची प्राप्ती होणे म्हणजे ज्याला रात्रीचा स्पर्शही होणार नाही, असा प्रकाशमान दिवस होय.

◈◈

# समूळ ग्रंथ पाहिल्याविण...

संतांच्या साहित्याकडे केवळ भाविकतेने, अंधश्रध्देने पाहू नये हे मत कुणीच अमान्य करणार नाही. त्यांनी लिहिलेले प्रत्येक अक्षर अंतिम सत्याचे द्योतक आहे आणि ते कोणी कालत्रयीही फिरवू शकणार नाही, हे असे काही भाबडे भक्त कदाचित समजत असतील. पण संत ही देखील माणसेच होती. आदराने व अलंकारिक अर्थाने ते परमेश्वराचेच अवतार होते असे म्हटले गेले. तरी सर्वसामान्य माणसाच्या वाट्याला येणारी सुखदुःखे संतांच्याही पदरात अपरिहार्यपणे पडली. आपल्या अनुभवांचा चिकित्सकपणे विचार करून श्रेष्ठ आदर्शांची उपासना करीत राहिलेल्या या तत्त्वजिज्ञासू साधूंनी लोककल्याणासाठी शक्य तितके लेखन केले. त्यात त्यांच्या प्रतिभेचे, तपस्येचे, व्यक्तित्वाचे आणि जीवनदृष्टीचे स्पष्ट प्रतिबिंब पडलेले आहे. संत कबीर तर लौकिकदृष्ट्या निरक्षर होते; पण अनुभवातून आणि चिंतनातून त्यांनी उच्च विचार प्रकट केले. ते म्हणतात:

*मैं कहता हौं आंखिन देखी, तून कहता कागजकी देखी।*
*मैं कहता सुरझावनहारी, तू राख्यौ उरझाई रे॥*

'मी जे प्रत्यक्ष पाहिले, अनुभवले ते सांगतो. तू पोथी पाहून बोलतोस. मी सुलभ आणि स्पष्ट बोलतो. तू मात्र क्लिष्ट शब्दांतून सांगतोस. तुझे-माझे दृष्टिकोनच भिन्न आहेत. प्रत्येक संत कबीरांप्रमाणे 'आत्मसंवाद' करतो. अनुभवाच्या वाणीतून बोलतो. पढीक पांडित्याशी या परखड वाणीचे जुळत नसेल. पण शब्द जेव्हा हृदयाच्या खोल कपारीतून अनुभवाचा आधार घेऊन आपल्या स्वभावाप्रमाणे प्रकट होतात तेव्हाच त्यांना साहित्याची जीवनकळा लाभते. हे मर्म लक्षात न घेणारे काही विद्वान आपल्या अहंकाराचे प्रदर्शन करताना म्हणतात,

'संतांच्या लेखनात नुसत्या भावड्या भक्तीचा नाद ऐकू येतो. ज्ञानेश्वर काय, नामदेव आणि तुकाराम काय किंवा कबीर आणि तुलसी काय, हे

विज्ञानंयुगाचे प्रतिनिधी नसून अज्ञान युगाचे साक्षीदार आहेत.'

आता या हास्यास्पद शेरेबाजीला काय म्हणावे? टीकाकारांनी एकाही संताचे साहित्य खऱ्या अर्थान वाचलेले नसते. चारदोन ओव्या, अभंगांपलीकडे त्यांना पुरेशी माहिती नसते. अशाच एका स्वयंमन्य टीकाकाराला मी विचारले, "तुकारामांची गाथा तुम्ही वाचली काय?" त्याने उत्तर दिले, "सहज थोडीशी चाळली. ते चारपाच हजार अभंग वाचायला वेळ कुणाला आहे? आठ-दहा अभंग वाचून कल्पना आली." या समीक्षकाच्या 'कल्पनाचातुर्याची' मलाही कल्पना आली.

समर्थ रामदासांनी पढतमूर्खाची अनेक लक्षणे बारकाईने टिपली आहेत. एक लक्षण असे आहे :

*समूळ ग्रंथ पाहिल्याविण। उगाच ठेवी जो दूषण।*
*गुण सांगता पाहे अवगुण। तो येक पढतमूर्ख॥*

असा पढतमूर्ख जन्मभर ग्रंथांच्या सहवासात राहिला, तरी त्याचा काय उपयोग आहे? श्रीखंडाच्या भांड्यात असलेली पळी दिवसभर तिथेच राहिली तरी तिला त्या पक्वान्नाची रुची समजू शकेल काय? संतांचे साहित्य वाचकाने आपल्या अनुभूतीच्या कसावर घासून घ्यावे. केवळ शब्दांचा अन्वय आणि अर्थ बुध्दीला कळला म्हणून रसानुभूती येतेच असे नव्हे. साहित्यातला रस चाखण्यात विचारभावनांच्या विशिष्ट उंचीवर जाण्याची क्षमता आवश्यक आहे. काळाच्या आणि परिस्थितीच्या ओघात कोणत्याही साहित्याचा काही भाग संदर्भहीन बनतो. संतांच्या काव्यातही असा विचार असू शकतो. पण चिरकालिक, महत्त्वपूर्ण विचारानुभव मांडून त्यांच्या माध्यमातून संतांनी जे आदर्श मानवतेला दिले, त्यांचा स्वीकार करताना आपल्या क्षुद्रपणाचे प्रदर्शन करू नये. संतांच्या काव्याला चिरंतनाचा स्पर्श झाल्यामुळे ते शतकानुशतके समर्थपणे उभे आहे.

*आता असो हा विचार। जगास आधार कवीश्वर।*
*तयांसी माझा नमस्कार। साष्टांगभावे॥*

# *तिघांचे तीन विचार*

नगरातल्या एका सुंदर गणिकेच्या मृत्यूची वार्ता ऐकून एक तरुण लक्ष्मीपुत्र खेद व्यक्त करून म्हणाला, "या तरुण सुंदरीसमवेत धुंद आनंदाचे काही क्षण साजरे करायचे म्हणून मी फार उत्सुक होतो. वाटेल तितके धन आणि सुवर्णालंकार मी तिला खुषीने बहाल करणार होतो, पण या कठोर काळपुरुषाने आमचे मीलन होऊ दिले नाही. तारुण्याच्या शिखरावर असताना या गणिकेला मरण्याची एवढी घाई का व्हावी? उरेरे! जे घडले ते वाईट घडले!"

नगरातील एका चोराने आपले दुःख व्यक्त करताना म्हटले, "अरेरे, वाईट घडले. हिच्याजवळ दागदागिने आणि पैसा भरपूर आहे. एक दिवस संधी साधून त्यावर डल्ला मारायचा आणि सुखानं आयुष्य कंठायचं, असं मी ठरवलं होतं. पण ही संधी कायमची हुकली. इतक्या लवकर तिला मरण यायला नको होतं."

या दोन्ही व्यक्तींचे दृष्टिकोन भिन्न असले तरी स्वार्थी होते. गणिकेच्या मृत्युमुळे आता आपण आपला स्वार्थ साधू शकत नाही, यामुळे ते अस्वस्थ बनले होते. तिच्याविषयी त्यांना आपुलकी किंवा प्रेम मुळीच वाटत नव्हते. माणसे बहुधा स्वार्थी दृष्टीतून विचार करतात. एखाद्या अंत्ययात्रेला जाताना सुध्दा आपण गेलो नाही तर ते बरे दिसणार नाही, म्हणून केवळ उपचार पाळण्यासाठी त्याला श्रध्दांजली वाहण्याचा अभिनय करतात. भक्तीच्या आणि सेवेच्या क्षेत्रातही 'अंतरीचा भाव वेगळाची' असतो. संत तुकोबा म्हणतात:

*मोले घातले रडाया। नाही आसुं आणि माया॥*
*तैसा भक्तिवाद काय। रंगबेगडीचा न्याय॥*
*वेठी धरिल्या दावी भाव। मागे पळायचा पाव॥*
*काजव्याच्या ज्योती। तुका म्हणे न लगे वाती॥*

डोळ्यांत अश्रू आणण्याचा सुध्दा अभिनय करता येतो. स्वार्थाला धक्का बसला म्हणून गणिकेच्या मरणाचा शोक चोराला आणि जाराला व्हावा, यात

आश्चर्य नाही. जगातल्या साऱ्या वस्तू आपल्याच सुखोपभोगासाठी आहेत, अशा अज्ञानमूलक भ्रमात काही माणसे वावरत असतात. पण निरपेक्ष भूमिकेतून जगाकडे निरोगी दृष्टीने पाहणारे काही सज्जन असू शकतात. एका सत्पुरुषाला गणिकेच्या मृत्यूची वार्ता कळल्यानंतर तो व्यथित होऊन म्हणाला,

"सर्वसमर्थ काळ केव्हा कुणाला गिळंकृत करील हे सांगता येत नाही. त्या गणिकेने आपल्या तारुण्याचे आणि सौंदर्याचे बाजारी मोल करायला नको होते. तिने आपले आयुष्य भगवंताच्या भक्तीत व्यतीत केले असते, तर तिच्या सौंदर्याला पावित्र्याची झळाळी आली असती. गोड गळा होता. गोड रूप होते. शरीर तरुण होते. धर्माचरणाला सारे अनुकूल घटक होते. पण माणसे पोटाच्या भूकेसाठी आत्मा गहाण टाकतात, ही दु:खाची गोष्ट आहे. ती गणिका हळूहळू ईश्वरचिंतनाकडे वळेल अशी लक्षणे दिसत होती. पण अकाल मृत्यूमुळे तिच्या आत्म्याचे, समग्र जीवनाचे फार नुकसान झाले."

त्या सज्जनाची ही प्रतिक्रिया इतरांपेक्षा अत्यंत वेगळी होती. गणिकेच्या अंतामुळे तिचेच कधीही भरून न येणारे नुकसान झाले. यामुळे तो सज्जन व्याकूळ झाला होता. ज्यांचा रस्ता चुकला आहे, त्यांचा तिरस्कार करण्यापेक्षा त्यांना योग्य त्या रस्त्याने घेऊन जाण्याची आपली नैतिक जबाबदारी आहे असे हा गृहस्थ मानीत होता. शरीरविक्रिय करून काही व्यक्तींना जगावे लागते. यात असे जगायला भाग पाडणाऱ्या लोकप्रवृत्तीचाही अपराध असतो, अशी त्याची वैचारिक भूमिका होती आणि ती यथायोग्यच वाटते. मानसिकदृष्ट्या भ्रष्ट झालेला समाज एखाद्या गणिकेपेक्षा अधिक अध:पतित आहे, अशीही त्यांची विचारसरणी होती. स्वच्छ निकोप दृष्टिकोनातून स्वत:कडे आणि जगाकडे पाहण्याची शक्ती प्राप्त होणे म्हणजेच अध्यात्मविद्या नव्हे काय? पण तिघांनी भिन्न भिन्न लोलकांतून पाहिले आणि भाष्य केले.

❖❖

# शरीराची गुलामगिरी

शरीर हे धर्माचे साधन आहे. सुखांचे माध्यम आहे. पण या शरीरावर मनाचे आणि बुध्दीचे नियंत्रण असले पाहिजे. इंद्रियरूपी घोडे भलत्याच दिशेने बेलगामपणे चौखूर उधळू नयेत म्हणून बुद्धीने त्यांचे सारथ्य केले पाहिजे. मनाच्या हातात या घोड्यांचे लगाम दृढपणे ठेवले पाहिजेत. ही धर्मशास्त्राची भूमिका कित्येकांना रुचत नाही. उपहासाने ते म्हणतात, 'कोणत्या तरी धार्मिक किंवा नैतिक कल्पनांच्या आहारी जाऊन शरीरावर अकुंश ठेवण्यापेक्षा शरीराची सर्व सुखे भरभरून घेतली, तरच आयुष्य सुखाचे होणार आहे. यथेच्छ खावे आणि प्यावे, जीवनाच्या अंगणात मनःपूत हुंदडावे, दोन्ही हातांनी आनंद आणि उन्माद लुटावा हे आमच्या जीवनाचे स्वातंत्र्यवादी तत्त्वज्ञान आहे. धर्माच्या आणि नीतीच्या बेड्या बंडखोरपणे तोडल्याशिवाय स्वैरसुखाच्या गगनात आपल्याला भरारी मारता येणार नाही.'

हे 'स्व-तंत्र' महान तत्त्वज्ञान अभिनिवेशाने मांडणाऱ्या, शरीरपरायणतेचा पुरस्कार करणाऱ्या विद्वानाला एका गंभीर आजारामुळे डॉक्टराकडे जावे लागले. डॉक्टरांनी तपासणी करून त्याला स्पष्ट शब्दात सांगितले, "खाण्यावर आणि पिण्यावर तुम्हाला अत्यंत कडकपणे बंधन ठेवावे लागेल. गोड पदार्थ, तळलेले-मसाल्याचे पदार्थ, अनेक प्रकारची पेये पूर्णपणे वर्ज्य करावी लागतील. इतर व्यसने सोडावी लागतील. नियमित व्यायाम घ्यावा लागेल. जागरण टाळायचे आहे. कोणाशीही बोलताना पित्तप्रकोप होऊ द्यायचा नाही. या साऱ्या गोष्टी करणार असाल, तर तुमच्या जीवनाची मी ग्वाही देऊन शकेन. शरीराचे अवास्तव लाड केल्याचा हा परिणाम आहे."

वैद्यकशास्त्र जे सांगते तेच धर्मशास्त्रांनी सांगितले आहे. भगवद्गीतेत याबाबतीत म्हटले आहेः

*युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु ।*
*युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा ॥*

ज्याचे खाणे आणि हिंडणे संतुलित आहे, जो सर्व कर्मे मोजूनमापून करतो, ज्याची निद्रा आणि जागरण परिमित आहे तो दुःखाचा नाश करणारा होतो. यालाच योग म्हणण्यास हरकत नाही. कारण कर्म करण्यातले कौशल्य म्हणजेच योग होय. मनुष्याने स्वतःला घडवले पाहिजे. आपल्यालाच प्रेरणा आणि गती दिली पाहिजे आणि आपल्यालाच त्याने सावरले पाहिजे. वेग नियंत्रित करण्याची शक्ती ज्या वाहनात नसेल ते वाहन नष्ट-भ्रष्ट झाल्याशिवाय राहील काय? पळण्यापूर्वीच कोठे थांबायचे आहे हे ठरले पाहिजे. पतंगाला किती ढील द्यायची आणि तो केव्हा खेचायचा याचे तंत्र अवगत नसणाऱ्यांचा पतंग गोते खात विनाशाच्या दरीत फाटलेल्या अवस्थेत जाऊन पडतो. संत ज्ञानेश्वरांनी अतिसेवन करणारा आणि मुळीच न सेवन करणारा अशा अतिरेकी लोकांवर टीका करताना म्हटले आहे, 'भूक-तहान अट्टाहासाने कोंडण्यात अर्थ नाही. हा योग नव्हे किंवा जिभेची आणि झोपेची गुलामगिरी पत्करणाराही योगी होऊ शकत नाही. शरीर ताब्यात ठेवता येत नसेल तर योग कसला?'

*म्हणोनि अतिशये विषयसेवा। तैसा विरोध न व्हावा॥*
*कां सर्वथा निरोधु करावा। हे ही नको॥*

आरोग्यसंपन्न जीवन आपण आपल्या इच्छेने आणि निग्रहाने जगू शकतो व त्यातून आनंदाची निर्मिती करू शकतो. शरीराचे आणि मनाचे आरोग्य प्रारब्धाच्या हाती आहे, हा समज खरा नाही. या जगात सुदृढ शरीरही कमवावे लागते. बुध्दी मिळवावी लागते. आपल्या आयुष्याची उभारणी आपल्यालाच करायची असते. शरीर आणि मन हे आपले मित्र आहेत. त्यांनी शत्रू होऊ नये यासाठी प्रेमाने का होईना, पण त्यांची गुलामगिरी माणसाने पत्करू नये. शरीरामागे फरफटत गेलेला माणूस पुन्हा परत येण्याची शक्यता कमी असते.

# कथा गोड विठ्ठलाची

"माझ्या देव्हाऱ्यातल्या मूर्तीची पूजा करताना माझे मन परम आनंदाने भरून येते. त्या मूर्तीला मी दररोज ताजी फुले वाहतो. समईची ज्योत देवघरात तेवत ठेवतो. सुगंधी उदबत्त्या पेटवतो. पाषाणाच्या प्रतिमेत मला तो विश्वात्मा दिसू शकतो. माझ्याही हृदयाच्या देव्हाऱ्यात त्याचे अधिष्ठान आहे. माझ्या भावनांची फुले मी त्याला वाहतो. शुभसंकल्पाचा नंदादीप तेथे तेवत ठेवतो. माझ्या प्राणशक्तीची उदबत्ती पेटवतो. मी सगुणोपासक आहे, तसाच निर्गुणोपासक आहे. सगुण भक्ती काय किंवा निर्गुणाची आराधना काय, ती विशुध्द आणि उत्कट असली म्हणजे सफल होते."

एका भक्ताने काढलेले हे उद्गार आपल्या विचाराला चालना देतात. प्रतिमापूजनाची कित्येक वेळा कुचेष्टा होते. पाषाणाची मूर्ती ही तर एखाद्या पाथरवटाने टाकीचे घाव घालून घडवलेली असते. ओबड धोबड प्रस्तर परमेश्वर कसा होऊ शकेल? या पाषाणमूर्तीसमोर धूप-दीप लावणे, फुले-फळे वाहणे, हे सारे अज्ञानाचेच प्रकार नव्हते काय? असे उपहासपर प्रश्न अनेक जण विचारतात. मूर्तीच्या ठायी ईश्वरत्व कल्पिण्यासाठी भक्तीचा आणि ज्ञानाचाही विकास व्हावा लागतो. एक सामान्य दगड म्हणून त्या मूर्तीची कोणी पूजा करीत नाही. मूर्तीत मूर्तिमंत परमेश्वर पाहण्यासाठी भक्ताच्या हृदयात आणि दृष्टिकोनात ईश्वरत्व जागे व्हावे लागते. एखादे चित्र किंवा मूर्ती हे प्रतीक असते. प्रतीकाकडून अर्थाच्या केंद्रबिंदूकडे रसिक भक्ताला जायचे असते. कवितेत प्रतीके येतात. ते प्रतीक म्हणजे काव्याचे सर्वस्व नव्हे. काव्यरसाची अनुभूती देण्यासाठी प्रतीक सहायक होते. मूर्तीपूजा हा भाबडेपणाचा प्रकार नाही. त्याच्या मागे एक व्यापक आणि उत्कट भावसंपन्न तात्त्विक दृष्टिकोन आहे, हे ज्याला कळते तो मूर्तिपूजेबद्दल अज्ञानी टीका करणार नाही. मूर्ती केवळ मंदिरातच नसते, ती भक्ताच्या मनातही असावी लागते आणि मनातले परब्रह्म पाषाणप्रतिमेत साकार झाल्याची खूण त्याला पटावी लागते. यातच भक्तीचे शब्दातीत सौंदर्य आहे. संत

निवृत्तीनाथांचा हा भक्तिरसात्मक अभंग पहावाः

*चंदनाचे झाड परिमळे वाड। त्याहूनि कथा गोड विठ्ठलाची ॥*
*पीरमळु सुमनी जाईजुई मोगरे। त्याहूनि साजिरे हरि आम्हां ॥*
*कल्पतरु इच्छेसि सागरु। त्याहूनि आगरु हरि माझा ॥*
*निवृत्ति सुवासु ब्रह्मीचा प्रकाशु। विठ्ठल रहिवाशी आम्हां पुरे ॥*

निवृत्तीनाथ हे तर ज्ञानेश्वरांचे गुरु, सगुण आणि निर्गुण या दोन्ही प्रकारच्या भक्तीची त्यांना यथार्थ कल्पना होती. ते म्हणतात, विठ्ठलाची कथा, त्याची प्रतिमा आम्हाला साजिरी, सुगंधी वाटते.

*'हरि एक पाहे विश्वरूपी। निवृत्तीने ब्रह्म देखिले परिपूर्ण ॥*

संत तुकोबांनीही म्हटले आहे, 'विश्वचैतन्यी पडता मिठी। झाली हरिरूप सृष्टी ॥ '

या भक्तांना एका लहानशा प्रतिमेत अपार परमेश्वर सामावला जात नाही याची कल्पना असते; पण बिंदूत सिंधू पाहण्याची शक्ती ज्ञानमय भक्तीच्या ठायी निर्माण होते. एखादा अज्ञानी भक्त केवळ मूर्तीतच ईश्वर आहे, असे मानून मूर्तिपूजा करीत असेल, तर त्याचा उपहास न करता हळूहळू त्याच्या समजुतीला वळण लावले पाहिजे. त्याच्या भक्तीला व्यापक जाणिवेचे अधिष्ठान दिले पाहिजे. एका खोचक टीकाकाराने माझ्याजवळ उद्गार काढले होते, "ज्याच्या हातात किरकोळ सत्ता आहे त्याच्यासमोर स्वार्थी माणसे कमरेपर्यंत वाकतात. काही तर लोटांगणही घालतात. सत्ताधीशाच्या घरातील श्वानासमोरही शेपूट हालवतात; पण विश्वाच्या सत्ताधीशासमोर नम्रतेने हात जोडणेसुध्दा त्यांना लज्जास्पद वाटते. याहून दुसरी लज्जास्पद गोष्ट कोणती?"

त्या परमेश्वराची अपेक्षा काय आहे?

*पै भक्ति एकी मी जाणे। तेथ साने थोर न म्हणे ॥*
*आम्ही भावाचे पाहुणे। भलतेया ॥*
*येर पत्र पुष्प फळ। ते भजावया मिस केवळ ॥*
*वांचुनि आमुचा लाग निष्फळ। भक्तितत्त्व ॥*

# आत्मा बंधू तो आपुला

'मी अत्यंत तृप्त आहे. समाधानी आहे. कोणत्याही प्रकारची आसक्ती माझ्या मनात उरलेली नाही. त्यामुळे शोक, निराशा, व्याकुळता यांचा प्रश्नच उद्भवत नाही. अप्रसन्नतेचा किंवा कटुतेचा स्पर्श जर कधी मनाला होऊ लागला, तर तो मी तत्परतेने बाजूला सारू शकतो. मनोमय आनंदाचा मी स्वामी आहे. आता मला 'अवघाचि संसार सुखाचा करीन। आनंदे भरीन तिन्ही लोक' असे उद्गार ज्ञानेश्वरांनी कसे काढले, हे समजते. त्यांच्या मनाच्या विस्तीर्ण प्रदेशात आनंदाचे वारे वाहत होते, समाधानाची हिरवळ उगवलेली होती. आत्मतृप्तीचा सुवास पसरला होता. त्यामुळेच ज्ञानेश्वर हे कृतार्थ जीवनाचे माहेरघर होते. मीसुध्दा त्या रस्त्याने जाण्याचा प्रयत्न करीत आहे. कोणतेही दुःख मला अस्वस्थ करू शकत नाही.'

एका साधुपुरुषाने आपल्या प्रवचनात हे सांगितले. या साधूच्या अंगावर पुरेशी वस्त्रे नव्हती. सकाळच्या थंडीत मोकळ्या आकाशाखाली बसून हा तपस्वी बोलत होता. श्रोत्यांच्या अंगावर नखशिखान्त गरम कपडे होते. त्यांवर उबदार शाली होत्या. या साधूला मात्र आत्मज्ञानाचे उबदार घोंगडे मिळालेले असल्यामुळे, वातावरणातली थंडी त्याला भासत नव्हती. त्याच्या शब्दांत प्रेमाची आणि बोधाची ऊब होती. हा माणूस खरोखरच निरामय आनंदाचा धनी झाला असावा, यात शंका नव्हती. प्रवचनानंतर मी त्यांना प्रश्न विचारला, "अनेक सुखसाधने असूनही, माणसे दुःखी होतात. आपल्यापाशी कोणतीच साधने नसूनही आपण आंनदी आहात, याचे रहस्य काय?"

त्यांनी मंदस्मित केले. ते म्हणाले,

"जी वस्तू जेथे नाही तेथे तिचा शोध केला, तर ती कधीतरी सापडेल काय? जेथे मुळातच सुख नाही, अशा बाह्य सृष्टीत तुम्ही सुख मिळवण्याची धडपड करीत आहात. संपत्ती म्हणजे सुख, हा तुमचा हिशेब आहे; पण खरोखरच द्रव्याच्या बळावर या जगात कधीकाळी कोणी चिरंतन सुख मिळवू

शकला, असे सिध्द करू शकाल काय?" आचार्य गुणभद्राचार्यांनी 'आत्मानुशासनात' म्हटले आहे:

*अर्थिनो धनमप्राप्य धनिनोप्यवितृप्तितः ।*
*कष्टं सर्वेपि सीदन्ति परमेको मुनिः सुखी ॥*

जे निर्धन आहेत ते द्रव्य मिळत नाही म्हणून, आणि जे धनवान आहेत ते अधिक द्रव्य मिळत नाही, म्हणून दुःखीच आहेत. खरे तर जगात सुखी कुणीच नाही. प्रत्येकाला बाह्य गोष्टीतूनच सुख मिळते, असे वाटत असते. जो अपेक्षाशून्य आहे, आणि आपल्या मनातच, आत्म्यातच आनंदाचा एक शाश्वत डोह आहे, हे ज्याला दिसते असा सम्यक् दृष्टीचा माणूस आनंदी राहू शकतो. सुख, आनंद आणि तृप्ती पराधीन नसून स्वाधीन आहे. हळूहळू माणसाने 'स्वाधीन', 'स्व-तंत्र', 'आत्मनिर्भर' व्हावे.

त्या तपस्व्याच्या प्रतिपादनात निश्चितच सत्य आहे. आम्ही सामान्य, संसारी, स्वार्थी, पोटभरू, मळखाऊ, अज्ञानी, कातडीबचावू माणसे सुखाचा शोध स्वतःच्या ठायी न करता, बाहेर कोणत्यातरी पदार्थात करीत बसतो, आणि हताश होतो. जे समाधान मिळते, ते किती तात्पुरते आणि क्षूद्र असते, याची चिकित्सा करण्याचीही बुध्दी आमच्यापाशी नसते. दुःख आणि निराशा यांची मूळे आपल्या अज्ञानातच आहेत.

*जिंकूनि घेतला आत्मा बंधू तो होय आपुला ।*
*सोडिला तो जरी स्वैर शत्रुत्व करितो स्वये ।*

आपल्या ठायी असलेल्या अनेक विकारांना जो संयमाने जिंकून, आत्म्याच्या आनंदाकडे आकृष्ट होतो, तो स्वतःचा मित्र आणि हितकर्ता असतो. जो विकारांच्याच आणि नानाप्रकारच्या वासनांच्या वेगवान प्रवाहात उडी घेतो, त्याला आनंद कोठून मिळणार?

# दुःखातून देवाकडे

एखादी जमीन विलक्षण सुपीक, निर्मितिप्रवण असते. तिच्यात पेरलेले बीज अंकुरल्याशिवाय राहत नाही. आपण काहीतरी निर्माण करावे. आपल्या कुशीत दडलेल्या बीजाला जीवनाची सत्त्वे पुरवावीत, त्याला जोपासावे आणि त्याचे एका विशाल वृक्षात रूपांतर करावे, असा ध्यास त्या जमिनीला लागलेला असतो. विकसित होण्याची स्वप्ने पाहणारी जमीन हे एक दैवी वरदान असते. पण ते मिळवण्यासाठी जमिनीलाही दीर्घ काळ तपश्चर्या करावी लागते. बहुसंख्य जमिनी मात्र नापीक, भरड असतात. त्यांत पेरलेली बीजे जळून जातात. कितीही नांगरली तरी अशा जमिनीत फारसे काही उगवत नाही. आपण काही उत्पन्न करावे, ही आसच तिच्या ठायी सहसा नसते. निष्क्रियतेच्या शिळपट सुखात ती पडून राहते.

माणसांच्या मनाची भूमीदेखील अशा दोन प्रकारांत विभागता येईल. एकदा न्यायालयात न्यायाधीशांसमोर एका अट्टल गुन्हेगाराला उभे करण्यात आले. बलात्कार आणि खून असे दोन आरोप त्याच्यावर ठेवलेले होते. न्यायाधीशांनी त्याला पाहिल्याबरोबर ओळखले. दरोडीखोरीच्या आरोपावरून आपणच त्याला पूर्वी तुरुंगात पाठवले होते, याची आठवण त्यांना झाली. त्यापूर्वीही काही गुन्हे करून तो दोन-तीन वेळा तुरुंगाच्या वाऱ्या करून आला होता. गुन्हेगारी प्रवृत्ती त्याच्या रक्तात जणू रुजली होती. न्यायाधीश मनात म्हणाले, 'या खडकाळ जमिनीत काहीच उगवणे शक्य नाही. वर्षानुवर्षे ही अशीच पडीक राहणार. केव्हातरी दैवायोगाने या जमिनीचा स्वभाव बदलू शकेल, पण परिवर्तनाची आच तिला स्वतःला असायला हवी. तीही तिच्यात आढळत नाही.'

काही थोड्या माणसांच्या मनाची भूमिका मात्र मृदू आणि संवेदनशील असते. ही माणसे चिंतनातून आणि दुःखाच्या अनुभवांतून फुलत जातात. उत्तरोत्तर वाढणाऱ्या झाडाप्रमाणे त्यांची जीवनसृष्टी विस्तारत जाते. 'नित्य नवा दिस जागृतीचा' ही अनुभूती त्यांना येते. प्रत्येक क्षण त्यांच्या दृष्टीने नवा

आणि मंगल असतो.

काही वर्षापूर्वी धर्मसाधना करणाऱ्या एका साधकाशी संवाद करताना मला जाणवले होते, की या साधकाच्या शब्दांना एक वेगळाच ताजा पण कोवळा सुगंध येतो. आता दहा वर्षे उलटल्यानंतर त्याच्याशी बोलताना तो सुवास अधिकच सांद्र आणि पक्क झाल्याची आनंददायक अनुभूती आली. शब्द तेच होते, व्यक्तीही तीच होती पण ते व्यक्तित्व अधिक शांत, संयत आणि सुविद्य झालेले दिसले. दहा वर्षांपूर्वीची त्याची मनोभूमी आता 'मऊ मेणाहुनी' बनली होती.

अनेक प्रकारची संकटे संसारात आली म्हणजे संसाराची दुःखमयता लक्षात येऊन काही माणसे वैराग्याच्या वाटेने ईश्वराचा शोध करीत जातात. ही माणसे अत्यंत संवेदनाशील असतात. कडक उन्हाने फूल कोमेजून जाते, पाषाण मात्र आहे तसाच राहतो. आपल्यावर आलेली आपत्ती म्हणजे परमेश्वराकडून आलेला जागृतीचा संदेश आहे असे त्यांना वाटते. संत तुकोबांनी दुष्काळाचे, आपल्या घरात मृत्यूने केलेल्या तांडवाचे; आर्थिक हानीचे स्वागतच केले आहे. ते म्हणतातः

*बरे जाले देवा निघाले दिवाळे। बरी या दुष्काळे पीडा केली॥*
*अनुतापे तुझे राहिले चिंतन। जाला हा वमन संवसार॥*
*बरे जाले देवा बाईल कर्कशा। बरी हे दुर्दशा जनामध्ये॥*
*बरे जाले जगी पावलो अपमान। बरे गेले धन ढोरे गुरे॥*

दुःख-विपत्तींमुळे भावनाशील मनुष्य अंतर्मुख होतो. त्याच्या आत्मचिंतनाला गती मिळते. परमेश्वराचा शोध आपल्या मनाच्या भूमीत आणि सभोवताली पसरलेल्या विश्वात तो घेऊ लागतो. कुंतीने श्रीकृष्णाकडे आपदा-विपदांचेच वरदान मागितले होते. कारण देवाची भेट दुःखाच्या माध्यमातूनच होते. दुःखामुळे मनाचे दार उघडे असते. देव तेथे सहज प्रवेश करू शकतो.

❖❖

# ज्ञान की भक्ती?

ज्ञानात सामर्थ्य असते, तर भक्ती सौंदर्याने फुललेली असते. ज्ञान उष्ण असते. भक्तीला मात्र चंद्रकिरणांची शीतलता बिलगलेली असते. ज्ञानातली रुक्षता भक्तीत नसते आणि भक्तीतली काव्यात्मकता ज्ञानात नसते; पण जेव्हा ज्ञान आणि भक्ती यांचा अपूर्व संगम जीवनात होतो, तेव्हा या जीवनवृक्षाला सुगंधी मोहोर येतो. फुले आणि फळे येतात. हा वृक्ष श्रांतांना सावली देतो, त्याचे हिरवे वैभव पाहून पथिक संतुष्ट होतात. ज्ञानाशिवाय भक्ती आणि भक्तीशिवाय ज्ञान ही अवस्था फारशी शोभादायक नाही. त्यांचे प्रमाण कमी-अधिक असेल; पण हे दोन्ही रंग आयुष्याच्या चित्रात नसतील, तर ते चित्र आकर्षक वाटणार नाही. मनुष्याने ज्ञानाची भक्तीने उपासना करावी आणि भक्तीला ज्ञानपूर्वक हृदयात स्थान द्यावे.

आपले जीवन या दोन्ही शक्तींनी संपन्न करणे, संतुलित करणे मात्र कठीण आहे. ज्ञानी भक्त होण्यासाठी तर अपरंपार कष्ट करावे लागतात. बिछान्यावर विश्रांती घेताना, सहजपणाने कधी कुणाला ज्ञानाची प्राप्ती झाली असे ऐकले नाही. अखंड चिंतन, निरीक्षण, अध्ययन आणि अनुभव यांच्या माध्यमांतून 'बुध्द' होता येते. जो 'वर्धमान' असतो, म्हणजे जो दररोज विकसित होत असतो, ज्याचे प्रत्येक पाऊल प्रगतीच्या दिशेने पडत असते. त्यालाच 'सन्मती' प्राप्त होते. परमात्मस्वरूपीची भक्ती वृध्दिंगत होते. आजची परिस्थिती अशी आहे, की माणसे अज्ञानी आणि अभक्त होत चालली आहेत. नुसत्या तंत्रज्ञानाला ज्ञान म्हणत नाहीत आणि नुसत्या मूर्तिपूजेला व तीर्थयात्रेला भक्ती म्हणत नाहीत. ज्ञानाची महात्मता गीतेने वर्णिली आहे:

*ज्ञानासमान नसे काही पवित्र दुसरे जगी।*
*योग-युक्त यथा-काळी ते पावे अंतरी स्वये॥*

हे ज्ञान श्रध्देने मिळवले म्हणजे भक्तीला उत्कटता आणि डोळसपणा येतो. सूक्ष्मपणे विचार करू लागलो, तर ज्ञान आणि भक्ती यांच्या सीमारेषा

परस्परांत मिसळून गेल्या आहेत, असेच दिसते. सारे विश्व एकच आहे आणि या चराचर विश्वातच-विश्वात्मक देव सामावलेला आहे, ही जाणीव ज्ञानातून फुलते आणि विश्वप्रेमाची ऊर्मी मनात उचंबळून येते. हा भक्तीचा प्रभाव आहे. ज्ञान की भक्ती हा वाद त्यामुळेच निरर्थक ठरतो. सुसंस्कृत, समर्थ, अर्थपूर्ण आणि भावनामय जीवन जगण्यासाठी ज्ञानभक्तीची मनुष्याला नितांत आवश्यकता आहे. संतांच्या व्यक्तित्वात या दोन्ही धारा मिळून वाहत असल्यामुळे, त्यांच्या शब्दात सामर्थ्य आले आहे. ज्या शब्दांना शुध्द विचारांची आणि प्रामाणिक भावनेची बैठक असते, तेच विचार साहित्यरूप होतात आणि त्यातून संस्कृतीचा विकास होतो. भक्तीच्या महतीविषयी तुकोबांचे म्हणणे असे:

*भक्तीचिया पोटी रत्नाचिया खाणी। ब्रम्हींची ठेवणी सकळ वस्तु॥*
*माउलीचे मागे बाळकांची हरी। एका सूत्रे दोरी ओढतसे॥*
*जेथील जे मागे ते रायासमोर। नाहीसे उत्तर येत नाही॥*
*भावारूढ तुका जाला एकाएकी। देव च लौकिकी आवघा केला॥*

भक्ती ही सुळावरची पोळी आहे असेही तुकोबांनी एका अभंगात म्हटले आहे. आपले सारे जीवन एखाद्या परम उद्दिष्टासाठी निरपेक्षपणे समर्पित करण्याची अतूट, अदम्य लाट जेव्हा रक्ताच्या प्रत्येक बिंदूतून अनावर उसळी घेते, तेव्हा ती भक्ती होते. श्रेष्ठ ज्ञान जसे दुर्मिळ, त्याप्रमाणेच श्रेष्ठ भक्तीही दुर्मिळच आहे. ज्ञानाचे आणि भक्तीचे प्रदर्शन मांडणारे गावोगावी असतात; पण ज्यांच्या ज्ञान-भक्तीसमोर आणि चारित्र्यासमोर भक्तीने माथा तुकवावा असे संतसज्जन कधीकधी भेटावेत, अशी इच्छा करण्यापलीकडे आपल्या हातात काय आहे?

*नसे ज्ञान नसे श्रध्दा संशयी नासला पुरा।*
*न हा लोक न तो लोक, न पावे सुख संशयी॥*

❖❖

# *रामभजनातले सुख*

ज्या अननुभूत, अपूर्व आनंदाची प्राप्ती आपल्याला झाली, तो आनंद जगापासून लपवून ठेवणे ही दुःखदायक गोष्ट आहे. दुःखवेदना मनात ठेवाव्यात; पण अतंरंगातल्या आनंदाच्या डोहाचे आनंदतरंग जगाच्या हृदयापर्यंत पोचवावेत. जितका आनंद वाटता येईल, तितका दोन्ही हातांनी भरभरून वाटला पाहिजे. प्रसन्नता, उत्साह, आनंद यांचे वितरण करीत राहणे, हाच आपला धर्म आहे असे संतांना वाटले. म्हणून आत्मस्वरूपीच्या अवर्णनीय आनंदाचे वर्णन करून, त्यात सर्वांनी सहभागी व्हावे म्हणून त्यांनी प्रयत्न केला. 'आनंदाचे आवारू मांडू जगा', 'आनंद भरीन तिन्ही लोक' हा आनंदघोष ज्ञानेश्वरांनी का केला? संतांचा हा आनंद क्षुद्र स्वरूपाचा मात्र नाही. परमतत्त्वाच्या साधनेतून आलेली आगळी अनुभूती त्यांनी दुःखवेदनेने भरलेल्या जगाला दिली. देण्यात आनंद आहे. स्वार्थमय भोगात तो सापडत नाही. तो रामभजनात आहे. तो दिव्य व्यक्तिमत्वाच्या स्मरणात आणि चिंतनात आहे. असा आनंद काळसुध्दा आपल्यापासून हिरावून नेऊ शकत नाही, हा विश्वास संतांच्या वाणीतून ओसंडून वाहताना दिसतो. कबीरांच्या या काव्यपंक्ती जितक्या सुगम, सुंदर तितक्याच उत्कट आणि प्रत्ययपूर्ण आहेत. एका अलौकिक तृप्तीच्या अनुभवातून ते म्हणतातः

*मन लागो मेरा यार फकीरी में।*
*जो सुख पायो रामभजन में, सो सुख नाहि अमीरी में।*
*भला बुरा सब को सुन ली जै, कर गुजरान गरीबी में।*
*प्रेमनगर में रहनि हमारी, भलि बनी आई सबुरी में।*
*हाथ में कूरी बगल में सोटा, चारो दिशि जागीरी में॥*
*आखिरी यह तन खाक मिलेगा, कहा फिरत मगरुरी में।*
*कहै कबीर सुनो भाई साधो, साहब मिले सबूरी में॥*

रामाच्या भजन-कीर्तनात जो आनंद आहे, तो वैभवसंपन्न जीवनातही कधी भेटणार नाही. रामचिंतनाच्या सान्निध्यात गरिबी सुध्दा अमिरीपेक्षा अधिक

समृध्द असेल. मला ही फकिरी मनापासून आवडते. प्रेमाच्या नगरात राहावे आणि रामाचे स्मरण भक्ती करीत साधेपणाने सबूरीने जगावे, हेच मला आवडते. भौतिक वैभवातल्या चार दिवसांत काय अर्थ आहे? या शरीराची अखेर मातीच होणार आहे ना? मगरुरीत परमेश्वर मिळत नाही. तो लीनतेनेच मिळतो, जे मिळाले असेल ते देऊन टाक. मिळालेले हरवण्यात काय अर्थ आहे? कबीरांची संपूर्ण कविता येथे दिली नाही. त्यांच्या शब्दांतला नितळ सच्चेपणा आपल्या मनाला भिडतो.

भौतिक समृध्दीचा माणसाच्या जीवनावर होणारा एक दुष्परिणाम गंभीरपणे लक्षात घेतला पाहिजे. भोग्य वस्तूंची, सुखसाधनांची अमाप चंगळ असणे, हेच सुखाचे लक्षण आहे, असे मानणारे लोक चुकीच्या वाटेने आनंद मिळवू इच्छितात. शरीरदृष्ट्या धष्टपुष्ट आणि तुष्ट असणे हाच आनंद आहे, असे म्हणायचे असेल, तर खाऊन उन्मत्त झालेल्या एखाद्या पोळात आणि माणसांत मग काय अंतर उरले? शरीराच्या पातळीवरचे जगणे ही जगण्याची अतिसामान्य अशी प्राथमिक पध्दती झाली.

कबीरासारख्या सुसंस्कृत, सुविचार संपन्न मनुष्याला उन्नत पातळीवरचे म्हणजे वैचारिक आणि मानसिक, फार काय, आत्मिक स्तरावरचे उच्च जीवन आणि त्यातले उत्कट सुख अभिप्रेत आहे. जीवनात प्रेम आले, भक्तीची पहाट फुलली. रामाच्या व्यक्तित्वातल्या चैतन्याचा स्पर्श झाला की मग चार दिवसांची क्षुल्लक अमिरी तुच्छ वाटते. फकिरीतला कलंदर आनंद मौलिक वाटतो. बाह्य श्रीमंती माणसाला अहंमन्य, उन्मत्त, स्वार्थकेंद्रित बनवते. आपल्यापलीकडचा विचारही तो करू शकत नाही. संत तुकोबाही म्हणतात:

*राम कहे सो मुख भला रे। बिन रामसे बीख।*

*रामनाम घेणारे मुख चांगले.*

रामनामाशिवाय मुखाला मोल नाही!

# ज्ञानियांचे अज्ञान

जीवनाच्या दुःखमूलकतेवर अनेक दार्शनिकांनी, साधुसंतानी, लेखक कवींनी स्पष्ट विचार व्यक्त केले आहेत. पर्वताएवढे दुःख असताना माणूस जवा इतक्या सुखाच्या अभिलाषेने धडपडत राहातो याबद्दल त्यांनी आश्चर्यही प्रकट केले आहे. भगवान बुध्द आणि भगवान महावीर यांनी साऱ्या जीवनालाच नाना प्रकारच्या दुःखवेदनेने कसा वेढा घातला आहे, हे विवरून सांगितले आहे. दुःखाला जिंकण्यासाठी व सुख मिळवण्यासाठी मनुष्य आमरण जे प्रयत्न करतो, ते बहुधा यशस्वी होत नाहीत, याचे कारण अज्ञान हेच आहे, असे प्रतिपादन या महापुरुषांनी केले आहे. आपण सहजपणे त्यांच्यावर दुःखवादी असा ठराविक शिक्का मारून मोकळे होतो; पण ते वैफल्यवादी नव्हते. दुःखदैन्याने व्यापलेल्या दयनीय अवस्थेतून प्रकृती बिघडली आहे, असे निदान केले तर ते निराशावादी दृष्टीमुळे नसून, वास्तवाचा शोध घेण्याच्या प्रवृत्तीमुळे केलेले असते. जीव आणि जगत यांचे स्वरूप निखळ वास्तवाच्या भूमिकेवरून स्पष्ट करणे, हे त्या तत्त्वज्ञांचे कर्तव्यच होते. कोणताही समंजस मनुष्य मानवी आयुष्याला बिलगून बसलेले दुःख दुर्लक्षित करू शकत नाही. आपल्यापरीने त्याचा विळखा कसा सोडवता येईल, याचाच तो विचार करील. भगवान महावीर म्हणतात,

*जाणिज्जइ चिन्तिज्जइ, जन्मजरामरणसंभवं दुक्खं ।*
*न य विसएसु, विरंज्जइ, अहो सुबध्दो कवडगंठी ॥*

हा जीव जन्म, वार्धक्य आणि मरण यांपासून होणाऱ्या दुःखाला जाणतो. विचारही करू शकतो; पण विषयांपासून मात्र विरक्त होत नाही. खरोखर मायेची, अज्ञानाची गाठ केवढी घट्ट असते, हेच यातून स्पष्ट होते. बुडत्याचा पाय खोलात म्हणतात, त्याप्रमाणे नाना प्रकारच्या वासनांच्या मागे धावत सुटलेल्या अज्ञानी माणसाला दुःख आपल्या पंजात सहज ओढून घेते. आग विझवण्यासाठी कोणीही सुबुध्द मनुष्य तेलाचा उपयोग करणार नाही. विकारवासनांच्या मगरमिठीत आपणहून गेलेल्या माणसाला सुख कसे मिळणार? हा साधा विचार बहुसंख्य

लोकांना पटत नाही.

एक बुरसटलेला पारंपारिक कालबाह्य विचार म्हणून त्याची आजच्या जगात कुचेष्टा होते. प्रत्यक्ष अनुभवाचे चटके बसू लागले म्हणजे या विचाराची सत्यता त्यांना पटते; तोपर्यंत फार उशीर झालेला असतो. दुःखाच्या रस्त्याने चालणाऱ्याला सुखाचा शोध कधीच लागणार नाही. म्हणूनच सारासार विचार करून काटेरी आयुष्याच्या वाटेवर मनुष्याने सावध पावले टाकावीत, हा संतविचार सर्वस्वी उचित आहे.

रुग्णालयात एका दुर्धर रोगाने तळमळत असलेला एक रोगी रडताना म्हणत होता, 'तारुण्याच्या मस्तीत आणि पैशाच्या धुंदीत सर्व वाकड्या वाटा मी चोखाळल्या. हितचिंतकाच्या उपदेशाची टवाळी केली. आता अखेरच्या क्षणात मला जाग आली आहे. मी माझ्या हातांनी माझ्याच जीवनाचा घात केला, ज्ञानाचा प्रकाश लवकर दिसला असता, तर आज सुखी झालो असतो.

संत कबीराने म्हटले आहे, 'पाण्यात राहून मासा तहानलेला राहतो हे ऐकून मला हसू येते. घरात वस्तू असून माणसे वनात फिरतात, त्याचा काय उपयोग?

*पानीबिच मीन पियासी। मोंहि सुनसुनआवे हांसी।*
*घरमे वस्तु नजर नहि आवत। बनबन फिरत उदासी।*
*आतम ज्ञानबिना जग झुठा। क्या मथुरा क्या कासी?*

आजच्या विज्ञानसंपन्न जगात राहणाऱ्या ज्ञानवंत माणसाची अशीच अवस्था झाली नाही का? आम्ही आकाशात उपग्रह सोडतो. चंद्रावर आरोहण करतो. सागराच्या तळाचा ठाव घेऊ शकतो; पण आमच्याच मनात आणि आयुष्यात बिळे करून बसलेल्या अधमवासनांच्या नागिणी आम्हाला ठेचता येत नाहीत. ज्ञानी माणसाचे हे अज्ञान केविलवाणे नव्हे काय?

# संभवामि युगे युगे

अन्यायाची परिसीमा झाली आणि न्याय कोठेच दिसेनासा झाला म्हणजे माणूस हतबल होतो. निराशेच्या भरात तो देवाला आणि दैवाला बोल लावतो. नाना प्रकारच्या अन्याय्य गोष्टींनी बुजबुजलेल्या जगाचा त्याला वीट येतो. या विश्वात सुसंगती नसून केवळ विसंगती, दुष्टपणा भ्रष्टाचार, दांभिकता आणि सर्व प्रकारची अनैतिकता असल्यामुळे हे जग सुंदर व मंगल आहे, हा विचार त्याला हास्यास्पद वाटू लागतो. सर्वसाधारण माणसालाच नव्हे, विचारवंतांनाही जीवनातल्या विकृतीकडे पाहून वैफल्य येत आहे. जीवनाभोवती अनेक भयानक आणि बीभत्स रूपांनी मरणाने वेढा घातलेला दिसतो. हिंसेचा आणि अत्याचारांचा कडेलोट झाला तरी त्या विश्वचालक भगवंताची निद्रा संपत नाही, याचे आश्चर्य वाटून एक सप्रवृत्त विचारवंत म्हणाले, भगवद्‌गीतेतले ईश्वरी आश्वासन केव्हा साकार होणार? का तो केवळ कल्पनेचा खेळ आहे? गीतेतल्या श्लोकाचा त्यांनी उल्लेख केला:

*परित्राणाय साधूनाम विनाशायच दुष्कृताम्*
*धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे*

सज्जनांचे रक्षण आणि दुर्जनांचे निर्दालन करण्यासाठी व धर्माला सुप्रतिष्ठित करण्यासाठी मी प्रत्येक युगात जन्म घेईन. अधर्माचा अजगर जेव्हा धर्माला घट्ट विळखा घालून गिळू लागतो तेव्हा त्या अजगराची खांडोळी करून धर्माचे आणि नीतीचे पुनरुज्जीवन करणे हे आपले कर्तव्य आहे, अशा आशयाचे उद्‌गार श्रीकृष्णाने काढले आहेत. कंसाने न्यायनीती पायदळी तुडवून अनीतीलाच सिंहासन दिले; पण कंसाच्या नरडीचा घोट घेणारी कृष्णशक्ती कंसाच्या कारागृहातच जन्माला आली. याचा अर्थ घनदाट अंधाराचे पोट फाडून नवनिर्मितीचा, नवजीवनाचा क्रांतिकारक प्रकाश जन्माला येतो. परमेश्वराने अवतार घेतला, असे या घटनेबद्दल बोलले जाते. गीतेमध्ये श्रीकृष्णाचे वचनच आहे:

*अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयास्थित:*

*अहमादिश्च मध्यच भूतानामन्त एवच*

हे अर्जुना, सर्व भूतांच्या अंतःकरणात असलेला आत्मा मीच आहे. मीच सर्व प्राणिमात्रांचा आदी, मध्य आणि अन्तही आहे. क्षयरहित काळ मी आहे आणि सर्व जगाला निर्माण करणारा विश्वमुखी पुरुष मी आहे. मी तेज आहे. मीच सिध्दी आहे. सर्वभूतांचे बीज मी आहे. मी हे सारे विश्व व्यापून उरलो आहे. श्रीकृष्णाच्या या सर्व वचनांचा अर्थ इतकाच, की ईश्वरी स्फुल्लिंग प्रत्येक अणुरेणूत आहे. पाण्याच्या प्रत्येक बिंदूत, मातीच्या प्रत्येक कणात, वायूच्या प्रत्येक कंपनात, प्रत्येक नादतरंगात, हृदयाच्या प्रत्येक स्पंदनात हे ईश्वरत्व जर भरून उरले आहे, तर जे जे दिसते ते ते सारेच ईश्वरी अवतारस्वरूपाचे आहे, असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. म्हणून संत तुकोबांना अनुभूती आली, की 'जेथे जातो तेथे देवा। तू माझा सांगाती। चालविसी हाती धरुनिया॥ '

ईश्वराला एखादा वेगळा अवतार घेण्याची तयारी करावी लागते, असे मला वाटत नाही. तो जर अस्तित्वातच आहे, तो जर चराचरांत सामावला आहे, दुधात साखर विरघळून जावी त्याप्रमाणे विश्वजीवनात तो जर समरसून गेला आहे तर कैलासावर किंवा क्षीरसागरात असलेला परमात्मा या मृत्युलोकात येऊन एक अवतार धारण करतो, असे परमार्थाने म्हणता येईल काय?

अलौकिक कर्तृत्व आणि पराक्रम यातून नवजीवनाची रचना करणाऱ्या महापुरुषाला परमेश्वरी अवतार असे आपण संबोधतो, ते सयुक्तिकच आहे. कारण असे महापुरुष जगाचा ढासळलेला तोल सावरून धरतात. आपल्या महाबलिष्ठ बाहूंनी अधर्माच्या आणि अनीतीच्या उताराकडे वेगाने झेपावत चाललेला समाजजीवनाचा रथ ते पुन्हा योग्य ठिकाणी स्थिर करतात. प्रत्येकाच्याच ठिकाणी या ईश्वरी शक्तीचा जो अंश आहे. तो कारणी लावला तर जीवन निरामय आणि सुंदर होऊ शकेल. अवताराची वाट पाहत निष्क्रियपणे बसणारा समाज नष्ट होतो. आपणच अवताराचे घटक आहोत या विश्वासाने आणि जिद्दीने अन्यायाविरुध्द लढले पाहिजे. 'माझे स्मरण कर आणि लढत रहा' हे कृष्णावतारातील वचन आहे.

# साहित्य असे असावे

साहित्याचे स्वरूप कसे असावे, त्याचे नेमके उद्दिष्ट काय असावे, या प्रश्नांची चर्चा आजपर्यंत अनेकविध दृष्टिकोनांतून झाली आहे. साहित्याने आनंद द्यावा हे मतं सर्वमान्य असले, तरी आनंदाच्या प्रत्येकाच्या कल्पना भिन्न भिन्न आणि परस्पविरोधी असू शकतात. कोणाला केवळ खून आणि रक्तपाताच्या कथा आवडतात. कोणी व्यभिचारकथा वाचण्यातच रस घेतो. वासना विकारांचे अतिरेकी व घाणेरडे प्रदर्शन ज्यात आहे, अशी पुस्तके विशेष आवडीने वाचणारे कित्येक वाचक आहेत. यातून आनंद घेण्याची त्यांची मनोवृत्ती रोगट मानावी लागेल. साहित्यात जीवनातल्या सर्व रसांचा सुभग आविष्कार जरूर व्हावा. मानवी जीविताच्या सर्व अंगांचे आणि रंगांचे रुचिर पण संयमित दर्शन साहित्यातून घडावे, याबद्दल वाद नाही. पण भडक वासनेच्या रंगाने बरबटून निघालेल्या कथा, कादंबऱ्या वाचण्याचे व्यसन मनुष्याला जीवनसौंदर्याचा, पावित्र्याचा, सोज्वळ भावनांचा आस्वाद घ्यायला प्रतिबंध करतात. चित्रपटात ज्याप्रमाणे गुन्हेगारी, हिंसक घटना आणि लैंगिक अत्याचार यांची गर्दी असते, तशीच अवस्था साहित्याची होऊ लागली, तर ती एक शोकांतिका ठरेल. कित्येक शतकांपूर्वी 'महापुराण'कर्ते आचार्य जिनसेन यांनी कवितेसंबंधी म्हटले आहेः

*पुण्यानुबन्धिनी या स्यात् कविता सैव शस्यते।*
*शेषा पापास्त्रवायैव सुप्रयुक्तापि जायते॥*

जी पुण्यबंधाला कारण आहे तीच कविता - साहित्य प्रशंसनीय आहे. अन्य प्रकारची कविता सुरचित असून सुध्दा पापबंधाला कारणीभूत होते. आचार्यांचे हे विधान आता जुने झाले, असे आधुनिक विद्वान म्हणू शकतील. संत ज्ञानेश्वरांनीही 'कवित्वाला परतत्त्वाचा स्पर्श असावा' तरच हे कवित्व उन्नत ठरते, असे म्हटले हे सयुक्तिकच आहे.

आपल्या साऱ्या जीवन व्यवहाराला उदात्त मूल्यांचे अधिष्ठान असावे, हा विचार सौंदर्याला पोषकच आहे. कवित्व सुंदर असावे, मोहक असावे, त्याने

रसिकांच्या मनात सुंदर विचार भावनांची मधुर कंपने निर्माण करावीत, ते शृंगाराला आणि वीराला पोषक असावे, पराक्रमाची व पौरुषाची न्यायोचित ध्वजा फडकविण्यासाठी कवित्वाने प्रवृत्त करावे, त्यात प्रवृत्तीचाही गंध असावा आणि निवृत्तीचाही सूर ऐकू यावा. अशीच कविता श्रेष्ठ प्रतिभावंतांनी लिहिली. साधुसंतांनीही अशाच साहित्याचा पुरस्कार केला. श्रीशारदेचे स्तवन करताना समर्थ रामदासांच्या अर्थपूर्ण शब्दांची आठवण होते. शारदा म्हणजे साहित्य - सारस्वत ते निर्माण करणारी शक्ती. समर्थांनी या शक्तीला 'महापुरुषाची भार्या' असे सार्थपणे म्हटले आहे.

*जे महापुरुषाची भार्या। अति सलग्न अवस्था तुर्या॥*
*जयेकरिता महत्कार्या। प्रवर्तले साधु॥*
*जे महंतांची शांती। जे ईश्वराची निजशक्ती॥*
*जे ज्ञानियांची विरक्ती। नैराश्यशोभा॥*

संत-महंतांच्या अंतःकरणातील प्रेमशक्तीचा सहजाविष्कार करून जीवनाला प्रीतीच्या आणि भक्तीच्या उंच पातळीवर नेण्याचे कार्य ही सरस्वती करते. सरस्वतीचा कृपाप्रसाद लाभलेल्या प्रतिभावंतांनी माणसांच्या घृणास्पद विकारांची केवळ चित्रे रंगविण्यात गर्क होऊ नये. विकारातून विवेकाकडे, दुर्गंधातून सुगंधाकडे आणि अंधारातून प्रकाशाकडे घेऊन जाणारे शुभंकर साहित्य निर्माण व्हावे. आदिकवी वाल्मीकी आणि महाकवी व्यास यांच्या प्रतिभेने साधुत्वाचा, वीरत्वाचा सत्कार केला. दुष्टत्वाचा व क्षुद्रत्वाचा धिक्कार केला. उदात्ताला नमन करावे आणि क्षुद्रतम नीचतेला निरसून टाकण्यासाठी शब्दसामर्थ्याचा विनियोग करावा, अशीच अपेक्षा साहित्याकडून करण्यात येते.

म्हणूनच ज्ञानेश्वरांनी सरस्वतीला 'अभिनव वाग्विलासिनी' व 'चातुर्यकलाकामिनी' म्हटले. रामदासांनी तिला 'लावण्यस्वरूपाची शोभा ' व 'परब्रह्मसूर्याची प्रभा' असे म्हणून गौरविले आहे.

# *दुष्टत्वाची कात गळावी*

माणसे जशी असतात, तशी दिसत नाहीत आणि जशी दिसतात, तशी असत नाहीत. हा चमत्कारच नव्हे काय? पण हे विधान सज्जनांच्या बाबतीत खरे नाही. सुजनता हाच ज्यांचा स्वभाव त्यांच्या मुद्रेवरही सात्विकतेचेच दर्शन होते. अंतरंग आणि बहिरंग सारखेच असते. 'अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी' असे असल्यामुळे मुद्दाम काही लपवून ठेवावे, असे त्यांना वाटत नाही. स्वच्छ पाण्याच्या डोहाचा तळ स्पष्ट दिसतो त्याप्रमाणे सज्जनांचे मन असते. सारेच लोक असे असते, तर जगात कधी कुणाची फसवणूक झाली नसती. पण हिरवळीतच काटे असतात. सुगंधी चंदनालाच विषारी भुजंगाने कवटाळलेले असते. सुवासाच्या ओढीने येणाऱ्या प्राण्याला दंश करणे त्यामुळे त्याला सुलभ होते. दुर्जनांच्या कुटिल बुध्दीचे वर्णन संत कबीरांनी केले आहे. ते म्हणतातः

*चंदन सर्प लपेटिया, चंदन काह कराय?*
*रोम रोम विश भीनिया अमृत कहां समाय?*
*चाल बगुलकी चलत है, बहुरि कहावै हंस*
*ते मुक्ता कैसे चुगै? परै कालके फंस!*

सर्पाच्या विळख्याला चंदन काय करील? रोमरोमांत विष भिनल्यावर अमृताला कसे सामावून घेणार? बगळ्याची चाल असणारा स्वतःला हंस म्हणवतो. तो मोत्यांचे सेवन करणार नाही, दंशच करील. दुष्ट प्रवृत्तीचे हे विश्लेषण मार्मिक आहे, यात शंकाच नाही. सज्जनांनी आपला धर्म सोडू नये हे खरे, पण कोळशाचा रंग बदलण्याच्या प्रयत्नात निष्कारण काळाचा अपव्यय करू नये. याचा अर्थ दुर्जनाच्या हृदयात परिवर्तनाचे बीज कल्पांतीही अंकुरणार नाही असे नव्हे.

अधमांना, पातक्यांना भविष्यकाल असतो. आज असलेला दुर्भेद्य खडक कालांतराने लोण्यासारखा मऊ होऊ शकतो, पण कठोरतेकडून कोमलतेकडे जाण्याची क्षीण का होईना एक जिवंत उर्मी त्या खडकाच्या पोटात असली

पाहिजे. केव्हातरी जडमूढ शिळेतून जिवंत अहिल्या अवतीर्ण होऊ शकते. मात्र, तिला रामाचा संजीवक हस्तस्पर्श लाभला पाहिजे. त्या अमृतस्पर्शाची प्रतीक्षा करण्याची आशावादी वृत्ती शिलाखंडातही जागी असावी लागते. नाहीतर बगळ्याचे रूपांतर राजहंसात होऊ शकत नाही. कोळशाचा रंग पालटत नाही. अंधारातून पहाट उदयाला येत नाही. वासनाविकारांच्या पिंजऱ्यात अडकून पडलेल्या पोपटाला मुक्तीचे स्वप्न पडत नसेल, तर पिंजरा हे वास्तव त्याला युगानुयुगे स्वीकारल्याशिवाय गत्यंतर नाही. ज्या सतारीच्या तारा एखाद्या कोपऱ्यात धूळ खात पडलेल्या असतात त्यांना आपल्या ठायी असलेल्या नादब्रह्माची जाणीव तरी कशी होणार? दुष्टप्रवृत्तीचे लोक मूक अंधारासारखे, जड कोळशासारखे आणि अज्ञानी पोपटासारखे किंवा निर्विकार पाषाणासारखे असतात.

दुष्टत्व हे अज्ञानाचे, मोहाचे, अहंकाराचे, दुराराध्य रूप आहे. दुष्टांनाही आपण कित्येक वेळां बुध्दिमान, धूर्त, कुटिल बुध्दीचे म्हणतो. पण कुटिल बुध्दी हेही अज्ञानाचेच लक्षण आहे. कारण असा मनुष्य अनेकांना फसवतो. सत्तेसाठी व संपत्तीसाठी कित्येक वाकड्या वाटांचा शोध करतो. काही दिवस तो लौकिक अर्थाने यशस्वी होतो. कीर्ती आणि प्रतिष्ठा त्याला लाभू शकते. पण दुर्जनांच्या अतःकरणातही अंशरूपाने असलेली परमेश्वरी शक्ती त्याला केव्हातरी असा कडकडून दंश करते, की त्याची दीर्घकाळची अज्ञानी झोप उडून जाते आणि आपले सारे समाधान तो हरवून बसतो. कित्येक वेळा अखेरच्या दिवसांत अथवा अंतिम क्षणी तो जागा होतो आणि आपले सारे आयुष्याचे हिशेब चुकलेले आहेत, फसलेले आहेत याचे भान त्याला येते. कबीर म्हणतातः

*ते दिन गये अकारथी! संगीत भई न संत!*
*प्रेमबिना पशु जीवना! भक्तिबिना भगवंत!*

अरे! ते दिवस व्यर्थ गेले. संतांचा सहवास मिळवला नाही. भक्तीशिवाय भगवंत भेटला नाही. प्रेमाशिवाय पशूचे जिणे जगलो. हा विचार उद्‌भवला, की दुष्टत्वाची कात गळून पडते.

# भक्ती आणि मुक्ती

एक चिंतनशील वृत्तीचे सज्जन गृहस्थ चर्चा करताना मला म्हणाले, मी हा प्रपंच करण्यातला आनंद मनापासून घेतला आहे. प्रपंचातले सुख पूर्णपणे निरर्थक आहे, असे मला वाटत नाही. ज्याच्या मनात कर्तव्यनिष्ठा आहे, नैतिक तत्त्वांविषयी आस्था आहे आणि आपल्या कौटुंबिक जीवनाच्या पलीकडे व्यापक दृष्टीने पाहण्याची उदार वृत्ती आहे, त्याला सुखसमाधानाने प्रपंच करता येतो आणि ऐहिक जीवनातच मुक्तीलाही स्पर्श करता येतो असे मला वाटते.

समुद्राच्या पोटात क्रूर जलचरे आहेत, लचके तोडणाऱ्या मगरी आणि प्रचंड मासे आहेत हे खरे आहे; पण तेवढ्यामुळे हा समुद्र म्हणजे दु:खाचे आणि मृत्यूचे, कुरूपतेचे माहेरघर आहे, असे विधान करणे कितपत योग्य आहे? सागराची विशालता, त्याच्यावरील लाटांचे कधीही न थांबवणारे नर्तन, त्याची गंभीरता, त्याला येणारी भरती आणि ओहोटी, त्याची भिन्न भिन्न रूपे हे सारे विशेष आनंददायक नाहीत काय? किनाऱ्यावर उभे राहून त्याची क्रीडा पाहण्यातला आनंद रसिकतेला घेता येतो. लाटांबरोबर खेळता येते, पण फार खोल पाण्यात तुम्ही उतरलात की मग मात्र अपघात होण्याची निश्चित भीती असते. या संसारसागराचेही असेच आहे. प्रपंचाला दूषणे देत बसण्यापेक्षा प्रपंचाचा रसिकतेने आणि तरीही तटस्थतेने सुखास्वाद घ्यावा आणि प्रपंचातच मोक्षाच्या वातावरणात विहार करण्याचा आनंद मिळवावा, हे माझे जीवनविषयक तत्त्वज्ञान आहे.

त्या मर्मज्ञ रसिकाच्या तात्त्विक विचारात जे तथ्य होते, ते सर्वसाधारण माणसाच्या लक्षात येत नाही. अधाशीपणाने आणि अट्टाहासाने प्रापंचिक सुखे किंवा खरे तर कोणतीच सुखे मिळविता येत नाहीत. मुक्तीसाठी घरादारावर लाथ मारावी, सारे प्रेमाचे धागे तटातट तोडून टाकावेत आणि एखाद्या गुहेत बसून मुक्तीची आराधना करावी, हे कित्येक भक्तांना पटत नाही. प्रपंचात राहूनच भक्ती आणि प्रेम यांच्या हिंदोळ्यांवर झोके घेत मुक्तीचा परम आनंद आपण घेऊ शकतो, असे त्यांना वाटते. संत जनाबाईची ही मुक्तीविषयक दृष्टी

सुंदर आहे.

*पंढरी सांडोनी जाती वाराणसी। काय सुख त्यांसी आहे तेथे ॥*
*तया पंचक्रोसी म्हणती मरावे। मरोनियां व्हावे जीवनमुक्त ॥*
*नको गा विठोबा मज धाडू काशी। सांगेन तुजपाशी ऐक आता ॥*
*ती ही मुक्ति माझी खेळे पंढरीसी। लागता पायांसी संतांचिया ॥*
*ऐसिये पंढरी पहाती शिखरी। आणि भीमातीरी मोक्ष आला ॥*
*जनी म्हणे तुज रखुमाईची आण। जरी मज क्षण विसंबसी ॥*

वाराणसीला जाऊन गंगा नदीत देहार्पण केल्यामुळे मुक्ती मिळते किंवा त्या तीर्थक्षेत्रात मृत्यू येणे परमभाग्याचे मानले जाते. मोक्षप्राप्तीसाठी असा देहत्याग करणे कित्येकांना संमत नाही.

तुकोबांनी म्हटले आहे, 'नाही देवापाशी मोक्षाचे गाठोडे। आणुनि निराळे द्यावे हाती ॥' मुक्ती किंवा मोक्ष ही श्रेष्ठ भक्ताला इहलोकातच प्राप्त होणारी एक परमसुखाची अवस्था आहे. मोक्ष नावाची एखादी वसाहत नाही किंवा तुकोबा म्हणतात त्याप्रमाणे 'एखादे निराळे गाठाडे' नाही. आपल्या मनातली सारी अशांती, अस्वस्थता, साऱ्या क्षुद्र वासना विवेकाने आणि संयमाने क्षीण करीत करीत त्या निरसून टाकणे हीच मुक्ती, हाच खरा मोक्ष. 'भक्तिभाग्यप्रेमा साधीन पुरुषार्थ ब्रह्मीचा जो अर्थ निज ठेवा'

नानाप्रकारच्या कर्मकांडातून व तीर्थयात्रांतून मुक्तीचे फळ पदरात पडत नसून ते श्रेष्ठ भक्ताच्या मनोभूमीत वाढणाऱ्या आनंदवृक्षाला लागते आणि त्याची अवीट मधुर रुची साऱ्या जीवितात पसरते. मुक्ती परलोकात आहे आणि ती मरणोत्तर लाभू शकते. हा विचार भक्तिमार्गी आणि ज्ञानमार्गी संतांच्या साहित्यात सापडत नाही. मुक्तीपेक्षा भक्तीतच महान आनंद आहे, विलक्षण तृप्ती आहे, अशी संतांची अनुभूती आहे. कबीर म्हणतात,

*भुक्ती, मुक्ति मांगौ नहीं, भक्तिदान से मोही और कोई याचौ नाही, याचौ तोहि*

# माझ्याहून कोणी लहान नाही

नाना प्रकारच्या कृत्रिम भेदांनी माणसांची मने पोखरून निघाली आहेत. सर्व क्षेत्रांत पक्षपात, भेदभाव आणि अन्याय उजळ माथ्याने वावरताना दिसतो. मनुष्याच्या वास्तविक योग्यतेला हजारो वर्षांपासून डावलले गेले याची साक्ष इतिहास मान खाली घालून देत आहे. आत्मतत्त्व सर्वत्र समान आहे. प्रत्येक जीवात ईश्वरच सामावलेला आहे, असे प्रवचनातून सांगणारे धर्ममार्तंड प्रत्यक्ष आचारात मात्र उच्चनीय भाव पाळताना दिसतात.

एका तथाकथित धर्माचार्याने तर असा भ्रामक युक्तिवाद केला, की 'जन्माने काही माणसे श्रेष्ठ असतात आणि काही माणसे क्षुद्र असतात. या क्षुद्र लोकांना उच्च माणसांच्या संगतीत स्थान कसे देता येईल? आंब्याचे झाड आणि बाभळीचे झुडुप यांच्यात काही फरक कराल की नाही? परमेश्वरानेच फरक केला आहे, तो आपण नाहीसा करण्याचा प्रयत्न करणे ईश्वरी इच्छेला विरोध करण्यासारखे आहे' विषमतेचे असले हास्यास्पद केविलवाणे समर्थन अहंकाराच्या व अज्ञानाच्या पोटी केले जाते हे काही नवीन नाही. ईश्वर जर विषमतेचा पुरस्कर्ता असेल तर तो ईश्वरच नव्हे. तो मग अधर्माचा, अन्यायाचा, पक्षपाताचा समर्थक ठरेल. नाव परमेश्वराचे घ्यायचे आणि अन्यायाची कृती माणसानेच कुटिलपणे करायची, असा हा प्रकार आहे. ईश्वर हे न्याय, प्रेम, सौंदर्य, सामर्थ्य, मांगल्य यांचे प्रतीक आहे.

*समानी व आकूतिः समाना हृदयानि वः समानमस्तु वो मनः यथा वः सुसहासति ॥*

आपली भावना समान असावी. आपले संकल्प एकच असावेत, आपली हृदये समान म्हणजे एकच असावीत. ही सारी एकत्वाची, एकात्मतेची, एकत्रित असण्याची, एकरस होऊन जाण्याची शिकवण आहे. पण एकत्वाचे हे स्वप्न दुर्दैवाने साकार होऊ शकले नाही. माणसाने माणसांची कृत्रिम विभागणी करून त्यांच्या कपाळावर जातीपातींचे शिक्के ठोकले. माणूस माणसापासून दूर झाला. आपल्या भोवती त्याने निष्कारण कुंपणे उभी केली. डबक्यातल्या बेडकाप्रमाणे

तो अज्ञानात, आकुंचित विचारांच्या आवरणात राहू लागला.

जन्माने समान असणाऱ्या माणसांत पुढे कर्तृत्व व गुणवत्ता यांच्यात अंतर पडते. पण कर्तृत्व जन्मजात असत नाही. ते प्रयत्न आणि पुरुषार्थी वृत्तीवर अवलंबून असते. इतर घटकही त्याला कारणीभूत होतात. जन्मानेच श्रेष्ठत्व किंवा कनिष्ठत्व प्राप्त होते असे मानणे ही अज्ञानाची परमावधी आहे. खरे तर आजच्या विज्ञानसंपन्न आणि बुध्दिनिष्ठ समजल्या जाणाऱ्या युगातही माणसे श्रेष्ठ-कनिष्ठत्वाच्या भ्रांतिष्ट विचारात गुरफटत चाललेली दिसतात. हे विषण्ण करणारे दृश्य आहे. प्रेषित येशू ख्रिस्ताचे उद्‌गार लक्षात ठेवले पाहिजेतः

'तो परमपिता परमेश्वर एक आहे. आपण सर्व त्याची लेकरे आहोत. आपणापेक्षा कोणालाही कमी लेखू नका. तुम्ही सर्वांना प्रेम द्याल तरच ईश्वराच्या प्रेमास पात्र व्हाल.'

महात्मा बसवेश्वरांचीही अनेक उत्कट वचने आहेत. त्यांचे एक वचन असेः

*जमीन सर्वत्र सारखीच असते -*
*मग ती महारवाड्याची असो की*
*शिवमंदिराची असो.*
*पाणी एकच असते -*
*मग ते शुचितेसाठी घेतलेले असो की,*
*आचमन करण्यासाठी घेतलेले असो*
*जात साऱ्यांची एकच असते -*
*हे कूडलसंगमदेवा, जो तुला जाणतो*
*त्या साऱ्यांची*
*जात जाणकाराचीच असते.*
*माझ्याहून लहान कोणी नाही*
*शिवभक्ताहून श्रेष्ठ कोणी नाही.*

ही उदार, समतावादी, मानवतेच्या एकतेचा गौरव असलेली विश्वप्रेमी विचारधारा आजच्या सामाजिक, राजकीय किंबहुना साऱ्याच जीवनक्षेत्रात उतरली तर विषमतेची कुंपणे आपोआप मोडून पडतील. समतेचे शुध्द वारे वाहू लागतील.

# मुखवटयांचे जग

सिंहाचे कातडे पांघरून एखादा कोल्हा मोठ्या सिंहासनावर जाऊन बसला म्हणून काय होणार आहे? आसनावर बसल्यामुळे कोल्हा सिंह कसा ठरेल? पण जो कोणी प्राणी 'येनकेनप्रकारेण' सिंहासनाधिष्ठित होईल तो वनराज आहे, त्याच्यासमोर लीन झालेच पाहिजे, अशी जगाची रीत आहे. खरा सिंह वनवासात असतो. कृत्रिम आयाळ गळ्याला लावून ग्रामसिंह मात्र ताठ्याने विराजमान झालेला असतो. केव्हातरी इतर प्राण्यांना हे नाटक समजते. आणि मग त्या नाटकाचा शोचनीय शेवट होतो. जगात असे प्रसंग पुष्कळ पाहायला मिळतात. प्रत्येक क्षेत्रात मुखवटे धारण करणारे दांभिक लोक आहेत. सज्जनांच्या सात्विकतेचा, करुणाबुध्दीचा गैरफायदा घ्यायचा आणि त्या बळावर आपला स्वार्थी संसार सजवायचा, प्रतिष्ठा मिळवायची, आपल्या स्तुतिपाठकांचा एक संप्रदाय निर्माण करायचा हा यांचा उद्योग असतो. अध्यात्माच्या व धर्माच्या क्षेत्रातही असे बाजारबुणगे पुष्कळ घुसलेले आहेत.

एका तीर्थक्षेत्री भगवी वस्त्रे परिधान केलेला - जटा वाढवलेला एक संन्यासी सांगत होता,

'भगवंतांनी यमुनातीरी सवंगड्यांबरोबर ज्या लाह्या खाल्या त्यातल्या थोड्या सुदैवाने उरल्या आहेत. केवळ लोककल्याणासाठी आम्ही त्या देत आहोत. वैकुंठेश्वराचा हा प्रसाद आहे. तो आम्ही विकत नाही. आपल्या इच्छेप्रमाणे ईशसेवा म्हणून काही रक्कम ठेवावी आणि प्रसाद ग्रहण करावा.' संन्याशाचा हस्तक लाह्यांची एक लहानशी पुडी भाविकांच्या हाती ठेवून प्रत्येक पुडीचे वीस-पंचवीस रुपये तत्परतेने वसूल करीत होता. संन्यासी महाराज शांतपणे डोळे मिटून बसले होते आणि मधून-मधून त्या अलौकिक लाह्यांची महती सांगत होते.

अज्ञान आणि अंध:श्रध्दा यांच्या भक्कम आधारावर हा व्यापार किती किफायतशीर होत असेल, हे सांगण्याचेही कारण नाही. सर्व साधुसंतांनी या प्रकारच्या दांभिकतेवर पुन्हा पुन्हा प्रहार केले आहेत. माणसाचे ढोंग आणि

त्याचा धूर्तपणा पाहून कधीकधी गंमत वाटते. खोटे नाणे आंधळ्या भिकाऱ्याच्या हातात किंवा मंदिरात आरती झाल्यानंतर पुजाऱ्याच्या ताटात टाकण्याची चतुराई कित्येक लोक दाखवतात. दानाचेही श्रेय मिळाले आणि खोटे नाणेही व्यवस्थित चालवले, असा दुहेरी आनंद त्यांना मिळतो. पण खरे तर ही स्वतःचीच फसवणूक आहे. व्यापाराच्या इतर क्षेत्रांत याहून भयानक स्वरूपाची नागवणूक केली जाते. अन्नधान्यात भेसळ, औषधातही भेसळ, सिमेंटमध्येही भेसळ, सारे व्यवहार भेसळीचे आणि अप्रामाणिकपणाचे. आश्चर्याची गोष्ट अशी की असे व्यवहार करणारे काही लोक व्रतवैकल्ये करतात. मंदिरात तासभर पूजाअर्चा करतात. कबुतरांना धान्य देतात. देवमूर्तीला नैवेद्य दाखवतात आणि भुकेल्या माणसाला दारातून हाकलतात. या प्रकारची दांभिकता पाहिल्यावर तुकारामांसारखा साधुत्वाच्या उंच आकाशात विहार करणारा समाजनिष्ठ संत क्षुब्ध झाला नाही तरच आश्चर्य? खोट्या ज्ञानाचे आणि लटक्या संतत्वाचे देव्हारे माजवणाऱ्या अशा लोकांवरची तुकोबांची टीका अत्यंत भेदक आहे. ते म्हणतात :

*जळो प्रेमा तैसा रंग। जाय भुलोनि पतंग॥*
*सासूसाठी रडे सून। भाव अंतरीचा भिन्न॥*
*मैंद मुखीचा कोवळा। भाव अंतरी निराळा॥*
*जैसी वृंदावनकांती। उत्तम धरु नये हाती॥*
*बकध्यान धरी। सोंग करुनि मासे मारी॥*
*तुका म्हणे सर्प डोले। तैसा कथेमाजी खुले॥*

संत कबीरांनीही म्हटले आहे. चार-चार माळा गळ्यात घातल्या आणि केसांचे मुंडण केले म्हणून साधुत्व प्राप्त होत नाही. हे सारे बाह्य देखावे फसवणुकीसाठी उपयोगी पडतात.

# खरा तो एकचि धर्म

धर्म आणि अध्यात्म या काही अनाकलनीय, गूढ व गुंतागुंतीच्या गोष्टी आहेत, असा अनेकांचा अपसमज झालेला दिसतो. खरे तर धर्म ही अत्यंत सुगम अशी विचार, आचारांची धारा आहे. ती अकारण जटिल करण्यात आलेली आहे. अगम्य अशा जडजंबाल शब्दांतून धर्मासंबंधी बोलणाऱ्या तथाकथित विद्वानांनी धर्माला दुर्बोधतेच्या चौकटीत बसवले आहे. धर्माचे सार अत्यंत साध्या सुलभ शब्दांतून अनेकांनी सांगितले आहे. भगवानबुध्द, भगवान महावीर, महात्मा बसवेश्वर, संत ज्ञानेश्वर, कबीर, तुकाराम इत्यादींनी धर्माचे स्वरूप सहज शब्दांत सुलभ रीतीने गुंफले आहे. याचे कारण या महनीय व्यक्ती म्हणजे धर्मरूपी विशाल सागरावर उचंबळून आलेल्या जिवंत आणि जोमदार लाटाच होत्या. त्यांच्या उक्तीतून, कृतीतून व श्वासोच्छ्वासातून धर्मभावनेचा सुगंध दरवळत होता.

'देव कुठे आहे?' या प्रश्नाचे उत्तर तुकोबा, 'देव तेथेचि जाणावा' असे सांगून 'रंजल्या गांजल्यांना जो वात्सल्याने पोटाशी धरतो, तेथेच देव असतो. तेथेच धर्म वसती करतो' असे देतात. भगवान बुध्द म्हणाले:

*धम्मं चरे सुचरितं न तं दुच्चरितं चरे।*
*धम्मचारी सुखं सेति अस्मिं लोके परंहिच॥*

सत्कर्म करा, दुष्टत्वाने आचरण करू नका, धर्माची ही वागणूक करणारा या इहलोकात सुखी होतो. यापेक्षा धर्माचे वेगळे स्वरूप काय सांगायचे? सत्याचे पालन कर, परद्रव्याची अभिलाषा नको, आपल्या निढळाच्या घामावर आपले सुख निर्माण कर. या व्यतिरिक्त दुसरा धर्मोपदेश काय असू शकेल? हा उपदेश जगातल्या सर्व धर्मपुरुषांनी केला आहे. येशू ख्रिस्ताचा, महंमद पैगंबराचा हाच संदेश आहे. या चिरंतन मूल्य असलेल्या उपदेशावर विशिष्ट संप्रदायांची लेबले कशासाठी चिकटवायची? धर्म हा इतका सोपा, सहज आणि सरळ आहे. पण काही लोकांची धर्म म्हणजे अत्यंत दुस्तर असे अतिखोल तत्त्वज्ञान, ही समजूत

झालेली आहे.

भगवान बुध्दाला एकदा मालुंक्यपुत्र नावाच्या शिष्याने विचारणा केली, "भदंत, आपण आम्हाला परलोक, पुनर्जन्म, यांसंबंधी काहीच सांगितले नाही. देह आणि आत्मा, विश्व सान्त की अनन्त? जिवाची अखेर गती कोणती? इत्यादी महत्त्वाच्या गोष्टींबद्दल आपण काहीच बोलला नाहीत? हे विश्व कोणी निर्माण केले? की त्याला आदि आणि अन्त नाही? ते स्वयंभू आहे काय? या प्रश्नांची आपण चिकित्साच केली नाही. असे का?"

या गोष्टींची चर्चा केल्याशिवाय धर्ममीमांसा होऊ शकत नाही, असे त्याला वाटत होते.

भगवान बुध्दांनी मार्मिक उत्तर देऊन शिष्याचे समाधान केले. ते म्हणाले, "या असल्या प्रश्नांची उत्तरे देण्याचे मी तुम्हाला कधी अभिवचन दिले हाते काय? आणि हे तत्त्वज्ञान माझ्यापासून मिळवावे या हेतूने तू माझे शिष्यत्व स्वीकारलेस काय? समज, एक मनुष्य विषारी बाण घुसून घायाळ होऊन पडला आहे. त्याच्या उपचारासाठी शस्त्रवैद्याला आणले आहे. पण तो जखमी मनुष्य शस्त्रवैद्याला जर प्रश्न विचारू लागला, की 'हा बाण मारणाऱ्याची जात कोणती? तो राहणारा कोठला? हा बाण कोणत्या कारखान्यात तयार झाला? बाण मारणाऱ्याची शरीरयष्टी कशी होती? त्याचा हेतू कोणता होता?'

असले निरर्थक प्रश्न विचारण्यात काहीच स्वारस्य नाही. प्रथम शस्त्रवैद्याला योग्य उपचार करण्याचे स्वातंत्र्य दिले पाहिजे. नाहीतर तो जखमी मनुष्य मृत्युमुखी पडेल. त्याप्रमाणेच हे मालुंक्यपुत्रा, माझ्याजवळ जे औषध आहे ते मी देतो. जे मी सांगतो ते ऐक. ज्याचा मी उल्लेख करीत नाही त्याची चर्चा करण्यात वेळ घालवू नकोस."

भगवान बुध्दांनी दिलेला दृष्टान्त अत्यंत अन्वर्थक आहे. इहलोकातले जीवन सात्त्विक प्रसन्नतेने जगायला कारणीभूत होणारी, सर्वांवर प्रेम करायला लावणारी मानवतावादी विचारसारणी म्हणजे धर्म. धर्म म्हणजे सर्वांबरोबर आनंदाने व सहकार्याने जगणे. या पलीकडे आणखी कोणता धर्म आहे?

◈◈

# विकारांचे मुंडण करा

शब्द आणि कृती यांचा मेळ ज्यांच्या आयुष्यात असतो, ते धन्य म्हणावे लागतील; पण बहुधा उच्चारांप्रमाणे आचार असत नाहीत. दाखवायचे दात वेगळे आणि खायचे वेगळे, असेच दृश्य जगात बहुतांशी पाहण्यास मिळते. शब्दांत पांडित्य पण करणी मात्र मूर्खाची, अशी परिस्थिती का असावी? याचे उत्तर असे, की शब्दांना प्रामाणिक भावनेचा, श्रध्देचा आधार दिला पाहिजे ही जाणीव विरळ झाली. आपले शब्द प्रांजळ भावनेचा रंग घेऊन यावेत, याची आंच ज्यांना लागलेली असते, असे लोकच संतत्वाच्या वाटेने चालू शकतात; पण रंगवलेले भडक शब्द हेच कित्येकांचे मुख्य भांडवल असते. त्यांना कीर्ती मिळवायची असते. शब्दांची आरास मांडून आपल्या ज्ञानाचा आणि नसलेल्या संतत्वाचा डंका पिटणारे लोक सर्वसामान्य माणसाला फसवत आले आहेत. संभाविताचा वेष घेऊन व नम्रतेची भाषा बोलून एखाद्या लुटारूने लुटावे, त्याप्रमाणे धर्माच्या व अध्यात्माच्या क्षेत्रांतही या प्रकारची लुटालूट चालू असते. आश्चर्य असे, की विद्वान समजले जाणारे लोकही लुटले जातात. तुकोबांसारख्या श्रेष्ठ संतालाही या अपप्रवृत्तींवर तुटून पडावे लागले. ते म्हणाले:

*जगी कीर्ति व्हावी। म्हणोनी जालासी गोसावी॥*
*बहुत केले पाटांतर। वर्म राहिलेसे दूर॥*
*चित्ती नाही अनुताप। लटिके भगवे स्वरूप॥*
*तुका म्हणे सिंदळीच्या। व्यर्थ श्रमविली वाचा॥*

लौकिक वाढावा म्हणून 'साधूचा' धंदा करण्याची प्रवृत्ती माणसात असावी, हा चमत्कार आहे. साधुत्व हा विकास पावलेल्या जीवनाचा स्वभाव आहे. साधुत्व हे बाहेरून घेण्याचे वस्त्र-प्रावरण नव्हे, की शोभादायक अलंकारही नव्हे. साधू 'बनता' येत नाही. 'होता' येते. पहिली अट अशी की साधकाने आपल्या वैयक्तिक स्वार्थाचे विसर्जन केले पाहिजे. स्वार्थबुध्दी सुटल्याशिवाय परमार्थाची वाट दिसूच शकत नाही; पण काही 'साधू' युक्तीप्रयुक्तीने आपल्या स्वार्थी

मनोवृत्तीला पारमार्थिक शब्दांची झालर लावून आपल्या ज्ञानाची व तपस्येची जाहिरात करतात.

एकाने तर मला सांगितले, की कपड्याला गेरू लावला, पायात खडावा घातल्या आणि थोडेसे पाठांतर सफाईने केले, तर 'साधू' म्हणून आपला धंदा बिनबोभाट चालायला हरकत नाही. तुकोबांनी या धंदेवाईक साधूसंस्थेवर प्रखर हल्ला चढवला, हे सयुक्तिकच आहे. अशा दांभिक गोसाव्याला ऊद्देशून त्यांनी आपल्या अभंगांतून एखादी अर्वाच्य शिवी दिली, तरी तेही पूर्णपणे समर्थनीयच आहे. आध्यात्मिक क्षेत्रांतील अपप्रवृत्ती सर्वसाधारण माणसाचे आणि एकंदर समाजाचे विशेष नुकसान करते. श्रेष्ठ संताच्या आचारविचारांत सुसंगतीबरोबरच सामर्थ्यही असते. समाजमन संपन्न करण्याची त्यात शक्ती असते. तुकोबांच्या व्यक्तित्वामुळे मराठी प्रवृत्ती रोखठोक आणि कसदार होऊ शकली. भला भेटला, तर आपली लंगोटी द्यावी आणि नाठाळ दिसला तर त्याचे वस्त्रहरण करावे, ही लक्षणे खऱ्या साधुत्वाची आणि शूरत्वाची आहेत.

संत कबीरांनीही दांभिकतेवर असेच प्रहार केले आहेत. 'नकली मालापासून सावध राहा' हा इशारा आध्यात्मिक क्षेत्रातही द्यावा लागतो, याचा अर्थ असत्य आणि दंभ यांचा प्रसार अधिक वेगाने होत राहातो. त्यांचा प्रतिकारही तत्परतेने केला पाहिजे. आपल्या केसांचे पुन्हा पुन्हा मुंडण करणाऱ्या तथाकथित साधूला कबीरांनी प्रश्न विचारला आहे:

*केसन कहाँ बिगारिया जो मुंडो सौ बार?*
*मनको क्यों नहि मुंडियो नामे विषय विकार?*

ज्यात विषय, विकार ठासून भरले आहेत, त्या मनाचे मुंडण - शुध्दीकरण का करीत नाही याचे उत्तर इतकेच, की डोक्याचे मुंडण सोपे आहे, पण डोक्यात आणि मनात जे तण माजले असेल, त्याचे मुंडण मात्र अवघड आहे.

# *सेंदरी ही दैवतें*

'उदंड झाली दैवते' असे म्हणावे अशीच अवस्था भक्तांनी करून ठेवली आहे. भक्तिभावना सुंदर असते हे मान्य करूनही तिचे मूळ जर अज्ञानात असेल, तर अशा भक्तीला काहीही अर्थ उरत नाही. ज्याची भक्ती करायची तो सर्वार्थाने आदर्श असला पाहिजे. कर्तृत्वाने, सामर्थ्याने आणि ज्ञानाने उत्तुंग असला पाहिजे. आदर्श व्यक्तित्वाची भक्ती मनाला उभारी देऊ शकते. मनाचा विकास घडवू शकते. ज्या दैवताची भक्ती भक्त करीत असेल त्या दैवताच्या स्मरणाने, गुणसंकीर्तनाने भक्ताच्या मनाला आनंद वाटला पाहिजे. पण पुष्कळ वेळा भक्तीचे रूपांतर आत्यंतिक भाबडेपणात आणि हास्यास्पद अंधश्रध्देत होऊन जाते. त्यामुळेच आपला आदर्श, आपले दैवत विचारपूर्वक निवडले पाहिजे. कोणत्याही दगडाला शेंदूर फासला की त्याचा देव होतो, ही परिस्थिती केविलवाणी आहे. 'जशी ज्याची दृष्टी तसा त्याचा देव' असे म्हटले पाहिजे. संत तुकारामांनी दैवत कल्पनेवर कठोर टीका केली आहे. ते म्हणतातः

*सेंदरी हे देवी दैवते। कोण ती पुजी भुतेखेते।*
*आपुल्या पोटा जी रडते। मागती शिते अवदान॥*
*आपुले इच्छे आणिकां पीडी। काय ते देईल वराडी।*
*कळो ही आली तयाची जोडी। अल्प रोकडी बुध्दि अधरा॥*
*तैसा नव्हे नारायण। जगव्यापक जनार्दन॥*
*तुका म्हणे त्याचे करा चिंतन। वंदूं चरण येती सकळे॥*

दैवताला कशाचे तरी प्रलोभन दाखवल्यानंतर ते प्रसन्न होते आणि वेळेवर नवस फेडला नाही, म्हणून क्षुब्ध होऊन भक्ताच्या आयुष्यात नाना प्रकारची दुःखे निर्माण करते. असला गैरसमज केवळ अज्ञानाचा नसून तो ईश्वरत्वाचा अवमान करणारा आहे.

संतांनी या अज्ञानी प्रवृत्तीवर पुन्हा पुन्हा कोरडे ओढले आहेत. अनेक दैवतवादाला विरोध केला आहे. ईश्वराला नाव कोणतेही द्या; पण तो एकच

आणि त्याचे अस्तित्व विश्वाच्या अणुरेणूंत सामावलेले आहे. ही जाणीव ज्ञानी भक्ताला होऊ शकते. अज्ञानी लोकांनी आणि काही धूर्त पंडितांनी आपल्या कल्पनेतून दिसेल त्या दगडांतून देव निर्माण केले. त्यांच्याभोवती अतर्क्य चमत्कारांच्या कथांचे जाळे विणून ठेवले. प्रापंचिक दुःखांनी पिडलेले लोक त्या दगडासमोर नवस बोलू लागले. लोटांगण घेऊ लागले. भक्तीचा बाजार बनला. खणानारळांनी ओटी भरली, की देवता भक्ताच्या पदरात त्याच्या सुखाचे पदार्थ टाकू लागल्या. भौतिक पदार्थ घेऊन सुखदुःखांची खरेदी-विक्री करणारा देव अज्ञानी भक्तांच्या दृष्टीने एक क्षुल्लक व्यापारी ठरला. सौदेबाजीतच ज्यांचे आयुष्य गेले त्यांनी ईश्वराची एका अर्थाने ही विटंबना केली असेच म्हटले पाहिजे.

खरे तर देवपूजा म्हणजे सर्वव्यापक, सर्वसमर्थ, सर्वसुंदर अशा विश्वशक्तीची आराधना असते. या सृष्टीच्या मुळाशी जी विलक्षण चैतन्यपूर्ण अमूर्त शक्ती आहे, तिचे भावपूर्ण कृतज्ञ स्मरण करून त्याच शक्तीचा मी एक अंश आहे, अशा अनुभूतीचा तरंग आपल्या मनात निर्माण करणे म्हणजे त्या जगदाश्रयाची पूजा होय. इतका व्यापक दृष्टिकोन ज्याच्या ठायी निर्माण होतो त्यालाच परमेश्वराची प्राप्ती झाली असे म्हणता येईल. फुलाकडे फूल होऊन पाहावे. मुलाकडे मूल होऊन पाहावे. त्याप्रमाणे मनाचा आणि दृष्टीचा विकास करून परमेश्वराकडे पाहावे. अर्जुन श्रीकृष्णाला म्हणाला:

*हे असो स्वर्ग पाताळ। की भूमी दिशा अंतराळ।*
*हे विवक्षा ठेली सकळ। मूर्तिमय देखतसे॥*
*तुजवीण एकादियाकडे। परमाणुहि एतुला कोडे।*
*अवकाशु पाहतसे परि न सापडे। ऐसे व्यापिले तुंवा॥*

स्वर्ग, पृथ्वी, पाताळ, आकाश आणि दिशा असे वेगळे बोलण्याची सोयच राहिली नाही. कारण हे ईश्वरा, तू सर्व व्यापले आहेस. तू विश्वरूप आहेस. व्यापक दृष्टीशिवाय भक्ती सार्थ होत नाही.

❖❖

# *नाथा नकीरे अंतरू*

काही घटना अतर्क्य असतात. काही व्यक्तित्वेही अनाकलनीय असतात. कितीही विचार केला तरी त्या व्यक्तित्वांतले सारे सौंदर्य आपल्याला कळले असे वाटत नाही. सुगंध जसा दिसत नाही आणि उज्वल प्रकाश जसा हुंगता येत नाही, सुस्वर जसा चाखता येत नाही, अमृताची रसवत्ता ज्याप्रमाणे दृष्टीला समजत नाही, त्याप्रमाणेच काही व्यक्तित्वांचे समर्थपण बुध्दीला समजत नाही. ते हृदयाला मात्र जाणवते. निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, सोपान आणि मुक्ताई यांच्या व्यक्तित्वासंबंधी हेच म्हणता येईल. लौकिक जगातल्या या माणसांना अलौकिक सृष्टीतल्या कल्पवेलीवर फुललेल्या फुलांचा जो अपार्थिव सुवास येत होता तो आजही आमच्या बधीर झालेल्या गंधसंवेदनेला जाणवतो आणि मन प्रसन्न होते. ही भावंडे विलक्षण तेजाच्या रसातून निसर्गाने घडवली होती. जगाने यातनांचे काटे यांच्या वाटेत पेरले पण आपल्या प्रेमप्रवृत्तीने त्यांचे फुलांत रूपांतर करून ती फुले यांनी जगाच्या ओंजळीत टाकली. दुष्टांचा दुष्टपणा ज्याप्रमाणे तर्काच्या चौकटीत बसवता येत नाही. त्याप्रमाणेच अशा संतांच्या आत्यंतिक संतत्वाचीही चिकित्सा करता येत नाही. मधून-मधून अशी व्यक्तित्वे इतिहासाच्या पानांत केव्हातरी भेटतात म्हणून तर आमच्या संस्कृतीचा इतिहास उन्नत झाला आहे. संत नामदेवांनी ज्ञानेश्वरांचा समाधीसोहळा आपल्या काव्यमय वाणीतून वर्णिताना म्हटले आहे:

*अहंकार पोटीचे उतरिले जहर। केला उपकार जगामाजी॥*
*कामक्रोध उते ऊतरिले दंभ। करपले कोंभ संशयाचे॥*
*विकल्पाचे पायी घातियेली बेडी। केली तडातोडी इंद्रियांची॥*
*स्वर्गादिक सुखे कमविली रोकडी। वैकुंठासी शिडी लावियेली॥*
*नामा म्हणे धन्य उभारिल्या ध्वजा। घातियेल्या शेजा सुखधामी॥*

हे वर्णन ज्ञानेश्वरांविषयी असले तरी ते या चारी भावंडांचे आहे. असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही.

नामदेवांनी या 'समाधी' प्रकरणात आपले सारे कृतज्ञ आणि व्याकुळ भाव उत्कटतेने व्यक्त केले आहेत. नामदेवांच्या हृदयीची आध्यात्मिक ज्योत या भावंडांच्या सहवासात अधिक प्रसन्नपणे प्रकाशू लागली आणि नामदेवांच्या भक्तीच्या मधुर संगीताच्या सुरात या भावंडांच्या मनातल्या गाण्याला अधिक मधुरता प्राप्त झाली यात शंका नाही. ज्ञानदेव आणि नामदेव आणि ज्ञानेश्वरांची भावंडे ही एकाच कल्पवृक्षावर बसून दिव्य आनंदाचे गीत गाणारी पाखरे आहेत. यांच्या गीतांतून उमटलेल्या भावार्त शब्दांनी साहित्यात काव्यगंगेला पूर आला यात संदेह नाही.

ही चार अलौकिक भावंडे पंचविशी-तिशीच्या आतच आपल्या 'माहेरघरी' निघून गेली. महाराष्ट्राच्या आध्यात्मिक आणि वाङ्मयीन इतिहासातले एक 'सुवर्णययुग' त्यांच्या प्रयाणाने संपून गेले. अलौकिकत्वाचा एक साचा मोडून गेला. निर्मिती करणाऱ्या कलावंतालादेखील पुन्हा अशीच व्यक्तित्वे घडविता येणार नाहीत. कदाचित स्वर्गातल्या या सुंदर पक्ष्यांना पृथ्वीवरचे दूषित वातावरण *आपल्या सुगंधी श्वासांनी* आणि स्वरांनी शुध्द करावेसे वाटले म्हणून ते अल्पकाळ आले आणि कायमचे निघून गेले.

आता केवळ ज्ञानेश्वरांची समाधी पाहायला मिळते. तो कैवल्याचा पुतळा आता पाहायला मिळत नाही. ज्ञानेश्वरा, आज तुझा जयघोष होतो हे खरे! पण ज्या महनीय मूल्यांच्या जयजयकाराची तुला अखंड तहान होती ती मूल्ये मात्र पायदळी तुडवली जात आहेत. म्हणून तुला नामदेवांच्या शब्दांत मी आळवतो:

*नाथा नको रे अंतरुं। तुझ्या कांसेचे वांसरुं॥*
*कळा दुभती तूं गाय। तुझा वियोग असह्य॥*
*ज्ञानदेवी ही समाधी। जडो मनोवृत्ती अवघी॥*
*नामा भेटे ज्ञानदेवा। जना प्रसाद मिळावा॥*

# कबीरांनी घातलेली साद

धर्म आणि संप्रदाय यांच्यात पुष्कळच अंतर असते. धर्म विशाल सागरासारखा आहे. त्याला मर्यादा नसतात. संप्रदाय मात्र लहानलहान जलाशयासारखे असतात. कित्येक वेळा त्यातले पाणी दूषित झालेले असते. पण सांप्रदायिक भक्त त्या साचलेल्या, शेवाळलेल्या पाण्याला तीर्थ समजतात धर्म मनुष्याला व्यापक करू इच्छितो. एखाद्या उंच पर्वत शिखरावरून माथ्यावरच्या आकाशाचा अथांग निळा विस्तार दृष्टीत भरावा त्याप्रमाणे धर्मभावनेच्या उन्नत शिखरावर गेलेल्या धार्मिकाला अपार जीवनाचे दर्शन होते. संप्रदायाच्या क्षूद्र दृष्टीतून जगाकडे पाहणाऱ्या माणसाला मात्र आपण जे पाहत आहोत तेवढेच जग आहे, आपल्याला जेवढे दिसले तेवढेच सत्य आहे असे वाटते. संप्रदाय माणसाचा अहंकार वाढवतात आणि अज्ञान जोपासतात. धर्म मात्र मनुष्याला ज्ञानाची व नम्रतेची देणगी देतो. सध्याच्या जगात सर्वत्र सांप्रदायिक वृत्तीचे, संकीर्णतेचे तण माजलेले दिसते. धर्माचे मंजुळ सूर कानावर पडण्याऐवजी सांप्रदायांचा कर्णकटू गलबला मात्र कानावर आदळतो. अशावेळी संत कबीरांसारख्या स्पष्टवक्त्या, सत्यवचनी सत्यशोधकाची आठवण होते. ते म्हणतातः

*साधो देखो जग बौरा ना।*
*सांची कहाँ तो मारन धावै, झूठे जग पतियाना॥*
*हिंदू कहत है राम हमारा, मुसलमान रहमाना॥*
*आपस में दोड लडके मरतु है, मरम कोई नहि जाना॥*
*बहुत मिले मोहि नेमी धरमी, प्रात करै असनाना॥*
*आतम छोडकि पखाने पूजै, तिनका थोथा ग्याना॥*
*बहुतक देखे पीर औलिया, पढै किताब कुराना॥*
*करै मुरीद कबर बतलावै, ऊनहुं खुदा न जाना॥*

'हे साधो, जग वेडे आहे! सत्य सांगितले तर मारायला धावते. आणि असत्य कथन केले तर विश्वास ठेवते. याचा अर्थ जगाला खरे चालत नाही. जे

बरे वाटते तेच खरे असे ते गृहीत धरते. हिंदू आणि मुसलमान राम रहीम म्हणत झगडा करतात-मरतात. पण ईश्वरी रहस्य मात्र त्यांना समजत नाही. व्रते वैकल्ये करणारे, स्नान करून सोवळे होणारे पुष्कळ भेटले. आत्मा सोडून पाषाणाची पूजा करणाऱ्यांचे ज्ञान काय सांगावे? अवलिया पाहिले, पंडित पाहिले. ग्रंथ वाचतात. कबर दाखवतात. ईश्वर स्वरूपाचे मात्र त्यांना काहीच आकलन होत नाही. ईश्वर काय पोथ्या पुस्तकांत भेटतो? तो मनातच शोधला पाहिजे. हिंदूंची दया आणि मुसलमानांची करुणा कशी सांगावी? एक जण प्राण्याला हळूहळू कापतो. दुसरा एकाच झटक्यात ठार करतो. शहाणा कोण आणि वेडा कोण?'

कबीरांनी केलेली टीका खरे तर विदारक वस्तुस्थितीपेक्षा सौम्य आहे. केवळ हिंदू आणि मुसलमानच नव्हेत तर सर्व धर्मांत संप्रदायाचे भोवरे निर्माण झाले आहेत. सारेजण दिव्याची म्हणजे कंदिलाची पूजा करीत बसले आहेत. प्रकाश देणाऱ्या ज्योतीला मात्र लोक ओळखत नाहीत. धर्माच्या व्यापक सर्वस्पर्शी सामर्थ्याकडे पाठ फिरवून आकुंचित संप्रदायांच्या डबक्यांत ते डुबक्या घेत आहोत. संत कबीरांना हे दृश्य विलक्षण अस्वस्थ करणारे आहे. हिंदू आणि मुसलमान या कुंपणाच्या पलीकडे कबीरांसारखे साधुपुरुष असतात आणि माणसाला बंदिस्त करणाऱ्या संप्रदायांच्या कारागृहांतून बाहेर पडण्यासाठी 'सुनो भाई साधो' अशी उच्च स्वरात ललकारी देत असतात.

पण कबीरांची वाणी ऐकायला आणि कळायला हृदयाचे कान व जिवाचे भान असावे लागते. प्रत्येकजण आपापल्या पंथांच्या अरुंद खोलीत अंधारात बसून राहिलेला आहे. अज्ञानाचा अंधार व खोलीला बंद करून टाकणारे अहंकाराचे कडीकुलूप असा बंदोबस्त असल्यावर 'सुनो भाई साधो' ही साद कशी ऐकू येणार? व्यासांनीही किंबहुना प्रत्येक साधुपुरुषाने जिवाच्या आकांताने अशीच साद घातली. प्रतिसाद मात्र अत्यल्प मिळाला.

# *प्रेममयी मीरेची भक्ती*

भागवत धर्माने भक्तिमार्गाचा पुरस्कार केला, याचे कारण भक्ती ही सर्वजनसुलभ आहे. सर्वसंगपरित्याग करून आणि कठोर तपस्या करून जीवनातला 'परम अर्थ' मिळवणे फार कठीण असते. या ज्ञानमार्गावर खाचखळगे असतात. काटेकुटे असतात. त्यावरून चालणे अनेक वेळां अशक्य होते. संन्यासापेक्षा भक्तीची पाऊलवाट मुलायम असते, असा समज आहे; पण या वाटेवरही सहज चालता येईल असा भ्रम बाळगणे चुकीचे आहे. परम आनंदाची, परमात्मास्वरूपीच्या सुखाची प्राप्ती करून घ्यायची असेल, तर भक्तीसुध्दा अत्यंत दृढ स्वरूपाची असावी लागते. मोहाचे आणि लोभाचे, वासना विकारांचे बलिष्ठ साखळदंड वज्रनिर्धाराने तोडून मन परमात्म्याच्या ठायी सर्वस्वी विलीन केल्याशिवाय भक्ती सफल होत नाही. आपल्या सवडीने केव्हातरी ईश्वराचे स्मरण करावे आणि पुन्हा प्रपंचाच्या पाशात गुरफटून जावे ही भक्ती नव्हे. नदी ज्याप्रमाणे समुद्रात सर्वभावे समरसून जाते आणि ती सागररूपी बनते त्याप्रमाणे भक्त आपल्या परमोच्च उद्दिष्टांशी एकरूप व्हावा लागतो. आराधक आणि आराध्य दैवत यांचा संगम झाल्याशिवाय आराधना फलद्रुप होत नाही. अशी अनन्यसाधरण भक्ती योगाइतकीच कठीण आहे. भक्ती मध्ये प्रीती, आत्मीयता, शरणशीलता, पूर्ण विश्वास हे घटक असतात. नामदेव-तुकारामांच्या काव्यात निर्माण झालेले सामर्थ्य त्यांच्या भक्तिभावाचेच द्योतक आहे. स्वतःला कृष्णाची सखी, प्रेयसी, दासी म्हणवणारी मीरा भक्तिप्रेमाने अंतर्बाह्य रंगून निघाली आहे. तिची सारीच कविता- सारेच जीवन परमोत्कट प्रेमाने आणि भक्तीने रसरसलेले दिसते:

*सखी, मेरी नींद नसानी हो।*
*पिय को पंथ निहारत सिगरी, रैन विहानी हो।*
*अंगि-अंगि व्याकुल भई, मुख पिय-पिय बानी हो।*
*अन्तर वेदन विरह की, वह पीडक न जानी हो।*
*ज्यूं चातक घन कूं रटै, मछरी जिमि पानी हो।*

*मीरां व्याकुल विरहिणी, सुध-बुध बिसरानी हो।*

प्रियतमाची वाट पाहता पाहता रात्र फिक्कट झाली. माझी झोप उडून गेली. अंगांगात व्याकुळता आली. विरहाची वेदना अंतरंगात आणि मुखात 'प्रिय प्रिय' हे शब्द. मेघाची प्रतीक्षा करणारा चातक आणि पाणी हेच जीवन असलेली मासोळी, तशी माझी अवस्था झाली आहे. सखये, ही व्याकुळ विरहिणी आपली शुध्द हरवून बसली आहे. 'मीरा के प्रभु हरि अविनासी, तुम मेरे ठाकुर मै तेरी दासी."

या काव्यात प्रेम आहे. जीवनसमर्पणाचा भाव आहे; पण काही टीकाखोरांना यात कामभावना दिसली. खरे तर हे वैषयिक प्रेम नव्हे. वासनेवर आधारलेले इंद्रियजन्य आकर्षण इतके स्वच्छ आणि उत्कट असत नाही. ते जन्मभर टिकतही नाही. कृष्णाला आपला स्वामी मानणारी मीरा भक्ताने परमेशाकडे पाहावे त्या दृष्टीतून पाहत होती. या भक्तिकाव्याच्या मुळाशी टीकाकार समजतात त्याप्रमाणे कामप्रेरणा असती, तर आपला पती, आपला संपन्न संसार बाजूला सारून, मनातल्या श्रीकृष्णावर ती आपल्या भक्तीचा वर्षाव कशाला करीत राहिली असती? मीरेच्या पूर्वी कित्येक शतके - कित्येक सहस्त्रके होऊन गेलेला श्रीकृष्ण, जो तिने पाहिलाही नव्हता - त्याच्या विषयी ऐंद्रिय आकर्षण तिला कसे वाटेल? कला निर्मितीच्या मुळाशी कलावंतांची सुप्त कामप्रेरणा असते, असे आधुनिक मानसशास्त्रज्ञांचे म्हणणे आहे. ते काहीही असले तरी मीरा, जनाबाई, निर्मळा, कान्होपात्रा, बहिणाबाई इत्यादी संत कवयित्रींनी - परमेश्वराकडे निखळ भक्तीच्या दृष्टीने पाहिले आणि त्याच्या चरणांवर आपले जीवन समर्पित केले.

मीरेच्या काव्यात विशुध्द भक्तिप्रेमाचे निर्मळ आणि आर्त सौंदर्य आहे. त्या सौंदर्याकडे भावनिक उंचीवरूनच पाहिले पाहिजे. आपल्या मनातल्या विकृत कल्पनांचा आरोप त्यावर कोणी करू नये.

# अमृत विकूनि कांजी प्याला

शासकीय सेवेतून नुकतेच निवृत्त झालेले अधिकारी आपण कसे कार्यक्षम प्रशासन केले हे गर्वाने सांगत होते. वरिष्ठ अधिकारी सुध्दा आपल्याशी सल्लामसलत केल्याशिवाय निर्णय घेत नसत, असे त्यांनी घोळवून सांगितले. तीस-बत्तीस वर्षे आपण शासनात अधिकारी होतो. त्या अधिकाराचे सारे फायदे आपल्याला मिळाले.पुढच्या तीन पिढ्यांची व्यवस्थित आर्थिक तरतूद आपण सावधपणे करून ठेवली आहे, अशा आशयाचे कृतार्थतेचे उद्‌गार त्यांनी काढले.

साठी उलटलेला हा व्यवहारचतुर अधिकारी उरलेल्या आयुष्यात काय करायचे, याबद्दल मात्र विवंचनेत होता. येणाऱ्या तीन पिढ्यांचे त्याने भवितव्य घडवले होते. त्यांच्यासाठी पैसाअडका, जमीनजुमला, सोने-नाणे सर्व व्यवस्था करून ठेवली होती. पण निवृत्तीनंतरचे आपले जीवन कसे व्यतीत करायचे, याची मात्र कोणतीही योजना त्याने आखलेली नव्हती. शासकीय सत्ता, त्या सत्तेतून व सेवेतून मिळणारे द्रव्य, मानमरातब या वर्तुळापलीकडे असलेल्या व्यापक अशा सुखदुःखात्मक जगाचे त्याला भानही नव्हते. कुणीतरी त्याला म्हटले,

"आता म्हातारपणात तुम्ही कशात मन रमवणार? अधिकार संपला, अधिकाराबरोबरच आलेली मानमान्यता आणि प्रतिष्ठाही संपून जाते. एक सामान्य मनुष्य म्हणून आयुष्याच्या संध्याकाळी तुम्ही काय करणार आहात?"

या प्रश्नाने मात्र तो निवृत्त अधिकारी अस्वस्थ झाला. प्रश्नाचे उत्तर त्याला सापडेना. बहुसंख्य लोकांना अशा प्रश्नांची उत्तरे देता येत नाहीत. कारण त्यांच्या जीवनविचाराची धाव सत्तासंपत्तीच्या कुंपणापलीकडे गेलेली नसते. नाना प्रकारच्या विद्या, कला आहेत. उत्कृष्ट विचार देणारे वाङ्मय आहे. आपल्या देशात अनेक निसर्गसुंदर स्थळे आहेत. भव्य मंदिरे आणि कलाकृती आहेत. आपल्या देशाला एक प्राचीन, पवित्र अशी धर्मपरंपरा आहे. अनेक धर्मसंस्थापकांचे महनीय विचार सामावलेले ग्रंथ आहेत. अशा सर्व क्षेत्रांतल्या उत्तमउदात्त गोष्टींचा

शक्य असेल तितका आस्वाद घ्यावा, त्यातल्या सौंदर्याने भारावून जावे अशी ओढ बहुसंख्य लोकांना असत नाही. नोकरीचाकरी, व्यापार, पैसा आणि पैशातून मिळणारी काही क्षणिक सुखे यापलीकडे त्यांचे जग नसते. आपल्या जीवनाचा आणि ते जीवन देणाऱ्या विशाल शक्तीचा त्यांनी कधीही विचार केलेला नसतो. संत एकनाथ म्हणातातः

*अमृत विकूनि कांजी प्याला। तैसा नरदेह गमाविला॥*
*लाहोनी उत्तम शरीर। वेचिले ते विषयपर॥*
*ऐशी मूर्खाचि गोष्टी। एकनाथ देखोनि होतसे कष्टी॥*

या अभंगातून व्यक्त झालेला दृष्टिकोन खरोखरच चिंतनीय आहे. व्यापारात आणि व्यवहारात अत्यंत हुशार असलेली माणसे जीवनाच्या तात्त्विक विचारात मात्र मूर्ख असतात, हेच प्रत्ययाला येते. आपल्याजवळचे अमृत विकून कळकट कांजी पिणाऱ्या माणसाला संतांनी याशिवाय दुसरे कोणते विशेषण द्यावे? रत्न द्यावे आणि चमकणारी क्षुद्र गारगोटी घ्यावी, त्याप्रमाणे देहाचे यौवन व त्याची शक्ती केवळ भौतिक आणि सामान्य प्रतीच्या क्षुल्लक क्षणजीवी सुखासाठी वापरावी हे व्यवहारशून्यतेचे लक्षण आहे. देहभोगाला विरोध नाही, पण देहापलीकडे काहीच नाही, म्हणून देहभोग हेच जीवनातले परम महत्त्वाचे सत्य आहे, ही समजूत घोर अज्ञानाची द्योतक आहे.

संत एकनाथानीही यशस्वी प्रपंच केला. पण अमृत आणि कांजी यांचे मोल तात्त्विक दृष्टीमुळे त्यांना योग्य रीतीने कळले होते. जीवनातले सर्व रस त्यांनी थोडे थोडे चाखले. पण भक्ती, अध्यात्म, लोकसेवा या गोष्टींनी माणसाचे जीवन समृध्द होते, ही जाणीव त्यांना होती. त्यांच्या प्रपंचात परमार्थाचा कोवळा सुगंध मिसळून गेला होता. त्यामुळे अमृताचे घोट घेत त्यांनी स्वतःचे आणि समाजाचे जीवन घडविले.

*ऐसी आवड धरा मनी। शरण एका जनार्दनी॥*

# या ज्यौती पुन्हा पेटवा

सध्याच्या शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या कोवळ्या मनावर कोणतेही सुसंस्कार होत नाहीत आणि त्यामुळे नवी पिढी संस्कारहीन बनत आहे अशी तक्रार एका सुविद्य पालकाने माझ्याकडे केली. तो म्हणाला, "तुमच्या महाविद्यालयातले वातावरण उत्तरोत्तर बिघडत चालले आहे. आम्ही महाविद्यालयात होतो त्यावेळी धूम्रपान करणेही पातकासारखे वाटायचे. आता विद्यार्थी-विद्यार्थिनी कॉलेजच्या निवडणुकांत, स्नेहसंमेलनात आणि क्रीडामहोत्सवात मद्यपानही करून येतात. त्यांची अभिरुची उथळ असते. मला या गोष्टीची विशेष चिंता वाटते."

त्या पालकाच्या विचारसरणीशी कोणीही सूज्ञ मनुष्य सहमत होईल यात शंका नाही. पण एक प्रश्न मला उपस्थित करावासा वाटतो. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व, त्यांची अभिरुची, त्यांची जीवनदृष्टी केवळ विद्यालयातच घडते हा एक गैरसमज आहे. लाचलुचपत, भ्रष्टाचार व्यसनाधीनता, सत्तालोलुपता वगैरे गोष्टींनी आजचे सारे समाजजीवन अधःपतित होत असताना विद्यालयांतील शिक्षक काय करू शकणार? भ्रष्टाचाराची मुळे तर विद्यापीठांतही रुजलेली दिसतात. समाजजीवनाचे असे कोणते दालन भ्रष्टतेपासून अलिप्त राहिले आहे याचे संशोधन केले पाहिजे. सर्व बाजूंनी वेगवान लाटांचे तडाखे खात चाललेली नौका किनाऱ्यापर्यंत पोहोचू शकेल असे मानणे हा वांझ आशावाद आहे. त्या पालकाला मी प्रश्न विचारला, "बाहेरचे वातावरण प्रदूषित आहे. तुम्ही घरातले वातावरण शुध्द ठेवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला आहे काय?"

पालकाने नकारार्थी मान हालवली. त्याचाही निरुपाय होता. आपल्या मुलांमुलींवर उत्तम संस्कार व्हावेत असे त्याला वाटत होते. पण ते कसे करावेत, कोणत्या रीतीने मुलांची मने घडवावीत याची जाण त्याला नव्हती आणि असती तरी दैनंदिन व्यापांतून इतका वेळही काढणे शक्य नव्हते. संत तुकडोजी या संदर्भात म्हणतातः

*मुलगा अभ्यासा लागला। की सात्विक खाणे असावे त्याला।*

*खारट, आंबट, तिखट, मसाला। देऊ नये भोजनी॥*
*साधे, ताजे अन्न द्यावे। वेळेवरि झोपवावे, जागवावे।*
*झोपता, जागता जवळी नसावे। स्पर्शणारे कोणी॥*
*कराया लावावे प्रातर्ध्यान। सायंकाळी प्रार्थना पूर्ण।*
*झोपता, जागता चिंतन। आदर्श महापुरुषांचे॥*
*कोणीही न घ्यावे मादक द्रव्य। तोंडी नसावे नाटकी काव्य।*
*समजावूनि द्यावे सेव्यासेव्य। उपवासहि करवावा॥*

तुकडोजी महाराजांचे हे विचार तरुणांच्या व्यक्तित्वाची जडणघडण करणारे आहेत. त्यांनी आपल्या प्राचीन परंपरेला अनुसरून हे विचार विवरून सांगितले आहेत. महापरुषांचे आदर्श समोर ठेवावेत हे कितीही न्याय्य असले तरी आज 'महापुरुष' या संज्ञेचा अर्थच बदलून गेला आहे. केवळ तरुणांचा नव्हे तर साऱ्या समाजाचाच 'आदर्श' तपासून पाहण्याची जरुरी आहे. साधुसंत, छत्रपती शिवाजीसारखे राज्यकर्ते, राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी सारे जीवन चंदनासारखे झिजवणारे महात्मे आणि हुतात्मे, कवी, शास्त्रज्ञ, शूर सेनानायक यांच्या ऐवजी स्त्रैण चाळे करणारे सिनेमातले नायक आदर्शपदी प्रतिष्ठित होत असतील तर इतिहासाला वेगळीच कलाटणी मिळेल. हे निराशावादी दृष्टीने मी म्हणत नाही. आदर्शाची ओळख पटावी आणि त्यांच्यापासून प्रेरणा घ्यावी असे संस्कारित वातावरण समाजातल्या प्रत्येक घटकाने प्रयत्नपूर्वक निर्माण केले पाहिजे. आपल्या घरापासूनच त्याची सुरुवात व्हावी.

आजच्या तरुणाने समाज आणि राष्ट्र यांचीच ईश्वर समजून भक्ती व सेवा करावी. 'देव मस्तकी धरावा। *अवघा हलकल्लोळ करावा' हे संत रामदासांचे* वचन आज राष्ट्र-देवाच्या संदर्भात घ्यावेत. आजचे विद्यार्थी संस्कारक्षम निश्चित आहेत. सुसंस्कार करणाऱ्या शक्ती मात्र क्षीण होत आहेत. समाजाने या ज्योती पुन्हा प्रज्वलित कराव्यात. या ज्योती तेवत्या राहाव्यात. संत तुकडोजी म्हणतातः
*या कोवळ्या कळ्यांमाजी लपले। ज्ञानेश्वर, रवींद्र, शिवाजी।*
*विकसता प्रगटतील समाजी। शेकडो महापुरुष॥*

◈◈

# आत्मसुगंधाची लाट

काही ग्रंथ कीर्तीसाठी लिहिले जातात, तर काही ग्रंथांची निर्मिती संपत्तीच्या इच्छेतून होते. 'मी माझ्या सुखासाठी लिहितो. इतरांशी मला कर्तव्य नाही' असे म्हणणारेही काही लेखक असतात. कोणी विद्वत्तेचे प्रदर्शन करण्यासाठी ग्रंथलेखनाकडे वळतो. पण काही ग्रंथकार आपल्या आत्मवेलीवर फुललेल्या फुलांचा सुगंध जगाला मिळावा आणि जगातली दुर्गंधी अंशमात्र तरी कमी व्हावी या उत्कट सात्त्विक हेतूने लिहितात. संपत्ती आणि कीर्ती यांची त्यांना अभिलाषा नसते. संस्कृतीच्या झाडाला सत्कर्माची फळे यावीत आणि या झाडाच्या सावलीत दुःखार्त लोकांना सावलीचे सुख घेता यावे, ही त्यांची अपेक्षा असते. आपल्या उदारतेने सारे पाणी तहानलेल्या धरित्रीला देऊन मेघ ज्याप्रमाणे आपले अस्तित्वही संपवून टाकतो, त्याप्रमाणे काही कवी आपल्या प्रतिभेच्या अमृधारांचा वर्षाव करून समाजमनाची भूमी सस्यशामल करतात. सुजल, सफल बनवतात आणि अनंतात विलीन होऊन जातात. असे महनीय प्रतिभाप्रभू फार थोडे असतात, कित्येक शतकांतून त्यांची आणि आपली भेट होते. असे प्रज्ञासूर्य, असे तापहीन मार्तंड शेकडो वर्षांतून क्वचितच उदयाला येतात. पण त्यांच्या उदयाने आसमंत निर्मळ होते, जीवनाला अर्थ प्राप्त होतो. मरणालाही मोल येते.

ज्ञानेश्वर नावाचा एक सूर्य सातशे वर्षांपूर्वी 'मराठीचिये नगरी' जेव्हा उगवला, तेव्हा मराठी भाषेला तारुण्याचे पंख फुटले. तिच्या अंगोपांगांवर सौंदर्याचे रोमांच आले. आनंदरसात ती न्हाली. ज्ञानदृष्टीचा कुंकुम तिच्या नितळ कपाळावर शोभू लागला. तिच्या भाषेला लालित्याचे वरदान लाभले. ज्ञानेश्वरांच्या हृदयाचा आविष्कार 'भावार्थदीपिका' या नावाने झाला. वाऱ्यावादळातही या दीपिकेची ज्योत विझू शकली नाही. ती अधिकाधिक तेजाने तेवत आहे आणि हृदया हृदयातले दीपक प्रज्वलित करीत आहे. आपल्या ग्रंथलेखनाबद्दल ज्ञानेश्वर म्हणतातः

*हे स्वानंदभोगाची सेल। भलतयासीचि देईल।*

*सर्वेंद्रिया पोषवील। श्रवणाकरवी॥*
*चंद्राते आंगवणे। भोगूनि चकोर शाहाणे॥*
*परी फावे जैसे चांदणे। भलतेया॥*
*तैसे अध्यात्मशास्त्री इथे। अंतरंगाचि अधिकारिये।*
*परि लोकु वाक्‌चातुर्ये। होईल सुखिया॥*

माझी ही टीका (ग्रंथ) कोणालाही आत्मानंद भोगाचा वाटा देईल आणि श्रवणाच्या माध्यमातून सर्व इंद्रियांना तृप्त करील. आपल्या आंगिक सामर्थ्याने चंद्राचा भोग घेऊन चकोर शहाणा ठरला. पण चंद्राचे चांदणे मात्र कोणालाही अंगावर घेता येते. त्याप्रमाणे या अध्यात्मशास्त्रग्रंथाचे अंतर्मुख वृत्ती असलेलेच अधिकारी आहेत. शब्दलालित्याने आणि चातुर्याने या ग्रंथामुळे सर्व लोक सुखी होतील. 'पसायदाना'त ज्ञानेश्वरांनी आशा प्रकट केली आहे. हा ग्रंथच ज्यांचे जीवन होऊन राहिला त्यांना इहपरलोकीचा सुखभोग मिळून ते विजयी होतील.

ग्रंथलेखनामागे उदात्त प्रेरणा असल्याशिवाय आणि ग्रंथात लेखकाच्या आत्मस्वरूपीचा सुवासिक प्रकाश स्वच्छ पडल्याशिवाय तो ग्रंथ क्रांती घडवू शकत नाही.

'ज्ञानेश्वरी'त क्रांती आहे, शांती आहे, म्हणूनच तृप्तीही आहे. विविधरसांचा आणि रंगगधांचा सुंदर आविष्कार आहे. 'सुंदर' हे मूल्य सत्य आणि शिव त्यांच्या आधारानेच पोसले जाते. संतांच्या साहित्यात ज्ञानाचे आणि सौंदर्याचे जे नवनवोन्मेष आढळतात, त्यांचा रसास्वाद घेण्यासाठी 'अतिहळुवारपणा चित्ता आणुनिया' जो भावमग्न झाला असेल, त्यालाच येथे रममाण होता येईल. सुंदर आणि श्रेष्ठ साहित्याची संगत ज्याला लाभत नाही, त्याचे सारे आयुष्य ही अज्ञानयात्रा ठरते. म्हणूनच भावार्थदीपिका ही सागरावर विलक्षण आवेगाने उचंबळून आलेली आत्मसुगंधाची, कधीच न ओसरणारी प्रमत्त लाट आहे. तिचा किंचित स्पर्शदेखील जीवनाला प्रसन्न व पावन करील.

# गुरूसारखा दाता नाही

'मी कोणाचेही शिष्यत्व कधीच पत्करले नाही. माझा कुणीही गुरू नाही. मीच माझा गुरू झालो. मीच मला वाट दाखवली आणि त्या वाटेने मी चालत राहिलो' असे उद्‌गार एखादा कर्तृत्वसंपन्न मनुष्य कधीतरी काढतो. त्याच्या या विधानात काही प्रमाणात तथ्य असते. लौकिक अर्थाने एखाद्या गुरूचे मार्गदर्शन त्याला मिळालेले नसते. या अभिप्रायाने मीच माझा गुरू आहे हे म्हणणे संयुक्तिक ठरेल, पण मनुष्य काही श्रेष्ठ व्यक्तित्वांना मनोमन आदर्श मानून त्यांचे अनुसरण करीत असतो. प्रत्यक्षपणे नव्हे तरी अप्रत्यक्षपणे कित्येक व्यक्ती आपल्या गुरू बनलेल्या असतात. काळ, परिस्थिती, अनुभव, सभोवतालचा समाज यांच्यामधून संवेदनशील मनुष्य काही संस्कार आणि ज्ञान ग्रहण करीत असतो. काही गुरू मात्र इतके समर्थ असतात, की 'आपणांसारखे करिती तात्काळ' याची ते प्रचिती देतात. गुरूचा प्रभाव नाकारण्यात अर्थ नाही. रामकृष्ण परमहंसांसारखे महनीय गुरू भेटले नसते तर नरेन्द्राचा 'विवेकानंद' होऊ शकला असता काय? संत कबीराने तर गुरूची महती गाताना म्हटले आहे :

*गुरू समान दाता नाहि, जाचक सिष समान।*
*तीन लोक की संपदा, सो गुरु दीन्हा दान॥*
*गुरु कुम्हार सिष कुंभ है, गढ़-गढ़ काढै खोट।*
*अंतर हाथ सहार है, बाहर बाहै चोट॥*
*गुरु को सिरपर रखिए, चलिए, आज्ञा माहि।*
*कहै कबीर ता दास को, तीन लोक डर नाहि॥*

गुरूचे सामर्थ्य कबीरांनी ईश्वरी सामर्थ्याशी समान मानले आहे. त्रैलोक्यात आणि नवखंडात 'गुरु से बडा न कोय' असे म्हणून त्रैलोक्याची संपदा आपल्या शिष्याला दान देणारा हा गुरू सर्वसंपन्न आहे. तो कुंभ घडविणाऱ्या कुंभकारासारखा बाहेरून आघात करणारा; पण आतून आधार देणारा रचनाकार आहे. ज्याच्या मस्तकावर गुरूचा वरदहस्त आहे, त्याला तिन्ही लोकात कसलेही भय नाही.

सकृत्‌दर्शनी हे शब्द अतिशयोक्तिपूर्ण आहेत असे दिसते, पण त्यातला आशय नीट समजून घेतला पाहिजे. कबीरांना अभिप्रेत असलेला गुरू कोणतीही भौतिक संपत्ती देत नाही. अशी संपत्ती मनुष्याला फार काळ सोबतही करू शकत नाही. जी संपत्ती चोर, दरोडेखोर लुटू शकतात, व्यसनात आणि ख्यालीखुशालीत जी वाहून जाऊ शकते, तिला संपत्ती ही संज्ञा साधुसंत देत नाहीत. कोणताही विचारशील मनुष्य 'हीच खरी संपत्ती' असे म्हणू शकणार नाही. जीवनाकडे निरामय तटस्थतेने पाहण्याची स्वच्छ दृष्टी मिळणे, हीच सर्वोच्च संपत्ती आहे. या प्रकारचे वैभव गुरूकडून प्राप्त होऊ शकते हे कबीरांचे वचन आहे. जो केवळ पोट भरण्याची विद्या शिकवितो, त्या सामान्य पोटार्थी गुरूबद्दल संत कबीर बोलत नाहीत. अशा गुरूंची विद्याविक्रीची दुकाने चालूच असतात. तीदेखील एक सामाजिक गरज आहे. त्या तथाकथित गुरूंचा मी उपहास करीत नाही; पण ज्या गुरुकृपेमुळे जीवनाचा कुंभ कलात्मक रूप धारण करतो, ती गुरूची शक्ती प्रत्येकानेच मिळविण्याचा प्रयत्न यथामती केला पाहिजे. ज्याचा गुरू समर्थ असतो तो आपल्या भविष्याला सामर्थ्यपूर्ण आकार देऊ शकतो.

संत ज्ञानेश्वरांनी आपल्या गुरूभक्तीचा विलक्षण सुंदर असा कृतज्ञ शब्दांचा वसंतोत्सव ज्ञानेश्वरीतून साजरा केला आहे. निवृत्तिनाथ नावाच्या गुरुवृक्षाला आलेले रसमधुर, अलौकिक फळ म्हणजे 'ज्ञानेश्वर'. ज्ञानेश्वर म्हणतात :

*नेणो कैसी वसंत संगे। अवचितिया वृक्षाची अंगे।*
*फुटती तै तयांही जोगे। धरणे नोहे॥*
*पद्मिनी रविकिरण। लाहे मग लाजे कवण।*
*कां जळे शिवतले लवण। आंग भुले॥*

गुरूच्या अनुग्रहाचे, सामर्थ्याचे आणि महात्मतेचे वर्णन करताना कबीर काय किंवा ज्ञानेश्वर काय, त्यांचे शब्दन् शब्द कसे फुलून येतात आणि सुवास देतात, हे सांगणेच नको.

# *निरोप*

आज मी आपला निरोप घेत आहे. एक वर्षभर मी आपल्याशी संवाद करण्याचा प्रयत्न मनःपूर्वक केला. मला आपल्याकडून जो स्नेहपूर्ण प्रतिसाद मिळाला तो माझ्या जीवनातला एक आनंदाचा ठेवा आहे. अनेकानेक वाचकांची पत्रे मला आली. अनेकांनी प्रत्यक्ष भेट घेतली. संतांच्या साहित्यावर आणि त्यांच्या व्यक्तित्वावर विलक्षण प्रेम करणाऱ्या या रसिकांमुळे माझी लेखणी लिहीत राहिली. खरेतर ही सारीच संतकृपा आहे.

लेखनाच्या निमित्ताने संतजीवनाचा आणि काव्याचा अभ्यास करण्याची दुर्मिळ संधी मला मिळाली व त्यामुळे माझ्या आयुष्यात आनंदाचे, प्रसन्नतेचे काही सूर निर्माण झाले. याचे कारण संत ही प्रसन्नतेची व प्रेमाची प्रतीके आहेत. असे सांगतात, की महान साधू, धर्मपुरुष ज्या प्रदेशातून संचार करीत असतो तो प्रदेश सुखाने मोहरून जातो. त्या प्रदेशातली हवा, पाणी शुध्द होते. वसंताच्या आगमनाने सृष्टी जशी हरितसुंदर होते तेच सौंदर्यपूर्ण वरदान त्या प्रदेशाला मिळते. याचा अर्थ इतकाच, की साधुसंतांच्या सहवासाने, उपस्थितीने वातावरण बदलून जाते. सद्‌भावनांच्या वेली फुलू लागतात. सत्कृत्यांचे वृक्ष फळे धारण करतात. माणसांच्या मनात सात्विक विचारांच्या लहरी उमटू लागतात. हे वर्णन अतिशयोक्तीचे नाही. यातला आशय पूर्णपणे वास्तव आहे. संतांच्या सत्वपूर्ण भावनेत अशी उत्कट शक्ती असते, की तामस वृत्तीचे ते सात्विकतेत परिणमन करू शकतात. स्वार्थ गळतो; परमार्थ उदयाला येतो. हा त्यांच्या व्यक्तित्वाचा प्रभाव असतो. दुर्गंध ज्याप्रमाणे वातावरण प्रदूषित करू शकतो त्याप्रमाणे श्रेष्ठ भक्तांच्या, संतांच्या, महापुरुषांच्या हृदयीचा अवीट सुवास आजूबाजूच्या दुर्गंधाला सुगंधात रूपांतरित करू शकतो. म्हणून तर संत विचारांचा सहवास आम्हाला अखंड हवा आहे. संपन्न जीवनासाठी संतविचारांची थोडीफार शिदोरी आमच्याजवळ असेल, तर आम्ही काट्याकुट्यांतून, अंधारातून प्रवास करताना कंटकांची शल्ये बोथट होतील. आणि दृष्टीसमोरचे तिमिर निरसून

जाईल. जगण्यातला आनंद स्वच्छ मनाने उपभोगता येईल. तुकोबांसारख्या सत्पुरुषाने 'संत-सहवासा'ची महती परोपरीने गायिली आहे. निसर्ग माणसाला जीवन देत असेल, पण जीवनाला अर्थ आणि सौंदर्य देण्याचे कार्य संतांचे विचार करू शकतात. ते स्वत:साठी जगत नाहीत. जगाला जगविण्यासाठी त्यांचे जीवन विकसित झालेले असते. तुकोबांच्याच शब्दातं सांगता येईल :

*चंदनाचे हात पाय ही चंदन। परिसा नाही हीन कोणी अंग॥*
*दीपा नाही पाठी पोटी अंधकार। सर्वांगे साकर अवघी गोड॥*
*तुका म्हणे तैसा सज्जनापासून। पाहाता अवगुण मिळे चि ना॥*

सज्जनांचे व्यक्तित्व संपूर्णपणे असेच असते, यात शंका नाही. असे साधुसंत आजच्या रोगट बनत चाललेल्या, विकलांग होणाऱ्या आत्मघातकी जगाला हवे आहेत. संतांनी या जगाला उन्नत स्वप्ने देण्याचा जो प्रयत्न केला त्यातूनच मानवी संस्कृतीला समृध्दी येऊ लागली. आज पुन्हा संतवृत्तीच्या चंदनगंधाने अंतर्बाह्य माखलेली चंदनी स्वप्ने आपल्याला हवी आहेत. माझ्या वाचकांचा निरोप घेण्यापूर्वी त्यांच्या आणि माझ्या वतीने सर्व संतमहंतांना विनवून सांगतो :

'आपल्या भव्य आणि विशाल स्वप्नांची पूर्ती आम्ही केव्हा करू शकू ते सांगता येत नाही. पण आम्हा लहानांना तुम्ही विचारांनी, संकल्पांनी महान करण्याचा प्रयत्न करीत आहात. निदान तुमच्या स्वप्नांची मोडतोड करणाऱ्या दुष्ट शक्तींचा आम्हाला वेढा पडू नये. आमच्याही दृष्टीत आम्हाला पेलतील अशी स्वप्ने द्या. हृदयात प्रेम आणि भक्ती द्या. बाहूत शक्ती द्या. भाषेला अर्थ द्या. आमच्या जीवनाला प्रामाणिक भावनेचा सूर द्या, हीच प्रार्थना.'

ज्याला समाजप्रबोधन करायचे आहे, त्याची भाषा परिणामकारक असली पाहिजे. शब्द दुबळे, नीरस, अर्थहीन, शिळे, सांकेतिक, मरगळलेले असे असतील, तर श्रोत्यांवर ते कसला परिणाम करणार? शब्दांत रसही असावा आणि कसही. संत नामा, तुकयांच्या शब्दांतही हे गुणधर्म आहेत. शब्द बाहेरून उसने आणावे लागत नाहीत. विचारभावनांच्या उचंबळत्या लाटेवर आलेला दर्शनी आवेग म्हणजेच शब्द. असे अर्थपूर्ण शब्द श्रोत्यांच्या मनात ज्ञानाची दिवाळी साजरी करतात. संत महंतांच्या शुचिर्भूत वाणीतून उमटलेला साधा शब्द देखील प्रभातीचा प्रसन्न प्रकाश घेऊन येतो. कारण, त्याच्या पाठीमागे एक उज्ज्वल, चिरसुंदर, पावन, कल्याणकारक, ज्ञानदायक मनोवृत्ती असते. शब्दकोशात शब्द पिकत नाहीत. श्रेष्ठ विचारवंतांच्या आणि संतांच्या भावकोशातच त्यांची निर्मिती होते. संतांच्या वाणीला त्यांच्या हृदयसौंदर्याचे पाणी मिळाल्यामुळे तिने साहित्यालाच नव्हे, तर संस्कृतीलाही तजेलदार बनविले आहे. शब्दांच्या माहात्म्याबद्दल संत तुकोबा म्हणतात,

**आम्हां घरी धन शब्दांचीच रत्ने। शब्दांचीच शस्त्रे यत्न करू।।**
**शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन। शब्दे वाटू धन जन लोकां।।**
**तुका म्हणे पाहा शब्दचि हा देव। शब्देचि गौरवपूजा करू।।**

....पण चहुबाजूंनी शत्रू टपले आहेत. राष्ट्रद्रोही प्रवृत्ती देशात फणा काढीत आहेत. भयभीत झालेले सज्जन जीव मुठीत धरून बसले आहेत आणि गुंडपुंड व दुर्जन असे कीचक, सैरंध्रीचा राजरोसपणे पदर ओढीत आहेत. ....राजा मात्र आपल्या सिंहासनावर बसून धृतराष्ट्राच्या दृष्टीने या तमाशाकडे पाहात आहे. या परिस्थितीत काय करावे? समर्थ रामदासांच्या मते राजा :

**गनीमाच्या देखतां फौजा। रणशूरांच्या फुर्फुरती भुजा।**
**ऐसा पाहिजे की राजा। कैंपक्षी परमार्थी।।**
**तयास देखता दुर्जन धाके। बैसवी प्रचीतीचे तडाखे।।**
**बंड पाषांडाचे वाखे। सहजचि होती।।**

**(अमृतकण कोवळे मधून)**

# संतवीणेचा झंकार

संतांच्या हृदयवीणेचे श्रवणमधुर झंकार डॉ. निर्मलकुमार फडकुले यांच्या हळुवार, रसोद्ग्राही लेखणीने टिपले. संतमनांतले संगीत जीवनाला उदात्ताच्या पातळीवर घेऊन जाते. ही पातळी कशी गाठायची याचे उद्‌बोधक विवरण लेखकाने केले आहे. वाचकांना 'आनंदाच्या डोहातले' 'आनंद तरंग' या पुस्तकांत अनुभवायला मिळतील.

संतांनी जीवनाकडे आशावादी, पुरुषार्थी दृष्टिकोनातून पाहिले आणि मुळांत दुःखमय वाटणाऱ्या बेसूर जीवनात आपल्या अंतःकरणातले भावसंगीत कसे ओतले याची रसपूर्ण चर्चा निर्मलकुमार फडकुले यांनी आपल्या काव्यमय सहजरम्य शैलीतून केली आहे. मराठी साहित्यात रससिध्द समीक्षेचे दालन त्यांच्या लेखणीने उघडले आहे.

आपल्या जीवनांत सर्व रसरंगांचे संमिलन करून ते कसे भावसंपन्न बनवावे याची समीक्षा करणारे हे चिंतनशील असे भाष्य आहे. आयुष्याच्या वाटेत सात्विक विचार-भावनांची फुले कशी मिळवावीत आणि त्यांचा सुगंध कसा घ्यावा याचा तर्कशुध्द विचार मांडणारे हे पुस्तक रसिकांना सुखानुभव देईल.

सुमेरू प्रकाशन